# श्रीज्ञानेश्वर महाराज



[illegible] ।
[illegible] ।
[illegible] ।
[illegible] ॥

॥ श्रीमत्सद्‌गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# श्रीगुलाबरावमहाराजकृत

# ग्रंथसंग्रह.

## सूक्तिरत्नावलि

द्वितीय यष्टि ( उत्तरार्ध. )

हें पुस्तक

प्रकाशक

श्रीनिवास रामचंद्र हरिदास

यानीं

नागपूर येथें

' श्रीज्ञानेश्वर मुद्रणालय ' मध्यें छापिलें.

आवृत्ति १ ली.

श्रावण शुद्ध १ शके १८३२.

या पुस्तकाचे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपले
स्वाधीन ठेविले आहेत.

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥

# परिचय.

न यत्र वैकुंठकथा सुधापगा ।
न साधवो भागवतास्तदाश्रयाः ॥
न यत्र यज्ञेशमखा महोत्सवाः ।
देवेंद्रलोकोऽपि न वै स सेव्यताम् ॥

( श्रीमद्भागवत. )

जेथ तो श्रीवल्लभ । तेथ भक्तकदंब ॥
तेथ सुख आणि लाभ । मंगळाचा ॥ ( तात. )

अनिर्देश्य ब्रह्माचें स्वरूप सांगतांना 'नेति नेति' ह्मणून श्रुति-जननी स्तब्ध झाली, तथापि पुनः ब्रह्माचे तीन निर्देश सांगून ' जय जय जह्यजामजित दोषगृभीतगुणां त्वमसि यदात्मना समवरुद्धसमस्त-भगः ' इत्यादि भगवत्स्तुतिपूर्वक जडजीवांचा उद्धार करण्यासाठीं अनादिकालापासून तिचा वाग्विलास अव्याहत सुरूच आहे. भगवती गंगा समुद्रास मिळाल्यानंतरही अनादि अनुस्यूत अशा आपल्या पुण्य-जलप्रवाहानें अझून जगाला पावन करीतच आहे. तद्वत् पूर्ण ज्ञानी असे भगवज्जन निर्ग्रंथ होऊनहि भगवंताचें गुणानुवाद गातच असतात. याप्रमाणें जननी श्रुति, भगवती गंगा व संत यापैकीं एकेकाच्या आंगीं जर जगाला पावन करण्याचें अमोघ सामर्थ्य आहे, तर हे तीन्ही ज्या-च्या ठिकाणीं एकवटलेले आहेत असे सत्पुरुष लीलामात्रेंकरून जगाचा उद्धार करतील ह्यांत नवल काय? ह्या तीन्ही विभूती मिळूनच आधिकारिक भगवद्भक्तांची मूर्ती बननेली असते. असें नसतें तर

' वाचा संस्कृतप्राकृता श्रुतिशिरो दृष्टे परब्रह्मणि,' ' तीर्थीकुर्वन्ति तीर्थानि स्वांतस्थेन गदाभृता,' 'तयांचे बिसाट शद्ब । कां ह्मणोनयेती वेद? । सदेहसच्चिदानंद । कां नोहावे ते? ।।', ' जे केवळ तीर्थांसी तीर्थरूप ', 'सेतुबंध वाराणासी । अवघीं तीर्थें पायापाशी' ।।, 'ब्रह्मरूप अहि ब्रह्मविद ताकी वाणी वेद । भाखा अथवा संस्कृत करत भेदभ्रमछेद' ।।, इत्यादि वचनांस वैयर्थ्य आलें असतें. भगवद्गुणानुवाद करणें हा भगवद्भक्तांचा स्वभावच बनून गेला असतो. त्यांच्या स्वैर कथाच बोधप्रद असून सामान्य जनांस सन्मार्गीकडे वळवितात. त्यांचा देहभाव अजीबात नष्ट झालेला असून त्यांचे ठिकाणीं अलौकिक भगवत्प्रेम, असामान्य दातृत्व, अचिंत्यलीलाविग्रह व अहैतुक दया दिसून येते. असे सत्पुरुष भक्तिप्रादुर्भावकालीं जगावर येऊन अद्वैत भक्तीचा जीर्णोद्धार करीत असतात. श्रुतिस्मृतिवचनांवरून ह्या सगळ्या संतांचें गुरुत्व व्रजगोपिकाकडेस येते व तीच परंपरा नाथमहाराजाकडे ( प्रसिद्ध गुलाबराव महाराज यांच्या कडे ) येते.

महाराजांचे ग्रंथ **सूक्तिरत्नावली** ह्या नांवाखालीं प्रसिद्ध होत आहेत. ह्या **सूक्तिरत्नावलीची** प्रथम यष्टि मागेंच प्रसिद्ध झाली असून द्वितीययष्टि पूर्वार्धही नुकतांच प्रसिद्ध झाला आहे व आज हा उत्तरार्ध प्रसिद्ध होत आहे. ह्यांत पत्रें, ध्यानयोगदिवाकर, भगवद्भक्तिसौरभ, प्रीतिनर्तन, गोविंदानंदसुधा व मातृपितृभावनाष्टक हे ग्रंथ आले आहेत.

हे ग्रंथ महाराजांच्या स्वैरलीलेंत निर्माण झाले आहेत. ह्या सत्पुरुषाच्या चित्तांत भगवत्प्रेमवृत्तीचा प्रवाह फार प्रबल आहे, व तोच 'माधुर्य' भक्तीच्या रूपानें परिणाम पावून, डोक्यावर सुंदर केशकलापांची वेणी, कपाळास कुंकू, गळ्यांत मंगळसूत्र, हातांत सुवर्णकंकण, पायांत जोडवीं, व नेसायाला शुभ्र धोतर असा त्यांचा नेहमींचा थाट बनलेला आहे! यामुळें त्यांच्याकडे पाहणारास क्षणभर भगवान अर्धनारीनटेश्वरांच्या ( शंकराच्या ) दर्शनाचा भास होऊन तो आश्चर्यचकित होतो. श्रावण वद्यांतलि श्रीकृष्णजन्मोत्सव आणि हेमंत ऋतूच्या प्रथम महिन्यांतील कात्यायनीव्रत हीं दोन ह्यांच्या माधुर्य

भक्तिप्रेमाचींच द्योतकें होत. ह्या माधुर्यभक्तीच्या प्रेमळ लीलांतच महाराजांची सर्व दिनचर्या व रात्रिचर्या चाललेली असते.

स्नान होऊन कोमल बिल्वपत्रांनीं पार्थिवलिंगाचें पूजन झाल्या-नंतर धूपदीपादि पूजोपचारांच्या थाटांत कधीं कधीं 'आदौ कर्मप्रसंगात् कलयति कलुषं मातृकुक्षौ स्थितं माम्' 'न मंत्रं नो यंत्रं तदपि च न जाने स्तुतिमहो' इत्यादि स्तोत्रांनीं उंच व गोड स्वरांत शंकराचें व भगवती अंबेचें स्तवन चाललें असतें, तर केव्हां हातांत टाळ असून 'जय गोविंद राधे गोविंद', 'जय जय विठ्ठल जय हरि विठ्ठल', असा प्रेमपुलक-युक्त नामघोष व मधून मधून अंत: करणास प्रेमाचे पाझर फोडणाऱ्या नवीन अभंगांची व पदा वगैरेची बहार उडत असते; कधीं भोजनाचा प्रसंग चालला असून ग्रासोग्रासीं महाराज ज्ञानेश्वरमाउलीचें स्मरण, व मधून मधून नवनि आर्या, श्लोक, वगैरे ह्यांचा तडाका चालला असतो. केव्हां सामान्य मनुष्याला उपयोगी पडणारीं साधनें सुलभ शद्वांत सांगण्याकरितां नवीन ग्रंथाची रचना चालली असते, तर केव्हां तुमडी वाल्याच्या ग्राम्य भाषेंतच श्रुतीचे सिद्धांत भराभर पण मनोवेधक रीतीनें बाहेर पडत असतात. कधीं पूर्वीच्या संतांची एखादी गोडशी प्रक्रिया विशेष स्पष्ट करण्याकरितां लेखन चाललें असतें, तर कधीं नास्तिकांचें तोंड बंद करण्या करितां नुसत्या तर्कानेंच अनेक वादांच्या खंडनपर ग्रंथ निर्माण होत असतो. कधीं साधकांच्या अभ्यासांतील अडचणी नाहींशा करणारा ग्रंथ चालला असतो, तर कधीं सद्गुरुचरण-तीर्थाच्या नित्यतेचें युक्तिसिद्ध निरूपण चाललें असतें. कधीं आबाल-वृद्धानां समजण्याजोगीं सुबोध वचनेंच मुखातूंन निघत असतात, तर कधीं उपासना व भक्ति ह्यांतील भेद सांगून अद्वैत प्रेमाची खूण पटवून देण्याचा यत्न चाललेला असतो. कधीं सुहृन्मित्रांनां अनेक प्रक्रिया-भरित गोडशीं पत्रें लिहीत असतात, तर कधीं निरनिराळ्या योगमार्गा-नी ज्ञानसिद्धि मिळविण्याच्या युक्तीचें लेखन चाललें असतें. ह्या सर्व ग्रंथांत देवगुरुभक्तीचें वर्णन प्राधान्येंकरून असतें, व कित्येक प्रसंगीं तर भक्तिचा प्रवाह अनावर होऊन सबंध ग्रंथच माधुर्यभक्तिप्रचुर बनत जातो.

महाराजांच्या ऊहासिद्धीचा प्रवाह इतका जोरदार आहे कीं ते बोलूं लागले असतां किंवा नवीन ग्रंथ करूं लागले असतां बरेंच प्रसंगीं शद्ब ऐकून नुसत्या अर्थाकडेही अनुसंधान ठेवणें सामान्य श्रोत्यांस कठीण पडतें, मग लेखन तर दूरच राहिलें. ज्ञानेश्वरीनिरूपणप्रसंगीं त्यांच्या ओव्या अथवा गद्य ऐकणारांस बहुतेक ह्याचा अनुभव येतो. ग्रंथ लेखनसमयीं दयेनें तेच आपल्या वाणीचा वेग जेव्हां बेताचा ठेवतात तेव्हां लेखन होतें. पण त्यांतही बऱ्याच प्रसंगीं लेखकांची गडबड उडत असते. तथापि, महाराजांचे मुख्यलेखक उमरावती येथील गुरुभक्तिपरायण रा० रा० हरि गणपत केवले हे बरेच जलदकलमी असून न गडबडतां लेखन चालवीत असल्यामुळें बहुतेक ग्रंथलेखनाचें श्रेय त्यांच्याकडेसच येतें. असो. ह्या ग्रंथलेखनाकडे महाराजांचा अगदीं अल्प काळच खर्च होतो व बाकीच्या वेळांत वेदांतचर्चा, ग्रंथनिरूपण, दर्शनास येणाऱ्या जिज्ञासू लोकांचे शंकासमाधान, वगैरे अनेक लोककल्याणाच्या गोष्टी चालू असतात.

ह्या यष्टींत आलेल्या कठीण ग्रंथांचें प्रयोजन व विषयदिग्दर्शन त्या त्या ग्रंथांच्या आरंभीं थोडक्यांत दिलें आहे. हे ग्रंथ साहजिक प्रेमाच्या ओघांत महाराजांच्या मुखांतून जसे निघाले तसेच लिहून छापले आहेत. ह्याविषयीं सांगावयाचें तें एवढेंच कीं लोकहितार्थ झटणाऱ्या मोठमोठ्या महात्म्यांचे ग्रंथ जसे त्यांच्या आचरणाचेंच शुद्ध प्रतिबिंब असले पाहिजेत व असतात, तसेच हेही असल्यामुळें यांच्या अध्ययनानें लोकांस सन्मार्ग लागून त्यांची नीतिमत्ता वाढेल व भगवत्प्रेमाविषयीं लालसा उत्पन्न होईल. दुसरी गोष्ट अशी कीं, नुसते वेदांत ग्रंथ घेण्याच्या प्रवृत्तीला उत्तेजन न देतां प्रत्येकानें आपलें आचरण सुधारून चित्तशुद्धि करण्याचाही कांहीं यत्न केला पाहिजे हें महाराजांचें मुख्य धोरण आहे व अशा प्रकारचा प्रयत्न करणारांच्या विचारशक्तीला या ग्रंथाचें साह्य निश्चयानें होईल यांत संशय नाहीं.

आणखी एका गोष्टीचा उल्लेख येथें करणें अवश्य वाटतें. महाराज हे दोन्ही डोळ्यांनीं अंध असून ह्यांचें वय हल्लीं सुमारें तीस वर्षांचें असल्यामुळें व एका खेडेगांवांत यांचा जन्म होऊन तेथेंच ते वाढल्या-

मुळें इतकी अलौकिक विद्या यानां कशी आली असावी ? असा प्रश्न त्यांना पाहणारांच्या मनांत सहज उत्पन्न होतो. ह्या प्रश्नाचें समर्पक उत्तर तातांच्या पुढील ओव्यांत आहे:—

‘ जे वर्षशतांचिया कोडी । जन्म सहस्रांचिया आडी । लंघिता पातला थडी । आत्मसिद्धीची ॥ ह्मणोनि साधनजात आघवे । अनुसरे तया स्वभावें । मग आयतिये बैसे राणिवे । विवेकाचिये ॥ × तैसी दशेची वाट न पाहतां । वयसेचिया गांवा न येतां । बाळपणींच सर्वज्ञता । वरी तयाने ॥ तिये सिद्धप्रज्ञेचेनि लाभें । मनचि सारस्वते दुभे । मग सकळ शास्त्रें स्वयंभे । निघती मुखें’॥ ह्याशिवाय ‘ऊह’ आणि ‘दान’ ह्या ज्या दोन वेदान्ताच्या सिद्धी सांगितल्या आहेत त्या अनेक जन्मीच्या वेदान्तचिंतनानेंच प्राप्त होत असतात.

असो ! तात्पर्य संसार विषवृक्षावर घरटें करून राहणारा हा जीवपक्षी जोपर्यंत तेथल्या क्षुद्र ( विषय ) फलांचा लोभ सोडून ‘सच्छास्त्र’ व ‘सत्संग’ हीं जीं दोनच अमृतमय फळें त्या झाडाला लटकलीं आहेत त्यांचें सेवक करीत नाहीं तोपर्यंत त्या वृक्षावरील त्याच्या जन्मयात्रेच्या घिरट्या चुकत नाहींत. ह्या अमृतमय फलांचें सेवन करणें सोडून विष (विषय) फलं मिळविण्या करितां त्यानें तपाद्यनेकसाधनरूपी कितीही उंच भराऱ्या मारल्या तरी अत्यंतदु:खनिवृत्ति आणि परमानंदप्राप्ति कधींही होणें शक्य नाहीं. भगवान् जडभरत रहूगण राजाला सांगतात:—

‘ रहूगणैतत्तपसानयाति न चेज्यया निर्वपणात् गृहाद्वा । न छंदसा नैव जलाग्निसूर्यैर्विना महत्पादरजोभिषेकम् ’ ॥ तो महत्पाद रजोभिषेक मिळणें अत्यंत दुर्लभ आहे. व त्याला उपाय हाच आहे:—

‘ तरी झडझडोनि वहिला निघ । इया भक्तिचिया वाटे लाग । तेणें पावसी अव्यंग । निजधाम माझें ॥ ( तात. )

आतां ज्या सद्गुरुनाथांच्या कृपेनें ही अल्प सेवा दासाकडून घडून आली ती त्यांच्याच चरणारविंदीं अर्पण करून त्यांच्या नामस्मरणांत लेखणीला विश्रांति देतो.

प्रकाशक.

# अनुक्रमणिका.


| ग्रंथाचें नांव. | पृष्ठ. |
|---|---|
| गुरुपंचपदी | |
| पत्रें | १–५१ |
| ध्यानयोगदिवाकर | ५२–७७ |
| भगवद्भक्तिसौरभ | ७८–१४५ |
| प्रीतिनर्तन | १४६–१९२ |
| गोविन्दानन्दसुधा | १९३–१९६ |
| श्रीज्ञानेश्वरमातृपितृभावनाष्टक | १९७–१९८ |
| सूचनाप्रकरण | १९९ |

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥



# ॥ गुरुपंचपदी ॥

१ परब्रह्म गुरुनाथ हमारे ॥ धृ० ॥ इतर देव अवतारहि लेत है । फिर जात निजधाम बिहारे ॥ परब्रह्म० ॥ १ ॥ श्रीगुरु तो हृदयमें रहत है। चिद्रूप विश्वव्यापक सारे ॥ परब्रह्म० ॥ २ ॥ देवकथासे शोकहि होत है। गुरु मिटावत शोक सब ठारे ॥ परब्रह्म० ॥ ३ ॥ अवतार सोऊ अनित्यहि पावत । श्रीगुरु बतावत जग नित डारे ॥ परब्रह्म० ॥ ४ ॥ रज्जुभुजगको नाश करत है। दीपरूप गुरू नाशन-ठारे ॥ परब्रह्म० ॥ ५ ॥ जगको नाश हरी नहि करत। श्रीगुरु बतावत चेतन सारे ॥ परब्रह्म० ॥ ६ ॥ ज्ञानेश्वरकन्याके हृदयमें । ज्ञानेश्वरकृपा ज्ञानेश्वर ठारे ॥ परब्रह्म० ॥ ७ ॥

२ भई मैं बाबा गुरुकी प्यारी ॥ धृ० ॥ अब नहीं जमको डर कुछ हमको। ऊपर हरीकी नारी। भई मैं० ॥ १ ॥ तुमको कृपाकर कहत कहत नित ॥ निगमश्रुती यह बचन बिहारी ॥ भई मैं० ॥ २ ॥ चेतनरूप जगतको जानो।जड सब सांख्यकी पाति निहारी ॥ भई मैं०। ॥ ३ ॥ बेदांत सो षरण पठावत । भक्ती होत कृष्णसाह्य दुलारी ॥ भई मैं० ॥ ४ ॥ ज्ञानेश्वरकन्या जगमाही। ज्ञानेश्वरकृपा ज्ञानेश्वरबन-बिहारी ॥ भई मैं० ॥ ५ ॥

३ गुरुबिन ग्यान प्रेम नहि आवे ॥ धृ० ॥ देह नहीं मैं प्राण नहीं हूं। मन नहि दूर लगावे ॥ गुरुबिन० ॥ बुद्धिनिवारन करकर

ढूंडत । फिर उत्थानको पावे ॥ गुरुबिन० ॥ २ ॥ गुरुकृपाकर देखत सबही । चिद्रुप जगत बिहावे ॥ गुरुबिन० ॥ ३ ॥ चेतनरूपही जगत दिखत है । विशेष रूप पुनी वृत्ति पठावे ॥ गुराबिन ग्यान० ॥ ॥ ४ ॥ ज्ञानेश्वरकन्या सबजनको ब्रह्मग्यानउपर भक्ति शिकावे ॥ गुरु० ॥ ५ ॥

४ गुरुचरणनपें मेरो मन लागा ॥ धृ० ॥ गुरुपग सीस धरत निहासा । मारत रस्सीभुजंगा ॥ गुरु० ॥ १ ॥ रस्सीभुजंग मरण जब पावे । तब गुरुके सत्संगा ॥ गुरु० ॥ २ ॥ कंचनभूषण तैसो सगुण हरी । गुरुकृपातें ठरे हृदंगा ॥ गुरु० ॥ ३ ॥ गुरुकृपातें प्रकट होत है । हृदय माहीं प्रभू रासके रंगा ॥ गुरु० ॥ ४ ॥ ज्ञानेश्वरकन्या अनुभवको । जाहीर कहत बिसंगा ॥ गुरुचरण न पें मेरो० ॥ ५ ॥

५ हमतो भई श्रीगुरुकी गौरी ॥धृ०॥ ब्रह्मा जगको निरमान करत । राखत अज्ञान ठौरी ॥ हमको० ॥ १ ॥ सद्गुरु दयाल हमारे जम । उत्पत्तीके ज्ञानसिदौरी ॥ हमतो० ॥ २ ॥ विष्णु जगतको पालन करतही । काहुंकु राखत काहूं सतावत शौरी ॥ हम० ॥ ३ ॥ गुरु तो हमारे सर्वत्र समाना । वैरी मित्र मिटावत दौरी ॥ हमतो० ॥ ४ ॥ शंकर जगको जाहीर मारत । नहीं मिटावत जमकी डोरी ॥ हमतो० । ॥ ५ ॥ गुरू हमारे जगत नशावत । फिरभी नचावत अन्वयभौरी ॥ हम तो० ॥ ६ ॥ ज्ञानेश्वर कन्या सुखरूपतें । निजबालकको कहन बिनौरी ॥ हम तो० ॥ ७ ॥

६ शरीरबाणीमन गुरुगुण गाऊं ॥ धृ० ॥ जोगिके जोगको माया पधारो । ज्ञानीके वृत्तीको नाच नचाऊं ॥ शरीर० ॥ १ ॥ अभिमानीको दांत खिलाके । हरिभक्तनको शीस सुहावूं ॥ शरीर० ॥ ३ ॥ हरीके चरण हृदयमों धरके । गुरुके चरण मस्तक बिहरावूं ॥ शरीर० ॥ ३ ॥ ज्ञानेश्वरकन्या निश्चय कर । सबको ज्ञानेश्वरपदपें ले जाऊं ॥ शरीरबाणी० ॥ ४ ॥

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# पत्रें.

( विषयदिग्दर्शन )

प्रपंचांतून आपलें मन काढून परमार्थाकडे लावण्याची आपण स्वतः खटपट न करितां, एखाद्या श्रोत्रिय व ब्रह्मवेत्त्या महात्म्याची अकस्मात् भेट होऊन त्यानें केवळ निरपेक्ष बुद्धीनें आपल्या उद्धाराचा यत्न करणें याला सुहृत्संमितीची जोड ह्मणतात. अशा प्रकारची जोड मिळून ज्यांचें भाग्य उदयास आलेलें आहे व ज्यांनीं जप तप अनुष्ठानादि साधनांच्या कचाट्यांत न पडतां "मार्जारशिशु" न्यायानें आपल्या सर्व चित्तवृत्ती सद्गुरूच्या स्वाधीन करून, गुरुसंप्रदायधर्म हेच आपले वर्णाश्रम समजून, "देईल गुरुसेवा। इयाबुद्धि पांडवा। शतजन्मांचा सांडोवा। करिती जे।" हें तातवाक्य प्रमाण मानून, सद्गुरुसेवेला देह झिजविण्याच्या आवडीनें अनेक जन्मपरंपरा घेण्यासाठीं कमर बांधली आहे, त्यांना ती अनुपम करुणावत्सल सद्गुरुमाउली क्षणभरही न विसंबतां, शिष्यचित्तपिलांना आपल्या वृत्तिनिरीक्षण तोंडांत धरून, साधनश्रम-दंत किंचित्‌ही न लागूं देतां, ब्रह्मानंद प्रदेशांत ने आण करून क्षणोक्षणीं कसे लळे पाळीत असते, याचीं अनेक उदाहरणें सहृदय वाचकांस या पत्रसंग्रहांत पहावयास मिळतील.

हीं पत्रें ह्मणजे अनेक शास्त्रसमन्वित सिद्धांतांचें एक अमोल भांडारच असून, एकंदर २० पत्रांचा येथें समावेश केला आहे. त्यांतील विषयानुक्रम येणेंप्रमाणें आहे:—

## पत्र १ लें.

प्रपंचांत परमार्थ विवेकाचें रहस्य.

## पत्र २ रें.

कोणतीही उपासना ब्रह्मरूपाला कशी नेऊन पोंहचविते याविषयीं विवेचन, व भिन्नभिन्न मार्ग-वर्णनाच्या ओव्या.

## पत्र ३ रें.

कर्म, उपासना व ज्ञान यांचें रहस्य, व सिद्धासनाची प्रक्रिया.

## पत्र ४ थें.

नाना प्रतिबंधांविषयीं आशंका, विरहासक्त स्थितीचें वर्णन व सगुणभक्तीचें श्रेष्ठय कथन.

## पत्र ५ व ६ वें.

ज्ञानेशवंदन. ज्ञानाहून भक्तीचें उत्तमत्व वर्णन. अंतर्बाह्य सभाज्ञानाविषयीं भ्रमनिरास.

## पत्र ७ वें.

सिद्धप्रक्रिया कथन व स्वपरमार्ग विरोधपरिहार.

## पत्र ८ वें.

शिक्षण मीमांसा व प्राथमिक शिक्षण सांख्याचें देण्याविषयीं ऐतिह्यदृष्टांतपूर्वक निर्णय.

## पत्र ९ वें.

भगवान् ज्ञानेश्वर तातांच्या सर्वांतर्यामित्वाची प्रतीति घेण्याविषयीं प्रक्रिया, दैवी सिद्धींचा स्वभाव व निष्काम कर्माची महती.

## पत्र १० वें.

All joke चा अनुवाद. चित्ताची व्यापकता व त्याचें दुर्जयत्व. चित्ताचा परिचय झाला नसतां साधनांचें वैय्यर्थ्य. तृप्तीच्या तीन कक्षा व त्यांचीं लक्षणें. लोकालोक, शरीरें, आत्मा, इत्यादि पदा-

थांचा परिचय, क्रिया व फल. ह्या मार्गाविषयीं सांसारिक जनांची उदासीनता.

पत्र ११ वें.

लोकांच्या कल्याणासाठीं सत्पुरुष इतके निरपेक्ष ह्मटत असूनही त्यांच्या सर्वशक्तिमत्वाविषयीं सर्वांचा निश्चय नसतो याविषयीं तुकाराम महाराजांचें उदाहरण, व लोकस्वभावाचें निरीक्षण. अंधविश्वासावर ( Blind belief ) टीका. नाथसंप्रदायानुसार सनत्कुमारादि सतरा गुरूंनीं सांगितलेला भाक्तिविचार. " सूत गाळोनीयां काढिले पदर " ( अभंग )

पत्र १२ वें.

परमात्मप्राप्तीला श्रोत्रियत्व आणि ब्रह्मनिष्ठता या दोहोंचीही आवश्यकता. शास्त्रांवर अलंबुद्धि केव्हां व कशी होते याचें विवेचन. सर्वभाषा प्राकृतच आहेत. भाषाज्ञान ग्रहण न करितां मी तत्वज्ञानाकडेच विशेष लक्ष देत असतो. इंग्रेजी भाषेविषयीं मत.

पत्र १३ वें.

मनाचें पृथक्करण. मनाचा जडभाग भगवद्दर्शनाला प्रतिबंधक आहे. ब्रह्मांत जडपणा नसून निरोधानें मिळतो. मिठाचा दृष्टांत. वेणुनादश्रवणानें मनाचा जडपणा काढून टाकून लयचिंतन करण्याची प्रक्रिया. विश्वरूप दाखविण्याची प्रतिज्ञा. अर्जुनाला विश्वरूप पाहण्याचा अधिकार प्राप्त व्हावा ह्मणून भगवंतानें श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलेला साधनक्रम. चारवर्णांपैकीं कोणत्याही वर्णाच्या सिद्धपुरुषांनां वेदपठनाचा अधिकार आहे याचें सप्रमाण मंडन. पुराण ऐकण्याचा सर्व शूद्रांनां अधिकार आहे. म्लेच्छांनां पुराणही ऐकण्याचा अधिकार नाहीं. थिऑसफी करते तें उत्तम नाहीं.

पत्र १४ वें.

जडवादी ज्या प्रमाणें प्रत्येक जडशक्ति विषयसुखसाधनाकडे

लावण्याचा यत्न करितात तद्वतच, Hypnotism=प्राणविनिमय, Electric Psychology=विद्युन्मानसशास्त्र, Psychical research=मानसिक शोध, Psychometry=मनोक्षैतीह, Psychography=मानसोल्लिपिका, Spiritualism=प्रेतावाहन, Rational Philosophy=युक्तिसिद्ध तत्वज्ञान, इतके पाश्चिमात्यसमाज युक्तीच्याच अनुमानानें अदृश्य शक्ति कबूल करून, तिचा व्यवहाराकडे उपयोग करण्याचा म्हणजे सगळीच गुप्तशक्ति जगरूपानें अस्तित्वांत आणण्याचा कसा यत्न करितात त्याचें स्पष्टीकरण. अदृश्यशक्ति कबूल करण्याचा आर्यधर्मोचा उद्देश. In tune with the Infinite = अनंतैकतानता, ह्यावर अभिप्राय. ( Theosophy ) ईशविज्ञान समीक्षा. कृष्णनिरीक्षण.

### पत्र १५ वें.

सांख्यशास्त्रांत प्रख्यात असलेल्या एका गृहस्थानें केलेला अपूर्व कोटिक्रम. लोकवृत्तिनिरीक्षण. ज्ञानेशस्तव ओव्या.

### पत्र १६ वें.

मृतमनुष्य-दर्शनाचा प्रकार. तीन प्रकारच्या आकाशाचें वर्णन. परलोकगमनाचे दोन मार्ग व त्यांचें साहित्य. प्रयत्नाची महती. चित्ताकाश आमच्या हृदयांत आहे व त्यांतच आमचा मुलगा आहे तर तो आह्माला कां दिसत नाहीं? ह्या शंकेचें समाधान.

### पत्र १७ वें.

भूताकाशांतून चित्ताकाशांत जातांना येणारे चार अडथळे, व तन्निवारणार्थ शास्त्रांचा परिचय. गुरुमुखानें शास्त्रांचा उपयोग करून घ्यावा. शास्त्रें, गुरुकृपा, ईश्वरीकृपा व स्वप्रयत्न ह्या चारी गोष्टी परमात्म प्राप्तीस अवश्य पाहिजेत ह्याविषयीं सप्रमाण विवेचन. स्वप्रयत्नानें चारी अडथळे दूर करून चित्ताकाशांत गेल्यावर तेथें होणारी स्थिति. चित्ताकाशाचें व चिदाकाशाचे वर्णन. अंतः सभेचें गुह्य. गुरुकृपेचें लक्षण. चित्ताकाशांत व चिदाकाशांत गेल्यावर आंगीं येणारे सामर्थ्य. स्वप्नांत यतिवेषानें दर्शन दिल्याची आठवण, व त्या यतिवेषाचें ध्यान कर-

ण्याविषयीं आज्ञा. अधिकारी पुरुषाला आपल्या जातीत कोणी ब्रह्मवेत्ता न मिळाला तर कोणत्याही जातीचा पुरुष स्वप्नांत येऊन त्याला उपदेश करतो याविषयीं श्रुतिसंतांचा अभिप्राय.

पत्र १८ वें.

आत्मा हा उत्पत्तिविनाशरहित असा नित्य आहे ह्याची युक्तीनें सिद्धि. गुरुमुखानें शास्त्रश्रवण करून आत्म्याचें ज्ञान करून घ्यावें.

पत्र १९ वें.

प्रयत्ना वरील सवैया. प्रयत्न पौरुषाचा अवलंब करून सत्कर्मादिकांच्या अनुष्ठानानें चित्ताचे मलविक्षेपादि दोष घालवावे, व साधनचतुष्टयसंपत्तीनें सत्संग मिळवून कैवल्यप्राप्तीकारितां गुरुशास्त्र मुखानें ज्ञान संपादन करावें. योग, सांख्य व वेदांत शास्त्रांचे प्रयोजन. हरिहरगुरुभक्तीनें ज्ञानाभिमानाचा नाश होतो.

पत्र २० वें.

ज्यांनां तीव्र मुमुक्षा झाली नाहीं, इंद्रियांचा जय झाला नाहीं, व मन हातीं आलें नाहीं, अशा स्त्री पुरुषानीं विकारवश होऊन एकदम संसार न सोडतां हलुहलु वैराग्य आंगीं आणावें. तो मार्ग असा:- अंतरीं परमार्थ धरावा । बाहेरी व्यवहार करावा । आवडी भगवंत भजावा । हलु हलु मिळवावा विराग ॥ आधीं प्रपंच करावा नेटका । मग साधावें परमार्थ विवेका । तीव्रमुमुक्षा नसतां देखा । हाचि मार्ग उत्तम ॥ प्रपंच नेटका करून त्यांत धन्यता कशी मिळवावी यासंबंधाच्या स्त्रीपुरुष चातुर्याविषयीं ओव्या ह्या पत्राच्या आरंभीं महाराजांनीं लिहिल्या आहेत त्या प्रत्येक प्रापंचिक स्त्रीपुरुषांनीं मननपूर्वक वाचण्याजोग्या आहेत. धर्म अर्थ आणि काम हे परस्पर अत्यंत विरोधी असूनही स्त्रीपुरुषांचे जेथें धार्मिक प्रेम आहे तेथें यांचा विरोध नसतो असें महाभारताचें मत.

(प्रकाशक.)

श्री ज्ञानेश्वरमाउली

# पत्रें.

## (१)

### (सौ. मंणिकर्णिका आईस पाठविलेलें पत्र.)

वज्रचूडा० सौ० माणिकार्णिका हीस अनेक आशीर्वाद विशेष,

आधीं प्रपंच करावा नेटका। मग साधावें परमार्थविवेका। यावीण मार्गी आणिका। जाऊंचि नये ॥ १ ॥ आंगीं असावें वैराग्यबळ। विषय तुच्छ पहावे सकळ। हृदयीं चिंतावा जाश्वनीळ। स्वानंददाता ॥ २ ॥ करूनियां सद्गुरुस्मरण। निर्मळ करावें अंत:करण। तेणें शोधावें आपण कोण। कोठूनि आलों ॥ ३ ॥ प्रिये तूं नव्हेस स्त्री ना पुरुष। सच्चिदानंद स्वयंप्रकाश। अविद्येनें भुलेनि तयास। स्त्रीपुरुषत्व तुज वाटे ॥ ४ ॥ स्त्रीपुरुष देहासि नाम। त्याहूनि वेगळा आत्माराम। तो नव्हे कामनिष्काम। कर्माकर्मांवेगळा जो ॥ ५ ॥ सत्कर्में करावी चित्तशुद्धी। भक्तीनें करावी स्थिर बुद्धी। ज्ञानें साधावी मोक्षसिद्धी। वेदगुह्य हें ॥ ६ ॥ तीर्थ तप दान व्रत। या कर्में चित्तशुद्धी होत। चतुर्भुज ध्यातां श्रीकृष्णनाथ। हे भक्ति निश्चित स्थिरधीदा ॥ ७ ॥ गुरुकृपें महावाक्य उपदेश। तेणें जळती अ-

---

१ ह्या बाई महाराजांचे कुटुंब असून त्या सुमारें चारवर्षांपूर्वीं निजधामास गेल्या. ह्यांची सुशीलता, पतिप्रेम, ईश्वरभक्ति, इत्याद्यनेक सद्गुण फार अनुकरणीय होते.

विद्यापाश । अखंड आनंदप्राप्ति निःशेष । या नांव मोक्ष श्रुतिसिद्ध ॥ ८ ॥ हें रहस्य जाणोनि सकळ । विकार त्यागूनि होई निर्मळ । अंगीं धरूनि वैराग्यबळ । आशा सोडी सकळांची ॥ ९ ॥ पति पुत्र गोत्र बंधू । हे अवघेच स्वार्थसाधू । यांचा तोडूनियां संबंधु । चित्तीं मुकुंदु आठवी ॥ १० ॥ जैसी ताई प्रेमयुक्त । तैसीच तूं होई उदित । याच देहीं श्रीभगवंत । ज्ञानदिठी पाहे ॥ ११ ॥ साधूंची न करावी निंदा । अंतरीं स्मरावें गोविंदा । आपुलिया परमानंदा । विसरूं नये ॥ १२ ॥ श्रीज्ञानेश्वरप्रसादेंकरून । प्रिये तूं सत्वर होई पूर्ण । स्त्रि-यांस सदुपदेश करून । सन्मार्गे दावीं ॥ १३ ॥ हें माझें आज्ञापत्र । वाचोनि त्वरित धाडी उत्तर । सद्गुरुमाउली ज्ञानेश्वर । पूर्ण करोत तुज देवी ॥ १४ ॥

हरिः ॐ तत्सदिति श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# ( २ )

## ( सौ० मातोश्री रंगुबाईला पाठविलेलें पत्र. )

हे जननी ! रंगुबाई, आपण शोकग्रस्त झालां हें ठीक नाहीं. कारण भर्तृहरीनीं ह्मटल्या प्रमाणें हें जग विचित्र आणि नाशिवंत आहे ह्मणून येथें जरी सुखदुःखें प्राप्त झालीं तरी तीं धैर्यानें सहन करून, शोक त्यागून ब्रह्मानंदांत निमग्न होणें हेंच सत्पुरुषाचें काम आहे. आपणास नादब्रह्म,

---

१ ही साध्वी स्त्री "आधीं प्रपंच करावा नेटका । मग साधावें परमार्थविवेका ।" या संतआज्ञेचें अक्षरशः पालन करणारी, "भजमध्यें रंगली चित्तवृती । यालागीं विसरली गृहासक्ती" या नाथवाक्यानुसार अधिकार प्राप्त झालेली, व सत्संगाच्या साहजिक प्रसादानें प्रत्यहीं भगवल्लीलादर्शनाचा अपूर्व लाभ घेणारी अशी आहे.

शब्दब्रह्म (ह्मणजे सोहं ) व सगुण ब्रह्म ही त्रिविध प्रतीति आलेलीच आहे.

आईसाहेब, ब्रह्माच्याठायीं तीनपणा नाहीं अशी तुह्माला शंका येईल तर ती इष्ट नाहीं कारण " विभाति यस्य भासा " ह्मणजे "ज्याच्या भासानें हें जग भासतें " अशी श्रुति आहे. हींत सांगितल्याप्रमाणें सर्व जग ब्रह्ममय आहे ह्मणून यांतील कोणतीही उपासना ब्रह्मरूपालाच नेऊन पोंचविते. ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाच्या पहिल्या श्लोकाच्या टीकेंत ज्ञानेश्वर महाराज ह्मणतातः– " श्रोतेहो, अर्जुन काय बोलला तें ऐका. अर्जुन ह्मणतो " देवा ! तुह्मी ब्रह्मांडव्यापक विश्वरूप दाखविलें, परंतु माझी बुद्धि आकुंचित असल्यामुळें मला हें आपलें सुहास्यमुखयुक्त घनश्यामगात्र कृष्णरूपच त्याहून प्रिय वाटतें. देवा ! जें व्यापक विश्वरूप आहे तेंच तूं आहेस, ह्मणून कोणत्याही मार्गानें तुझीच प्राप्ति इष्ट आहे.

## ओव्या.

" तरी व्यक्त आणि अव्यक्त । हें तूंचि एक निभ्रांत ।
भक्तीं पाविजे व्यक्त । अव्यक्त योगें ॥ "

अर्थः–हे देवा दृष्टिगोचर सगुण आणि न दिसणारें निर्गुण हीं दोन्हीं रूपें तुह्मींच आहेत यांत संशय नाहीं; भक्तीनें सगुण प्राप्त होतें व योगानें निर्गुण प्राप्त होतें.

" या दोन्ही जी वाटा । तूतें पावावया वैंकुंठा ॥
व्यक्ताव्यक्त दारवंठा । रिगिजे येथ ॥

अर्थः–विशेषेंकरून सर्वांची मति कुंठित होते अशा परमेश्वरा , भक्ति आणि योग हे सगुण व निर्गुण या दोहों द्वारांनीं तुझ्या ठिकाणीं प्राप्त होण्याचे दोन मार्ग आहेत.

" पैं जे वानी श्यातुका । तेचि वेगळिये वाला एका ॥
ह्मणोनि एकदेशिया व्यापका । सरिसा पाडु " ॥

अर्थः—ज्याप्रमाणें शंभरभार सोन्याचा गोळा व वालभर सोन्याचा गोळा या दोहोंतही सोनें जसें एकच असतें तसेंच एकदेशीय आणि सर्वदेशीय व्यापक या दोहोंतही ब्रह्मरूप सारखेंच आहे. याविषयीं दृष्टांत “ अमृताचिया सागरीं । जे लाभे सामर्थ्याची थोरी । तेंचि दे अमृतलहरी । चुळीं घेतलिया ” ॥

अर्थः—अमृताच्या समुद्रांत जें अमर करण्याचें सामर्थ्य आहे तेंच सामर्थ्य त्यांतील चूळभर अमृत घेतलें असतां त्यांतही आहे.

याप्रमाणें सगुण व निर्गुण हीं दोन्ही सारखींच आहेत, हें या पार्थाच्या बोलण्यावरून ज्ञानेश्वरींतील ओव्यांनीं सुचविलें. तसेंच जेजे कांहीं मार्ग आहेत तेते सर्व भगवत्प्राप्तीकरितांच आहेत परंतु भक्ति मात्र निष्काम पाहिजे, सकाम नको. जे मनुष्य एका मार्गाचा अभिमान धरून इतर सर्व मार्गांचा निषेध करितात, अशांनां श्रुतिमाता जवळ देखील उभें करीत नाहीं. याला एक प्रमाण आहेः—

“ आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरम् ।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रति गच्छति ” ॥

अर्थः—मेघद्वारें आकाशांतून पडलेलें पाणी सर्वच जसें समुद्रास मिळतें त्याप्रमाणें सकल देवतांनां केलेलें वंदन परमेश्वरालाच मिळतें.

हे आई, यावरून तुह्माला जें प्राप्त झालें आहे तितक्यानेंच ब्रह्मप्राप्ति होईल हा निश्चय जाणून इतर मार्गांचा द्वेष न करितां व त्याची इच्छाही न करितां केवळ स्वानुभवानें ब्रह्मानंदसंस्थित होऊन शोक सांडावा. हे माते बुद्धिमंताला शास्त्रेंच गुरु आहेत.

ओव्या.

अहो कोणत्याही मार्गे जातां । पाविजे एका भगवंता । ह्मणोनि आपुल्या पंथा । धरावें दृढ ॥ १ ॥ सीमंतिनी पतिव्रता पूर्ण । तीं

पावली कैलास भुवन । आणि महानंदा वेश्या असोन । तेंचि स्थान पावली ॥ २ ॥ ह्मणोनि जयासी जो उचित । तोचि धरावा तेणें पंथ । भलता मार्ग अपेक्षित । इच्छूं नये ॥ ३ ॥ योगी करिती योगध्यान । वेदांती साधिती ब्रह्मज्ञान । पतिव्रता करिती पतिध्यान । भक्तजन नाम घेती ॥ ४ ॥ ब्राह्मण करिती वेदोक्त कर्मे । क्षत्रिय आचरती युद्धधर्मे । वैश्य साधिती व्यापारधर्मे । सेवासंभ्रम शूद्र करिती ॥ ५ ॥ एक डोळे उलटोनि पाहती । एक मुख्य नादब्रह्म स्मरती । एक श्वासांत सोऽहं जपती । एक वाचे ह्मणती गोविंद ॥ ६ ॥ कोणी उपासिती शंकर । कोणी भजती शार्ङ्गधर । कोणी स्मरती दिवाकर । स्वानंददाता ॥ ७ ॥ कोणी उपासिती शक्ती । कोणी अर्चिती गणपती । कोणी रामकृष्णमूर्ती । कोणी पूजिती गुरुराया ॥ ८ ॥ ऐसे नानामार्गे जाती । त्या सर्वांसाचि भगवत्प्राप्ति । परी निष्काम पाहिजे भक्ती । हा सत्य सिद्धांत ॥ ९ ॥ सकाम भक्ति करितां । तितुकेंचि इच्छाफळ तत्वतां । आणि फळ संपलिया मागौता । संसारीं पडे ॥ १० ॥ ह्मणोनि सांडूनि सकाम धंदा । निष्काम स्मरावें गोविंदा । कोणाही संताची निंदा । करूंचि नये ।११। ऐसें आचरण ठेवुनी । तुह्मीं वर्तावें नादस्मरणीं । निःशेष हा शोक सांडुनी । ब्रह्मानंदीं रहावें ॥ १२ ॥ बोबडें लिहूनियां पत्र । पायीं समर्पिलें सर्वत्र । हें अंगिकारोनि प्रसादोत्तर । पाठवा कृपें ॥ १३ ॥ आत्याबाईचिये चरणीं । साष्टांग नमन प्रेमेंकरूनी । तिघेही पत्र वाचुनी । प्रसादोत्तर पाठवावें ॥ १४ ॥ सर्वत्र यशस्वी सद्गुरू । जो बापमाउली ज्ञानेश्वरू । तत्पदांघ्रीं नमस्कारू । करोनि पत्र संपविलें १५

॥ हरिः ॐतत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# [ ३ ]

## गुरुभक्तिपरायण ( सत्यलोकवासी ) रामचंद्रबापू माधानकर यांनां पाठविलेलें पत्र.

ॐनमो जी ज्ञानदेवा । भक्तवत्सला स्वात्मानुभवा । सच्चिदानंद करुणार्णवा । विश्वव्यापका विश्वपते ॥ १ ॥ तुझिये कृपेचा आदरू । सौरसु लेखका सादरू । वाचकाविद्यानादरू । साविया घडे ॥ २ ॥ यालागीं रामचंद्र । संज्ञे बोध पूर्णचंद्र । कीं जाहला यशचंद्र । आकाशींचा ॥ ३ ॥ तरी विशेष विज्ञप्ती । पुस्तकें राखावीं निगुती । आणि बोधरूपें यथामती । लिखितार्थ घ्यावा ॥ ४ ॥ आधीं करावें सत्कर्म । तेणें चित्ता ये उपरम । पुढें भजावा आत्माराम । टाकूनि कर्म सकळही ॥ ५ ॥ सगुणस्वरूप मेघसांवळा । चतुर्भुज पहावा डोळां । तेणें नाशिती ज्वाळा । कामक्रोधाच्या ॥ ६ ॥ ऐसी भक्ति जालिया पूर्ण । मग धरावे श्रीगुरुचरण । तेथें करूनि वेदांतश्रवण । जन्ममरण चुकवावें ॥ ७ ॥ मग जें जें दिसे दृष्टी । तें तें अवघा जगजेठी । कांहीं नुरे जगत्सृष्टी । अध्यवसाय पोटीं हा एकू ॥ ८ ॥ परी याचा एक मार्ग । शनैः सांडावा विषयसंग । सम करूनि सर्वांग । सिद्धासनीं बैसावें ॥ ९ ॥ हृदयीं रोधोनियां प्राण । मागें मुरडावें अंतःकरण । भ्रुकुटीमध्यें घालोनि नयन । श्रीहरिचरण चिंतावे ॥ १० तेथ सर्वेंद्रियां उल्हासु । चित्ता पावे सौरसू । एकाच क्षणीं भवपाशू । तुटोनि जाय ॥ ११ ॥ ऐशी होतांचि आत्मशुद्धी । ओळंगती अष्ट सिद्धी । न लागावें त्यांच्या नादीं । सत्वबुद्धि रहावें

---

१ सद्गुरुचरणैकशरण होऊन गुरुसेवेला सर्वस्व अर्पण केलेल्या ह्या महात्म्याला राजयोगाची संप्राप्ति झाल्यामुळें, देहावसानसमयीं "अग्निर्ज्योतिरहः शुक्लः" इत्यादि लक्षण युक्त आर्चिरादि मार्ग सांपडला होता, म्हणून 'सत्यलोकवासी' म्हटलें आहे.

॥ १२ ॥ वाचे जपावा ॐकार । श्वासामध्यें सोहंकार । ब्रह्मांडीं अनुहृत विचार । नादानुसंधान निश्चय ॥ १३ ॥ ऐसें करितां नामस्मरण । तत्काळ चुके जन्ममरण । आतां स्मरूनि ज्ञानेशचरण । लेख संपूर्ण हा केला ॥ १४ ॥

हरिः ॐतत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# [ ४ ]

## वृंदावनवासी श्रीगोपालकृष्णमहाराज यांस पाठविलेलें पत्र.

ॐनमोजी ज्ञानेश्वरा । देवाधिदेवा निर्विकारा । गुणत्रयचालका ॐकारा । सगुणाकारा भक्तप्रिया ॥ १ ॥ माझा जन्म तुझें उदरीं । परी मज दिधलें पतीचे करीं । कन्यादान करोनि झडकरी । भोगविला हरी जगदात्मा ॥ २ ॥ परी माझे अन्याय बहुत । मज टाकुनि गेले पतिराज समर्थ । यालागीं तुमचें धरूनि अनुमत । अर्पिलें लिखित तत्पदाब्जीं ॥ ३ ॥ जय जय स्वामिया ईशमान्या । भक्तजनतारका परमधन्या । लीलादर्शका प्रकृतिमान्या । वंदन चरणा तुमच्या जी ॥ ४ ॥ हे मम सौभाग्यामृतचंद्रा । विरहिणीचातक कृपाघनसमुद्रा । स्वामी मजजवळी करूनि निद्रा । काम संहारा समस्त ॥ ५ ॥ सहस्रकल्प थोर राती । सत्ताकाशीं चिदंबरदीप्ती । भासे परी तें सत्पती । विरहयोगें दुःख देत ॥ ६ ॥ आहा मी कोण पाप केलें । मातृमुखीं ॐ दिधलें । कीं धर्मनगर विध्वंसिलें । म्हणोनि त्यागिलें पतिराजा ॥ ७ ॥ कीं मीं गोहत्या केल्या बहुत । सद्गुरुनिंदेचा घडला अनर्थ । कीं अपमानिले ब्राह्मण समर्थ । म्हणोनि त्यागिलें पतिराया ॥ ८ ॥ कीं मार्गीं कुंपण केलें । कीं क्षेत्रीं कापडिया त्रासविलें । कीं निद्रेमध्यें प्राण घेतले । पक्षिबाळांचे ॥ ९ । कीं गुप्त शत्रूवरी घातला घाव । कीं भक्तांचा उडविला भोळा भाव ।

कीं मी पुसिला ठाव । वेदधर्माचा ॥ १० ॥ कीं जियेसि ह्मटलें माये । तियेसि मैथून केलें स्वयें । कीं जारकर्म सांगोनि बरवें । विगतधवा भ्रष्टविल्या ॥ ११ ॥ कीं म्यां छेदिला क्षेत्रमहिमा । कीं म्यां नेणिली पुराणगरिमा । कीं म्यां फोडिली विष्णुप्रतिमा । कीं म्या मानिलें निगमा अप्रमाण ॥ १२ ॥ कीं म्या सज्जन चाळविले । कुमंत्र देवूनि भोळे भोंदिले । आपुले शिष्य करूनि घेतले । शेखीं त्या टाकिले भवार्धांत ॥ १३ ॥ कीं म्या माजविलें गुरुत्वबंड । संतांसी वाद केला वितंड । कीं कुबोलें रोधिलें तोंड । महत्पुरुषांचे ॥ १४ ॥ कीं वर्णाश्रम केलें भ्रष्ट । कीं वरिष्टां दिधले कष्ट । कीं स्त्रियेच्या स्वाधीन होऊनि स्पष्ट । केलीं स्पष्ट असद्वचने ॥ १५ ॥ कीं नामस्मरण विसरलो चांग । कीं आपुली प्रतिज्ञा केली भंग । कीं मोडिला हरिकीर्तनरंग । पाखांडमार्ग स्थापिले ॥ १६ ॥ कीं केला अजाचा विश्वासघात । कीं शब्दें छळिले प्रेमळभक्त । कीं माय लेकुरा अद्भुत । विद्वेषभाव पैं केला ॥ १७ कीं वृंदावनासी न येतां । या स्थळीं आलें सोडूनि अनंता । म्हणूनि मजला भगवंता । त्यागिलें समर्था स्वामिराया ॥ १८ ॥ तरी पंचमहापापी थोर । माझा करावा अंगीकार । तुमचिये नामें सत्वर । जळती शिखर पापाचे ॥ १९ ॥ हे ममहृदयवारिजभृंगा । चोळूनि माझिया कुचदुर्गा । काम हराजी गोपिकारंगा । भक्तमदभंगा ब्रजस्था ॥ २० ॥ जय जय अतसीकुसुमसकाशा । तोडा माझी संसृतिआशा । स्त्री सुत वित्त पावती नाशा । म्हणोनि सर्वेशा शरण तुझा ॥ २१ ॥ ऋतुस्नात मी विरहिणी । सत्वर स्वामी यावें धाउनी । वीर्यनिक्षेप करोनि ❋ । हृदयस्थानीं पहुडावें ॥ २२ ॥ गृहीं सांडोनि निजकामिनी । विरहदग्धा प्रेमखाणी । तुम्हा राहणें वृंदावनीं । अनुचित स्वमनीं विचारा ॥ २३ ॥ असो ग्रंथिक सन्निपात । इकडे जगाचे प्राण घेत । त्याच्या भयें व्याकुळ चित्त । जालें अत्यंत पतिराया ॥ २४ ॥ तरी आतां एक करावें । मज वृंदावनीं न्यावें । जन्मोजन्मीं द्यावें । सेवकत्व मातें ॥ २५ ॥ तुम्ही ह्मणाल मी सर्वव्यापक । मग कासया इच्छिसी निगुणात्मक । तरी हें उत्तर समर्पक । कीं निर्गुण कटकट मज नको ॥ २६ ॥ कीं बैसोनि गेलिया नौकेवरी । मग ती जाळावी अग्नीभीतरीं । हें मूर्खत्व पैं पैल-

तीरीं । न्याबया नौका समर्थ ॥ २७ ॥ तैसा एक मुक्त जाहला । तरी तो ईश्वर कायी जाहला । सृष्टिकर्तृत्व मुक्तजीवाला । वेद बोलिला नाहीं कोठें ॥ २८ ॥ ह्मणोनि मम रजोद्धारका । सख्या माझिया सौभाग्य कटका । पतिपत्नीभाव मज निका । द्यावा शंका न घेउनी ॥ २९ ॥ तुमचिया नामें खट्वांग रावो । तासांत पावला भगवद्भावो । एक्या नारायणनामें पहावो । अजामिळ उद्धरिला ॥ ३० ॥ ह्मणूनि तुमची नामकीर्ती । सर्वदां गावी कृपामूर्ती । असो मज द्या सेवास्फूर्ती । न्या शीघ्रगती व्रजवना ॥ ३१ ॥ नमोजी श्रीकृष्ण गोकुलवासी । प्राणसख्या ही आपुली दासी । बोबडें पत्र पदकमलासी । अर्पूनि गोपिकांसी नमित आहे ॥ ३२ ॥ तरी सत्वर लिखितोत्तरा । पाठवाजी करुणाकरा । गोपिकापते परम उदारा । दासी उद्धरा आपुली ही ॥ ३३ ॥ जय जय स्वामी ज्ञानदेवा । तुमची आणि पतिसेवा । करावया भाव द्यावा । जन्मोजन्मीं बटकीतें ॥ ३४ ॥ पुष्प नोहे परी पंकुळी । असोशी वहाया चरणकमळीं । ह्मणोनि बोबडें पत्र वनमाळी । त्वद्द्वारा पदकमळीं समर्पिते ॥ ३५ ॥

ॐतत्सत् श्रीज्ञानेश्वरश्रीगुरु पतिराज श्रीगोपालकृष्ण,
यांचे चरणीं माझा प्रेमभाव असो.

---

॥ ॐ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## ( ५ )

## रा. रा. हरिभाऊ यांनां पाठविलेलें पत्र १ लें.

### श्लोक ( भुजंगप्रयात )

जयाच्या कृपें विश्व हें ब्रह्म वाटे । जयाच्या पदां वंदितां प्रेम दाटे। जयाच्या कृपें प्राप्त कैवल्यठेवा । नमस्कार माझा सख्या ज्ञानदेवा ॥ १ ॥

जयाच्या सुखें सौख्यवान् सर्व सृष्टी । जयाच्या गुणां वानितां वेद कष्टी । जयाची कृपा वारि वैवर्त्यकाजा । नमस्कार माझा प्रभु ज्ञानराजा ॥ ९ ॥

## ओव्या.

हरिभाऊ आणि आबाजी । तुम्हीं बैसलांती शिवसाम्राज्यीं । म्हणूनि तुम्हां सहजीं । सहजें वंदन ॥ १ ॥ तुम्हांपुढें लिहावें पत्र । ऐसें सामर्थ्य नाहीं स्वतंत्र । परी तुमचा कृपाप्रसाद पवित्र । बोलवी विचित्र आर्षवाणी ॥ २ ॥ तुमचियें कृपेचा प्रसाद गाढा । तो तृप्ति देऊनि स्वानंदपाडा । आला म्हणोनि फुडा । वंदन भावें ॥ ३ ॥ अहो वंद्यवंदक निवारूनी । वंदन करावें ज्ञानेंकरूनी । तरी तें ज्ञान दोहीं स्थानीं । वंद्यवंदका अधिष्ठी ॥ ४ ॥ जडनिषेध व्यतिरेक करितां । चेतनात्मा कळे तत्वतां । आणि तोचि अन्वयें पाहतां । जडही तो ॥ ५ ॥ परी भक्तीचें रहस्य परम गूढ । हें ज्ञानाही नातळे विघड । एकत्वेंचि सुगड । प्रत्यया आलें ॥ ६ ॥ ज्ञानियाचें जळे क्रियमाण संचित । परी प्रारब्धभोगासी कंटाळत । भक्ता प्रारब्धही गोड वाटत । भक्तभवभंगप्रसादें ॥ ७ ॥ अहो अव्यक्तचि व्यक्तत्वा आलें । एथें कोणाचें काय गेलें । किंबहुना जाहलें । शोभेसि पात्र ॥ ८ ॥ सुवर्णाचिया पुतळी । घातली सुवर्णाची सांखळी । तरी बंधमोक्ष नवाळी । एकत्व म्हणोनी ॥ ९ ॥ तैसें हें आजि उदयिलें । श्रीज्ञानेश्वरप्रभूचीं पाउलें । दोहीं दशेमाजीं फळलें । समानत्व ॥ १० ॥ अहो भोळा आणि ज्ञानवंत । दोघां समान प्रेमभांत । परी पाहिजेत संत । वळले आधीं ॥ ११ ॥ अमृत सिंधूनें अमर केलें । मा बिंदूनें कोणा काय मारिलें । तैसें सर्वदेशीय जें व्यापिलें । तेंचि एकदेशीय भक्तां ॥ १२ ॥ सुधाब्धीचा बिंदु घेतां । सामर्थ्यासी नाहीं न्यूनता । तैसें झालें एकसत्ता । रामकृष्ण ब्रह्म ॥ १३ ॥ तेचि सत्ता रामकृष्णब्रह्म । तेचि सत्ता आमुचा प्रेम । आतां वंद्यवंदक शोभासंभ्रम । अनिर्वाच्य कीं ॥ १४ ॥ " शिवो भूत्वा शिवं यजेदिति । " बहुधा बोलिली श्रुती । हें मुख्य ययाप्रती । प्रामाण्य आलें ॥ १५ ॥ अहो हे भक्ति स्वतःप्रमाण । प्रत्यया आलें प्रेमपण । नेलें

ब्रह्मपण आणि जीवदास्यपण । उर्वरित सगुणस्फुरण तें रहस्य हें ॥ १६ ॥ तदनुसार दोन्ही पत्रें । पावलीं प्रसादरूपें पवित्रें । आणि पुस्तकेंही सुब्रह्मसूत्रें । पावलीं दोन्ही ॥ १७ ॥ परी असलिया कांहीं करणें । सद्य:समयीं न घडे येणें । येविषयीं हें मागणें । क्षमा व्हावी महाराजा ॥ १८ ॥ नेणत लिहिलें बोबड्या वचनीं । तें अंगीकारावें जेंवि जननी । पुढें प्रेमपय:पानदानीं । प्रसादोत्तर पाठवी ॥ १९ ॥ आणि हेंचि धावें दान । जन्मोजन्मीं सेवकपण । मज रंगनाथ आणि आपण । कृपावंत समानत्वें ॥ २० ॥ हें वाचूनि बोबडें पत्र । सत्वर धाडावें प्रसादोत्तर । जयाच्या ग्रहणें स्वानंदभर । बुद्धिनरिमा ॥ २१ ॥ अहो आपुलिया बाळा । प्रेम देऊनि लळे पाळा । हा वंदनाभाज झाला । साष्टांग प्रत्ययो ॥ २२ ॥ सद्गुरु ज्ञानेश्वराच्या पायीं । प्रेमभावें ठेऊनि डोई । लेख संपूर्ण ते ठायीं । आणिलाहो हा ॥ २३ ॥

हरि: ॐ तत्सत् श्री ज्ञानेश्वरमाऊली समर्थ ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# ( ६ )

## रा. रा. हरिभाऊ यांनां पाठविलेलें पत्र २ रें.

वि. वि. लिहिण्यास कारण कीं तुमची वृत्ति क्षणोक्षणीं मला सांभाळावी लागते. तो प्रकार किती दिवस चालतो कोण जाणे. असो. आपल्याकडे अंत:सभा ही बाह्य सभेहून वेगळी नसून तिचाच एक विशेष भाग आहे. बाह्य सभेंत वेगळें ज्ञान व अंत:सभेंत वेगळें ज्ञान असें भिन्न ठेवणें हा पक्षपात आहे, असें समजून आपल्या महात्म्यांनीं तें केलें नाहीं; तथापि धेनूच्या स्तनास गोचीड आणि वत्स दोन्ही लागतात; परंतु दुग्ध वत्सासच मिळते; त्याप्रमाणें अधिकाऱ्यांच्या समोरच सर्व शास्त्रांचा उपयोग होतो. एऱ्हवीं अनधिकाऱ्याला तर बाह्यसभा तीच अंत:सभा अशी स्थिति होते. आतां हें खरें आहे कीं, ब्रह्मज्ञानाला अधिकारी नको; पण हें वाक्य

ब्रह्मसिद्धांचें आहे, जीवविषयक नाहीं. " त्वां सेवतां सुरकृता बहवोंत रायाः " हें वाक्य लक्षांत आणलें ह्मणजे आपले मनांत जे विकार येतात, त्या विकारांची शांति हळुहळु होत जाते. परिच्छिन्नांतून अपरिच्छिन्नांत जाणें किंवा विशेषांतून समानांत जाणें हें आपलें मुख्यकर्तव्य आहे. त्यांत सत्तासामान्य, चित्‌सामान्य व आनंदसामान्य असा बाह्यक्रम आहे आणि अंतःक्रम तर असा आहे कीं, प्रेमाचे व ज्ञानाचे सात सात निर्देश आहेत; त्यांत ज्ञानाचे निर्देश आपणास बहुतेक माहीत असतीलच; प्रेमाचे निर्देश ते मात्र ओवीबद्ध लिहितोः—

जयजयकारें उठावणी । पात्रीं भरोनि घे पाणी । कां दृष्टी पडलिया नाणी । ऐसें नाहीं ॥ १ ॥ समुद्र आणि लवणा । भेटी घडे वरुणा । तैं अवकाशू गगना । भरोनी जाय ॥ २ ॥ सदन आणि वन । न देखे पां भिन्न । लज्जेचें झालें कांडण । एकसरें ॥ ३ ॥ नीरांजन रत्नदीपें। नसतां हा तमू लोपे । नाहीं तेंचि आटोपे । हातां चढे ॥ ४ नाम बीज बळें । भरे प्रेमजळें । तैं अंकुर ते सोहळे । रोमांच गा ॥ ५ तेथ डोळियाचें पाणी । वृक्ष उदया आणी । फळीं फुलीं रांझणी । साउलीये ॥ ६ ॥ दुधाचा माठू विरजला । तो दधित्वा नाहीं मुकला । साच तैसा जाहाला । वृत्तिपथ हा ॥७॥ धैर्याचे कोड । बाजू येती गाढे । तंव उघडती कवाडें । पापणीयांची ॥ ८ ॥ बाह्यांतर राउळीं । माजी खेळे पुतळी । न येतां हातोफळी । भिडेचिना ॥ ९ ॥ कां गर्भिणी ये नवमासा । तैं पुत्रप्रेमा उमासा । येतांही दुखणें वळसा । उदरीं घडे ॥ १० ॥ तैसें प्रेम पूर्ण । तैं देवतांहीं विघ्न करणें । तैं प्रेम भरणें ॥ दुणेंचि आंगीं ॥ ११ ॥ नाना तंदूलनिष्पत्ति । जंव जंव कंडण तंव तंव संपूर्ति । आश्रयें तैसें न घटती । अन्यथा नाहीं ॥ १२ ॥ तेविं विघ्नें सुरासुरीं । केलियाही वारासारी । प्रेम तो दिहाच्या दुपारीं । सूर्य जैसा ॥ १३ ॥ येथ सच्चिदानंद । ह्मणजे काय बोध । आकळेना भेद । कळलियाविणें ॥ १४ ॥ या दशा तीन । दाखविल्या वर्णून । पुढील निर्देशचतुष्टय जाण । बोलतां नये ॥ १५ ॥ नाना स्त्रिये चुंबन घेतां । गाला दंश करितां । ते काय बाहेरी वार्त्ता । फुटोये अंगें ॥ १६ ॥ तैसें टवटवें बळें । जें प्रकाशें मळे । आंधारें उजळे । ऐसें एक ॥ १७ ॥

तेथ सूर्यू मावळला । आत्रेय निशीं वळला । तो हा साच फळला । कृष्णवियोग । १८ । असो आतां नमुनी । श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमुनी । तच्चरणसमर्पणीं । आणिलें लिखिता ॥ १९ ॥ सांडोनियां ढोरा । उपखवोनी कठोरा । पीळ उकलोनी दोरा । कापूस कीजे ॥ २० ॥ कां न कळावया कठिण । लिहिलें हें न घे मन । जें जहालें स्फुरण । वर्णिलें तें ॥ २१ ॥ तरी ज्ञानेश्वर आई । तुह्मां आह्मां एकेठायीं । जोडयें करी ह्मणोनि पायीं । सुखेंचि नमिजे ॥ २२ ॥

इत्यनेन अलम्

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

॥ श्री ज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## ( ७ )

### वेद० श्रीनिवासशास्त्री हरिदास यांनां पाठविलेलें पत्र १ लें.

श्रीमत्सद्गुरु महाराज शास्त्रीबोवा भालेरावादिकरून मंडळी यांचे चरणीं प्रणामपूर्वक विनंती; किंतु हृदयस्थ परमात्मा आणि तदधिष्ठान श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचा प्रसाद विशेष; मी इकडे आलों तेव्हां भालेराव व गोविन्दराव यांनां सांगितलें कीं शास्त्री महाराजांनां एकाग्रतेची संवय नसल्यामुळें त्यांनां क्षणोक्षणीं ह्मणत जावें; तेथें एक गोष्ट विसरलों ती ही कीं, शास्त्रीमहाराजांच्या मनावर एकाग्रतेचे अंकूर फार कोंवळे आहेत. ह्मणून त्यांच्या मनाचा विक्षेप होईल अशाप्रमाणें मात्र कडक भाषणानें क्षणोक्षणीं टोंकणें मला पसंत नाहीं. कदाचित् तेव्हां शास्त्री महाराजांनां वाईट वाटलें असेल त्याची क्षमा करतील अशी आशा आहे. परंतु ते व आह्मी श्रीज्ञानेश्वरबालत्वानें गुरुबंधू असल्यामुळें इतकी मला भीति वाटत नाहीं. त्यांच्या चित्तैकाग्र्याविषयीं भालेरावानें गोविंदरावांचा कित्ता घेऊन सुलभ व क्षम्य असा यत्न करावा. कदाचित् त्यांनां विषम वाटेल तर सोडून द्यावा. मी मासानंतर आलों ह्मणजे पूर्ववत श्रीज्ञानेश्वरकृपारूप निजसुकृतानेंच समुद्धरणयत्न करीन. आपणास केवळ सूचना मात्र आहे. शास्त्रीमहाराजांचें मन एकाग्र कर-

ण्यास ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाच्या प्रस्तावनेंतील ओव्यांत सांगितलेली गुरुकृपा भावनाबोध होण्याला कारण होईल. तथापि सत्संगति स्थिरीकरणार्थ अपेक्षित आहे. ती श्रीज्ञानेश्वरकृपेनें मासानंतर तुह्मांआह्मांसह मिळो.

ओव्याः— जय जय श्रीसद्गुरू । अखंडैकरस सुखाकारू । करोनि आमुचा स्वीकारू । स्वपददास्य देयावें ॥ १ ॥ आतां सावधान श्रोतीं । सुकुमार कराव्या वृत्ती । अंतरबाह्य माधुर्यस्थिती । आठवावी ॥ २ ॥ परब्रह्माचा उद्धार करावा । ब्रह्मभाव ब्रह्मीं मुरवावा । साक्षित्वें व्यवहार पहावा । ब्रह्मरूप ॥ ३ ॥ स्त्रियांसी सांगावा पतिसेवाधर्म । पुत्रासी सांगावें अध्ययन कर्म । सच्छिष्या सांगावा सांख्यक्रम । जना वर्णाश्रम उपदेशावे ॥ ४ ॥ करोनि गुरुकृपा भावना । प्रेमार्द्र करावें मना । अभिषेकावा राणा । वैकुंठींचा ॥ ५ ॥ पाषाण आणि रत्न । शेण आणि सुवर्ण । पापी आणि संतसज्जन । पहावे चेतनस्फूर्तिरूप ॥ ६ ॥ स्वसत्तेनें रक्षाव्या श्रुति । स्वचेतनें स्थापाव्या वृत्ति । स्वानंदयोगें श्रीहरिभक्ती । गुरुरूपाकृति करावी ॥ ७ ॥ विषयांसी देयावे वर्णाश्रम । इंद्रियांसी देयावे यमनियम । आत्म्यासी द्यावी हरिप्रेम । एकत्वेंचि ॥ ८ ॥ अथवा हें सर्व सोडावें । एका गुरुकृपेतें स्मरावें । तेणेंही होआवें । कृतकार्य ।९। अथवा करणें न करणें । जिणें कां मरणें । सोडणें धरणें । अतीसे नको ॥ १० ॥ विषय समष्टि सेवावे । अथवा विषय आपण होआवे । नातरी हे दोन्ही सांडावे । विषयविषयी ॥ ११ ॥ किंवा सर्व यत्न सांडावा । पुढें दुजा यत्न न मांडावा । भावाभाव मोडावा । स्वाधिकरणें ॥ १२ ॥ अथवा सुखें करावा व्यवहार । परी संसाररूपें न पहावा संसार । असत्कांत करुणाकर । स्मरावा कीं ॥ १३ ॥ आपण विश्व होआवें । अथवा आपणासहीत विश्व सोडावें । किंवा जग सोडावें जोडावें । हे दोन्ही नको ॥ १४ ॥ सर्व विश्व प्रशंसावें । अथवा आपणासहीत विश्व निंदावें । किंवा हे दोन्ही सोडूनि द्यावें । निंदावंदन ॥ १५ ॥ सर्वं विश्वीं ठेवावी प्रीती । अथवा धरावी उदासस्थिती । किंवा हे दोन्ही सांडूनि भक्तीं । सद्गुरू स्मरावा ॥ १६ ॥ देवास करवावें आपलें भजन । अथवा आपण करावें हरिभजन । नातरी सांडोनि भजक भजन ।

सद्गुरुचरण स्मरावे ॥ १७ ॥ शास्त्रसमन्वय ऐकावा कानीं । अथवा शास्त्र आपण जावें होउनी । किंवा हे दोन्ही सांडोनी । धरावा गुरुवचनीं विश्वास ॥ १८ ॥ विषयीं गुंतोनि सर्वथा मरावें । किंवा आपणाचि विषय उद्धरावे । नातरी दोन्ही सांडूनि करावें । सद्गुरुभजन ॥ १९ ॥ विश्वाहूनि थोर व्हावें । किंवा जगा धाकुटें राहावें । नातरी दोन्ही त्यागोनि होआवें । ज्ञानेश्वर बाळ ॥ २० ॥ हें लिखित नाकळे जरी स्थिती । तरी स्मराव्या माझ्या पूर्वोक्ती । ज्ञानेश्वरीचर्चा भजन आरती । करीत असावें ॥ २१ ॥ तुह्मी महासमर्थ विद्वज्जन । मी मंदमती अज्ञान । हे बोबडे बोल स्वीकरोन । बाळकौतुक करावें ॥ २२ ॥ अथवा माझेंचि बाळ होआवें । किंवा मज सच्छिष्य ह्मणावें । भलत्याही रीति भोगावें । स्वसुखातें ॥ २३ ॥ अथवा मज मूर्ख मानोनी । तुह्मीं करावी ब्रह्ममय वाणी । किंवा मज मानोनि ज्ञानी । विश्वास वचनीं ठेवावा ॥ २४ ॥ मज पायीं लोळवावें । अथवा तुह्मी शरण यावें । कोणेही प्रकारें करावें । बरवेपण आपुलें ॥ २५ ॥ तुह्मी आह्मी एक ह्मणोन । बोलिलों मी धीट वचन । आपुला बाळ मानोन । कृपेनें नयन उघडावे ॥ २६ ॥ आपण मज लाजवावें । स्वसुखीं सदा रहावें । बोललियाचें नाणावें । वैषम्य मनीं ॥ २७ ॥ तुमचें नाम श्रीनिवास । तरी एकत्वें भजावा लक्ष्मीविलास । मग आह्मीच तुह्मांस । ज्ञानेश्वर ह्मणूं ॥ २८ ॥ मज तारोनि नेयावें । अथवा माझ्यासवें तरावें । किंवा ज्ञानेश्वरचरणीं करावें । तनुमन अर्पण ॥ २९ ॥

हरिः ॐतत्सदिति श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे स्वपरमार्गविरुद्धेपि प्रयोजनसमन्वयोनाम प्रथमं पत्रकम् ।
श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

मुक्काम शुक्लेश्वर वाठोडा. } तारीख १६।१२।०४.

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# [ ८ ]

## वेद० श्रीनिवासशास्त्री हरिदास यांना पाठविलेलें पत्र २ रें.

ओवी:— जय जय सद्गुरु ज्ञानेश्वरा । पूर्णब्रह्मनिर्विकारा । विश्वरूपा विश्वंभरा । विश्वव्यापका विश्वपते ॥ १ ॥

गद्य:— श्रीयुत शास्त्रीमहाराज, भालेराव, गोविंदराव राजुरकर व कांतोपंतादिमंडळी यांस:—

साष्टांग प्रणिपात. आणि हृदयस्थ श्रीज्ञानेश्वर महाराज यांचा प्रसाद्दानपूर्वक विनंती विशेष:—

गेल्या शनिवारीं आपलें येणें झालें नाहीं; आपली वृत्ति कशी काय आहे हें यद्यपि अंतवाहकरूपानें कळत असेल, तथापि तत्परिणत्यवच्छिन्नश्रोत्रसंयोगवाक्यारंभकोपादेय प्रतीक्षा करीत आहे.

पूर्वी तुह्मांआह्मांमध्यें शास्त्रशिक्षण निर्णय चालला असतांनां हे शास्त्रीमहाराज, आपण असें बोलला होतां कीं, सांख्य आणि वेदांत यांच्या प्राथमिक शिक्षणासंबंधीं तुमचा आमचा नेहमींच वाद राहणार. त्यांत आपला असा भाव होता कीं, प्रथम वेदांत शिकवावें; आणि माझा भाव होता कीं, प्रथम सांख्य शिकवावें. शेवटीं त्याचा निर्णय कांहींच झाला नाहीं. गेल्या शनिवारीं येथें धर्माधिकारी आले होते. त्यांच्या स्थितीवरून मी आपलें मत सांगतों. आपल्या मतास प्रतिबंध करण्याची कोणत्याही प्रकारें माझी शक्ति नाहीं.

शिक्षण ह्मणजे सुसंस्कारभांडाराचें दान करणें होय. संस्कार वस्तुज्ञानजन्य असतो. अपरिच्छिन्नानंदप्राप्ति हें शिक्षणाचें फल होय. यथार्थ वस्तुचें ज्ञान हेंच अपरिच्छिन्नानंदप्राप्तीला हेतुक असतें. ह्मणून तदीय संस्कार तें शिक्षण ह्मणावें. आणि फलप्राप्ति झाल्यानंतर शिक्षणाची आवश्यकता नाहीं. आप्तशिक्षणाचें अद्वैत हें फल आहे. आणि तें जातिसमावेशसाध्य आहे. तत्साधक संस्कार संशयनिवृत्तिद्वारा सुसंस्कारप्रदान हेंच शिक्षणाचें तत्त्व आहे. आणि तें सांख्यद्वारानें सिद्ध होतें. या विषयीं ऐतिह्यदृष्टांत सांगतों:—

एका विवक्षित ग्रथांत लिहिलें आहे कीं, प्राचीन व अर्वाचीन पांडुरंग व गोपाळ ज्ञानेश्वरपुत्र, ज्ञानेश्वरदर्शनगमनार्थ भूमियानस्थित अलकावती समीप दोघांमध्यें तीर्थमाहात्म्यवादारंभ झाला. तेव्हां गोपाळ म्हणाला, हे बंधो, मला त्र्यंबकेश्वराविषयीं अति प्रीति वाटते, आणि तेथें गोदेचें तीर्थमाहात्म्य विशेष आहे.

पांडुरंगः—अरे हा तुझा सर्व भ्रम आहे. कारण, अलकावतींतील इंद्रायणीचें पाणी आणि गोदेचें पाणी दुसरें नाहीं. आणि पृथ्वीही एकच आहे. मग अलकावतीहून त्र्यंबकेश्वराला विशेष म्हणण्याचें प्रयोजन काय? हें ऐकून गोपाळ ह्मणालाः—अरे हें तुझें पटुत्वाचें बोलणें उपयोगीं नाहीं; कारण तूं म्हणतोस असेंच जर प्रमाण मानलें तर ग्रामस्थ थिल्लरोदक आणि गोदेचें उदक एकच आहे, मग अलकावतीस कशाला जातोस? आणि न जाशील तर मग तुझ्या मोठेपणांत म्हणजे आस्तिक्यांत आणि आमच्या लहानपणांत म्हणजे नास्तिक्यांत भेद कांहींच नाहीं.

पांडुरंगः—गोपाळ, तूं म्हणतोस तें खरें आहे. [illegible]रण, आपापल्या उपासनेनुरूप अशी प्रतीति होत असते. याप्रमाणे [illegible]त्रटलें बोलणें करून पांडुरंग व गोपाळ यांचा वाद संपला.

नंतर गोपाळाचें अज्ञान पाहून पांडुरंगास उत्तम वाटत नसल्यामुळें जवळच्या मुंबई शहरास जाण्याचा विचार करून दोघेही तेथें गेले. तेव्हां प्रातःकाल झाला होता. आणि जवळच समुद्र होता; तो पाहून दोघांनींही स्नान करण्याच्या इच्छेनें त्यांत बुडी मारली.

पांडुरंग ह्मणतो गड्या गोपाळा, आतां या समुद्रांत सर्व नद्या मिळाल्या आहेत. तर तूं आपलें गोदामाहात्म्य आणि मी आपलें अलकावतीमाहात्म्य हीं दोन्ही दोघांनीं काढून आपापल्या नदीचें स्नान केल्यास बरें पडेल.

गोपाळः—असें काय रे बोलणें. तें कसें बरें निवणार?

पांडुरंगः—कायरे गड्या, तें कां निघत नाहीं बरें? माझी तर फार बुवा काढण्याची इच्छा आहे.

**गोपाळ**:—बोवा! तुला काढतां येईल तर काढ. मला तर काढतां येत नाहीं. आणि कां ह्मणशील तर ऐक. पृथ्वीच्या परिच्छिन्नतेनें पाण्याची परिच्छिन्नता वाटत होती. आणि ह्मणूनच नदी, थिल्लर इत्यादि भाव होते. आतां तर सर्व पाणी एक झालें आहे. आतां मला येथें सर्व तीर्थें वाटतात.

**पांडुरंग**:—तेव्हां हें तुझें ज्ञान कोठें रे गेलें होतें? मीही पूर्वी हेंच सांगत होतों.

**गोपाळ**:—गड्या, तेव्हां नद्यांची भिन्नता प्रत्यक्ष दिसत होती. आणि पाण्याची एकता अनुमित होती. आतां तर नद्यांची भिन्नता दिसत नाहीं; आणि पाण्याची एकता प्रत्यक्ष आहे. ह्मणून तुझें ह्मणणें मला पटलें त्यांत काय? आणि विशेष हें कीं आतां जसा माझा वाद राहिला नाहीं तसा तुझाही राहिला नाहीं.

**पांडुरंग**:—गोपाळ, तूं मोठा प्रत्यक्षवादी आहेसरे! आतां तुला समजलें, आतां चल.

याप्रमाणें बोलून पुन्हां ते आपल्या अलकावतीच्या वाटेनें खेळत चालले. असो. ही कथा लांबलचक असल्यामुळें लिहीत बसत नाहीं. आतां दार्ष्टांत मात्र सांगतों:—

कोणीएक जिज्ञासु शिष्य सद्गुरू जवळ येऊन सुखासाठीं कांहीं उपाय सांगा ह्मणून विचारूं लागला.

**शिष्य**:—भगवन्, मला देवांचा जन्म फार सुखी दिसतो.

**श्रीगुरु**:—कायरे, तुला असा भ्रम काय ह्मणून पडला? अरे, देव, मनुष्य, पशु पक्षी सर्व खातात, पितात, निजतात ह्मणून एक आहेत असें कां ह्मणत नाहींस?

**शिष्य**:—कायहो, मी सुखाचा उपाय विचारूं लागलों ह्मणून आपण भलतेंच सांगतां कीं काय? देव अमृत पितात, आणि पशु गवत खातात. हे दोन्ही एकच तर मग पशुपक्ष्यांप्रमाणें तुह्मांआह्मांलाही नरक खाण्यास काय होतें? आणि तशालाही जर तुह्मी कबूल असाल,

तर माझ्यानें मात्र तसें होत नाहीं. हें ऐकून श्रीगुरु:—शाबास! शाबास! बाळा, तुला तुझी कांहीं लज्जा आहेरे! मला वाटत होतें तूं आपला केवळ चौंढालपणानें विचारीत होतास. तर आतां सांगतों तें श्रवण कर.

बाळा, या विश्वाचें कारण त्रिगुणसाम्यावस्था प्रकृति एक आहे. तीच कार्य कारण आणि कर्तारूपी झालेली आहे. तिच्या संयोगी पुरुष नाना आहेत. ही प्रकृति जेव्हां आपल्या गुणांचें वैषम्य करिते, तेव्हां सृष्टिरूप होते. नाना पुरुष हे इच्छा संगानें भोक्ते होतात. जसा चुंबक लोखंडाच्या काट्यांनां ओढतो, आणि ते कांटे त्याच्याच शक्तीनें धांवत येऊन त्यालाच टोंचण्या मारतात, अथवा झांकून टाकतात; त्याप्रमाणेंच पुरुषसान्निध्यानें प्रकृति कार्य कारण आणि कर्त्ता झाली असून सुखदु:खें पुरुषावर आणून टाकते, आणि हीच आपल्या गुणांच्या साम्यावस्थारूप झाली ह्मणजे सृष्टीचा प्रलय होतो. मग पहिले देवादिक मरून जाऊन दुसरे पुरुष जे साधक असतात, ते देवादिक होतात. या प्रकृतीच्या सत्वगुणानेंच देव झाले आहेत. आतां तुला जर देव व्हावयाचें आहे, तर तूं साधन कर ह्मणजे होशील. याप्रमाणें गुरूंनीं जेव्हां सांगितलें तेव्हां शिष्यास बरें वाटून तो आपल्या घरीं गेला. कांहीं दिवसांनीं विचार करून पुन: येऊन ह्मणाला:—

भगवन् मी देव होण्याकरितां जर साधन केलें, तर मला प्रथम कांहीं दिवस प्रलयांत राहून नंतर देव व्हावें लागेल; आणि दुसरा प्रलय झाला कीं दुसरा कोणी देव होईल व मी मरून जाईन.

श्रीगुरु:—होय. असें तर आहेचरे. तूं विचारलेंस म्हणून मी सांगितलें. आतां मी काय करावें सांग बरें?

याप्रमाणें श्रीगुरूचें वचन ऐकून शिष्य त्रिविधतापानें संतप्त होऊन ह्मणाला कीं भगवन् आतां माझ्या दु:खाचें निवारण आपणच करावें. तेव्हां कनवाळू श्रीगुरु म्हणाले:—

बाळा, भितोस कशाला? प्रकृतीनें तुला सुखदु:ख प्राप्त झालें आहे; तर तूं प्रकृतीचा संग सोडून दे म्हणजे झालें आणि तो संग सोडण्याकरितां समाधीचा अभ्यास कर, म्हणजे समाधिमध्यें

त्रिगुणांचा विसर पडून तुझा संग सुटेल. या करितां मी तुला एक योगाचें पुस्तक देतों. त्यावरून अभ्यास कर. असें श्रीगुरु बोलल्यावर शिष्यानें अवश्य म्हणून श्रीगुरुदत्त पुस्तकावरून समाधि साधल्यावर ती पुन: उतरली म्हणून तो सद्गुरूजवळ गेला, आणि अत्यंत परिश्रम केल्यानें स्वेदपरिप्लुत होऊन हात जोडून ह्मणाला:–भगवन् समाधीनें तर मला सुख झालें, परंतु प्रकृति सत्य असल्यामुळें पुन: पुन: तिचा संग प्राप्त होतो. तर प्रकृति खोटी करण्याचा कोणी यत्न आहे कीं नाहीं ?

श्रीगुरु:— कायरे तुला वेड लागलें आहे? सर्व शास्त्रें प्रकृति सत्य आहे असें सांगतात; आणि तूं प्रकृति खोटी करण्याचा प्रयत्न कसा विचारतोस? तेव्हां शिष्य ह्मणाला:— भगवन् मला शास्त्रांशीं नातें नाहीं. तुम्हीं मला कांहीं शास्त्रानें मिळाले नाहीं. शास्त्रें कांहींही ह्मणोत, मी सर्वस्वी आपला आहे. आतां माझ्या सर्व दु:खांचें निवारण आपणच करावें. असें ह्मणून अश्रुपरिप्लुत होऊन मूर्च्छित पडलेला जो शिष्य त्यास पाहून श्रीगुरु 'नाभी' 'नाभी' ह्मणून दोन्ही हात मस्तकावर ठेवून त्याला संकेतदृष्टि उपदेश करिते झाले. आणि तत्काळ विचारिलें कीं, आतां तुला कायरे वाटतें? कोठें तुझे प्रकृति पुरुष आहेत ते मला निवडून दे.

शिष्य:— भगवन् आतां तुह्मीं मात्र येथें आहांत. येव्हवीं माझ्यासुद्धां जगत् हें कांहींच वाटत नाहीं. आणि हे देव, मनुष्य, पशु-पक्ष्यादिक कांहींच नसून अखंडैकरसरूप आहे.

श्रीगुरु:— पहिलें तुला तर हेंच सांगितलें, तें कसेरे पटलें नाहीं?

शिष्य:— भगवन् आपण मला वेदांतानें परोक्ष सांगितलें होतें ह्मणून पटलें नाहीं. आणि आतां आपल्या कृपेनें शब्दरहीत अपरोक्ष झालें आहे; ह्मणून आतां पटले न पटलें काय सांगावें? तें आपणच.

श्रीगुरु:— तर तुला श्रम फार पडले कीं नाहीं?

शिष्य:— भगवन् मला इतक्या दूर यावयाचेंच होतें ह्मणून. आतां श्रम कांहीं वाटत नाहींत.

श्रीगुरुः—बरें तर, दूरजवळ कांहीं मानूं नकोस. चाल मज बरोबर. याप्रमाणें बोलून शामरावगुरु व जैरामशिष्य दोघेही स्वस्थानीं गेले.

यावरून हे श्रीनिवासतात, संशयनिवृत्तिद्वारा सुसंस्काररूप प्रथम शिक्षण कोणतें द्यावें, याचा निर्णय आपण मला कळवाल अशी आशा आहे.

ओवीः—सद्गुरुज्ञानेश्वर माउली । जी अखंड कृपेचि साउली ।
तियेची वंदोनि पाउली । वाक्पुष्पें अर्पिलीं तत्पायीं ॥१॥

हरिः ॐतत्सत् श्रीद्वितीयं पत्रकम् संपूर्णम्.
श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# [ ९ ]

## रा. रा. केशराव देशमुख यांनां पाठविलेलें पत्र.

वेदमूर्ति गुरुबंधु केशवराव महाराज यांचे चरणीं शिरसाष्टांग प्रणिपात वि. वि.

आपलें पत्र आलें मजकूर समजला, विशेष. श्री ज्ञानेश्वरकृपेनें स्फुरलें तें लिहितोः—

### ओव्या.

जयजय सद्गुरु मायबापा । वारूनि माझिया संसारतापा । मज मार्ग दाविला सोपा । अलकावती निवासिया ॥ १ ॥ नवल साविया पाउठी । न घेतां वृत्तीची हातवटी । ध्यानाचिये परिपाटीं । बैसावें कीं ॥ २ ॥ शद्व तो प्राणीं जाय । दिठी ते बुद्धि होय । चित्त तें राहे । आत्मा होउनी ॥ ३ ॥ मग बुद्धीचिया भरंवसा । आत्माचि उपहित ये ऐसा । तो शद्वाचिया सौरसा । पोटींपाठीं ॥ ४ ॥ तैं समस्त प्रतिबंधा । फुटोनि होय रंपंधा । मग उरे बांधा । सगुणपणाचा ॥ ५ ॥ होतें तें

अधिष्ठान । आलें तें सगुणपण । आतां प्रेमें आलिंगन । स्वानंदभरें । ६ स्मरण ज्ञान आणि ध्यान । या त्रिकाचें हेंचि लक्षण । लिहिलें तैसें अभ्यासून । पहावें तुह्मीं ॥ ७ ॥ मग जेथें पहाल तेथें ज्ञानेश्वर तत्वतां । ओ देतील हांक मारितां । हें रूपक नव्हे यया अर्थी । प्रमाण आहे ॥ ८ ॥ व्यासें शुकाचिया आवडी । या प्रत्ययाची घेतली गोडी । तोचि श्लोक सुखपरवडी । लिहितें येथें ॥ ९ ॥ अलकावतींहूनि तात यावे । हें बोलणें कोणें सहावें । पैं केशकेश ज्ञानेश्वर म्हणावें । तैंचि फावे ॥ १० ॥ उदित चक्रांचिया आवांका । निकियापरी मारितां हांका । तैं ऐसा हा कां । हातां न ये ॥ ११ ॥ येथें तुह्मीं बोलिलां ऐसें । कीं गुह्य काय सांगितलें असे । तरी आतां हें लिहिलें तैसें । अभ्यासावें ॥ १२ ॥ मग हें गुह्य होय किंवा नाहीं । प्रत्यय येईल लवलाही । परी बुद्धि ते सर्वदाही । सरळ असावी ॥ १३ ॥ सांडूनि परमत जाल वितंड । मोडावे आग्रहाचे बंड । करावा कामक्रोधदंड । विवेकेनीं ॥ १४ वाचेनीं जपावें श्रीहरिनाम । अंतरीं असावें अतिनिष्काम । मानापमान मानावे सम । एकदेशीय मतही सांडोनी ॥ १५ ॥ दैवीसिद्धींची ऐसी रीति । त्या इच्छा असतां दुरी जाती । इच्छा नसतां लोळती । पायां-तळीं ॥ १६ ॥ म्हणोनि निष्कामासि कांहीं । दुर्लभ ऐसें नाहीं । परी हरिकाम सर्वदाही । असावाचि कीं ॥ १७ ॥ तो मिळवाया शार्ङ्गपाणी । लक्ष असावें श्रीगुरुचरणीं । जयाचिया वाणी । भेटेचि तो ॥ १८ ॥ आतां माझा प्रत्यय देख । तो व्यासशुकसमयदर्शक । जैसा कां असे श्लोक । तैसाचि आहे ॥ १९ ॥ श्रीज्ञानेश्वर महाराजा ऐसीं । माझी ओवी नाहीं निश्चयें । परी ऐसेंचि असणें मजसी । भूषणावह वाटे ॥ २० ॥ श्रीज्ञानेश्वरतातचरणीं । श्रीकृष्ण आणि मी दोघे मिळूनी । कवितालेख समर्पुनी । सेवकस्थानीं राहिलों ॥ २१ ॥

श्लोक.

यं प्रव्रजंतमनुपेतमपेतकृत्यं द्वैपायनो विरहकातर आजुहाव ॥
पुत्रेति तन्मयतया तरवोभिनेदुस्तं सर्वभूतहृदयं मुनिमानतोऽस्मि॥१॥

कळावें हा प्रणाम. पौष शु० १०. ता० १९।१।०६

॥ श्रीज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वमाउली समर्थ ॥

## ( १० )

### रा. रा. मुळे मास्तर यांनां पाठविलेलें पत्र १ लें.

श्रीयुत महाराज तज्जन्मसंज्ञाधारी यांतें प्रणाम वि. वि. आपलीं कृपापत्रें बरींच पोहोंचलीं. आपण पत्रांत "ऑल जोक" ( All joke ) म्हणून लिहिलें त्याबद्दल मला वाईट वाटलें नाहीं, कारण मागच्या पत्रांत "श्रीकृष्णपतिसुख तुला सर्वकाळ असो" असा आशिर्वाद होता, ह्मणून चित्तक्षोभप्रतिबंधाविर्भाव झाला. असो. सर्व संसृतीचें कारण एक चित्त आहे. हें चित्तच अधिभूतरूपानें पुत्र, कलत्र, माता, पिता, भ्राता, स्वसा, मित्रेष्टगणगोत इत्यादि होऊन, अध्यात्मरूपानें मी व माझें आणि तसेंच आधिदैविकरूपानें यम, वरुण, इंद्र, चंद्र इत्याद्यनेकरूप झालें आहे. ज्या ज्या शास्त्रांचें पर्यवसान जगत्कारणांत होतें, त्याला त्याला चित्त विषय करीत असतें. सर्व शास्त्रांत जगत्कारणाचा हवा तसा शोध केला, पण चित्ताचा शोध करण्याला कोणतेंही शास्त्र समर्थ झालें नाहीं. कारण, शोध करण्याचा प्रयत्न केला असतां, हें चित्त आधींच पुढें जात असतें. श्रुतींनीं जीं अनेक ब्रह्माण्डें सांगितलीं आहेत, त्यांची चित्त तृष्णारूपानें उत्पत्ति करून ज्ञानरूपानें संहार करीत असतें. बाबा, याला एक निमिषभर मोकळीक दिली तर हें अनेक ब्रह्माण्डाचा उत्पत्तिसंहार करितें; मग याला सर्व आयुष्याची मोकळीक दिली तर काय होईल याचा विचार करण्याची गरजच नाहीं. वंध्यापुत्राच्या हातांत शृंखला देऊन पोटराजांनां बंधन करण्याला ह्याच्यासारखे गारोडी दुसरे कोणीच नाहींत. किंबहुना सर्वसत्तावान जो परमात्मा त्यालाही हें कठीण असल्यामुळें कर्तव्याकर्तव्याची जबाबदारी त्यानें चित्तावरच दिली आहे. स्वप्नांतील स्त्री खोटी असून वीर्यपात जसा खरा होतो त्याप्रमाणें हें खोट्या संसाराला रचित असून पुरुषांनां सुखदु:खादि भोग मात्र खरा देतें. हें हातांत आलें ह्मणजे जन्ममरणाचें सर्व काम संपलें. बहुत मनुष्यें

साधनावर फार धांव घेत असतात. पण झाडाला आंब्याचें फळ आहे असें पूर्ण जर कळलें नाहीं, तर मग त्यावर चढणें, आणि शाखोपशाखीं भ्रमण करणें हें जसें मूर्खत्व आहे, तद्वत् चित्ताचा परिचय न होतां जे कोणी योगादि साधनांचा यत्न करितात, त्यांनां हें चित्त नाना पदार्थ देऊन मोहित करितें. कोणत्याही तृप्तीविषयीं तीनच कक्षा इष्ट आहेत. परिचय, क्रिया, आणि सिद्धि. आप्तादि वचनेंकरून हा आंब्राच आहे असें पक्के ओळखणें याला परिचय म्हणतात. त्यावर जाऊन तो तोडून आणून त्याचा रस काढणें याला क्रिया म्हणतात. आणि तो भक्षून जी क्षुधाशांति ती सिद्धि म्हणावी. तसेंच लोकालोक, शरीरें, आत्मा, प्रकृति, भूत, मोक्ष, पुनर्जन्म इत्यादि पदार्थांची प्रत्यक्ष, अनुमान आणि शाद्ब या प्रमाणांनीं योग्य ओळख झाली म्हणजे हठ, लय, मंत्र , राज ह्यांतून कोणत्याही साधनास लागावें. नंतर अखंड दुःखनिवृत्ति आणि परमानंदप्राप्ति हें फल प्राप्त होतें. पण संसाराच्या दुःखामुळें या क्रियेला प्रतिबंध होतो असें म्हणणारेच बहुत आढळतात. आपलेंच मन संसारांत गुंतलें आहे त्याला क्षणभर समाधानानें काढून परमप्रेमानें भगवच्चिंतनाकडे लावूं असें म्हणणारा कोणता बरें सखीचा लाल दिसत आहे? असो, तुमची स्थिति काय आहे हें लौकर पत्रांत लिहून कळवावें. येथें बिझंटची व्याख्यानें झालीं. तीं ऐकण्याला भालेराव मी व आणिकही मंडळी गेली नव्हती प्रश्नोत्तरसभेंत मात्र भालेरावानें जाऊन तिचीं बाराही उत्तरें शंकाग्रस्त होती असें तेथून आल्यावर मला सांगितलें. ही मात्र तुमच्या सारखी थट्टा नव्हे. दुसरें, तुम्हाला यावयाचें असेल तेव्हां यावें, पण पत्र मात्र आधीं पाठवावें.

श्रीमत् सद्गुरुज्ञानेश्वरचरणस्मरणकृतेरलम्.

| | |
|---|---|
| मुकाम अमरावती<br>तारीख २१।२।०५. | आपला<br>गुलाब. |

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वमाउली समर्थ ॥

# (११)

## पत्र २ रें.

वेदमूर्ती जन्मसंज्ञाधारिन् यांचे चरणीं प्रणाम. वि. वि. आपलें कृपापत्र पावलें. मजकूर समजला. आपला विश्वास मजवर सत्यच आहे, तर मीही आपणास सोडून जाण्याची इच्छा करीत नाहीं. तुह्मीं मला खरोखरच प्रेमपाशांत बांधिलें तर मला एक पाउलही पुढें निघवणार नाहीं असें मी ज्ञानेश्वर साक्ष घेऊन सांगतों. परंतु माझ्या सर्वज्ञत्वाबद्दल जसा सर्वांचा निश्चय आहे तसा सर्वशक्तिमत्वाबद्दल दिसत नाहीं. जगाची स्थिति अशी आहे कीं ईंद्रजालानें केलेल्या गारुड्याच्या सर्पाला पाहून मोहरांच्या मुठी सोडतात, पण रात्रीं दोरीवर भासणाऱ्या सर्पाची निवृत्ति करण्याकरितां जो दिवा घेऊन येतो त्याविषयीं खरें काय आहे याचा कोणीच विचार करीत नाहींत, हा सिद्धांत. तसेंच संसारांतील मायेचा आश्रय करून संसारच खेळविणाऱ्या पुरुषांनां संसारांतील जीव शरण जात असतात. पण स्वज्ञानानें संसारांतील त्रिविध दुःखांची निवृत्ति करणाऱ्या पुरुषाचें कोणी नांवही घेत नाहींत. हा प्रसंग मजवरच आहे असें नाहीं, तर तुकाराम महाराजांनीं वैकुंठीं जातांनां स्त्रियेस चलतेस काय? ह्मणून विचारलें असतां तिनें माझें उदरीं पांच महिन्याचा गर्भ असल्यामुळें माझें रिकामपण नाहीं आपण जावें असें स्पष्ट सांगितलें, व ते निघून गेल्यानंतर प्रस्ताव केला, असें भक्तिलीलामृताच्या ४० व्या अध्यायांत लिहिलें आहे. माझी तुकाराम महाराजांइतकी योग्यता नाहीं हें जरी खरें धरलें तथापि श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरमहाराजांमध्यें तसें सामर्थ्य नाहीं असें मात्र मजकडून ह्मणवत नाहीं.

इतकें लोटांगण घालून सांगितलें असतांही जर तुह्मांलोकांचें चित्त द्रवत नाहीं, तर मग तुमचें ह्मणणें काय तें तरी सांगा? मला केवळ अन्नाकरितांच तुह्मांला असें सांगणें आहे असें नाहीं, कारण श्वान जसें उदर भरतात तसें आह्मींही भरतों. याउपरही

तुह्माला आपल्या स्वहिताची जर काळजी नसेल तर मी तरी काय आपला मेंदू काढून तुमच्या हातीं द्यावा हें समजत नाहीं.

मी तुमचें फुकट दास्य करण्यास तयार असूनही जर तुह्माला करवून घेतां येत नसेल तर तुमचें प्रारब्ध; पण असें प्रारब्धावर बोल देऊन बसण्यापेक्षां श्वानसूकरादि जन्म झाले असते तर बरें होतें. कारण पाषाणादि प्राणी जड खरे परंतु स्वस्थानीं क्षणभर तरी विश्रांती घेतात, पण तुह्मी आह्मी तर दिवसा लोकांचे दास व रात्रीं स्त्रियांचे पास अशा रीतीनें विश्रांतीपासून च्युत झालों आहोंत.

हें प्रिय, मी सर्वस्वी अपराधी असल्यामुळें मजकडून जे प्रमाद झाले असतील त्यांची क्षमा करणार आपण समर्थ आहांत. मी थिऑ-सफिस्ट महत्वाकांक्षेकरितां किंवा आकर्षण पडलें ह्मणून झालों नाहीं तर यांत माझा कांहीं हेतु आहे. तुह्मी आपलें हित करीत असतांनां माझ्यावर कितीही जरी क्रोधाग्नीचे शद्ब टाकले तरी ते मी शिरसावंद्य करीन, परंतु स्वहिताकडे लक्ष न देतां स्मशानवैराग्यप्रेमजलानें डोळे भरून वाहवा! वाहवा! म्हणणें मला पसंत नाहीं. हे तात, आपण जितका जितका विश्वास मजवर ठेवाल तितक्या तितक्या आपणास या जन्मांत व पुढच्या जन्मांत अनंत प्रतीति येतील. आतां आपणास वाटेल कीं हा आम्ही अंध विश्वास ठेवावा कीं काय? तर बाबा, तुम्हा-ला डोळेच नाहींत. तुह्मी आंधळें आहांत म्हणूनच तुह्मास अंध विश्वास ठेवावा लागतो. आंधळ्यानें जर डोळसाचा हात धरून मग त्याच्या-विषयीं भलभलत्या कल्पना केल्या तर काय फळ मिळेल? किंवा हें आपणास रुचलें नसेल तर दुसऱ्या रीतीनें सांगतों. तुह्मी परमार्थी-विषयीं आंधळे, मी जगाविषयीं आंधळा. ज्ञानेश्वर महाराज समाधींत डोळे लाऊन बसले आहेत. भगवान् श्रीआदिनाथ स्मशानांत डोळे लाऊन बसले आहेत, व तुमच्या नांवाचें पूर्वाधिष्ठान गोपीनें गुलाल टाकल्यामुळें रासांत डोळे लावीत आहेत, याप्रमाणें ही अंधपंरपराच तुह्मां आह्मांला सुखाला कारणीभूत होणार आहे असें दिसतें.

## ओव्या.

सुखाची साउली डोळा । श्वेतपीतांचा उमाळा । कीं गोपी रंगमाळा । कृष्णगळां ज्या रीती ॥ १ ॥ जग साकाराचि निराकार सर्वदां सर्वां सुखकर । वेणुनादीं सगुणाकार । प्रत्यया ये ॥ २ ॥ तूं वडिल मी लेंकरूं । तूं स्वामी मी चाकरू । ऐसी भक्ति निर्धारू । देहबुद्धीनें ॥३॥ तूं वृक्ष मी पान। तूं पृथ्वी मी कण। तूं सूर्य मी दीपक जाण। जीव बुद्धि प्रमाण ही भक्ती ।४। तूं सागर मी तरंग। तूं आकाश मी अवकाश सवेग। तूं नाद मी शब्द अव्यंग । तूं प्रकाश मी प्रभा ॥५॥ तूं शिव मी शक्ती । तूं राग मी रक्ती । तूं अर्थ मी उक्ती । सुखार्थे ॥ ६ ॥ तूं मृग मी हरिणी तूं चंद्र मी चांदणी । तूं कांत मी कामिनी । भोगाथिया ॥ ७ ॥ तूं गोप मी गोपिका । तूं रावा मी सारिका । तूं पुष्प मी कळिका । आनंतीये ॥८॥ तूं मेघ मी विजुळी । तूं श्याम मी सांवळी । तूं वाद्य मी धुमाळी रस भरितां ॥ ९ ॥ तूं नेत्र मी बाहुली । तूं अंग मी साउली । तूं चाल मी धाउली । तूं पंथ मी विंदी ॥ १० ॥ तूं वायू मी गति । तूं सोनें मी कांती । तूं प्रेममी भक्ती । स्वानंद योगें ॥११॥ ऐसा जो कांहीं अनुभवो । तो आमचा स्वयंभावो । नव्हे देह ना जीवो । आत्माभिमान तोही नको ।१२। हें नव्हे दृष्टांत निरूपण । सर्व सुखाचें अधिष्टान । समजेल तरी घ्यावें समजोन । नाहीं चोरोनि ठेविलें न्यां ॥ १३ ॥ सनत्कुमादि सतरा गुरू । यांनीं जो मज सांगितला विचारू । नाथ सांप्रदायानुसारू। लिहिला साचारु ये स्थळीं ॥ १४ ॥ ते गुरु जेकां सप्तदश । त्या सर्वांचाही समावेश । ज्ञानेश्वरतात सर्वेश । निष्कलंक निस्संगु ॥ १५ ॥ त्या ज्ञानेश्वरजननीपायीं । अरुप प्रेमें ठेवोनि डोई । भावद्रव्यलाखोटा पाही । तुह्मां लवलाही पाठविला ॥ १६ ॥

॥ अभंग ॥

सूत गोळोनियां काढिले पदर । दिले खोळेभर चंद्रबिंब ॥ १ ॥
आकाश गाळोनी काढिली निळीभा । वळली प्रतीमा प्रतीभानें ॥ २ ॥
ध्वनी गाळुनीयां काढिला शब्दार्थ । स्मरूनी समर्थ लिहिला येथें ॥३॥
रुचेल तरी तो घ्यावा आकळोनी । नाहीं यावांचोनी आम्हांपाशीं ॥४॥

जन्मनाम तुह्मी आधींच खेळीये । कायसी लळिये पाळावी हो ॥ ५ ॥
ज्ञानेश्वरप्रभू तुह्मां आह्मां रंगा । कृष्णसंगें पिंगा खेळवीजी ॥ ६ ॥

ताजा कलमः—पत्राचा अक्षरशः विचार करावा, केवळ आरूढ ह्मणून सोडून देऊं नये. आपण मागाहून आल्यास हरकत नाहीं, परंतु पत्राचें उत्तर पावल्याबरोबर पाठवावें. बहुत काय लिहिणें कळावें ही विनंति.

आपला अजागलस्तन,

गुलाब.

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# [ १२ ]

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वररूप विज्ञान भिक्षवे नमः

श्रीजन्मनामाधिष्ठित वेदमूर्ती यांचे चरणीं सेवक गुलाब याचा साष्टांग प्रणिपात वि. वि. आपण माझ्या भेटीची अत्यंत इच्छा करीत आहां; ही कृपा तुम्हांस आणि मज दोघांसही सत्वगती देणारी आहे, किंतु सद्यः समर्थी ती भयावच्छिन्न असल्यामुळें मर्यादामार्गीय आहे. तुह्माला क्षणोक्षणीं भीति उत्पन्न होत असते, व असंतोषही उत्पन्न होत असतो, पण हें विक्षेपकार्य असल्यामुळें आमचा इलाज नाहीं. तुह्माला जेवढी मार्गाची उतावळी आहे तेवढी ज्ञानाची नाहीं, परंतु ज्ञान आणि मार्गाचा समुच्चय असतो. उदाहरणः—जसें ज्ञानानें परमात्मा जाणावा आणि मार्गानें त्याचा संयोग करावा. अशा अनेक गोष्टी आहेत. श्रोत्रीय आणि ब्रह्मनिष्ठ होणें हेंच जगांतील मुख्य कर्तव्य आहे. ब्रह्मनिष्ठते वांचून श्रोत्रीयता जशी आंधळी, तशीच श्रोत्रीयतेवांचून ब्रह्मनिष्ठताही लंगडी आहे ( श्रोत्रीयता=विद्वत्ता ) एकेवेळ ब्रह्मनिष्ठतेची गोडी लागल्यावर विद्वत्तेवर त्यांचें मन बसत नाहीं, ह्मणून याचा उपक्रम पहिलेच तसा आहे. त्यावर तुमचें ह्मणणें कदाचित् " मग तुह्मी आह्माला

शद्बकिटाकिटच सांगणार कीं काय? ” असें येईल, परंतु आह्मी तुम्हाला विद्वत्ता व ब्रम्हनिष्ठता या दोन्ही पक्षानें सारखे नेणार. शिवाय शद्ब किटकिटही सांगितली तरी तुह्माला शद्बकिटकिट ह्मणण्याचा काय अधिकार आहे? कारण शास्त्रावर अलंबुद्धि झाल्याशिवाय शास्त्रें नकोत, असें ह्मणण्याचा कोणासही अधिकार नाहीं. ग्रहण होत नाहीं ह्मणून कंटाळा येऊन आतां शास्त्र पुरे अशी तुमच्या सारखी अलंबुद्धि अज्ञानी पुरुषांनां आणि वाचकांनांही असतें. त्याला आह्मी अलंबुद्धि ह्मणत नाहीं. ती तर शद्बानुविद्ध समाधीमध्यें होत असते. जसें भगवत्कथेमध्यें प्रेम येऊन प्रेमानें मूर्च्छित पडला म्हणजे कथा ऐकणें आपोआप बंद पडते, त्याप्रमाणें श्रवणानंदानेंच प्रथम समाधींत गुंग झाला ह्मणजे आपोआपच शास्त्रावर अलंबुद्धि होत असते. भालेरावांचीही मागें तुमच्याप्रमाणेंच स्थिती झाली होती. किंचित् कारणाकरितां आत्मसार्थक करणाऱ्या पुरुषांनां आह्मी आपल्या हातचे सोडीत नसतो. तुह्माला जी मी स्त्रीतुल्यता लिहिली आहे ती जन्मनामाधिष्ठित असल्यानें विनोदाभावप्रतिसंयोगिताभासरूप आहे, ह्मणून क्षमा करावी. आतां मी संस्कृतांत फार भाषण करीत नाहीं; याचें कारण हें आहे कीं प्रभू ज्ञानेश्वरांनीं संस्कृत ग्रंथ केले नाहींत त्यांच्यावर तुटक्या कवडीची ताण मिळविणें हें आह्माला इष्ट नाहीं. दुसरें, सर्व भाषा प्रकृतिप्रत्ययी आहेत ह्मणून प्राकृतच आहेत. तिसरें, भाषाज्ञान मी ग्रहण न करितां तत्वज्ञानाकडेच विशेष लक्ष देत असतो; आणि निश्चलदास महाराज असेंच म्हणतात:—

ब्रह्मरूप अहि ब्रम्हवित् । ताकी वाणी वेद ॥
भाखा अथवा संस्कृत । करत भेदभ्रम छेद ॥ १ ॥
विचार सागर.

मग इंग्रेजी भाषेंतूनही तत्वज्ञान घ्यावें असें तुह्मी म्हणाल तर ती भाषा वैकृत असल्यामुळें मंत्ररहित आहे, ह्मणून तिजपासून तत्वज्ञान न होतां उलटा प्रतिबंध होतो.

आतां जीजीबाई मला दर्शनें झालीं असें ह्मणत असते, ती माझी परीक्षा पाहण्याकरितां कीं काय कोण जाणे? कारण ती अजूनही तिसऱ्या भूमिकेवरच स्थित आहे मंडळीच्या मानानें पाहिलें तर निस्पृह

होण्याला जिजीबाईला जितकी सवड आहे, त्याच्या शतांशही दुसऱ्याला नाहीं; आणि तिचें धैर्यही मोठें आहे, पण क्षणोक्षणीं विक्षेपबुद्धीवर कां येते हें कळत नाहीं अथवा, "त्वां सेवतां सुरकृता बहवोऽन्तरायाः" या भागवतोक्तिप्रमाणें जर होत असेल, तर तिचा तरी काय उपाय आहे? तें मलाच सुधारलें पाहिजे, पण असेंच आहे किंवा कसें आहे, हें पत्र लिहून कळविणें तिचें काम आहे. गंगाधर हा माझ्या भेटीवांचून किंचित् विदेहपक्षी होण्याचा संभव आहे. एवढ्याकरितां "ज्ञानेश्वरकन्याभेट तुला लौकरच होईल" अशा आशयाचें महाराजांनीं मला सांगितलें ह्मणून मी तुला कळवीत आहे, असें तुह्मी त्याला एक पत्र पाठवा, आणि त्याला असेंही लिहां कीं "तुला जो दशभुज प्रत्यय आहे तेवढाच सध्यां कायम ठेव." गंगाधरचें जेवढें ह्मणून कांहीं गूढ वागणें होतें तें सर्व आत्मसार्थकतेकरितांच होतें.
कळावें हा प्रणिपात.

| | |
|---|---|
| मुक्काम यावली. (वऱ्हाड.) ता. २०।५।०५. | आपला सेवक गुलाब. |

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## ( १३ )

( उमरावतीहून नागपुरला पाठविलेलें पत्र ४ थें. )

ओवी:—ॐ नमोजी ज्ञानदेवा। भक्तवत्सला करुणार्णवा । अनंत ब्रह्मांडांचा गोवा। तुझिये नखीं ॥ १ ॥ जय मत्कांत नामधारका । स्वधर्मरस परिमूलका । नमस्कार आणि आशीर्वाद निका । दोन्ही साविका करूनिठा ॥ २ ॥ अंतवाहक शरीरेंकरून । प्रथम चिद्रूप करावें मन । तैंचि तुह्मां दर्शन । सहज लाहे ॥ ३ ॥ जड आणि चिन्मयपण । दोन्ही मिळोनि झालें मन । जड भाग तो बाह्य जाण । ह्मणोनी मन

विषयीं धांवे ॥ ४ ॥ सागरीं मीठ नसोनी । निर्माण होय रोधेंकरोनी । तैसें ब्रह्मीं जड नसोनी । निरोधें मिळे ॥५॥ जो का मनाचा जड भाग । भगवद्दर्शना प्रतिबंध सांग ; तयाचा तोडावा योग । वेणुनाद श्रवणें ॥ ६ ॥ नाद करितां श्रवण । आकाशरूप होय मन । तेणें पृथिव्यादिकांचें जडपण । निघोनी जाय ॥ ७ ॥ तो नाद जेव्हां बिरे । तैं मन स्वरूपीं मुरे । नाहींच या प्रलयाकारें । सुखावें कीं ॥ ८ ॥ मग जें उठे अन्वयपण । तेंचि पैं लयचिंतन । आणि तुह्मां संपूर्ण । फावेल कीं हें ॥ ९ ॥ मी जी प्रतिज्ञा केली । ती साच करीन बहिली । सत्य असत्य कांहीं साउली । वाटो तुह्मां ॥ १० ॥ परी यासी पाहिजे संगती । तैसी काय करावी युक्ती । पत्रांवरूनि तुह्मांप्रति । साधतां येईल काय वदा ? ॥ ११ ॥ ह्मणजे मी पाठवून पत्र । साधनें लिहीन पवित्र । आणि आपुलें स्वरूपही निर्धार । थोड्या वेळींच दावीन कीं ॥ १२ ॥ लययोगें करूनी । तुह्मी शुद्ध व्हावें दृष्टी करूनी । मग येथें येउनी । माझा कंठ लक्षावा ॥ १३ ॥ अथवा भ्रुकुटी पहाव्या जाण । मग माझिया स्वरुपाची खूण । तुह्मां कळेल संपूर्ण । कैशिया रीति ॥ १४ ॥ अर्जुनासी श्रीकृष्णें विश्वरूप दाविलें । तैसेंनि मी तुह्मीं दावीन वहिलें । परी सांगेन तें पाहिजे केलें । आधीं आपण ॥ १५ ॥ आमुचे पती श्रीकृष्ण । त्यांनींही ऐसाच बोधिला अर्जुन । प्रथम तुझे नाहींत स्वजन । ह्मणून वैराग्य कथियेलें ॥ १६ ॥ पुढें वर्णाश्रमकर्में चित्तशुद्धी । सांगोनि तोडिली मलबुद्धी । ब्रह्मार्पणयोगें विक्षेपसिद्धी । तोडिली क्षणें ॥ १७ ॥ सांगोनियां योगसंन्यास । तोडियला कर्मपाश । योग सांगोनि विशेष । व्यतिरेक करविला ॥ १८ ॥ परा अपरा सांगोनि प्रकृति । दाविला संसार मिथ्यारीति । अर्चीधूममार्ग सांगोनि प्रीति । परलोक मिथ्या दाविले ॥ १९ ॥ राजविद्याराजगुह्य ह्मणून । दाविली मोक्षगतीखूण । संतांचे भजावे चरण । ह्मणूनि विभूति कथियेल्या ॥ २० ॥ इतुकें जेव्हां पूर्ण झालें । तैं स्वमुखीं विश्वरूप दाविलें । हें एकयाचि जन्मीं जाय साधिलें । परी पाहिजे केलें धैर्यपूर्वक ॥ २१ ॥ तैसें मीही दावीन तुह्मांप्रती । परी आधीं आंगीं आणावी ही संपत्ती । पत्रावरूनी निश्चिती साधेल काय तें कळवावें ॥ २२ ॥ तुह्मी जन्मसामाचें धारक । ह्मणोनि

कांहीं सम्यक | बोलतां नये न्यूनाधिक । तरी तें क्षमा कीजे ॥ २३ ॥
आणि शूद्र मी पठण करी श्रुती । हा आक्षेप न घ्यावा चित्तीं । शांकरभाष्यामाजीं । निश्चिती । प्रथमाध्यायीं कथियेलें ॥ २४ ॥

**गद्यः**–शांकरभाष्य प्रथमाध्याय त्रितीयपाद यांत शूद्राला वेदाचा अनाधिकार सांगून पुढें ३८ व्या सूत्राच्या टीकेंत आचार्यांनीं असें ह्मटलें आहे कीं, विदुर, व्याध प्रभृतींनां जें वेदज्ञान दृष्टीस पडलें, तें त्यांनां अध्ययन न करतां आपोआप आलें होते, आणि ज्ञानाचें फल जी भगवत्सिद्धि तीही त्यांनां झाली होती. ह्मणून त्यांनां कोणी दोष देऊं शकत नाहींत, आणि वेदही दोष देण्याला समर्थ नाहींत. याच भाष्याच्या टीकेंत आनंदगिरी असें ह्मणतात कीं, वैदिक धर्मातील चार वर्णांपैकीं सिद्धपुरुष कोणीही असो त्याबद्दल विचार नाहीं. साधक शूद्रानें मात्र वेदाध्ययन न करितां पुराणांतून ज्ञान संपादन करावें. यावरून मी सिद्ध आहे, असें मात्र ह्मणत नाहीं, पण ज्ञानेश्वरकृपेनें तसें झालें यांत काय नवल आहे? आतां तें भाष्य आणि टीकारूप वाक्यें खालीं लिहितों

शांकर भाष्य प्रथमाध्याय त्रितीय पाद ३८ सूत्रः–

" येषां पुनः पूर्वकृतसंस्कारवशाद्विदुरधर्मव्याधप्रभृतीनां ज्ञानोत्पत्तिस्तेषां न शक्यते फलप्राप्तिः प्रतिषेद्धुं ज्ञानस्यैकांतिकफलत्वात् "

यावर आनंदगिरीकृत टीकाः-साधकस्याधिकारचिंता न सिद्धस्येत्याह. ( आनंदाश्रमांत छापलेल्या पहिल्या भागाचें पृष्ट ३१३ ) या वाक्यांचा वर लिहिलेला अर्थ आह्मी भामती टीकेच्या अनुसार केला आहे. तेथें त्यांनीं विदुरादिकांनां ऐकांतिक वाक्यावरून वेदज्ञानच घेतलें आहे; तथापि विदुरादिकांनीं ब्राह्मणकर्म मात्र केलें नाहीं त्याप्रमाणें माझीही वागणूक आहे धर्मव्याधानीं आपल्या गीतेंत श्रुति सांगितल्या आहेत. यापेक्षां अन्य कांहीं मजकडून प्रमाद घडत असेल, तर तो मला परतून शिक्षित सांगावा. पण इतक्यावरून म्लेच्छांनां मात्र वेद ह्मणण्याचा अधिकार येत नाहीं. कारण पंचमवेद जो पुराण तो ऐकण्याचा सर्व शूद्रांनां अधिकार आहे; आणि म्लेच्छांनां तर पुराणही

ऐकण्याचा अधिकार नाहीं, असें भागवतमाहात्म्यांत स्पष्ट सांगितलें आहे. ह्मणून थिऑसफी करतें तें मात्र उत्तम नाहीं ॥ अलम् ॥

॥ श्रीमत्सद्गुरू ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# ( १४ )

( उमरावतीहून नागपूरला पाठविलेलें पत्र ५ वें. )

सा. प्रणिपात वि. वि. मागचें पत्र पावलेंच असेल आजच्या पत्रांत थिऑसफी संबंधानें मला थोडें लिहावयाचें आहे कारण एका मडक्यांत शिजलेली डाळ दुसऱ्या मडक्यांत ओतली असतां ती चांगली होत नाहीं, असा सिद्धांत आहे:—

अन्येषां हीनवर्णानां ज्ञानाभ्यासो विधीयते ।
भाषान्तरेण कालेन तेषां सोप्युपकारकः ॥ १ ॥
( सूतसंहिता शिवमाहात्म्यखण्ड. )

पश्चिमेकडे स्वामी विवेकानन्द किंवा बाबा भारती यांचे समाज सोडून, पश्चिमेकडच्या लोकांनींच शोध लावलेले ' प्राणविनिमय ' ( Hypnotism ), विद्युन्मानस ( Electric Psychology ), मानसिक शोध ( Psychical research ), मनोज्ञैतीह ( Psychometry) मानसोल्लीपिका ( Psychograply ) प्रेतवाहन [ Spiritualism ] युक्तिसिद्ध तत्वज्ञान [ Rational Philosophy ] व ईशविज्ञान [ Theosophy ] इतके समाज, अदृश्यशक्ति ( Metaphysical Force कबूल करीत आहेत. अदृश्यशक्ति कबूल करण्याचा आर्यधार्मिकउद्देश असा आहे कीं या दुःखमय जगांतून सुटून ती शक्तीच होऊन राहणें किंतु वर सांगितलेल्या पाश्चिमात्य समाजापैकीं ऱ्याशनल तत्ववेत्ते नुसत्या युक्तीच्याच अनुमानानें अदृश्य शक्ति कबूल करतात. राहिलेले,

थिऑसफीवांचून बाकीचे समाज गुप्तशक्ति मानून तिचा व्यवहाराकडे कसा उपयोग करावा ह्मणजे सगळीच गुप्तशक्ति जगरूपानें अस्तित्वांत कशी येईल ह्याचाच विचार करितात. जसें, रोग दूर करण्यांतच ' हिप्नाटिझमची ' समाप्ति, चोऱ्या शोधून काढण्यांत ' क्लेअरव्हायन्सची ' समाप्ति ' स्वर्गींही खावया जोडी येथुनीचि ' ॥ या तातवाक्याप्रमाणें परलोकांत नातेवाईकसंबंधच व वासना ठेवण्यांत स्पिरीच्युआलिझमची समाप्ति होते, आणि भूत शोधण्यांत सायकिकल रिसर्चची समाप्ती. विसरून राहिलेली अनंतैकतानता [ In tune with the Infinite ] ही देखील तोंड दाबून बुक्यांचा मार करीत करीत ऑप्टिमिझमच्या कलईखालीं आरोग्याचें आमिष दाखवून आशावादांत बुडविते. सारांश, जडवादी ज्या प्रमाणें प्रत्येक जडशक्ति विषयसुखसाधनाकडे लावण्याचा यत्न करितात, तद्वतच वरील सर्व समाज आहेत, हें ह्मणणें सर्वच अतिशयोक्तीचें होईल असें नाहीं. बाकी असलेली थिऑसफी मात्र पुष्कळ अंशीं व्यवहारांतून सुटण्याचा यत्न करिते.

१ मनस् हे मनुष्यांतच प्रगट होत असून जनावरांत तें नसतें आणि तें मनसच पुनर्जन्म घेते ह्मणून मनुष्य पश्वादि खालच्या कोटींत जाऊं शकत नाहीं;

२ निराभासांत आभास होऊं शकत नसल्यामुळें सर्वच ब्रह्म कळूं न शकणारें असें आभासरूप आहे;

३ स्पिरीच्युॲलिस्टांच्या मंडळींत कामलोकांतील जीव नसलेले मुर्दे येवून [ जीव नसूनही ] मनुष्यासारखे बोलतात;

४ पूर्वी मनुष्य हे पशुसारखे होते; इत्यादि चुकीचे व स्थूल-तत्व, ईथर, प्राण व काम हे चार नाशवंत असून मनस, बुद्धि व आत्मा हे तीन शाश्वत आहेत, कित्येकांचे ' लोअरमनस ' काम लोकांत ही नाश पावतें, आत्मा व बुद्धि हीं दोन असूनही सर्वमिळून एकच आहे, त्यांचेच किरण मनांत पडतात ह्मणून मन अवतार घेतें, इत्यादि परस्पर विरोधी, ' डिसायपल्स ' देवलोकांत न जातां कामच करीत

राहतात इत्यादि संशयी व जसें, मनुष्यांतील तत्व ज्या ज्या भुवनांतील पदार्थांचे बनले आहे, तीं नांवें सांगणें परंतु परनिर्वाण व महापरनिर्वाण यांचें काय बनलें आहे हें न सांगतां नुसतीं त्या भुवनांचीं नांवें सांगणें, अरूपलोक ह्मणून नंतर त्यांत तीन भाग करणें, लोगास निरनिराळे आहेत 'हरक्युलीस' व हलधर, ख्रिस्त व कृष्ण, हें त्यांच्या नांवाच्या किंचित्सारखे पणावरून एकच आहेत, नैयाइकांनीं शंकराचार्यांनां जी 'प्रच्छन्न बौद्ध' ह्मणून शिवी दिली आहे तिचा अर्थ शंकराचार्य बौद्धमतांचेच विशेष सुधारक होते असा करणें ब्ल्याव्हेट्स्की वेदांच्या पूर्वी होती, तिनेंच वेद शुद्ध केले इत्यादि अंधविश्वासाचे एच. पी. बी. सात तत्व सांगत असून टी. सुबाराव चारच बरोबर आहेत असें ह्मणतो. मि. सिनेट आत्म्याची वाढ होते असें ह्मणतो, व कांहीं थिऑसाफिस्ट तें खोडतात, निर्वाणिक प्लेनमध्यें बिझँट 'एटम्' सांगते व ब्ल्याव्हेट्स्की नाहीं ह्मणते, इत्यादि बाधग्रस्त—'अवतार' व 'समप्राब्लेम्स आफ लाईफ' या ग्रंथांत, थिऑसफी व राष्ट्र यांचा संबंध दाखवून, आतां तो संबंध बिझँट नाहीं ह्मणते इत्यादि धूर्तपणाचे, लेडबिटरला काढला व पुनः घेतला ह्मणून उपेंद्रनाथ बसू हा फर्स्ट डिग्रींत असतांनांहीं निघाला व तिची शिष्यीण एडगर ही निघाली, व यामुळेंच उमाकांत ही निघाला; परंतु हे सर्व आउटरमध्यें आहेतच; कारण आउटर सर्वांकरितां एक असून इनर सध्यां बिझँटचेंच आहे, इत्यादि महत्वाकांक्षेचे व बंधुफुटीचे हे सर्वच प्रकार काढून टाकले असतां, मुसलमानांनां ज्याप्रमाणें सुफीमत जीवतत्व दाखवून देवून "दिवाने सादक" व दिवाने हाफिज अद्वैताच्या रेषेवर आणतात, कबीरपंथ हिंदुमुसलमानांचें ऐक्य करून, नानक पंथ त्यांनां परमार्थांत घेतो, त्याप्रमाणेंच वरील कुत्सित प्रकार काढून टाकलेली थिऑसफी पाश्चिमात्यांचा भेदवाद मोडून, आँग्लविद्यादग्ध पौर्वात्यांनांही अद्वैत परमार्थ बऱ्याच अंशीं दाखविते असें माझें खरें मत आहे.

याचा विशेष खुलासा आपण मागितल्यास एखाद्या पत्रांत आणखी करीन.

कृष्ण निरीक्षण:—

कृष्णाचें भाषादि बाह्यांग खरोखर मायामय असून मनोहर आहे असें नीलछबीयुक्त दिसत असतां अंतरंग पाहतो कोण? मायेवांचून सर्वच जर प्रेमांतून निघत असेल तर पुन: प्रेमांत मिळून पुन: निघणार नाहीं कशावरून? शंकराचार्यां प्रमाणें अनादिउपाधी स्वीकार नसल्या- मुळें ही अडचण कायमच राहते. मुख्य प्रयोजनावांचून पुष्कळशी सायन्टिफिकली काय कामाची? तथापि पूर्ण निरीक्षणांतीं पुढें सांगण्यांत येईल.

॥ श्रीमत्सद्गुरू ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# ( १५ )

## वेद० मोरेश्वर गोपाळ देशमुख यांनां पाठविलेलें पत्र.

वेदमूर्ति महाराज मोरेश्वर गोपाळ देशमुख यांचें चरणीं सांष्टांग प्रणिपात. वि. वि. आपलें कृपापत्र पोंचलें, मजकूर समजला. सुबोध— पत्रिकेंतील लेखाबद्दल उत्तरप्रत्युत्तर करण्याची माझीही इच्छा नाहीं.

आपण पंचदशी वगैरे जितक्या प्रमाणानें होईल तितक्या प्रमा- णानें वाचीत जावी.

दुसरें, व्यंकटाचलशास्त्रीप्रमाणें येथेंही एका पुरुषाशीं माझा वाद झाला; परंतु व्यंकटाचलशास्त्री जसे व्याकरणादि सर्वांगांत निष्णात होते, त्याप्रमाणें हा नव्हता. त्या वादाचे मुद्दे थोडक्यांत आपणाकडे पाठवितो.

प्रथम सांख्यांत ईश्वर नाहीं असा प्रश्न निघून मला अनुभवाचे प्रश्न विचारूं नका असें तो गृहस्थ ह्मणाल्यावरोन केवळ शुष्क शब्द-

वादच चालला होता; पण ते शब्ददेखील व्याकरणसाधित असावे असा कांहीं नियम नव्हता. तसेंच एका शास्त्रांतून दुसऱ्या शास्त्रांत जाऊं नये, अशी ही मला सक्त ताकीद होती. एकच गोष्ट तीनवेळ सांगीतली असतां 'मी समजलों' मी असें ह्मटलें ह्मणजे मला पुरें बोलूं देत नाहीं काय? असें नेहमीं मला हे गृहस्थ ह्मणत. अविद्या ही ज्ञानाचें आवरण करणारी आहे, अभाव नव्हे, ( माझ्यामतें व शास्त्रमतें 'शशविषाण', 'खपुष्प 'वंध्यापुत्र' हीं अभावाचीं उदाहरणें होत ] असें मी ह्मटलें तेव्हां, पदार्थाच्या सूक्ष्मावस्थेसच आह्मी अभाव ह्मणतो, असा चार्वाक दर्शनापासून तों वेदान्तदर्शनापर्यंत कोणीच स्वीकार न केलेल्या सिद्धान्ताचा त्यानें स्वीकार केला, व पुढें भावकार्य नित्य नसतें असा शांकर भाष्याच्या विरुद्ध सिद्धांत सांगून, बुद्धाप्रमाणें अभावकार्य नित्य राहतें असा सिद्धांत केला. नंतर 'ज्ञानादविद्यानाशः' या श्रुतीचा अर्थ अज्ञानानें अज्ञानाचा नाश होतो, असा शक्तिलक्षणा व गौणी इत्यादि वृत्ति सांडून, सुखानेंच केला; व त्यावर दगडानें दगड जसा फुटतो असें एक उदाहरण दिलें. हीं दोन्ही कार्याचीं उदाहरणें असून, कार्यानें कारणाचा नाश होतो, असा सिद्धान्त त्या उदाहरणांपासून कसा निघाला हें समजलें नव्हतें.

त्यावेळीं अशा विरुद्ध वादानें माझें हृदय अगदीं क्षीण होऊन, मला कांहीं समजत नाहीं असें ह्मणून मी त्या वादाची कशी तरी पीडा टाळली.

परंतु, मुंबईस जसे सत्यासत्याचा निर्णय करणारे भडकमकरादिकरून दोन तीन शास्त्री होते, तसे, येथें कोणीच नसून, उलटें ज्यांनां स्वतःचाच विचार नाहीं, अशा प्रकारची मंडळी होती. या ग्रहस्थाची सांख्यशास्त्रांत प्रख्याति आहे, पण अशा प्रकारचा वाद कापिल, आसुरी, पंचशिख, ओढु, सनातन या सांख्यपंचकांतून कोणत्या शास्त्रांत लिहिला आहे, हें मला व सर्व पृथ्वींतील शास्त्र्यांनां गूढच राहणार आहे. असो.

आपणाशीं संकेत केल्याप्रमाणें मी या गांवांत नेहमीं निजूनच असतो. तसेंच मी आपल्या मंडळीची परीक्षा शनैः शनैः पाहत जाईन

असें कबूल केल्या प्रमाणें, येथल्या मंडळीचा विश्वास परीक्षा करून पाहतां, देश व परमात्मा, स्त्री आणि भक्ति व स्वत:ची अविचारबुद्धि या पंचायतनपूजेंतच गुंग राहिला आहे. असो.

इतक्या गोष्टी लिहितांनां कांहीं उद्धट शब्द निघाले असतील, तेच वाचेला चांडालान्न झाल्यामुळें, आतां श्रीज्ञानेश्वरस्तवनानें तिला प्रायश्चित देऊं.

जयजयाजी सच्चिदानंदा । कृपामूर्ति आनंदकंदा । जगद्व्यापका अभेदा । विश्वेशाजी ॥ १ ॥ रेडियाहातीं वेद । बोलविले प्रसिद्ध । हे ऋतंभरेहूनि अगाध । करणें देवा ॥ २ ॥ पातया पातें मिळे । तंव देखणेपणा पघळे । उघडे उघडिलिया चावळे । दृश्याची गोठी ॥ ३ ॥ कार्याचेनि मिसें । कारणाचि आलें विश्वदशे । कां चढोवाढ सौरसें । सिद्धानुवादा ॥ ४ ॥ साखरेचा पुतळा । नव्हे साखरे वेगळा । तेवीं चैतन्यें गिंवसला । विश्वाकारू ॥ ५ ॥ हें कां स्वप्नींचें खेळणें । परी मीवांचूनि न होणें । तैसें कार्या इया येणें । कारणाचें ॥ ६ ॥ असत्तेचेनि मिसें । सत्ताचि पैसे । कां वाचकत्व भडसें । सच्चिदानंदू ॥ ७ ॥ असो इया ओविया । प्रेमसूत्रीं गुंफोनियां । सद्गुरू ज्ञानेश्वरचरणीया । कमळमाळ अर्पिली ॥ ॥ ८ ॥ आतां प्रत्युत्तराचेनि मिसें । डोळे मेटीचे वळसे । घ्यावया पाठवितसे । बाळलेखू ॥ ९ ॥

नागपूर.
ता. २७।९।१९०५.

॥ श्रीसद्गुरू ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## ( १६ )

### पुत्रशोक झालेल्या एका गृहस्थास पाठविलेलें पत्र १ लें.

साष्टांग प्रणिपात विनंती विशेष. मी आपणास नागपुरास भेटलों, तेव्हां आपलें सर्व ह्मणणें ऐकून घेऊन त्याप्रमाणें आपणास

उत्तर पाठविण्याचें कबूल केलें होतें; परंतु येथें आल्या नंतर कांहीं व्रताच्या कामामुळें, व कांहीं चित्ताच्या अस्वस्थतेमुळें, उत्तर पाठविण्यास उशीर लागला. असो. मृतमनुष्य आपणांस पाहतां येतात; परंतु ते श्रुतिमार्गानें आपल्या कुळांत घेण्याला योग्य नाहींत, असें मी आपणास ह्मटलें होतें आतां ते कसे पाहतां येतात, तो प्रकार असा:—

आकाश तीन प्रकारचें आहे; भूताकाश, दुसरें चित्ताकाश व तिसरें चिदाकाश. ज्यांत आपण व आपणाला दिसणारे सर्व प्राणी व्यवहार करितात, तें भूताकाश; येथें आपणाला . ह्याच शरीरानें जातां येतें; व हें आपल्या सभोंवती आहे. ज्यांत अखिल ब्रह्मांडाचे व्यवहार होतात, तें चित्ताकाश; आपल्या हृदयांत असणारी अंगुष्ठमात्र पोकळी, ती हें होय. या ठिकाणीं गेलें असतां आपल्याला आपल्या मागल्या जन्मांतील आप्त इष्ट सखे सोयरे वगैरे सर्व मंडळी पाहतां येते; व त्यांच्याशीं व्यवहार करितां येतात. फारतर काय? आपल्यापैकी एखादा मनुष्य मरून, कोणत्याही ब्रह्मांडांत जन्मास आला असला, तर तेथेंही त्याच्याशीं व्यवहार करतां येतो, परंतु तेथें सामान्यप्रतीच्या माणसास जातां येत नाहीं. तेथें योगियांशिवाय स्वतंत्रपणें कोणाचाच प्रवेश नाहीं. अथवा ज्याला योग येत नाहीं, त्यालाही एक मार्ग आहे. तो हाच कीं, आपल्या मनानें तीव्र भावना करीत जावें. ह्मणजे ह्यादेहाची विस्मृती पडून भावनेच्या बलानें दुसरा देह मिळून, आपल्या प्रिय मनुष्याला पाहतां येते. परंतु ही तीव्र भावनाही साधारण मनुष्याला करितां येत नाहीं, तर ह्यालाही सत्कर्माचाच जोर पाहिजे ह्मणजे तप केलें पाहिजे. व ज्या शास्त्रांत तें सांगितलें अथवा ज्या गुरूनें तें सांगितलें त्याच्यावर विश्वास ठेविला पाहिजे. जग हें सगळें देवतांच्या स्वाधीन आहे. त्या त्या देवतांची आराधना केली ह्मणजे ती ती देवता आपणाला त्या त्या ठिकाणीं पोहचवून देतें; अथवा आपली भावना तीव्र होण्याकरितां सत्कर्माची मदत होते.

आपल्याला एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणें आहे तर दोन रीतीनें जातां येते, एकतर गाडींत बसून दुसऱ्याच्या स्वाधीन होऊन; अथवा स्वतंत्रपणें आपल्या पायानें. पैकीं गाडींत बसून जाणें

ह्मणजे तपानें देवता प्रसन्न करून, तिच्या स्वाधीन होऊन जाणें, व स्वतंत्रपणें ह्मणजे योगबलानें वाटेल तेव्हां जाणें व येणें. आतां तुह्मी ह्मणाल कीं, परतंत्र होऊन दुसऱ्याच्या ताब्यांत जाण्यापेक्षां स्वतंत्रपणें योगबलानेंच मला माझें कार्य साधून द्या. तर योगाला लागण्यापूर्वी आंगीं वैराग्य आणून यमनियमादि करावे लागतात. ते तर तुमच्या आंगीं मुळींच नाहींत व सध्याच्या स्थीतींत ते करण्याची तुमची तयारी ही नाहीं. सध्यां तुमचा इष्ट हेतु तपानेंच साधणें शक्य आहे. मलाही अशाच रीतीचा एक प्रयत्न करावयाचा आहे. तुमचाही निश्चय असल्यास कळवा; म्हणजे तुम्ही व मी कोठें तरी जाऊन तप करूं. अशा रीतीनें परत आणलेले मृत मनुष्य पुन्हां आपल्या कुळांत घेतां येतात, अशाबद्दल प्रमाण आहे असें आपण ह्मणाले तें कोठे आहे. तेवढें मात्र तूर्त कळवावें. तुमचा हेतु तपानें सिद्धीस जाणें शक्य आहे. जी गोष्ट आपणांस मुळींच मिळणें शक्य नाहीं, अशा गोष्टी बद्दल शोक केला तर हरकत नाहीं, परंतु जी गोष्ट आपणाला प्राप्त होण्यासारखी आहे, तिच्याबद्दल शोककरण्यांत काय अर्थ? स्वयंपाक शिजून तयार व्हावयाचा आहे अथवा होत आहे तर त्याच्या आधीं रडत बसणें हें कांहीं समजदार मनुष्याचें काम नव्हे. विचारी मनुष्यतर शोक करण्यांत वेळ न घालवितां आपल्या कार्याला लागून लौकर फल प्राप्त करून घेतो. तुम्हाला जर कार्यसिद्धि करून घ्यावयाची आहे, तर मग शोकांत दिवस घालविण्यांत काय अर्थ? प्रयत्नाला कोणतीच गोष्ट अशक्य नाहीं ‘प्रयत्नें वाळूचे कण रगाडितां तेलही गळे’ म्हणून ज्याला इष्ट हेतु साध्य करून घ्यावयाचा आहे त्यानें उठून प्रयत्नास लागलें पाहिजे. प्रतिसृष्टिसारख्या मोठमोठ्या गोष्टीही प्रयत्नानें व तपानें सिद्ध होतात. तर मग आपल्या हृदयांत असणाऱ्या चित्ताकांतील मुलास पाहणें व आणणें काय कठीण? ‘हातनको आलसी, मूमें मख्या जाय’ याप्रमाणें प्रयत्नाला न लागतां नुसतें रडत बसणाऱ्याला क्लेश मात्र होतात. नुसता शोक केल्यानें कधींच इष्ट हेतु साधणें शक्य नाहीं आतां तुह्मी असें म्हणाल कीं चित्ताकाश आमच्या हृदयांत आहे, व त्यांतच आमचा मुलगा आहे

तर तो आम्हाला कां दिसत नाहीं? तर तें येथें थोडक्यांत सांगतो. आपण एखाद्या वस्तूकडे पाहतों तेव्हां तिच्याकडे आपलें लक्ष्य असलें तर आपल्याला ती चांगली समजते, परंतु तेंच आपलें लक्ष्य दुसरीकडे वेधले असलें तर ती वस्तु आपल्याला मुळींच समजत नाहीं. यावरून एखादी वस्तु दिसणें हें कायम आहे, नुसत्या डोळ्यांवर ( गोळकांवर ) अवलंबून नसून तुमच्या मनावर अवलंबून आहे. तेंच मन जर एकाग्र करून एखाद्या वस्तूकडे पाहिलें तर दूर असलेल्या वस्तूचेंही उत्तम ज्ञान होतें. आपल्याला अतिदूरचा किंवा अतिजवळचाही पदार्थ दिसत नाहीं, परंतु मन एकाग्र करून पाहण्याची संवय केली तर उपर्युक्त अगदीं जवळच्या किंवा अतिदूरच्या पदार्थांचेंही स्पष्ट ज्ञान होतें. तर मग आपल्या अगदीं जवळ असलेलीं मृत माणसें आपल्याला दिसतील यांत नवल काय? असो. हिला फार मोठी मेहनत व वैराग्यादि पाहि-जेत. परंतु सध्या, आपलें इष्ट कार्य तपानें साधणें शक्य आहे. मग शोक वगैरे सोडून तपाला लागण्याचा विचार असलातर तुमची कधीं ची तयारी आहे? तसेंच मेलेलें मनुष्य पुन: आलें तर त्याला आपल्या कुळांत घेतां येते, हें कोठें सांपडलें तें प्रत्युत्तरीं मेहरबानीनें कळविणें. तुम्हाला एक गोष्ट आणखी कळवावयाची आहे. ती ही कीं, एखाद्या सिद्धीनें मृत मनुष्य आणले तरी ते थांबत नाहींत, त्यांनां थांबविण्या-करितां तपच पाहिजे. कौरव मेल्यानंतर त्यांनां व्यासंनीं पुन्हा आणलें आणि पांडवांची व कौरवांची भेट करून दिली, परंतु ते पुन्हां अदृश्य झाले अशी 'आश्रमवासी पर्वांत' कथा आहे. याचें कारण त्यांच्या करितां तप केलें नव्हतें. तुमच्या प्रयत्नाला लौकर यश देण्याची मी खटपट करीन. तुम्हाला या कामाकरितां नौकरी सोडली पाहिजे. तुम्ही म्हणाल कीं रजा घेऊन तें काम करीन, परंतु तें चालणार नाहीं. कळावें हा प्रणिपात.

मुक्काम, शुक्रेश्वर वाठोडा, ता० २२।२।०७. — आपला गुलाब.

श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

# [ १७ ]

## रा. रा. कृष्णाजी श्रीनिवास हरिदास उर्फ बापूजी याला नागपूरला पाठविलेलें पत्र.

सा. प्रणिपात वि. वि. तुला एक अंत: सभेंतील पुस्तक मला पाठवावयाचें आहे. तुझी गती जी आहे ती जागृतींत आणून ठेव म्हणजे झालें. दुसरें, रा. रा. भालेराव मास्तर यांना असें सांग कीं, तुम्ही कोठेंही राहिले तरी तुमचा अभ्यास चालतोच; मग मजजवळ येण्याची उगीच किटकिट कशाला? तुला मी महाराजांचे संमतीनें अंत: सभेत घेतलें आहे हें तुला माहीत असेलच. मग तुझी काय इच्छा असेल तें सांग. भक्त, भालेराव, मुळे, हरिभाऊ व तूं असे पांचच जणे अंत: सभेंत आहेत.

विशेषः—भूताकाशांतून चित्ताकाशांत जातांनां चार अडथळे आहेत. त्यांतील भौतिक म्हणजे सृष्टींतील पदार्थांवर चित्ताचा आवेश होणें हा पहिला. तो दूर करण्याठीं बौद्धांचा बाह्य शून्यनाद फार उपयोगी आहे. दुसराः- मानसिक म्हणजे परोपकारादि सात्विक विकारांवर चित्ताचा आवेश होणें. राजस, तामस विकार हे पहिलेंच दूर केले जातात, म्हणून येथें त्यांचें ग्रहण केलें नाहीं. तो अडथळा दूर करण्यासाठीं गुरूसेवा इत्यादि निरूपण केली आहे. आगमशास्त्रें ह्याच्या फार उपयोगी पडतात. तिसराः— दैविक,— ईश्वराच्या षड गुणैश्वर्यादिकांवर चित्ताचा आवेश होणें. तो अडथळा दूरकरण्यासाठीं ‘ ईश्वरासिद्धेः ’ इत्यादि सांख्यसूत्रें फार उपयोगी पडतात. चवथाः- सर्व अद्वैत आहे तर भक्ती कशाला पाहिजे, हा. ह्याचें निवारण करण्याकरितां प्रस्थानत्रय आहे. ह्याप्रमाणें चारी अडथळ्याचें निवारण करण्याकरितां त्या त्या शास्त्रांचा उपयोग गुरूमुखानें करून घ्यावा. शास्त्राला सोडून जे केवळ गुरुवरच अवलंबून राहतात, त्यांच्यावर श्रुतींचा अपमान झाल्यामुळें ईश्वर कृपा करीत नाहीं. कारणश्रुति ईश्वराच्या आज्ञा आहेत, म्हणून;

आणि गुरूला सोडून जे केवळ शास्त्रावरच अवलंबून राहतात, त्यांच्या वरही ईश्वरविभूतींचा अपमान झाल्यामुळें परमात्मा कृपा करीत नाहीं यास्तवच विद्यारण्य म्हणतात:—

श्रवणं गुरूशास्त्राभ्यां मननंच स्वयुक्तिभिः
विज्ञानं स्वानुभूत्येति श्रवणादेरसंकरः ॥ १ ॥

योगवासिष्ठांत ईश्वर अनुग्रहावाचून गुरू आणि शास्त्रें या दोहों पासूनही कांहीं लाभ होत नाहीं. असें सांगितलें आहे.

यावन्नानुग्रहसाक्षात्जायते परमेश्वरात् ॥
तावन्न सद्गुरुः कश्चित् सच्छास्त्रं वापि नो लभेत् ॥ १ ॥

एकनाथ ह्मणतात:—ज्याचें जन्मांतर सरूनिया जाय ॥ तेथें स्थीर होय गुरू बोध ॥ १ ॥

ह्मणून आपल्या दुर्दैवांत असेल तसें होईल, अशा प्रकारचा मूढ वाद तूं सोडून दे. आणि महा पुरुषार्थाचें अवलंबन कर. स्वतःचा प्रयत्न न करून केवळ ईश्वरकृपेवर, गुरूकृपेवर आणि शास्त्रांवरच जे अवलंबून बसतात, त्यांनां परमप्राप्ति आजपर्यंत झाली नाहीं, सध्या नाहीं आणि पुढें होणार नाहीं.

योग वासिष्ठः— उपदेश क्रमो राम व्यवस्थामात्रपालनं ॥
ज्ञप्तेस्तु कारणं साक्षात् शिष्य प्रज्ञैव केवला ॥ १ ॥

अर्थ:—हे रामा, शिष्याच्या अधिकारानुसार मार्ग सांगून त्यांत सर्व शास्त्रांची व्यवस्था करून देणें, एवढ्याचकरितां गुरूसंप्रदायक्रम आहे. एऱ्हवीं परब्रह्मप्राप्तीला तर शिष्याची बुद्धीच कारण आहे. तसेंच ज्ञानेश्वरींत ज्ञानेश्वर महाराज ह्मणतातः

" तूं प्राप्तीची चाड वाहसी । परी अभ्यासीं दक्ष न होसी ।
तें सांग पां काय बिहसी । दुवाडपणें ( ६-३६० )

विष कीं आहारींपडे । समुद्रीं पायवाट जोडे । एकीं वाग्ब्रम्ह थोकडें । अभ्यासे केलें ॥

ह्मणोनि अभ्यासासि कांहीं । सर्वथा दुष्कर नाहीं ॥ "
( १२-११२।११३ )

असो. ह्याप्रमाणें स्वतःचा प्रयत्न करून चारी अडथळे दूर झाल्यावर चित्ताकाशांत आपण जावूं लागलों म्हणजे मागच्या व पुढच्या अनंत जन्माचे आईबाप आपणास दृष्टीस पडतात. तसेंच बायका पोरें, घरेंदारें, पशुपक्षी, शत्रुमित्र वगैरे सर्वच दृष्टीस पडतात. आणि ते सर्वच जीवाला माझे माझे म्हणत असतात. हें आपल्याला जें दिसते व ज्यांत चंद्र, सूर्य, तारा इत्यादि नांदत आहेत; एवढें हें ब्रह्मांड चित्ताकाशाच्या एका केशा एवढ्या जागेवर दिसूं लागते. ह्याठिकाणीं गेलें म्हणजे सर्व जन्मांतील दिसणाऱ्या पदार्थांचा गोंगाट पाहून पुष्कळ खाली येतात. येथून चढून जाणारा कोटी योगियांमध्यें एखादाच पुरुष असे चिताकाशांतील अनंत ब्रम्हांड उल्लंघून गेलें म्हणजे पुढें चिदाकाशांत मनुष्य जातो. त्याठिकाणीं गेलें म्हणजे चित्ताकाश व भूताकाश हें पृथक् दिसतच नाहींत.

एवढा जरी हा अभ्यास कठीण आहे, तरी तो तीव्र संवेगी पुरुषाला साडेसहा वर्षांत पूर्ण होतो हेंच आमचें अंतः सभेचें गुह्य आहे. स्वतःच्या प्रयत्नाला निर्विघ्न यश देणें, ह्यालाच ईश्वरकृपा किंवा गुरुकृपा ह्मणणें सयुक्तिक आहे लहान सहान क्षुल्लक सिद्धि भूताकाशांतच पुरुषास प्राप्त होतात; आणि चित्ताकाशांत गेला म्हणजे तर सहस्त्रावधि ब्रम्हांड निर्माण करण्याची शक्ति येते. इंदु राजाच्या मुलांनीं सूर्य, चंद्र, पृथ्वी, कुबेर, ब्रह्मा, विष्णु जे उत्पन्न केलें होते, अशी कथा आहे तिचाही आशय हाच. पुढें चिदाकाशांत गेल्यानंतर निर्माण करणारा व निर्माण करण्याची वस्तू ह्या दोन पृथकच उरत नाहींत. तूं पटण्याला असतांना श्रीज्ञानेश्वर नामस्मरण करीत मी स्वप्नांत तुला ग्रहण केलें आहे त्याची आठवण कर त्यावेळीं माझा यतिवेष तोच तुझ्या अनुग्रहाला कारण आहे. या देहांत मी शूद्र असल्यामुळें तुम्हा ब्राम्हणांनां उपदेश करूं शकत नाहीं म्हणून त्या वेळीं जे तुला ज्ञानेश्वर नामस्मरण सांगितलें त्याचा सारखा जप सुरूकर; आणि त्या यतिवेषांचेंच ध्यानकर. स्वप्नांत गुरूचा उपदेश शंकराचार्यादि सत्य मानतात. तुकाराम महाराजही “ मानियला स्वप्नीं गुरुचा उपदेश ” असें ह्मणतात. “ स्वप्ने वै आचार्यावान् उपदिशति अस्य ”

अर्थः—अधिकारी पुरुषाला आपल्या जातींत जर कोणी ब्रह्मवेत्ता न मिळाला, तर कोणत्याही जातीचा पुरुष त्याला स्वप्नांत येऊन उपदेश करितो. त्या यतीनीं सांगितलेल्या मंत्राचा जप सुरू केला ह्मणजे पुढचा मार्ग मला ह्या शूद्रदेहानें सांगण्यास हरकत नाहीं.

॥ इत्यनेनालम् ॥ आपला

मुकाम--हर्दा. गुलाब.

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# [ १८ ]

## रा. रा. शांताराम यांनां ( अजनासला ) पाठविलेलें पत्र.

चिरंजीव शांताराम यास आशीर्वाद. तुला पत्र पाठविण्याचें कबूल केलें असल्यामुळें तें आतां पाठवीत आहे.

कोणती ही वस्तु कोणत्याही वस्तुपासून जेव्हां उत्पन्न होते, तेव्हां अनुमान केलें पाहिजे कीं ती सूक्ष्मरूपानें त्या वस्तूंत असते. खांबापासून ह्मैस उत्पन्न होत नाहीं. किंवा वाळूपासून तूप उत्पन्न होत नाहीं. सारांश, विरुद्ध वस्तूपासून विरुद्धवस्तु उत्पन्न होत नाहीं. या न्यायानें जर पाहिलें तर आत्मा हा चैतन्य आहे व इतर सर्व जगत् जड आहे; ह्मणून जडापासून चैतन्य उत्पन्न होणें शक्य नाहीं. आतां जे कोणी ह्मणतील कीं जडापासून चैतन्य उत्पन्न होतें; त्यांनां असें विचारतो कीं—जड चैतन्याच्या जातीचें आहे, किंवा जड चैतन्याच्या विरुद्ध आहे; जर जड चैतन्याच्या जातीचेंच आहे असें ते म्हणतील तर मग चैतन्यापासूनच चैतन्य उत्पन्न झालें जड कांहींच राहिलें नाहीं असें म्हणावें लागतें; व जड चैतन्यापासून विरुद्ध आहे असें मानलें

तर मग जडापासुन विरुद्ध चैतन्य उत्पन्न होतें कसें? याला कांहीं दृष्टांत आहे काय? आणि असेंच आग्रहानें कोणी कबूल करील तर आंधार हा प्रकाशाच्या विरुद्ध आहे; मग अंधारापासून प्रकाश कां उत्पन होवूं नये? सारांश, आत्मा हा कशापासून उत्पन होत नसून तो नित्य आहे; आणि जी वस्तु कशापासून उत्पन्न होत नाहीं, कारण तिचा कशापासून नाशही होणें शक्य नाहीं. ज्या वस्तूला उत्पत्ति असते त्याच वस्तूला नाश असतो. जसें वस्त्र आपणाला विणतां येते, ह्मणून फाडून टाकतां येते; आणि आकाश आपल्याला उत्पन्न करतां येत नाहीं ह्मणून त्याचा नाशही करतां येत नाहीं. त्याप्रमाणें आत्मा कोणत्याच पदार्थापासून उत्पन होत नसल्यामुळें त्याचा नाशही होत नाहीं. आतां हा आत्मा कसा आहे असें ह्मणशील तर ह्माला जाणण्याकरितांच नाना प्रकारचीं शास्त्रें आहेत. तो शास्त्रांनीं व गुरुमुखानीं जाणून घेतला पाहिजे. त्याविषयीं जसा जसा विचार करून तूं मला लिहिशील त्या त्या प्रमाणें मी तुझ्या शंकेचें अपहरण करून पुढें बोधद्वारा उपदेश करण्याचा प्रयत्न करीन कळावें.

ताजाकलम—आईचें तीर्थ घेण्याची पद्धती कशी काय चालली आहे तें मला कळीव. तूं खरें बोलणारा आहेस; असें मला सौ. दुर्गा जननीनें सांगितलें असल्यामुळें दिलेलें वचन तूं मोडणार नाहींस अशी खात्री जाणून हें पत्र लिहिलें आहे. कळावें.

मुक्काम—हर्दा.

॥ श्रीमत्सद्गुरू ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# [ १९ ]

## गणेशप्रसाद मंडलेकर यांना पाठविलेलें पत्र.

दोहा.

अलकावतिपतिचरणरज शांति रूप सुखसार
सीस धरत भवकुदर हरे दिलहि मिले दिलदार ॥ १ ॥
आज पत्र आपका मिला तदुत्तर सुनहु सुजान ॥
मीन क ह्व कर राखिये ब्रह्मग्यानमों जान ॥ २ ॥

सवैया.

सद्गुरुकी करुणा मन केवल राखि अयत्नत वृत्ति फलेहै ।
यत्नहितें जन कर्म करे अरु यत्नहितें मुनि ब्रह्म मिलेहैं ।
यत्नहितें बनि आवत साधन यत्नहितें गुरुग्यान खुले हैं ।
यत्न बिचार सहाय करे अरु यत्नहितें श्रुति बाग फुले हैं ॥३॥
जो न बनीहि बनावत है हरिके बिन सत्यवती हरिमाया ।
फेरि प्रयत्नहि एक समर्थ न कारजकारि दुजा कोइ पाया ।
यत्नहितें वर दैवत दे अरु यत्नहितें गुनिशाप न लागे ।
यत्नहितें कलिकाल हटे अरु यत्नहितें चितिमें मति जागे ॥४॥
कोउको जीर्व भया जगमें निज यत्नहितें गिरिजापतिशंभू ।
कोउको जीवभया निज यत्नहितें हरिकोउको जीव स्वयंभू ।
यत्नहितें चिरजीवन लब्ध भुशुंडमुनी करि कंचनकाया ।
व्याज करी रघुनंदनकी निजग्रंथ वसिष्ठजु यत्नहि गाया ॥ ५ ॥

चोपाई.

शुभदैवकरीये अनाजकि प्राप्ती । भोजन यत्नबिनानहिं तृप्ती ।
ताकरि यत्न करों तुम ताता । तजि मिथ्या मूरखमति बाता॥६॥
आदौ कर्म बिहित निज करिये । तिसकरि मतिमलसागर तरिये ।
फेरि बाणि हरिहरगुण गावो । तिनतें चंचलताग्नि बुझावो ॥ ७ ॥
साधनचार करों फिर नंदन । गुरुपद सुमिरि होंहु गुण चंदन ।
सज्जन संग सदा सुखदाई । जिसकरि पंछिपशुहि चिति पाई ॥ ८ ॥

मायाश्रय चिति दीप्ति उजासे । बिदित समान बाणिवल भासे ।
बिन बिराग मति बोध न थारे । यह बिधि बोलत तात हमारे ।९।

दोहा.

तातें बाहर मेल करी मनमों धरो बिराग ।
गुरु निगमनमुख बोध सुनो तजि धननंदनराग ॥ १० ॥
साधनत्रिक कैवल्यपथ उपरति बोध विराग ।
योगमाहि उपरति मिले सांख्यमाहि सुबिराग ॥ ११ ॥
बोध होत वेदांतके महावाक्य तें तात ।
दृढगुरुहरिहरभक्तितें अंतराय मिटिजात ॥ १२ ॥
श्रीज्ञानेश्वर कृपावश लिखदीना निगमार्थ ।
ज्ञानेश्वरगुरुनाम सदा सुमिरि करो परमार्थ ॥ १३ ॥

वृंदपतिनंद लालकी जय ॥

श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्री ज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

## ( २० )

## रा. रा. लक्ष्मणराव केकरे यांनां पाठविलेल्या पत्रांतील स्त्रीपुरुष चातुर्याविषयीं ओव्या.

वडिलांतें नमस्कारी । लहानांतें शिकवण करी । कार्याकार्य मनीं विचारी । तो पुरुष संसारीं अतिधन्य ॥ १ ॥ आपण वडिलांच्या आज्ञेंत वागे । निजकन्येला तेंचि सांगे । पतीस सत्कार्य करूं लागे । ती वनिता धन्य संसारी ॥ २ ॥ प्रातःकाळीं उठोनी । योग्य धर्म करोनी । व्यवहार चिंती मनीं । तो पुरुष संसारीं अति धन्य ॥ ३ ॥

जीवभाव पतीच्या चरणीं सासूसासरिया पूज्य मानी । बाळास वळवी कुमार्गापासुनी । ती संसारीं कामिनी अतिधन्य ॥ ४ ॥ योग्य वेळीं निजोनी । फुकट आळस न धरी मनीं । व्यापार करी तोटा वारुनी । तो पुरुष धन्य संसारीं ॥ ५ ॥ कवणासी हठ न करी ॥ सर्वांस बोले मधुरोत्तरीं । पतीतें चिरायू चिंतन करी । ती वनिता संसारी अति धन्य ॥ ६ ॥ नफ्याचा एकांश धर्मासाठीं । दुसरा अंश सांठवी कोठी । दोन अंश ठेवी प्रपंचासाठीं । तो पुरुष संसारीं अतिधन्य ॥ ७ ॥ पुरुष साहित्य आणी सदनीं । त्यांतील थोडें थोडें उतरंडींत सांठवुनी । विपत्तिसमयीं पुरवी काढुनी । ती धन्य कामिनी संसारीं ॥ ८ ॥ शेती करितां व्यापार बुडती । व्यापारीं बुडूं पाहे शेती । ऐसें समयीं जो करी शेती । तो धन्य पुरुष संसारीं ॥ ९ ॥ केव्हां सेवका शिक्षा देणें । केव्हां काना डोळा करणें । शरणागता अभय देणें । तो पुरुष धन्य संसारीं ॥ १० ॥ स्वयंपाक गोडकरी । जेवूं घालण्या कंटाळा न धरी फुकट शृंगार आंगें न करी । ती वनिता संसारी अतिधन्य ॥ ११ ॥ दुर्बळा चाळवूं नये । उन्मत्ताला वंदूं नये । ऐसी जों कां धरी सोय । तो पुरुष धन्य संसारी ॥ १२ ॥ सासरची सुखाची ठेव । जावा नणंदावरी प्रेमभाव । माहेरा जावया न धरी हांव । ती वनिता धन्य संसारी ॥ १३ ॥ अतिलज्जेची नाहीं बेडी । अतिनिर्लज्जेची नाहीं आवडी । थोड्याकारणें सन्मैत्री न तोडी । तो पुरुष संसारीं अतिधन्य ॥ १४ ॥ एक निजपतीवांचून । वडील माता पितया समान । लहान पुत्र कन्ये समान । ती वनिता धन्य संसारीं ॥१५॥ गृहीं आलिया अतिथी । अनादर न कदा चित्तीं । दान देणें यथाशक्ति । तो पुरुष धन्य संसारीं ॥ १६ ॥ चौघांचा पाक करितां । पांचवा संपादेल तत्वतां । अन्न ठेवी लेंकुरां करितां । ती धन्य वनिता संसारीं ॥ १७ ॥ नवे नवे मित्र जोडी । होईल तोंवरीं द्वेष सोडी । मित्रसहायें कार्य घडी । तो पुरुष संसारीं अतिधन्य ॥ १८ ॥ संपत्तींत गर्व न करी । विपत्तींत धैर्य धरी । विनवुनी पतीस सन्मार्गीं करी । ती वनिता संसारीं अतिधन्य ॥ १९ ॥ पाहूनि कुटुंबासी लंधन । यज्ञदान करणें अधर्मपण । व्यय करी लाभ पाहून । तो पुरुष धन्य संसारीं ॥ २० ॥ तुसट कवणातें न करीं ।

सर्वांचाचि विश्वास न धरी । लीन आणि दक्ष गृहाचारी । ती वनिता संसारीं अतिधन्य ॥ २१ ॥ आपण होतां उतावेळ । पुढें ऐसेंचि होईल कुळ । हें जाणोनि गांभीर्य धरी निर्मळ । तो पुरुष धन्य संसारीं ॥ २२ माय बापें वाईट शिकवितां । तरी तें नायकें सर्वथा । सासरीं राहूनि पतिव्रता । ती धन्य वनिता संसारीं ॥ २३ ॥ अश्लीलभाषा नाटकगीत । शिकवोनी चावट न करी सुत । धर्म आणि व्यवहार शिकवित । तो पुरुष संसारीं अतिधन्य ॥ २४ ॥ लेंकुरें लाडवूनी कडिये वरी ॥ सदा देवूनी गोड साखरी । कुमी होतील ऐसें न करी । ती कामिनी संसारीं अतिधन्य ॥ २५ ॥ धर्म अर्थ काम । हे विरुद्ध असती परम । परी जेथ स्त्रीपुरुषांचा धार्मिक प्रेम । तेथ विरोध नाहीं ऐसें भारतीं ॥ २५ ॥ असो स्त्री अथवा पुरुषा । जंव नाहीं तीव्र मुमुक्षा । तंव सोडुनी संसार विशेषा । विटंबना करूं नये ॥ २७ ॥ पंच ज्ञानेंद्रियें सहावें मन । यांचें न करितां निर्दळन । होवूनियां विकाराधीन । संसार सोडणें विटंबू ॥ २८ ॥ अंतरीं परमार्थ धरावा । बाहेरी व्यवहार करावा । आवडी भगवंत भजावा । हळू हळू मिळवावा विराग ॥ २९ ॥ जोंवरी विकारी आपुलें चित्त । तोंवरी दुर्जनासी करूं नये मात । आपलें निर्विकारी होतां चित्त । मग दुष्ट सुधारणार्थ किंचित् यत्न कीजे ॥ ३० ॥ आधीं प्रपंच करावा नेटका । मग साधावें परमार्थ विवेका । तीव्र मुमुक्षा नसतां देखा । हाची मार्ग उत्तम ॥ ३१ ॥ श्री ज्ञानेश्वर माय माउली । तियेचीं वंदूनी पाउलीं । पत्रिकाहीं समर्पिली । अतितर प्रेमें ॥ ३२ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

पत्रं समाप्त.

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# ध्यानयोगदिवाकर.

( विषयदिग्दर्शन )

ह्या ग्रंथाचें सहा समुल्लास असून ध्यानमार्गानें ज्ञानसिद्धी कशी मिळवावयाची अशा बद्दल ध्यानयोगाच्या अनेक प्रक्रिया सांगून स्पष्टीकरण केलें आहे.

**१ समुल्लास.** ह्यांत ध्यानयोगास, योगांतील सातवी पायरी असतांही, स्वतंत्रत्व सिद्ध करून ध्यानाचें प्रकार सांगितले आहेत. त्यांत फलरूप सद्गुरु ध्यानाचें श्रेष्ठत्व प्रथम कथन करून ध्यान करण्याची प्रक्रिया व त्यांत आवश्यक ईश्वरानुग्रहा करितां ईश्वरसजातियशुद्धसत्वमयशरीर करण्याची प्रक्रिया सांगून ज्ञानासह प्रेमस्थित्यर्थ सगुणसद्गुरुध्यानाची प्रक्रिया सांगितली आहे.

**२ समुल्लास.** ईश्वराहून श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजांचें श्रेष्ठत्व. मंत्रयोगास अनुसरून पदस्थ ध्यान प्रक्रिया. वाणीनीं केलेला ज्ञातजप परमेश्वराचें ठिकाणीं अर्पण करून तो मानस झाला ह्मणजे ध्यान होतें. हें नित्य राहण्याकरितां श्वासासह होत असलेला अज्ञातजप भगवंताचें ठिकाणीं अर्पण करण्याची प्रक्रिया. या प्रमाणें नित्य होत असलेल्या २१६०० अज्ञात जपापैकीं, ६०० गणेशाला, ६००० ब्रह्मदेवाला, ६००० विष्णूला, ६००० शिवाला, १००० जीवाला, १००० सद्गुरुला व १००० आत्म्याला जप अर्पण झाल्या नंतर नादोत्पत्ति कथन. त्याचें दहा प्रकार. त्यापासून उत्पन्न होणाऱ्या सिद्धीकडे दुर्लक्ष करून लय चिंतनाभ्यासपूर्वकपदस्थध्यानप्रक्रियोपसंहार.

**३ समुल्लास.** पिंडस्थ ध्यान प्रक्रिया. आधारादि चक्रांचीं लक्षणें, स्थानें व त्यांचें आध्यात्मिक ध्यान. आधिदैविक ध्यान. ध्यानाचे पूर्व पश्चिम मार्ग. उपसंहार.

**४ समुल्लास.** रूपस्थ ध्यान प्रक्रिया. या प्रक्रियेच्या समर्थनार्थ मागील संतांचे उतारे. मुद्रेचें प्रकार. त्यांची लक्षणें व त्या करण्याच्या क्रिया. वर्ण

निरीक्षण व त्या त्या वर्णा बरोबर वृत्तीचें स्थित्यंतर व प्रणवरूप कथन. शेवटली ध्यानगम्य तुरीयावस्था व उन्मन्यवस्था. या समाधींतून व्युत्थान झालें असतां श्रीकृष्णरूपानें सर्वत्र तेंच प्रणवरूप पाहून भगवद्भक्तिसिद्धि.

५ समुल्लास. रूपातीत ध्यान प्रक्रिया. सर्वच साकार असल्यामुळें सर्वांच्या अभावाचें-शून्याचें-ध्यान. बौद्ध मतांत हें ध्यान प्रशस्त सांगितलें आहे. परंतु "क्लेशोधिकतरस्तेषां" ह्मणून त्या ठिकाणीं ही भक्तीची अपेक्षा आहे. रूपस्थ ध्यानाचा परिणाम जी प्रतिमा तत्सुहास्यवदनांतर्गत हास्यांत स्वीयमनोधर्म मिळवून आनंदित व्हावें. हास्य सोडून शून्य भासल्यास अभाव योग होतो. व हास्य सोडून भूत विवेकानें सत्ता सिद्ध करून तिला आपली चित्ता देऊन त्यांत प्रतिमाहास्यफळ-आनंदवत्ता मिळविली म्हणजे महायोग होतो. येथें पुष्कळ सिद्धी उत्पन्न होतात. परंतु एका परमेश्वरावांचून दुसऱ्या कोणत्याही सिद्धीची अपेक्षा करूं नये. कारण तदितर सर्व सिद्धी उपाधिरूप आहेत. याप्रमाणें भक्ति आणि योग यानीं सच्चिदानंद ज्ञान होऊन समाधि बोध होतो. हेंच ध्यान पुढें अन्वयरूपानें वस्तुतंत्र सगुण सद्गुरु ह्मेऊन परिणाम पावते.

६ समुल्लास. तटस्थ ध्यानांत सर्व व्यापकत्व घटूं शकत नाहीं. तटस्थ ध्यान निषेधपर मुक्ताबाई व तुकाराममहाराज यांचें प्रमाण वचन. त्या समाधींतून व्युत्थान झालें असतां अनध्यस्त ब्रह्मरूपाचें ठिकाणीं सद्गुरुरूप विवर्त्त आपल्या प्रेमामुळें सांपडतो. हरिहर हेही सांपडतात. परंतु त्यांची परोक्षस्थिती असल्यामुळें अपरोक्ष सद्गुरूच अनेक विघ्न निवारण करून शिष्याचें संरक्षण करीत असतांना हरिरूप व त्याच्या सर्व उपाधींचा नाश करितांना शिवरूप असतात. ज्ञानानंतर गुरुपरंपरेची आवश्यकता, व त्यांची अनध्यस्त विवर्त्तता सिद्ध करून सद्गुरु भक्तींत एकंदर पर्यवसान करून श्रीमत्सद्गुरुनाथ ज्ञानेश्वर चरणीं ग्रंथ समर्पण.

श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# ध्यानयोगदिवाकर.



## समुल्लास १ ला.

जय जय सद्गुरो दिव्यमूर्ते । जय जय सद्गुरो श्रौतकीर्ते । जय जय सद्गुरोऽद्वैतदीप्ते । अविक्रिय ॥ १ ॥ जय जय सद्गुरु अनुपम्य । जय जय सद्गुरु परमरम्य । जय जय सद्गुरु ज्ञानगम्य । केलिप्रिय ।२। जय जय सद्गुरु सदधिष्ठान । जय जय सद्गुरु विशेषचेतन । जय जय सद्गुरु स्वानंदघन । प्रेमलपते ॥ ३ ॥ जय जय सद्गुरो करूणहृदय । जय जय सद्गुरो कैवल्यमय । जय जय सद्गुरो छेदक त्रय-। देहबंध ।४। जय जय सद्गुरो मायबहिणी । जय जय सद्गुरो अपवर्गदानी । चरण अधिष्ठूनि हृदयध्यानीं । निदिध्यासनीं तुज चिंतू ॥ ५ ॥ ' तत्कारणं सांख्ययोगाधिगम्यमिति ' । श्वेताश्वतर श्रुति । इयेचा समन्वयसाधक आचार्योक्ति । शारीरकभाष्य द्वितीयाध्यायीं ॥ ६ ॥

**भाष्यः**– " यत्तुदर्शनमुक्तं तत्कारणं सांख्ययोगाभिपन्नमिति वैदिकमेव । तत्र ज्ञानं ध्यानं च सांख्ययोग शद्बाभ्यामभिलप्यते प्रत्यासत्ते-रित्यवगंतव्यम् ॥

**भाष्यार्थः**–वैदिकज्ञान आणि ध्यान । सांख्य योगशद्बेंकरून । बोलिले यास्तव निरोधसह[1] महावचन । सप्रेमब्रह्मज्ञान उपजवी ।७।

---

१ महावाक्य

परी तोचि निरोध साधावया । साधिली पाहिजे ध्यानक्रिया । यास्तव ध्यानयोगा यया । आरंभिजे ॥ ८ ॥ ह्मणाल अष्टांग योगीं स्पष्ट । ध्यानासि सप्तत्वाचा पट । तयाचाचि केवलारंभ चोखट । होणार नाहीं ॥ ९ ॥ परंतु " ध्यानेनात्मनि पश्यंति " । इया रमणचरणोक्ति । ध्यानातें स्वतंत्र योगस्थिती । आरंभणीय ह्मणूनी ॥ १० ॥ आणि शांतिपर्वी मोक्षधर्मीत । ध्यानारंभ भीष्मोक्त । यालागीं स्वतंत्र योग स्थित । ह्मणिजे ध्यान ॥ ११ ॥ " प्रच्छर्दनविधारणाभ्यां वा प्राणस्य" येथ । प्राणायाम विकल्पित । ह्मणोनी ध्यानसमुच्चित । आवश्य नोहे १२ " यथाभिमतध्यानाद्वे " ति । समाधिपादीं ध्यानविकल्पोक्ति । येणें हीं आवश्यक समुच्चिती । दूरोत्सारिली । १३ । असो ध्यानयोगा स्वतंत्रता । ह्मणवूनि आरंभणीय तत्वतां । तया ध्याना द्विविधता । बोलती मुनी ॥१४॥ पहिलें अवस्तुभावन । दुसरें तदाकारकरण । या दोहींचें लक्षण । ऐंक आतां ।१५। जेंवीं वैदिकध्यान । अग्निरूपें योषिच्चिंतन । आणि मंथब्राह्मणामाजीं निरूपण । असे जैसें ॥ १६ ॥ तें आघवें अवस्तुभावन । परी फळ होय शास्त्रबळें करून । कारण अग्निरूपें स्त्री आपण । न जाहली कधीं ॥ १७ स्त्री अग्निरूपें झळकत । होम करावा स्त्रीमुखांत । ऐसा इतिहास निश्चित । कोठेंचि नाहीं ॥ १८ ॥ उपस्थ कल्पूनि इंधन । योषिद्योनीतें कुंडस्थान । हें जुगुप्सित जाण । अवस्तुभावन यास्तव ॥ १९ ॥ हें प्रमाणजन्य नाहीं ह्मणोन । बोलिजे अतत्वभावन । कर्तृतंत्रही बोलण । याचिसाठीं ॥ २० ॥ दुसरें तदाकारकरण । तयाचें ऐक लक्षण । रघुनंदन । अथवा चरण श्रीगुरूचे ॥२१॥ उमा अथवा उमारमण । यांतूनि कवणाचें जें चिंतन । तें जाणावें ध्यान । दूसरें कीं ॥ २२ ॥ वस्तु नसोनि भावना करितां । हें प्रथमध्यान तत्वता । वस्तु असोनि भावना करितां । द्वितीयध्यान घडे ॥२३॥ रामकृष्णादि अवतार । येथ इतिहास असती फार । पुराणें साक्ष देती शंकर । उमेविषयीं ॥ २४ ॥ ह्मणवूनि तयांचें जें ध्यान । तें ह्मणिजे तदाकारकरण । आणिकही एक विलक्षण । उपपत्ति सांगूं ॥ २५ ॥ ऐतिह्य रामकृष्णादि झाले ह्मणुनी । प्रतिमा करितां येतसे कल्पुनी । अग्निरूप झाल्या नाहींत कामिनी । यास्तव प्रतिमा तेथें न घटे ॥ २६ ॥ येथ ऐसें ह्मणतील कोणी । कीं

पुराणध्याना श्रेष्ठय देउनी । श्रुति अवमानली हे करणी । योग्य नव्हे ॥ २७ ॥ तरी ययाचें उत्तर । तापनीयादि श्रुतिनिर्धार । तदाकारध्यानानुसार । प्रमाण आहाती ॥ २८ ॥ येर अतत्व भावनाबोधक श्रुति । तिया गौणित्वाची प्राप्ति । जे कीं प्रथम श्रुति । वस्तुवृत्तानुग्रह ह्मणूनी ॥ २९ ॥ आणि केलियाही अवस्तुभावन । फळ होय श्रुतिबळें करून । आह्मी उपरि बोलिलें ह्मणून । वाढविला मान श्रुतिचा । ३० । असो तदाकारकरण । तेंही द्विविधजाण । सद्गुरुध्यान आणि देवध्यान । त्यांत प्रथम फळ साधन द्वितीय ॥ ३१ ॥ परी ' आत्मा अरे द्रष्टव्य ' इया श्रुतींत । आधीं फळ सांगोनि निश्चित । श्रवणादि तत्साधनें पश्चात । निरूपिलीं ॥ ३२ ॥ अहो आधीं वृक्षीं फळ पहावें । मग आरोहण साधनें तोडोनि घ्यावें । तैसें संकेतें आधीं चिद् ओळखावें । मग निरोधें करावें तेंचि दृढ ॥ ३३ ॥ ह्मणोनी द्रष्टव्य आधीं पद । श्रोतव्य मंतव्य आदि नंतर प्रसिद्ध । भाव हा कीं विज्ञात विशद । श्रवणादिकीं ॥ ३४ ॥ तैसें फळ जरी सद्गुरुध्यान । तरी तयाचें आधीं निरूपण तें साधावया देवध्यान । निरूपिजेल पुढें ॥ ३५ ॥ सकळ मंगळामाजीं मंगळ । श्रीगुरुचे चरणकमळ । यालागीं तद्ध्यान फळ । बोलिजे आधीं ॥३६॥ आतां देवध्यानाहूनि श्रीगुरुध्यान । वरिष्ठ ह्मणावया काय कारण । येचिविषयीं गहन । उपपत्ति सांगू ॥ ३७ ॥ तरी पाषाण धातूच्या मूर्तीतून । निष्पन्न होय देवध्यान । मग त्यावरी पौराणिकगुण । आरोपावे लागती ॥ ३८ ॥ तैसी नोहे सद्गुरुजननी । साक्षात्सचेतन दिसे नयनीं । यालागीं अनायासें ध्यानीं । आरूढ होय ॥ ३९ ॥ आणखी एक्यादृष्टीं उपपन्न । निर्गुण पर्यवसायी सगुणदेव ध्यान । झालियाही निर्गुणज्ञान । सगुणगुरुध्यान सुटेना ॥ ४० ॥ यास्तव निर्गुण ध्यानाचें सगुणगुरुध्यानीं पर्यवसान साचें । ह्मणोनी फळत्व तयाचें । सिद्ध आहे ।४१। सगुणध्यानें निर्गुण होआवें । मग गुरुत्व घेउनी तारणीया यावें । याही उपपत्ति स्वभावें । गुरुध्यान फळ ।४२। देवध्यान करितां चित्तीं । तरी उत्पत्तिस्थितिलयस्मृती । गुरुध्यान करितां चित्तीं । तरी संबंधें स्मरे महावाक्य ॥ ४३ ॥ असो ऐसिया अनंतोपपत्ति । आतां ऐकावीं ध्यान रीति । आधीं घेवोनि भगवन्मूर्ति । तींतूनि जडांश निश्चिती काढावा

॥ ४४ ॥ मग जडांश काढलिया मुर्तीचा । मृदुसंवेग उरे मनाचा । तो आश्रय पौराणिकगुणाचा । करूनि वाढवीजे ॥ ४५ ॥ तो मध्यसंवेग होय स्वप्नीं । तोचि जागृतींत वाढवूनि । तीव्रसंवेगें करुणागुणीं । हृदयीं धरिजे ॥ ४६ ॥ तेव्हां भगवत्कृपेंकरून । सद्गुरु भेटे आपण । येचिविषयीं वचन । वासिष्ठाचें ॥ ४७ ॥

यावन्नानुग्रहस्साक्षाज्जायते परमेश्वरात् ।
तावन्न सद्गुरुः कश्चित् सच्छास्त्रं वाऽपि नो लभेत् ॥
( योगवासिष्ठ. )

परी तो ईश्वरानुग्रह होआवया । ईश्वरसजातीय कीजे काया । ती निर्गुणसजातीय व्हावया । योग्य नोहे ॥ ४८ ॥ यालागीं सगुण सजातीय । देह करणें लागे स्वयें । तुकारामवचनही आहे । प्रमाण येथ ॥ ४९ ॥

अभंगः— " ब्रह्मभूतकाया होतसे कीर्तनीं । भाग्य तरी ऋणी देवा ऐसा ॥ "

ते सगुणसजातीय काया । पूर्णपणें करावया । उपपत्ति शिष्यराया । सावध ऐकें ॥ ५० ॥ भगवच्छरीर शुद्धसत्वमय । आणि जीवशरीर मलिन सत्वमय । तें करावया सगुणसजातीय युक्त्या भूतलय कीजे ॥ ५१ ॥ 'लं' बीजधारणा करून । पृथ्वीचें करूनि चिंतन । लय कीजे संपूर्ण आपामाजीं ॥ ५२ ॥ पृथ्वीचीं जीं नांवें समस्त । तयांचा लय करावा 'लं' बीजांत । आणि पृथ्वीरूप जो अर्थ । तयाचा अर्थरूप आपांत लयकीजे ॥ ५३ ॥ मग आपाचीं जीं नांवें समस्त । मेळवजे 'वं' बीजांत । अर्थजलाचा अर्थ तेजांत । लयकीजे ॥५४॥ मग तेजाचीं नांवें 'रं' बीजीं मेळवूनी । अर्थतेज मिळवावें अर्थपवनीं । वायूचीं नांवें 'यं' बीजीं मिळवूनी । अर्थगगनीं मिळवावा अर्थवायू ॥ ५५ ॥ गगनाचीं नांवें 'हं' बीजांत । मिळवोनियां समस्त । आकाश ह्मणजे शब्दरूप अर्थ । तो 'हं' बीजाकारावच्छिन्नवृत्तिगत मिळवावा ॥ ५६ ॥ मग या सकळातें 'अ'कार ह्मणूनी । स्थूळ ब्रह्मांड येथेंचि मिळवोनी । अहंकारासहीत घेऊनी । बुद्धीमाजीं मेळवीजे ॥ ५८ ॥ तयातें उकार ह्मणोन । हिरण्यगर्भ येथेंचि मेळवून । बुद्धीचा लय करावा पूर्ण । प्रकृतिरूप मकारीं ॥ ५८ ॥ मकारसाक्षीं अनुच्चार्य व्हावें । ह्मणजे प्रकृति मिथ्या स्वभावें ।

मग संस्कारें देहावरी यावें । परी एक करावें त्या ठायां ॥ ५९ ॥ प्रकृतिसाक्षीं होतांचि क्षणीं । सत्वांशमालिन्य गेलें निघोनी । यास्तव देहावरी येतां क्षणीं । न घेयावा मनीं प्रारब्धभाव ॥ ६० ॥ यद्यपि हें नव्हे वस्तुतंत्रज्ञान । तथापि होय वस्तुतंत्राकार उपासन । यालागीं ब्रह्मसंबंधें करून । शुद्धसत्वगुण ज्ञातां चढे ॥ ६१ ॥ तया शुद्धसत्वयुक्त आपणापासोन । शुद्धसत्वआकाश करावें उत्पन्न । मग तया गगनापासोन । शुद्धसत्ववायू ॥ ६२ ॥ शुद्धसत्व वायूपासुनी । उत्पन्न कीजे शुद्धसात्विक अग्नी । तैसोंचि अग्निपासुनी । शुद्धसात्विक पाणी । उपजविजे ॥ ६३ ॥ पाणियापासूनि मही । शुद्धसात्विकची तीही । शुद्धसात्विक बीजांतुनीही । निपजविजे शद्ब ॥ ६४ ॥ शुद्धसात्विक नामरूपांतून । आपुलें शरीर करावें उत्पन्न । तेही शुद्धसात्विक ह्मणोन । अवतारसम ॥ ६५ ॥ एवं सगुणसजातीय काया । एकवेळ जाहालिया । मग सगुणतीव्रसंवेगू करावया । उपयोगू होय ॥ ६६ ॥ "त्वं"पदें भूतशुद्धि केली । तेणें काया शुद्धसत्व झाली । आतां 'तत्प'दोपास्ती पाहिजे अवलंबिली । तेणेंचि परी ॥ ६७ ॥ आधीं घेवोनी सगुणभगवंत । जो पुराणपुरुष गुणवंत । तयाच्या एकैकावयवीं चित्त । ठेविजे मग ॥ ६८ ॥ जैसें सर्व अन्न ताटीं आधीं घेयावें । मग तें एकैकग्रासें सेवावें । तैसें पूर्ण भगवद्व्यक्तीतें प्रथम स्मरावें । मग ध्यावें अवयवानुक्रमें ॥ ६९ ॥ चरणापासोनि समस्त- । अवयवीं स्थीर जाहालिया चित्त । मग मुख ध्येयावें सस्मित । हास्य ध्येयावें तदनंतर ॥ ७० ॥ मग हास्यामाजीं जो आनंद । तेथेंचि होवावें अभेद । परी हें ध्यान ह्मणोनी प्रसिद्ध । वृत्ति उठे ॥ ७१ ॥ तया वृत्तिसंधीत्वें ज्ञान । साक्षित्वें रहावें ह्मणून । तें निर्गुणचि गुरुकृपेंकरून । सगुणपणा आणावें ॥ ७२ ॥ 'त्वं' पद सगुण शिष्यस्थित । 'तत्पद' सगुण सद्गुरुनाथ । आतां ध्यानसुखें ज्ञानैक्यार्थ । ऐसा उमटे ॥ ७३ ॥ मग तयाचेंचि ध्यान तयाचीच सेवा । तयाचेचि मुखें महावाक्य व्हावा । ऐकोनियां तोचि व्हावा । भाव आपुला ॥ ७४ ॥ मग ज्ञानरक्षणा कारण । पुढती तेंचि ध्यान । देवाचे कर्तृत्वादिगुण । काढिलीया सद्गुरुध्यान सगुण उमटे ॥ ७५ ॥ अन्वयें ज्ञाना नाहीं क्षती । सगुणध्यानें प्रेमस्थिती । सद्गुरुचरणसाक्षात्कृती ।

महती ऐसी ॥ ७६ ॥ आतां हें साधावया ध्यान । पुढें विस्तरें निरूपण । श्रीज्ञानेश्वर मायबहिण । स्फूर्तिदात्री ॥ ७७ ॥ येथें कांहीं पुरेउणें । सद्गुरूचें सद्गुरु जाणें । मी ओविया समर्पूनि नेणें । चरणावीण कांहीं ।७८।

हरि: ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे श्रीध्यानयोगदिवाकरे नाना उपपत्तिपूर्वक सद्गुरुध्यानश्रैष्ठ्यकथनं नाम प्रथम: समुल्लास: ॥

श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

## ॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## समुल्लास २ रा.

ॐ नम: श्रीमंगलपदा । ॐ नमो भवभयगदओषधा । ॐ नमो मुग्धबुद्धिप्रबोधा । परमात्मबोधा सद्गुरो ॥ १ ॥ कां ईश्वरासी मायाजाळ । बांधोनियां करवी खेळ । मग जीवालागीं बळ । कासयाचें ॥ २ ॥ यालागीं दोहींचे । मिटवावया असाचे । सुख चहों अक्षरांचें । प्रगटलें आहे ॥ ३ ॥ अज्ञानेश्वराचे व्यावृत्ति- । करोनी ज्ञानेश्वर प्रकटस्थिती । प्रथम ईश्वरीं आरोपगती । द्वितीयेश्वरीं । तान्निरासू ॥ ४ ॥ अज्ञानेश्वर तटस्थ लक्षण । ज्ञानेश्वर स्वरूपलक्षण । अज्ञानेश्वराचें बंधनेक्षण । कैवल्यपरीक्षण ज्ञानेश्वरांचें ।५। एवं गाळीव जो सुखसागरू । तो माझा श्रीसद्गुरू अलकावतीनृपवरू । पाववी पारू सद्भक्तां ॥ ६ ॥ साधावया सद्गुरुध्यान । ध्यानान्तरें सांगेन । येथ असो अवधान । श्रोतृवृंदाचें ॥ ७ ॥ "नामब्रह्मेत्युपासीत'। छांदोग्यश्रुती सांगत । योगबीजीं शिवोक्त । विस्तर याचा ॥ ८ ॥ मंत्रयोगातें अधिष्ठून । प्रथम कीजे पदस्थध्यान । वैखरीचे शब्द घेऊन । मानसीक करणें जप त्यांचा ॥ ९ ॥ उच्चैर्जपेंकरून । दोषजाती जळोन । आपणासहित पावन । सांगातीचे ॥ १० ॥ रामकृष्ण हरि गोविंद । या नामाचे निखळ प्रबंध । टाळोनियां दशापराध । जपावें कीं ॥ ११ ॥ तया जपाचेनि प्रसंगें । जप उपांशु होऊं लागे । सहस्रगुण चौरंगें । पहिल्याहुनी ॥ १२ ॥ एथ समस्तही प्राण । होती पैं पुण्यपावन । मग मानसजप त्याहून । सहस्रगुण अधिक होय ।१३।

एवं ज्ञातजपाची स्थिती । चेतसा आलिया ध्यानत्वप्राप्ति । परी अज्ञात-जप अर्पावया भगवंतीं । मंत्रयोग युक्ति पाहिजे ॥ १४ ॥ कर्त्रधिष्ठित भगवदर्पण । केलिया निवटे अभिमान । परी सहज कर्मही भगवदर्पण । केलिया निवारण प्रकृतिसंगु ॥ १५ ॥ जपादीक कर्त्राधिष्ठित । आणि श्वासोश्वासादि सहज निश्चित । मन लीन असतां सुषुप्तींत । घडे यास्तव ॥ १६ ॥ इंद्रियांमाजीं सकळ क्रिया । मुख्य प्राणा-धार इंद्रियां । श्रुत्युक्त ह्मणोनी श्वासा इया । भगवंतीं अर्पिजे ॥ १७ ॥ ह्मणाल, ज्ञात संकल्पावीण । कर्म भगवंतीं नोहे । अर्पण आणि मन तों होय सुषुप्तींत लीन । मग अवशिष्टश्वासाद्यर्पण । घडे केवीं ॥ १८ ॥ तरी येथ उपपत्ति । श्रवण करावी सावध चित्तीं । संकल्प लीन जाह्या-लिया निश्चिती । कर्म राहे अदृष्टवशें ॥ १९ ॥ कीं माता पिता नाम ठेविती । स्वप्नींही होय तीच प्रतीति । हाका मारितां सुषुप्ति । त्याचि नांवें सोडी ॥ २० ॥ यालागीं संकल्पप्रवाह असतां । संकल्पसंस्कारलीनता । प्रभु साक्षी जाणे तत्वतां । यास्तव संकल्पोद्भवसमयीं अर्पितां सर्वदां घे ॥ २१ ॥ भगवंतीं घेणें नाहीं । परी भगवंताश्रये होतें पाहीं । आणि जीववासनेनें पाही । वाढीस लागे ॥ २२ ॥ जैसें भूमीवरी बीज ठेविलें । तयावरी पाणी न घातलें । तरी तें मिळे वहिलें । मृत्तिके माजी ॥ २३ ॥ तैसें परमेश्वरातें अधिष्ठून । विश्ववृक्षाचें उद्भवन । जीव वासनाजळावीण । सर्वथा नोहे ॥ २४ ॥ जीववासनाजळ न घालितां । सर्वाधिष्ठानींच मिळे तत्वतां । यालागीं ज्ञाताज्ञाता । भगवन्मय कीजे ॥ २५ ॥ श्वासोश्वास प्रिय मानून । जीविताची वासना पूर्ण । तेथ उठे देहाभिमान । यालागीं भगवंतीं अर्पण श्वास कीजे ॥ २६ ॥ भगवंतीं अर्पिलीया प्राण । भगवन्मय सहजची जाण । हें संकल्प उद्भूत अथवा लीन । असतां जाण घडतसे ॥ २७ ॥ आतां तो अर्पिजे कैसा । दृष्ट भावनेचा ठसा । आधीं देऊनियां श्वासा । चैतन्यविशेषा भाविजे ॥ २८ ॥ आणि तीचि भावना श्रद्धेंकरून । ऐसेंच आहे ह्मणोन । दृढ करावी संपूर्ण । अदृष्ट सत्संस्कारास्तव ॥ २९ ॥ परी मायवाक्यें बाळासी । भावना दृढ होय जैसी । सज्ज्ञानातें नव्हे तैसी । भावनाज्ञान ह्मणोनी ॥ ३० ॥ यास्तव श्रुतिमातेचें वचन । हंसोपनिषदीं प्रमाण

तें ज्ञानदृष्टी भावना जाण । परी सत्य संपूर्ण अन्यदृष्टी ॥ ३१ ॥ तोचि आतां कवणे रीति । पदस्थ ध्यानाची संगती । योगबीजीं निरुती । बोलिली आहे ॥ ३२ ॥ जागृतीमाजीं ज्ञातजप । आणि श्वासांतील अज्ञातजप । यांचा समन्वय साक्षेप । सगर्भसंकल्प करोनि रहावें ॥ ३३ ॥ ज्ञातजप वरी बोलिला । आतां अज्ञातजप ऐकावयाला । श्रवणें सर्व शरीराला । व्यापोनि घ्यावें ॥ ३४ ॥

हंकारेण बहिर्याति सकारेण पुनर्विशेत् ॥
हंसहंसेति मंत्रोऽयं जीवो जपति सर्वदा ॥ १ ॥

नाकांतोनि निघे श्वास । तेव्हां 'हं'कार शब्द विशेष । आंत जातां 'स'कारास । अधिष्ठी वायू ॥ ३५ ॥ यालागीं हंस बोलिजे । येणें प्रागें अवघें व्यापिजे । ह्मणोनिया भावना कीजे । सकळ देवतांची येथची ॥ ३६ ॥ तें गुरुगीतेंत निरूपण । सावध ऐकावें सज्जन । तेथील श्लोक प्रमाण । घेवूनि सांगू ॥ ३७ ॥

हंसो गणेशो विधिरेव हंसो । हंसो हरिर्हंसमयश्च शंभुः ॥
हंसो हि जीवो गुरुरेव हंसो । हंसोऽहमात्मा परमात्महंसः ॥२॥

सकारातें आश्रवून । तेथ भावनायोग करून । श्वास वरी उठतां जाण । आधार गणेश भाविजे ॥ ३८ ॥ आदि आणि अंतीं । ही हंसाची गणेशस्थिती । तैसी स्वाधिष्ठानीं प्रतीति । ब्रह्मा हंसू ॥ ३९ ॥ मग मणिपुरा येतां । हंसत्व रमाकान्ता । हृदयस्थानीं उमाकांता । हंसपण ॥ ४० ॥ कंठस्थानीं जीवज्योती । हंसयोगें हंसत्व ख्याती । द्विदलीं सद्गुरुमूर्ती । हंस निश्चिती तेथही ॥ ४१ ॥ वायू जरी बाहेर निघे । नाद मस्तकीं जाऊं लागे । तयाचेनि योगें । हंसमय गुरू ॥ ४२ ॥ श्रीगुरूचे चरणकमळ । माझें हृदयीं केवळ । श्रीगुरूवीर्य मी बाळ । ह्मणोनी आत्मा ॥ ४३ ॥ तो मी सूक्ष्म हंस । एवं अज्ञातजपाचा अर्थ मी सुरस । आणि ज्ञातजप जो विशेष । तो सूक्ष्मप्रणव मी ॥ ४४ ॥ या हंसा आणि प्रणवाचा । अनुचार बोध साचा । आणि माझिया मीपणाचा । येथचि लय ॥ ४५ ॥ तो हा परमात्मा ॐ सोहं लक्ष्य । हें जाणोनिया परोक्ष । करावया ध्यानें अपरोक्ष । ध्यानचि कीजे ॥४६॥

" ध्यानाचि ध्यानातें प्रसवे " । या तातवचनगौरवें । येतां जातां पावावें । याचि स्थळीं ॥ ४७ ॥ नर तोचि नारायण । सदा हृदयीं सोऽहं स्मरण । हें पवनविजयीं बोलण । मुकुंदराजाच ॥ ४८ ॥ आतां हें परमात्मभावना कैसी । विश्व संघट्टावया परमात्मेसी । ध्यानमिषें पार्थासी । देव उपदेशी उत्तरगीतेंत ॥ ४९ ॥

आत्ममंत्रस्य हंसस्य परस्पर समाश्रयः ॥
योगेन गतकाम्यानां भावनाचैवमेवच ॥ २ ॥

तरी ऐके महाबाहो पार्था । मनबुद्धि ठेवोनि पवनाचिया माथां । मग सांगितल्या तत्वार्था । पावशील ॥ ५० ॥ ऐसें तातांचें वचन । आणि शिवस्वरोदयीं निरूपण । सकार ती शक्तिजाण । हंकार तो शिव । ५१ । हंकारलक्ष्य शिवतत्व । सकारलक्ष्य शक्तितत्व । हें सिद्धसंकेतसत्व । वेदांताचें ॥ ५२ ॥ एक एकातें गिळितां । एक एकातें उगाळितां । समावेश सर्वथा । न मोडे हा ॥ ५३ ॥ ज्ञानें शिवशक्तिसमावेशनुती । बोलिली अनुभवामृती । ध्यानें शिवशक्तिसमावेशनुती । तातोक्ति उत्तरगीताटीकेंत ॥ ५४ ॥ योगबीजश्लोक घेऊनी पुढती । याचि भावनेची करुनी पुरती । सद्गुरुरायें बोधिली स्थिती । ते यथामती मग सांगो ।५५।

गुरोर्वाक्याच्छुपुम्नायां विपरीतो भवेज्जपः ॥
सोहं सोहमिती प्राप्तो मंत्रयोगः स उच्यते ॥ ३ ॥

वाणीचिया घडाडा । शास्त्रकोटी दगड खडाडा । झालिया चिच्चौरंगी पुढा । गुरुवीण फुडा प्राणी नव्हे ॥ ५६ ॥ संकोचांतुति संकोचले विशेष । निवडोनी मध्यनाडी हृदयाकाश । गाळोनी अस्पर्श गगनरस । प्राण सुरस सस्पर्शें ॥ ५७ ॥ तेथ शक्तितेजाचेनि दीपें । धैर्यबळें सत्संकल्पें । गुरुवाक्य होय सोपें । सद्गुरुकृपेंकरुनी ॥ ५८ ॥ तेंव्हा शिवस्थानीं ये शक्ती । आणि शक्तिस्थानीं पशुपती । समरस होय लयोत्पत्ति । अखंड चिति प्रकाशे ॥५९॥ मानससरोवरींचा हंस । तो पावला सोहंभावास । मुक्त घेउनी तृप्तीस । न सांडी तरी ॥ ६० ॥ येथूनि उर्ध्व जाये कैसा । पक्षी सोहं पक्षी हंसा । पौर्णिमे पूर्णप्रकाशा । पूर्ण वाग्विलासा मिळोनी ॥ ६१ ॥ ते उर्ध्वगमनगती । मातृकाबोधें निश्चिती । चक्रातें पाहूनि प्रीती । सुस्थिति कीजे ॥ ६२ ॥

"एकविंशति साहस्रं षट्शताधिकमीश्वरी ॥
प्रत्यहं जपति प्राणी हंसइत्यक्षरद्वयम् ॥ ४ ॥
षट्शतं गणनाथाय षट्सहस्रं तु वेधसे ॥
षट्सहस्रं च हरये षट्सहस्रं हरायच ॥ ५ ॥
जीवात्मने सहस्रंच सहस्रं गुरवे तथा ॥
चिदात्मने सहस्रं च जपसंख्यान्निवेदयेत् ॥ ६ ॥

एकवीस सहस्र षट्शत । प्राणी जपती अखंडित । परी निष्कार्य होऊनी निश्चित । खूण सांपडे ही ॥ ६३ ॥ सकार्यें न्यूनाधिक होती । यालागीं बैसोनि एकेपांती । जप अर्पावा दैवतीं । भगवत्स्थिती अनुकारी ॥ ६४ ॥ षट्शत गणनाथा । सहासहस्र सावित्रिकांता । सहासहस्र रमाकान्ता । उमाकान्ता तितुकेची ॥ ६५ ॥ एकसहस्र जीवाप्रती । एकसहस्र गुरुप्रती । एकसहस्र आत्मयाप्रती । जप निश्चिती अर्पावा ॥ ६६ ॥ परी या जपीं मेळवून । घेयावें मातृका वर्ण । वं शं षं सं ह्मणून । आधाराहून मिळवावे ॥ ६७ ॥ बं भं मं यं रं लंमिति । स्वाधिष्ठानाची गणती । ड पासोनी फवरी संगती मणिपुरीची ॥ ६८ ॥ हृदयींच्या कादि ठांत । स्वरसमुदाय कण्ठस्थ । द्विदळींच्या निश्चित । हं क्षं दोनी ॥ ६९ ॥ या स्मरोनी प्राणें जिळवाव्या । मग हंसनादें गाजाव्या अनाहती वाजाव्या । नानाकारें ॥ ७० ॥ सद्गुरुरायें बोधिलें ऐसें । जे शिवशक्तीचेनि ठसे । मध्य ज्ञातजप समरसें । ऐसें कीजे ॥ ७१ ॥ वक्ष्यमाण पिंडस्थध्यान । तें शिवीं उपसंहरोन । पुन: तेंचि शिवांतोन । शक्तिस्थ व्हावें ॥ ७२ ॥ सृष्टि दैवतांचे हातीं । पिंडस्थ ध्यानें त्याचित्याप्रती । अध्यात्मध्यान समान्विती । करोनि दिधली ॥ ७३ ॥ अध्यात्म अधिदैवत ध्यान । पिंडीं परमात्मज्योति पाहोन । मग पिंडभाव विसर्जन । शिवामाजीं ॥ ७४ ॥ शिवाची व्यक्ति शक्ती । आणि शक्तीची अव्यक्ति पशुपती । संधींत ज्ञातजप श्रीपती । गोपीवल्लभ ॥ ७५ ॥ शक्ति करी सर्जन । शिव करी संहरण । दोन्ही संधींत पाळन । गोविन्द करी ॥ ७६ ॥ ऐसें ध्यान करितां करितां । आटे घनप्रवाहसरिता । जप कोटीसंख्या भरतां । चित्त गगनता गगनादिकां ॥ ७७ ॥ येथवरी आलिया ध्यान । मग न चुके एकासन । चालतां बोलतां मौन । न

मांडे हें ॥ ७८ ॥ तया गगनाचेनि पेठे । शिव ताण्डव झणाणा उठे । अथवा कृष्णवेणु उमटे । ऐसें ह्मणों ॥ ७९ ॥ हा नाद तरी प्राणाचा । येथ निर्धार ज्ञातजपाचा । ऐसा आहे ताताचा । अभिप्रायो ॥ ८० ॥

" अजपा जपणें उलट प्राणाचा । येथेंही नामाचा निर्धार असे "

(अभंग हरिपाठ ज्ञानेश्वर महाराज)

एवं हरिपाठीं तातोक्ती । नादीं ज्ञाताज्ञात जपसमन्विती । 'स एवं जपकोट्या नादमनुभवति ' । श्रुति ह्मणे ॥ ८१ ॥ तेथ नादमय आघवें । उघड चैतन्य स्वभावें । ईश्वरानुग्रह संभवे । अनायासें ॥ ८२ ॥ येथोनी सर्व वेदसंधान । हें भागवतीं निरूपण । तो नादही आपण । दशविध असे ॥ ८३ ॥

" चिणेति प्रथमो नादश्चिण्चिणीति द्वितीयकः ।
घंटानादस्तृतीयश्च शंखनाद श्चतुर्थकः ॥ ७ ॥
पंचमस्तंत्रिनादश्च तालनादश्च षष्ठकः ।
सप्तमो वेणुनादश्च मृदंगश्च तथाष्टमः ॥ ८ ॥
नवमो भेरिनादश्च मेघाख्यो दशमः स्मृतः ॥
एवं दशविधं नादं श्रुणुते साधकोत्तमः ॥ ९ ॥
नवनादान्परित्यज्य गृह्यते दशमः सदा ॥
प्रथमे चिण्चिणी गात्रं द्वितीये गात्रभंजनम् ॥ १० ॥
तृतीये स्वेदनं याति चतुर्थे कंपते शिरः ॥
पंचमे स्रवते तालुः षष्ठेऽमृत निषेवणम् ॥ ११ ॥
सत्पमे गूढाविज्ञानं परावाचा तथाष्टमे ।
नवमे त्वदृशो देहो दशमेनात्मदर्शनम् ॥ १२ ॥
( स्पष्टार्थत्वाद्विस्तर भयान्नार्थो लिख्यते )

मग या नादांच्या सिद्धी । तिरस्करोनि परमार्थबुद्धी । शेवटील नादही विशुद्धा । ब्रह्माकाशीं मिळविजे ॥ ८४ ॥ भूताकाशीं मिळवावे भूत । हा वाङ्मय जप ज्ञात । भूताकाश चित्ताकाशांत । मिळविणें येथ ज्ञातजप मनोमय ॥ ८५ ॥ मग ज्ञाताज्ञातजप आणि मनपवन । ॐ सोहं समन्वय करून । घेऊनियां दोनी गगन । चिदाकाशीं मेळवीजे ॥ ८६ ॥ येथोनि व्युत्थितास्थिती । तरी मुखीं भगवन्नामोक्ती । कीर्त्तनसुखें सरती ।

तरती सकळ ॥ ८७ ॥ पिण्ड ध्यानें परमात्मज्योती । संयोग पावोनियां वृत्ती । उलटलिया तनुस्थिती । कनकमय ॥ ८८ ॥ तैसेचि पदस्थ ध्यान । अन्तर्यानन्द बाहेरी कीर्त्तन । श्रीज्ञानेश्वर गुरु स्मरण । मुद्रा येथें ॥ ८९ ॥ " जयाचें वक्त्र । वाहे गुरुनामाचे मंत्र । गुरु वाक्या-वांचूनि शास्त्र । हातीं न शिवे " ( ज्ञानेश्वरी १३-४४८ ) ऐसें श्रीतात वचन । सूत्र हृदयीं अधिष्ठून । निरूपिलें पदस्थध्यान । यथामती ।९०। तया ध्यानाची अवधी । श्रीज्ञानेश्वरतातपदीं । श्रोतया वक्तयां संधि समाधी । प्रीति घडो ॥ ९१ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपा प्रसादे ओवी छंदबद्धे ध्यानयोगदिवाकरे पदस्थध्यान निरूपणं नाम द्वितीयः समुल्लासः ॥
श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

## ॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥
## समुल्लास ३ रा.

जयजयसद्गुरो अलक्षा । जयजयसद्गुरो ऽ परोक्षा । जयजयसद्गुरो पूर्ण मोक्षा । योगदीक्षादायका ॥ १ ॥ जयजयसद्गुरो आळंदीपते । जयजयसद्गुरो वेदांतकीर्ते । जयजयसद्गुरो कैवल्यदीप्ते । जनक जननी ॥ २ ॥ मागां बोलिले पदस्थ ध्यान । ते शद्बब्रह्माची खूण । आतां अर्थत्वें ब्रह्मचिंतन । ऐसे पिंड ध्यान ऐकावें ॥ ३ ॥ जे आकाशाची स्थिती । तेचि आकृत्यादि वृत्ती । यालागीं पिंडध्यानें प्राप्ती । तेंचि होय ॥ ४ ॥ पदपिंडाचा समन्वय । परी मध्यमाधिकारिया क्रम होय । असो आतां तेचि सोय । सादर श्रवण करावी ॥ ५ ॥ योग शास्त्रीं भगवत्प्रणिधान । पतंजली वदले आपण । प्रणवजप प्रणवार्थभावन । समाधिपादीं ॥ ६ ॥ त्यांतील ज्ञाताज्ञात जपाचा । मागां विचारू जाहाला साचा । आतां अर्थभावनाचा । विचारू कीजे ॥ ७ ॥ सृष्टिसहित अर्थ ईश्वर । तो पिंडस्थ ध्यानें कळे समग्र । षट् चक्रावरी स्थिर । चित्त कीजे ॥ ८ ॥

"आधारे लिंग नाभौ प्रकटित हृदये तालुमूले ललाटे ।
द्वेपत्रे षोडशारे द्विदशदशदले द्वादशारे चतुष्के ॥

वासांते वालमध्ये डफकठ सहिते कंठदेशे स्वराणाम् ॥
हंक्षं तत्वार्थ युक्तं सकलदलगतं वर्णरूपं नमामि " ॥ १ ॥

शक्ति सहायें प्राण । सुषुम्नेमार्गी अनुगमन । करोनी षटचक्रस्थान । लक्षिजे पैं ॥ ९ ॥ हृदयींचा सूर्य आणि बहिस्थ चंद्र । करोनी एकाकार । हठयोगें निर्धार । शक्ति सहाय घेईजे ॥ १० ॥ आतां आधारादि कैसे । ते गरुडपुराणी बोलिले जैसे । सांगेन परी ते समरसे । पदस्थ ध्यानेसी घेयावे ॥ ११ ॥ पदस्थ जप हें ध्यान । मिळवोनी अन्वय समान । मागा सायासानायास पदस्थ ध्यान । ज्ञाताज्ञात ह्मणोनी बोलिलेंजे ॥ १५ ॥ तें येथें कैसे मिळे । हेंही बोलिजेल येवेळे । सावधान श्रोतृमंडळे । असावें कीरु ॥ १३ ॥ तरी तया चक्रांचें लक्षण । स्वयें सांगे गरुडपुराण । तेंचि श्लोक प्रमाण घेऊं आधी ॥ १४ ॥

" आधारं तु चतुर्दलानलसमं वासांतवर्णाश्रयम् ।
स्वाधिष्ठानमपि प्रभाकरसमं बालांतषट्पत्रकम् ॥
रक्ताभं मणिपूरकं दशदलं डाद्यं फकारान्तकम् ।
पत्रैर्द्वादशभि स्त्वनाहतपुरं हैमं कठान्तावृतम् ॥ १ ॥
पत्रैः सस्वर षोडशं च त्रिगुणं ज्योतिर्विशुद्धाम्बुजम् ।
हंसेत्यक्षर युग्मकं द्वयदलं रक्ताभ मात्राम्बुजम् ॥
तस्मादूर्ध्वगतं सलक्षणमिदं पद्मं सहस्रच्छदम् ।
सच्चानंदमयं सदाचितिमयं ज्योतिर्मयं शाश्वतम् ॥ २ ॥"

स्पष्ट ह्मणोनी नलगे अर्थ । परी हें अध्यात्मध्यान निश्चित । आतां अधिदेव ध्यान येथ । देवताचिंतनें साधिजे ॥ १५ ॥ परी सुषुम्ना नाडींतून । पाहोनिया तेथें स्थान । तेथ तेथ अंतःकरण । नेयावें पैं ॥ १६ ॥

गणेशंच विधिं विष्णुं शिवं जीवं गुरुं तथा ॥
व्यापकंच परंब्रह्म क्रमाच्चक्रेषु चिंतयेत् ॥ १ ॥ ( स्पष्टोर्थः )

परी आधार स्वाधिष्ठान । अकारार्थेसी कीजे चिंतन । अनायास समन्वयून । मातृका ध्याव्या तेथींच्या ॥ १७ ॥ उकारार्थेसी चिंतावें । मणिपूर अनाहत भावें । विशुद्ध आज्ञाचक्रासी चिंतावें । मकारार्थेसी ॥ १८ ॥ चक्रावरील मातृका सकळ । तियांचा अनायास जपी मेळ ।

… … करोनियां कोल्हाळ । सहस्रदल साधिजे ॥ १९ ॥ हें अनुच्चार्य विंदूचें स्थान । शाश्वत सच्चिदानंदघन । पूर्वमार्ग संपूर्ण । बोलिती यातें ॥ २० ॥ आतां पश्चिम मार्गाची भरोवरी । जया ब्रह्मांड अजपा ह्मणती कुसरी । तीही रीति अवधारी । जैसी असे ॥ २१ ॥ सुषुम्ना मार्गाचा वळसा । येऊनि गुरुवचनरसा । कुंडलिनी सहाय ठसा । घेऊनी चालावें ॥ २२ ॥

"त्रिकुटं श्रीहठं स्थानं गोल्हाटंचौटपीठकं ॥
पुण्याद्रि भ्रामरी गुंफा ब्रह्मरंध्राण्यनुक्रमात् ॥२॥"(स्पष्टोर्थः)

पूर्ववा पश्चिममार्गी । कुंडलिनीसहाय योगी । चिंतोंनियां चौरंगी । बैसती इया ॥ २३ । त्रिकुटापासोनी ब्रह्मरंध्रावरी । पश्चिम मार्गीही प्रणव कुसरी । अनायास जपाची परी । तैसीचि आहे ॥ २४ ॥ अथवा पिंडस्थ देवतानुग्रहेंकरून । पूर्वमार्गें घडे गमन । आणि ब्रह्मांड देवतानुग्रहेंकरून । पश्चिममार्गीं गमन होतसें ॥ २५ ॥ चौदा चक्रांचिया शिखरीं । जेथ हंस प्रणव अनुच्चारी । अनायास जपाची कुसरी । येथचि पावे ॥ २६ ॥ पुढें परब्रह्मपूर्ण । येथ तातवचनहीं प्रमाण। ऐकावें चित्त देऊन । सज्जनश्रोतीं ॥ २७ ॥ "तैसेॐहें स्मरों सरे । आणि येथेंचि प्राण पुरे । मग प्रणवातीत उरे । पूर्णघन जें" ॥ १ ॥ (ज्ञानेश्वरी ८–१३–११७. ) मात्राभावें सायास प्रणव । तो येथेंचि पुरला सावेव । आणि सोहंशद्बें प्राणगौरव । येथेंचि आले ॥ २८ ॥ महाशक्तीचा खटाटोप । येथेंचि सरला संकल्प । व्युत्थानीं तरी साक्षेप । सोनियाची ननु ॥ २९ ॥ नातरी हें जाहलें । येथ ज्ञानावीण वहिलें । विधिलोकांतराये पावले । मुक्तियोगें ॥ ३० ॥ ज्ञानतरी सातवी भूमिका। येथेंचि पावे महाजन निका । आळंदीवल्लभा सुखदायका । स्मरोनियां॥ ३१ ॥ अव्युत्थानीं सुखसागरु। व्युत्थानीं पदपिंडान्वयें जगदुद्धारु। ज्ञानेश्वर स्वानंदमेरु । सांपडे सद्गुरु कृपालु हा ॥ ३२ ॥ श्रीज्ञानेश्वर जनकजननी । काव्या वाहोनी तदीय चरणीं । तन्नामःमय वाणी । होवो सदा ॥ ३३ ॥

हरिः ॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादें ओवीछंदबद्धे ध्यानयोगदिवाकरे पिंडस्थ ध्यान वर्णनं नाम तृतीयः समुल्लासः ।

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर महाराजार्पणमस्तु ॥

## ॥ श्रीज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

## समुल्लास ४ था.

जयजय सद्गुरो आळंदीपती । जय जय सद्गुरो कृपामूर्ती । जय जय सद्गुरो श्रौतकीर्ती । भक्तवत्सला ॥ १ ॥ मागां बोलिलें पिंडस्थ ध्यान । आतां रूपस्थ कीजे श्रवण । अध्यात्मीं रूप पाहोन । अधिदैवत भाविजे ॥ २ ॥ जें पिंडपदीं भावनामय । तेथचि रूपाची धरून सोय । कीजे पैं समन्वय । ऐसा आधीं ॥ ३ ॥ अंतरीं पिंडपद ध्यान । बाहेरीं रूपाचें दर्शन । मग ते दोन्ही समन्वयून । ध्यान कीजे ॥ ४ ॥ तेथ हृदयरूप आघवें जावें । रूप विलक्षण प्रगटावें । तया प्रभे ओळखावें । परमेश्वरातें ॥ ५ ॥ पिंडपदीं जी दैवीवृत्ती । तेचि रूपस्थध्यानस्थिती । उमटे होऊनि आकृती । तीव्र मनोवृत्ति सहजची ॥ ६ ॥ हा ठावो लययोगाचा । विहंगमार्ग ह्मणती साचा । येथही श्रुतिसंतांचा । आधार बहू ॥ ७ ॥

श्रुति– " नीहार धूमार्कानिलानलानाम् खद्योतविद्युत्स्फटिकं शशीनाम् ।
एतानि रूपाणि पुरस्सराणि ब्रह्मण्यभिव्यक्तिकराणि योगे " ॥

ओवी:– नीहारादिकांचे प्रकाश । ब्रह्माभिव्यक्ति व्हावयास । आधीं दिसती तयास । श्रुति ह्मणे ॥ ८ ॥ दक्षिणनेत्रीं पुरुष दिसत । तो परमेश्वरची निश्चित । हें निकें सिद्धान्तित । श्रुतिसूत्रभाष्यीं ॥ ९ ॥ ' विशोका वा ज्योतिष्मती ' ॥ पतंजलीही सांगती । येथही त्याची समान्विती । घटों शके ॥ १० ॥ सात्विकप्रकाश ज्योतिष्मती । किंतु रूपस्थध्यानीं ही समान्विती । केलिया निश्चिती । अयोग्य नोहे ॥ ११ ॥ आणि तातादि संत । सांगती निश्चित । जे हा लय योगार्थ । ऐसा होय ।१२।

## अभंग श्रीज्ञानेश्वर.

(१) तें नयनाचे अग्रीं पहावें आपण । उजाळिल्या जाण दाही दिशा । १।
ब्रह्मांडा एवढें ओतीव सगळें । मन बुद्धि कळे ऐसें नाहीं ॥ २ ॥
निवृत्तिप्रसाद ज्ञानदेवा लाधला । सुखाचा पैं झाला तेणें सुखें । ३।
(२) ज्ञानदेव ह्मणे ऐक मुक्ताबाई । सद्गुरूचे पायीं मन ठेवी ॥ १ ॥
करीं निजध्यास सोहमाचा बाई । इन्द्रियासी नाहीं रीघ तेथें ॥ २ ।

सात हे आंत आठव्याच्या पोटीं । नवव्या संगे गोष्टी करी बाई । ३
मग दहावा सहज नवव्यासी भेटला । अकराव्यासी सांगू लागला गूज गोष्टी ॥ ४ ॥
करूनि उपेोषण मूळद्वार बुजवोन । लिंगस्थानीं चरण ठेवी बाई । ५
ब्रह्मांडाहूनि ओढावा सोहम । त्रिवेणी आसन घाली बाई ॥ ६ ॥
ॐ तोची गुरू सोहं तोची शिव । या दोहींचा लाघव करि वो बाई । ७ ।
ऐक्य झाल्यावरी उठेल बंबाळा । कोटीसूर्यकळा प्रकाशल्या ॥ ८ ॥
खेचरी हे मुद्रा नासाग्रीं दृष्टी । स्वयंभू पाठींपोटीं भरला बाई ॥ ९
ज्ञानदेव ह्मणे ऐक मुक्ताबाई । या परता नाहीं उपदेश आतां ॥ १०
( ३ ) डोळ्याचा हा डोळा शून्याचा शेवट । नील बिंदु नीट लखलखीत असे ॥ १ ॥
विसावें आलें चैतन्य तेथें । पहा निरुते अनुभवेंसी ॥ २ ॥
पार्वतीलागीं आदिनाथें दाविलें । ज्ञानदेवा फावलें निवृत्तिकृपें ॥ ३ ।

## अभंग जनार्दन स्वामी.

(४) देहाची समाधी लागे तीन वेळां । आपुली जीवनकळा शोधावी हे । १
कर्णी घालूनियां [illegible] अंगळ्या [illegible] निकटे । नेणें विकाशुनी भेटे शुभ्रवर्ण ॥ २ ॥
[illegible]याचे [illegible] जीवदशा [illegible] भरूनी येती ॥ ३ ।
तितक्यामध्ये न [illegible] । [illegible] पुढें शोधी गुरुपुत्रा । ४ ।
स्वामीनें पुसिलें [illegible] । [illegible] तुज भासलें आत्मरूप ॥ ५
शिष्य ह्मणे स्वामी धरितां [illegible] डोळे । एकाएकीं उमाळे आदित्याचे ॥ ६ ॥
विकासिला निर्मळ जैसा चन्द्र [illegible] । तैसाहे प्रकाशे आत्माराम । ७
ह्मणे जनार्दन नव्हे एकनाथा । समाधी पाहतां आळस केला ॥ ८ ॥
( ५ ) शिष्य ह्मणे स्वामी पुढें कैसें पहावें । रिघत हें जावें अभ्यासासी । १ ।
स्वामी ह्मणे बापा समाधि घेई आतां । तुझिया विकल्पता निवबितो । २
अशंका जे झाली तुझी तुज ठेली । आह्मीं नाहीं विचारिली समाधी तुज ॥ ३ ॥ प्रथम विकास पहावा शुभ्रवर्ण । त्याचे पुढें चांदणे चकचकीत ॥ ४ ॥ खद्योताचे वाणी सुर्य तारांगण । पुढें शोध जाण घेत जावा

॥ ५ ॥ बैसावें निश्चळ त्याचे अग्रीं डोळे । पहावे केवळ हंसु तैसे । ६
त्यामध्यें रिघावें स्वरूप पहावें । परी समाधी ही जीवें सोडूं नये ॥ ७
जीवाचा हा शिव देहाचा कुळस्वामी । तो अविनाशखाणी प्रगटतो
॥ ८ ॥ ह्मणे जनार्दन त्यापोटीं रिघावें । एकनाथा पहावें आत्मरूप ॥ ९

## अभंग एकनाथ.

( ६ ) डोळ्याची बाहुली वस्तुरूप झाली । पाहतां झोंबली चिदाभासा ॥ १ ॥ अर्धमात्रा स्थान नयनींच प्रमाण । मसुर हा वर्ण पाहे तेथें ॥ २ सुषुम्ना कुंडलिनी कासयासी गती । नयनींचि देख ती बिंदुरूप ॥ ३ ॥ आस्तवीं सम्पूर्ण स्वामी जनार्दन । काय एकपण तया ठायीं ॥ ४ ॥

## अभंग तुकाराम.

( ७ ) देखिलागे माये पांडुरंग डोळा । चौशून्या वेगळा दिसताहे ॥ १ ॥
आरक्त परकोट मध्यें शुभ्रभान । तयामध्यें शाम गृह एक ॥ २ ॥
त्यामध्यें मसुरासारिखें राउळ । तेथें घननीळ लखलखीत ॥ ३ ॥
तयामध्यें आहे पांडुरंग मूर्ति । रुक्मिणीचा पती वर्णातीत ॥ ४ ॥
तुका ह्मणे पाहा अनुभव घेउनी । बाहेर गुंफोनी असू नका ॥ ५ ॥

ओव्या:—आधीं बाहेर समाधी घेऊन । मग उदयीं तीन वेळ करून । तैसे द्वितयेचे तीन । अविनाश देखन संध्यासमयीं ॥ १३ ॥ परी आधीं बाहेर समाधी घेणें । मुद्राप्रकरणीं तातवचनें । तैसी ती निकी करणें । अभ्यासू प्रथम ॥ १४ ॥ नासाग्रीं दृष्टी ठेवुनी । वरी उठलियाही पाणी । परी त्राटक करणीं । निकी कीजे ॥ १५ ॥ सूक्ष्म लक्ष्य धरून । त्राटक साधावें संपूर्ण । अश्रुसंपातें डोळे धुवून । स्वच्छ कीजे ॥ १६ ॥ पुढें नासाग्रीं दृष्टीचेनि योगें । भूचरीचेनि अंगलगें । रूपाचिया चौरंगें । चढोनी चाचरी वरावी ॥ १७ ॥ भूचरीचे नीलवर्ण । चाचरीचें मौक्तिक गगन । अर्धमात्रादि भावेन । धरिजे तेथ ॥ १८ चिन्मय मोती । तेथ ते भाविजे चिती । सूर्यादि बारोनी दीप्ती । चिती वेगळी स्थिति नसे ॥ १९ ॥ अहो मणिप्रभादिक । जे कां आधिभौतिक । तयाचें ध्यान सकळिक । येथेंचि मिळे ॥ २० ॥ मग तया चाचरीचिये गती । जे बाहेर भाविली होती चिती । ते शांभवीमुद्रानुगती । दृढ कीजे ॥ २१ ॥ दृष्टी होय रूपाकार । आणि चित्त चेतनाकार ।

ऐसा तिया मुद्रेचा प्रकार । सांगती शिव ॥ २२ ॥ " संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं " ह्मणून । भूचरी मुद्रेपासून । क्रम बोलिले नारायण । ऐसाचि येथ ॥ २३ ॥ आणि मुद्राप्रकरणीं । तातांची ऐसीचि वाणी । पुढें शांभवी शूलपाणी । वदती कैसे ॥ २४ ॥

श्लोक:–" अन्तर्लक्षो बहिर्दृष्टिर्निमिषोन्मेषवर्जिता ।
एषाहि शांभवी मुद्रा गुप्ता कुलवधूरिव " ॥ ( अमनस्कखंड )

ओव्या:–तरी अन्त: करणवृत्ती । आत्मया खेव देती । आणि दृश्यत्यागें भावित ज्योती । रूपीं बहि:स्थिती दृष्टीची ॥ २५ ॥ वरिष्ठभगिनीबोधू । ऐसाचि विशदू । तो प्रमाणार्थ प्रसिद्धू । श्रवण कीजे । २६।

ओव्या ज्ञानेश्वरी अध्याय ६

" वरिचिले पांती न ढळती । तळींची तळीं पुंजाळती ।
तेथ अर्धोन्मिलित स्थिती । उपजे तया ॥
आतां दिशाची भेटी घ्यावी । कां रूपाची वाट पहावी ।
हे चाड सरे आघवी । आपसया ॥
ऐसी शरीरा बाहेरलीकडे । अभ्यासाची पाखरपडे ।
तंव आंत त्राय मोडे । मनोधर्माची " ॥

एवं भूचरी सोपानीं । चाचरी गती येऊनी । शांभवीचिया चढोनी । चौरंगावरी ॥ २७ ॥ मग सखी घेउनी अगोचरी । भ्रकुटीचिया मंदिरीं । षण्मुखी आणि खेचरी । गडिणीसह ॥ २८ ॥ बाहेरिचें जें होतें । तें कोंडणें अंतरीं चिरातें । आणि चित्तीं भावलेतें । सोडिजेना ॥ २९ ॥ एथ सखी एकटी एक । अथवा तिघी मिळोनियां देख । मीनादि मार्गी सकळीक । क्रीडा करिती ॥ ३० ॥ सकळ योग सहाय घेऊन । मागील योग सम करून । पदस्थ ध्यानीं शब्द आवोन । अर्थआवन पिंडस्थीं ॥ ३१ ॥ मन तीव्रवृत्ति रूपस्थध्यान । सवितर्क समाधी येथचि घेऊन । ज्योति: स्वरूपीं लक्षण । ऐसें कीजें ॥ ३२ ॥

श्लोक:–स्पर्शान् कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवान्तरे भ्रुवो: ॥
प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यन्तरचारिणौ ॥ ( भ. गी. )

---

१ ज्ञानेश्वरी.

ऐसी भगवंताची वाणी । दृश्य समस्त त्यागोनी । अगोचरी आश्रवोनी । केवळकुंभक साधिजे ॥ ३३ ॥ केवळ भ्रकुटींत दृष्टि नेणें । या नांव अगोचरी ह्मणणें । आणि जिव्हा तालूस लाउनी अगोचरी करणें । खेचरी ह्मणावी ॥ ३४ ॥ कंठावरील सप्तद्वार । बंद करणें हें षण्मुखीसार । ह्मणोनि तिन्ही परस्पर । सहायक मी ह्मणे ॥ ३५ ॥ प्राणायामाभ्यास करून । अंगुष्ठीं दाबावें करण । तर्जनीनें नयन । चेपावें तैसे ॥ ३६ ॥ मध्यमेनें नासापुट । अनामिका कनिष्ठिकेनें दोन्ही ओंठ । कपालकुहरीं जिव्हां नीट । घालोनि भ्रकुटींत वाट लक्षावी ॥ ३७ ॥ मग तयारूपाचेनि अनुगुणें । प्रणवाचिया उपासनें । पिंडब्रह्मांडध्यानें । आश्रयीजे ॥ ३८ ॥ तारक आणि दंडक । कुंडल आणि अर्धचन्द्रक । बिंदु ऐसे देख । पांच ब्रह्म ॥ ३९ ॥ तारक स्थूल देह रक्तवर्ण । सावित्रीसहित ब्रह्माजाण । ऋग्वेद आणि प्रजासर्जन । अकार जाण आघवे ॥ ४० ॥ मग पाहतां पाहतां निश्चिती । श्वेतवर्ण उमटती । तेव्हां रक्तवर्ण विसरती । तेणें स्थूळ देहादि विस्मृति पडे ॥ ४१ ॥ एऱ्हवीं भूतलय करितां। लयविस्मरणमिषें स्मरणाचि तत्वतां । यालागीं वृत्ति देयावी एखाद्या अर्था । मग तो अर्थ हरपतां वृत्ति विसरे ॥ ४२ ॥ जैसा मानस देवदत्त । विसरविल्या आठवत । आणि दृश्य देवदत्त । दूर जातां तदाकृत वृत्ति नोहे ॥ ४३ ॥ या अनुभवावरुनी । लययोगीं लयकहाणी । सुलभत्वप्रमाणीं । सहजचि ये ॥ ४४ ॥ हा लययोग करितां । रूप जैसें हरपेल तत्वतां । तैसें पंचीकरणस्थ विलापन सर्वथा । वृत्तीचें कीजे परवृत्तौ ॥ ४५ ॥ रूपें रूप विसरावें । मनीं मन मुरवावें । शिवीं जीवा मेळवावें । गुरुवाक्ययोगें ॥ ४६ ॥ ह्मणोनि सूक्ष्मदेह श्वेतवर्ण । दंडक ब्रह्मदेव लक्ष्मीनारायण । यजुर्वेद प्रजापालन । उकारजाण हे सर्व ॥ ४७ अकाराचें विलापन । उकारीं करावें सम्पूर्ण । आणि पूर्ववृत्तिविस्मरण । परवृत्तिभानीं ॥ ४८ ॥ प्रथम रक्तवर्णादि पाहतां । वृत्तीस असावी जागृत समता । द्वितीय श्वेतवर्णादि पाहतां । स्वप्नसमता वृत्तीसि यावी ॥ ४९ ॥ वृत्तीसि येतां स्वप्नसमता । मात्र नसावी निद्रावशता । रूपीं आनंद असावा तत्वतां । बाह्य विषयता न स्मरिजे ॥ ५० ॥ पुढें कारण शामवर्ण । कुंडल्य ब्रह्मदेव उमात्रिनयन । सामवेद प्रजासंहारण

। हें आघवें जाण मकारू ॥ ५१ ॥ उकार मकारीं विलापावा । वृत्तीस सुषुप्तिभाव यावा । विषयभास आघवा जावा । ध्यान आनंद उमटावा स्तब्ध ॥ ५२ ॥ मग मसुरप्रमाण नीलवर्ण । तेंचि पैं महाकारण । देव ईश्वर आपण । अर्धचंद्र बद्ध ॥ ५३ ॥ अथर्ववेद नादमात्र । तोहा जाहला ॐकार । येथ विलापन साचार । मकाराचें कीजे ॥ ५४ ॥ जावोनियां स्तब्धता । आनन्दरूपीं तत्वतां । ध्यानगम्य तुरीयावस्था । साहं भावे वृत्तीसी ॥ ५५ ॥ पुढें बिंदु बद्ध सदाशिव । हा अनुस्वार्ये प्रणैव । येथवरी भावना लाघव । गौरव बहू ॥ ५६ ॥ परी कवणेंही गुणें । सर्व येथ बिलापणें । ध्यानगम्य या उन्मनी ह्मणणें । वेदांतज्ञानें शुद्धतुर्या ॥ ५७ ॥ करणें आणि न करणें । हें अवघेंचि परित्यागणें । सविचार सानंदादि समाधी क्रमानें । सास्मित पणें फळोनि राहे । ५८ तो व्युत्थानीं अन्वयो जाहला । तरी सकळ वर्णाचा एकवटला । ॐका- र अवघा विस्तारला । श्रीकृष्णमूर्तिपणें ॥ ५९ ॥ एवं तेचि ते होय मूर्ति । तेथ अर्पावी भक्ती । रूपस्थ ध्यानाची संपत्ती । सरली आघवी ॥ ६० बहुप्रकार हें ध्यान । कपिलगीतादि ग्रंथीं निरूपण । दृष्टि मन आणि प्राण । एकवटोनि विरती ॥ ६१ ॥ आतां विरालियाची स्थिती । ती रूपातीत ध्यानसंपत्ती । तातकृपें सावध श्रोतीं । परिसिजे पुढें ॥ ६२ ॥ श्रीज्ञानेश्वर मायमाउली । रूपीं अरूपीं तीच फावली । यालागीं तियेची पाउली । सबाह्यांतरीं धरिली नित्य ॥ ६३ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे ध्यानयोगदिवाकरे पदस्थध्याननिरूपणं नाम चतुर्थः समुल्लासः ॥
श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## समुल्लास ५ वा.

जय जय सद्गुरु सच्चिदानंदा । जय जय अक्षय अभयवरदा । जय कैवल्यसंपत्तिप्रमदा । बिलासिया ॥ १ ॥ जय जय निजजनहृत्प- द्मभृंगा । जय शांतिइंदिरारंगा । जय सत्यज्ञानानंत अव्यंगा । ज्ञानेश्वर

प्रभो ॥ २ ॥ मागा झालें रूपस्थनिरूपण । आतां चवथें ध्यान । रूपातीत अभिधान । सावध ऐकें ॥ ३ ॥ जया जया आकाराचें । होवोनियां चित्त नाचे । ते उपाधिभाव तयाचे । सुटावे सकळ ॥ ४ ॥ रक्त आणि पीत । हरित आणि श्वेत । नील आणि कपोत । वर्ण नाहीं ॥ ५ ॥ नाहीं गंधासहीत मही । सरसोदक नाहीं । न सरूप वन्हीही । पवन नाहीं सस्पर्श ॥ ६ ॥ सशब्द नाहीं गगन । भूतें हरपतांचिजाण । तन्मय ब्रह्मांडची शून्य । मग पिंड कासयाचा ॥ ७ ॥ शरीरीं रक्तवाहिनीगण । तयातें नाडी समजोन । आंतडियांच्या गोळ्यालागोन । ह्मणती चक्रें । ८ । भूतरूपाची दीप्ती । तयास ह्मणती ज्योती । परी अवधीयाची नास्ती । भावावी तुवां ॥ ९ ॥ या शून्यध्यानासमान । ध्यान नसेचि आन । अभावयोग ह्मणोन । कूर्मपुराण हें सांगे ॥ १० ॥ आणि बौद्धजनांचिया ग्रंथी । इया ध्यानाची अतिप्रशस्ती । विधिमुखप्रत्ययसमाप्ती । होय जेथे ॥ ११ ॥ परी रूपाहोनि रूपातीत । ध्यान करितां निश्चित । श्रम होती बहुत । ह्मणवोनि भक्ति अधिष्ठित कीजे ॥ १२ ॥ रूपस्थध्यानपरिणामा । हाता लागली प्रतिमा । तत्स्मयसुखीं मनोधर्मा । मिळवोनि आनंदी होवावें ॥ १३ ॥ हासा सोडूनि शून्य भासे । तो अभावयोग असे । महायोग उत्तम विलसे । याहोनी कूर्मपुराण ह्मणे ॥ १४ ॥ हासा सोडोनि आनंद । तेथाचि भूतविवेकें सत्ता सिद्ध । झालिया मग चिद् । स्वरूपें आहें ॥ १५ ॥ भूतविवेकें सत्ता । तीस आपुली देयावी चित्ता । आणि प्रतिमा हास्यफल आनंदवत्ता । मेळवावी ॥ १६ ॥ जिवा शिवाचें एकपण । तो हा महायोग पूर्ण । येथ सांपडे अधिष्ठान । भलतेयाही ॥ १७ ॥ येथ जेवढा चित्तलय वाढे । तेवढें सिद्धिचिन्ह जोडे । हें निरूपिलें फुडें । अमनस्कखंडीं ॥ १८॥ परी ऋद्धी सिद्धी निधी । अवधीयाची उपाधी । जंव त्या परमानंदीं । मन नाहीं ॥ १९ ॥ " एका केशव राजें सकळ सिद्धी " । परी सिध्याधिष्ठान धरावें बुद्धी । ऐसी तातमत प्रसिद्धी । तेथ देवेतर सिद्धी इच्छिजेना ॥ २० ॥ " निर्गुणीं पावले सगुणीं भजतां " । ही नाथोक्ती प्रतिपादी या अर्था । कीं सगुण हास्यांतूनि तत्वतां । निर्गुणीं महायोगानंदवत्ता पावावी ॥ २१ ॥ मग विषयशून्य ब्रह्मपूर्ण । ऐसा व्यतिरेक गहन । उत्तमाधिकारिया याचें ज्ञान । मध्य-

मा ध्यान बोलिलें ॥ २२ ॥ या ध्यानेंचि समाधी । ज्ञानेंही वृत्तिरोध प्रसिद्धी । म्हणवूनि ज्ञात्या ध्यात्या सिद्धी । सारखीच ॥ २३ ॥ परि पहिल्याचें वस्तुतंत्र नित्य । दुसऱ्याचें कर्तृतंत्र अनित्य । तथापी ब्रह्म तंव नित्य । दोन्ही ठायीं ॥ २४ ॥ एवं ज्ञानीं ध्यानीं सच्चिदानंद । भक्तियोगाभ्याम् कळे विशद । हाचि शुद्ध समाधिबोध । जाहला आहे ॥ २५ ॥ आतां यार्चेचि अन्वयें करून । सगुणसद्गुरुमूर्तिस्मरण । तें वस्तुतंत्र शिष्यलाडकें ध्यान । देवोनि अवधान पुढें ऐका ॥ २६ ॥ श्रीज्ञानेश्वर जगज्जननी । तनुमन वाहोनी तच्चरणीं । श्रीज्ञानेश्वरनामेंचि वाणी । छंद आणि अखंड ॥ २७ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपप्रसादे ओवीछंदबद्धे ध्यानयोगादिवाकरे रूपातीतध्यानकथने अभावयोगमहायोगोर्निरूपणं-नाम पंचमः समुल्लासः ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

समुल्लास ६ वा.

जयजयसद्गुरु मायबहिणी । येऊनी माझिया हृदयभुवनीं । निजप्रेमपयः पाजुनी । सबाह्यांतःकरणीं निववीवो ॥ १ ॥ मागां बोलिला समाधी । परि तेथ ताटस्थ्यबुद्धी । सर्व व्यापकत्वसिद्धी । घटो न शके ॥ २ ॥

## ( १ ) अभंग

झालासी तटस्थ नव्हे ती समाधी । उपायांची शुद्धि नेणोनियां ॥ १ ॥
काष्ठा ऐसा जड तैसा तूं झालासी । स्वरूप नेणसी भ्रमोनिया ॥ २ ॥
बोलतां चालतां देखतां ऐकतां । ढळेना सर्वथा तोचि साधी ॥ ३ ॥
ब्रह्मादिक ऐसी समाधी इच्छिती । तयांसी ही स्थिती प्राप्त नाहीं ॥ ४ ॥
ऐकरे चांगा म्हासी ही कल्पना । पावसी त्या खूणा मुक्ताई ह्मणे ॥ ५ ॥

मुक्ताबाई.

ाटस्थ्याकारणें समाधी ह्मणती । उघडी फजिती जगामध्यें ॥ १ ॥

**तुकाराम.**

२ दोन्ही प्रमाण वचन । ताटस्थ्य निषेधती पूर्ण । तें जावया कारण । भक्तिसंपन्न अन्वयें ॥ ३ तेचि उठलिया वृत्ती । जी रूपमय मूर्ती । ती ब्रह्मरूप अनध्यस्तीं । विवर्त्त सांपडे ॥ ४ ॥ अध्यस्तविवर्त्तताविशेषें । अनध्यस्ताविवर्त्त विलसे । तैसा सद्गुरुराव असे । आपण एक ॥ ५ ॥ यद्यपि प्राप्त ब्रह्मवृत्ती । प्रियत्वास्तव अनध्यस्तविवर्त्ती । साधी विष्णुशिवमूर्त्ती । तथापी ती स्थिती परोक्ष ॥ ६ ॥ अपरोक्ष सद्गुरुरावो । तो बंधसंहरणीं शिवो । करुणापालनीं वासुदेवो । अनध्यस्तविवर्त्त पहाहो तोचि खरा ॥ ७ ॥ पूर्वी अध्यस्तविवर्त्त होता गुरु । ह्मणाल तरी अध्यस्तविवर्त्त विश्वसंभारू । तयाकडूनि उपकारू । न झाला कां ॥ ८ ॥ ह्मणाल झाला तो पुढें आतां । काह्मा पाहिजे परंपरा वार्त्ता । दगडकेरांपासूनी तत्वतां । शिकावें ज्ञान शिष्यांनीं ॥ ९ ॥ ऐसे जंव नाहीं । तंव ज्ञानानंतर सद्गुरुआई । अनध्यस्तविवर्त्त पाही । कोणेप्रकारें न ह्मणावा ? ॥ १० ॥ पूर्वील मनुष्यधर्म पूर्ण । गुरुवरी भासती ह्मणाल आपण । तरी तुह्मासि तैसाचि कृष्ण । भासेल मुखादिकीं ॥ ११ ॥ अद्भुतत्व जरी । ब्रह्मजाहलियाहीवरी । अद्भुतत्व कौतुकाकारी । तरी गुरूपकारी कौतुक कां नव्हे ? ॥ १२ ॥ आणि गुरुकृपायोगीं । कौतुक रत्नाकर शिष्य भोगी । मग अनध्यस्तचौरंगीं । सद्गुरु न बैसे कां ? ॥ १३ ॥ योग आणि ज्ञान । यांचा अन्योन्याश्रय जाण । सांगे कूर्मपुराण । ते ज्ञानानंतर भक्तीनें पूर्ण कळे ॥ १४ ॥ येथ ऐसें ह्मणतील कोणी । कीं न भक्ति विदेहमुक्तीस्थानीं । तरी मी पुसे तयांलागुनी । कीं तुमचे मनीं विदेहमुक्तिचिंता कां ? ॥ १५ ॥ कळलिया ब्रह्म व्यापक । प्रारब्धनाशीं हरपे देहअटक । पुढें कर्म नाहीं ह्मणोनि देख । जन्म न घडे ॥ १६ ॥ येर ब्रह्माचें स्वानन्दपण । जंव नाशेना संपूर्ण । तंव प्रेम राहिलिया जाण । विरोध काय ? ॥ १७ ॥ येथ कोणी असो अवस्था । आज काय त्याची चिंता । देहीं जाणोनि व्यापक परमार्था । अनध्यस्तविवर्तगुरुनाथा भजावें ॥ १८ ॥ सद्गुरु मातापिता कांत । त्याची सेवा यथार्थ । सर्वभावें सावचित्त । करावी कीं ॥ १९ ॥ ती

सेवा कैसी कवणेरीती । इयेविषयीं आचार्योपास्ती । हृदयप्रकाशक तात बोलिती । त्रयोदशाध्यायीं ॥ २० ॥ त्याहोनि अधिकवर्णन । ब्रह्मा हरी उमारमण । अनंत कल्प तप तपोन । करों न शकती ॥ २१ ॥ ह्मणोनि तेंचि एक दृहावें । सर्वस्व तेथ पहावें । तदनुसार ह्मोआवें । सद्गुरुदास ॥ २२ ॥ श्रीज्ञानेश्वर मायमाउली । हृदयीं धरोनि तत्पाउली । संसारताप कृपासाउली । निवाला सकळ ॥ २३ ॥ तत्पदीं पुष्पपंकोलिका । न्यायें ओविया सकाळिकां । समर्पोनि अंगोलिका । धरिल्याशिरीं ॥ २४ ॥ तिया कृष्णमय अंगोळिका पूर्ण । मग शिरसंयोगें प्रेमामृत वहन । तेणें मज शंभुपण । आलिया नवल कें ? ॥ २५ ॥ गुरु ज्ञानेश्वरचरणगंगा । शिरीं धारितां विश्वेश्वरत्व विश्वांगा । आणि हृदयचौरंगा । ज्ञानेश्वरमाउली ॥ २६ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे ध्यानयोगदिवाकरे फलरूपसद्गुरुध्यानवर्णनं नाम षष्ठः समुल्लासः ॥

श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥



श्रीज्ञानेश्वरमाउली

# भगवद्भक्तिसौरभ

## ( विषयदिग्दर्शन )

तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे ॥
हे अनुभवाचि जोगे नोहे । बोला ऐसें ॥ १ ॥

या तातवाक्यानुसार यद्यपि ज्ञानोत्तरकालीन भक्ति बोलून दाखविणें मुळींच शक्य नसून केवळ अनुभवगम्यच आहे, तथापि जीवन्मुक्तांनां ज्ञानानंतर दृष्टदुःखनिवृत्ति व परमानंदप्राप्तीकरितां अत्यंत आवश्यक असलेल्या पराभक्तीचा सौरभ आंतल्या आंतच कोंडून न राहतां बाहेर प्रगट होऊन सर्व परमानंद इच्छिणाऱ्या जनांना आपल्या सौरभानें तल्लीन करीत असतो.

श्रीरुक्मिणीच्या मधुरभक्तीचे सात संस्कृतश्लोक घेऊन, त्यावर प्राकृतओवीबद्धटीकारूपानें, श्रीगुलाबरावमहाराजांच्या मधुरभक्तीच्या भरांतच, हा भगवद्भक्तिसौरभ बाहेर आलेला आहे.

ते धन्य होत कीं जे या मधुर भगवद्भक्तिसौरभाचें अवघ्राण करून आपल्या परमप्रिय मधुररसाधिष्ठानाचें ठिकाणीं एकतानता पावतात.

या सौरभाचें एकंदर आठ पराग आहेत; व प्रत्येक परागामध्यें परमेश्वराचें ठिकाणीं जें वाढतें व दांडगें (अमर्याद ) प्रेम त्याचें स्वरूप निरनिराळ्या प्रकारें दाखविलें आहे. ह्या सर्व परागांचा मुख्य विषय प्रेमच असल्यामुळें, भक्तीला अनुकूल प्रमेयांचें मंडन व तद्विरोधी प्रमेयांचें खंडन करून, भक्तीचें शुद्धस्वरूप निरनिराळ्या ठिकाणीं मोठ्या

बहारीनें दाखविलें आहे. तथापि पहिला पराग ह्मणजे कोणत्याहि एका विवक्षित श्लोकावर टीका नसून त्यांत अद्वैतमधुरभक्तीचें श्रुती, युक्ति व अनुभवासिद्ध सविस्तर विवेचन असून, श्रीरुक्मिणीचीहि ज्ञानोत्तरकालीन परा मधुरभाक्ति सिद्ध करून श्रीकृष्ण हे ब्रम्ह व रुक्मिणी ही माया या रूपकाचें खंडन केलें आहे. श्रीकृष्णजन्मखंडांत श्रीमद्व्यासांनीं श्रीकृष्ण हे पुरुष व राधिका ही प्रकृती असें जें म्हटलें आहे त्याचाही या प्रथम परागांत सुंदररीतीनें समन्वय केला आहे.

बाकीच्या सात परागांत त्या त्या श्लोकावर ओवीबद्ध टीका असून श्लोकांचे भाव व त्यांचे सौरस्य फारच अलौकिक व मार्मिक तऱ्हेनें दाखविलें आहे हें प्रेमळ वाचकांच्या सहज लक्षांत येईलच.

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

# ॥ अथ श्रीभगवद्भक्तिसौरभः प्रारभ्यते ॥



## प्रथम परागः

श्लोकः–उमा माता पिता शंभुर्गुरुर्ज्ञानेश्वरो महान् ।
पतिः कृष्णो राधिकाद्या भगिन्यो गोपिका मम ॥ १ ॥
पंचायतनमित्येतत्धृदि स्थाप्य प्रपूज्यच ॥
प्रणम्य परमस्माभिः स्वाघ्रेयो भक्तिसौरभः ॥ २ ॥

### ओव्या

ॐ नमः श्री आळंदीपती । लोकीं तिहीं तुझी ख्याती । भक्तवत्सला कृपामूर्ती । कृपा मजवरुती केली तुवां ॥ १ ॥ तूं माय बाप कांत बंधू । सोयरा सज्जन सौख्यसिंधू । सदा सांभाळिसी आर्तबंधू । भेद रहितू संबंधू तुझा मज ॥ २ ॥ तूं विघ्नहरणीं गणपती । तूं बुद्धिदानी सरस्वती । तूं ज्ञानदानी श्रीगुरुमूर्ती । तुझी सत्संगती आवडे ॥ ३ ॥ तूं श्रीकृष्ण कैवल्यदानी । तूं जगन्माता रुक्मिणी । एक असोनी दोनपणीं । सुखसन्मार्नीं विलससी ॥ ४ ॥ " एकाकी न रमते " ॥ ऐसी श्रुती जे साक्ष देते । तोचि उल्हसूनि येथें । विस्तारातें पावले ॥ ५ ॥ आनन्दो विषयानुभवो नित्यत्वं चेति संति धर्मा ब्रह्मणो ह्यपृथक्त्वेऽपिपृथगिवावभासंते "

या वचनें करून । निर्गुणीं भक्ती उपपन्न । हें जाणती सज्जन । भक्ति वेत्ते ॥ ६ ॥ “ तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें नोहे । बोला ऐसें ( ज्ञाने. ) ॥ ७ ॥ ऐसे श्रीमत्तात वचन । आणि श्रीतुकारामही आपण । अभंगीं करिती निरूपण । कीं ब्रह्मीं प्रस्थान भक्तिसाठीं ॥ ८ ॥

### अभंग

यज्ञभूतांच्या पालना । भेद कारिया कारणा ।
पावावया उपासना । ब्रम्हस्थानीं प्रस्थान ॥ १ ॥
एकपरी पडिलें भागीं । फळ बीजाचिये अंगीं ।
धन्य तेचि जगीं । आदि अंत सांभाळी ॥ २ ॥
आवश्यक तो शेवट । मागे अवधी खटपट ।
चालों जाणे वाट । ऐसा विरळा एखादा ॥ ३ ॥
तुका होउनि निराळा । क्षरा अक्षरा वेगळा ।
पाहे निगम कळा । बोले विठ्ठलप्रसादें ॥ ४ ॥

आणि भक्तिभाग्यप्रेमा पुरुषार्थ । हाचि ब्रह्मींचा मुख्य अर्थ । हेही वचन यथार्थ । त्यांचेंचि असे ॥ ९ ॥ तेवीं श्रीमन्मधुसूदन । गूढार्थ दीपिकेमाजिं निरूपण । निकें करिती कीं निर्गुणीं भक्ति उपपन्न । संक्षेपशारीरक टीकेंतही ॥ १० ॥

श्रुतिः— यस्यदेवे परा भक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥ श्वेता.

श्लोकः—ब्रम्हभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥ ( भ. गी. )

एवं सौषुप्तश्रुती जागृतश्रुती । सांगती ज्ञानोत्तर भक्ती । “ मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजंत ” इति । श्रीमदाचार्योक्ति नृसिंहतापनयिभाष्ये ॥ ११ ॥

श्लोकः—आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रन्थाअप्युरुक्रमे ।
कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थम्भूतगुणो हरिः ॥ श्री. भा.

एवं श्रीशुकाचार्यवचन । ‘ सा तु कर्मज्ञानयोगेभ्योऽप्यधिकतरा ’ ह्मणोन । ब्रम्हनंदनसूत्र प्रमाण । ईश्वरदत्त ॥ १२ ॥ एवं बहु-

प्रमाणें ज्ञानोत्तरभक्ती । निरभिमान व्हावया तेचि युक्ति । भक्त्या वाचा ऋणमुक्ती । ही स्वानुभूति गुरुगम्य ॥ १३ ॥ " तैसें ग्रासूनि दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें । आपुलियेपणें उरे । बोधू जो कां ॥ तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनियां । तें पायां पडोनि मियां । सोडविलें " ॥ अमृतानुभव ॥

ऐसें श्रीमत्तातवचन । स्वानुभवेंहि परम प्रमाण । कीं सोहंपणाचें ज्ञान बंधन । तुटोनी जाय गुरुभक्त्या ॥ १४ ॥ मीपणावीण अवघा देवो । हा समर्थाचा भक्तिअनुभवो । एवं भगवद्भक्तिप्रवाहो । सर्व सौख्यद ॥ १५ ॥ आर्त जिज्ञासु अर्थार्थी ज्ञानी । यांत वरिष्ठ तो चतुर्थ स्थानीं । श्रीहरीचिया भजनीं । निष्काम आणि नित्ययुक्त ॥ १६ ॥ कां पितृ मातृ वात्सल्य मधुरा । एवं एक भक्ति चतुःप्रकारा । त्यांतोनि शेवटली सुंदरा । विलसे येथ ॥ १७ ॥ स्त्र्याकृत्यवच्छिन्नानन्दाचिती । ती भीमककन्यका महामती । पुमाकारावच्छिन्नानंदचिती । श्रीकृष्णमूर्ति सहज ऐक्य ॥१८॥ ऐसी रुक्मिणी ज्ञानी । आणि होऊं इच्छी कामिनी । हे माधुर्यभक्तीची कडसणी । महंतजनीं जाणिजे ॥ १९ ॥ चूर्णिकाः— आपणचि वनिता आपणचि पती । ऐसी असतां ब्रम्हसंविती । तरी भोगघृणा आणि पारतंत्र्यविपत्ती । जाऊनी अद्वैतप्रीतिसंपत्ती सुखरूप साधे ॥ २० ॥ बाह्य सांडोनि आपणां येणें । तैंचि आपलें देखणें । द्वैतइव परी अद्वैतपणें । डोळां देखो जाणें तारकामात्रीं ॥ २१ ॥ तेवी आपली माधुर्यभक्ती । आपणांमाजी करी स्थिती । तैं आपणचि होय पती । आपण युवती रिझवीत ॥ २२ ॥ एवं हें पत्नीचें भजन । आणि तैसें परमात्मपतिपण । तेंही तातचि आपण । स्पष्ट करिती ॥ २३ ॥

एऱ्हवीं माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता ।
काय समर्थाची कांता । कोरान्न मागे ॥ १ ॥
तैसें तें माझें । कलत्र हें जाणिजे ।
कायसेंनिही न लाजे । तयाचेंनि मी ॥ २ ॥ ( ज्ञाने. )

एवं हा गुरु देव भक्तीचा । श्रीगुरूक्त संवाद साचा । " पतिरेकोगुरुः स्त्रीणां " या स्मृतीचा । शक्य साचा प्रमितिभावो ॥ २४ ॥ संयोगीं

वियोगोपलालन । येथ हें योग्य निरूपण । श्रीभमिकाचें लग्न । श्रीहरीसीं ॥ २५ ॥ नसतां योग्य परिस्थिती । आपुलिये बळें साधावी भक्ती । निराशा न करी भक्तपती । हेंचि नीती येथिचीं ॥ २६ ॥ पत्र पाठवूनि आपण । पती मिळविला जगज्जीवन । तें बाह्यदृष्टी मात्र लग्न । परी अन्तः संलग्न पत्रव्यक्त ॥ २७ ॥ कैं लागलें आत्मलग्न । हें जाणो न सके कोंठें कवण । दोघेही शक्ती दोघे उमारमण । कीं दोघे कृष्ण दोघे रुक्मिणी ॥ २८ ॥

श्लोकः— " सार्धं केनच कस्यार्धं शिवयोः समरूपिणोः

ज्ञातुं न शक्यते लग्नमिति द्वैतच्छलान्मुहुः । ( अमृतानु. )

श्रीतातवचनाचा अर्थ । दोघेही शिवसमरूपी यथार्थ । यालागीं बाह्यमात्र द्वैत । परी संलग्नांत स्थित अगम्य ॥ २९ ॥ वैदान्तिक पठन्मूर्ख कोणी । ह्मणती कृष्ण ब्रह्म माया रुक्मिणी । जड चेतन भेद कल्पुनी । ज्ञानपर्णी अतिबद्ध ॥ ३० ॥ तयासीं पुसणें आमुचें । कीं कैसें लग्न जडचेतनाचें । न कळे रहस्य चरित्राचें । अतो वेदाताहंतेचें बोलणें हे ॥ ३१ ॥ अज्ञानाचें हेंचि लक्षण । कीं निवृत्त होय झालिया ज्ञान । त्वन्मते रुक्मिणी माया अज्ञान । कृष्ण ब्रह्म तरी लग्न केवीं ॥ ३१ ॥ ह्मणाल सामान्यरूपें सत्ता । मायेसी देत आश्रयता । तथापि विशेषचैतन्यज्ञानें तत्वतां । निवर्त्ते माया ॥ ३३ ॥ येणें तंव रुक्मिणी स्वयंवर । ह्मणजे जाहला मुख्य संसार । संसारावांचोनी पैलपार । कोण पावले आजवरीं ? ॥ ३४ ॥ आणि व्यासशुकादि रुक्मिणीस्वयंवर । गाती धरूनी मनीं आदर । एवं ऐसा सदाचार । तो बाष्कळ संसार कदा नोहे ॥ ३५ ॥ वरी सत्तेचा तंव केंव्हाही । यावन्माया वियोग नाहीं । मग श्रीकृष्ण भेटावया ळवलाही । पत्रिका काय पाठविलीं ॥ ३६ ॥ भेटतां विशेषचेतन श्रीकृष्ण । तरी संलग्नमिषें रुक्मिणीरमण । आणि पत्रिका ही ज्ञानसंपन्न । तरी जडा ज्ञान कासयाचें ॥ ३७ ॥ " आत्मतमोऽपहत्यै " या वचनें करून । शिवादिप्रमाणें आपण । रुक्मिणी इच्छी तमतिरस्करण । तें विशेषचिज्ज्ञानाविण केविं घडे ? ॥ ३८ ॥ गुरुविप्रादि आराधन । केलिया हरी करील पाणिग्रहण । हें पत्रिकागत चतुर्थश्लोकवचन । तें काय अज्ञानवर्धक ? ॥ ३९ ॥

गुरुआराधनें होय ज्ञान। अभिप्राय कीं ज्ञानरूप भेटे कृष्ण । आणि ते ज्ञानही विशेषचेतन । जें अज्ञाननिवर्त्तक ॥ ४० ॥ रुक्मिणी जरी माया अज्ञान । तियेसीं भेटलें सामान्यचेतन । तरी गुर्वादींचे आराधन । संसारवर्धनकारक झालें ॥ ४१ ॥ ह्मणवुनी ब्रह्म श्रीहरी रुक्मिणी प्रकृति । हे तों अरण्यपण्डितोक्ती । यद्यपि पुरुष कृष्ण राधा प्रकृती । व्यासोक्ती कृष्णजन्मखंडी ॥ ४२ ॥ तथापि पुरुष कृष्ण पिता । आणि राधिका प्रकृति माता । म्हणजे सामर्थ्यावच्छिन्नचितिप्रीति कृष्णपुरुषता । आणि पालनावच्छिन्नचितिप्रकृति राधा ॥ ४३ ॥ सत्ता तो पुरुषु । चैतन्य तो प्रकृत्युल्हासु । ऐसा श्रीमत्तातवाग्विलासू तेथ आनन्द विनाशु किमपि नसे ॥ ४४ ॥ " तरी केवळ हे सत्ता । तो पुरुष गा पांडुसुता । प्रकृतीतें समस्ता । क्रियानाम " ॥ ( ज्ञानेश्वरी ) आणि हरिपाठीं श्रीएकनाथ । बोलिलें ऐसेंचि यथार्थ । तो अभंग प्रमाणार्थ । परिसिजे श्रोतीं ॥ ४५ ॥

## अभंग.

सत्पद ते ब्रह्म चित्पद ती माया । आनंदपदीं जया ह्मणती हरी ॥ १ ॥
सत्पद निर्गुण चित्पद सगुण । सगुणनिर्गुण हरिपायीं ॥ २ ॥
तत्सदिति ऐसें पैलवस्तूवरी । गीतेमाजी हरि बोलियेले ॥ ३ ॥
हरिपदप्राप्ती भोळ्या भाविकांसी । अभिमानियांसी गर्भवास ॥ ४ ॥
अस्तिभातिप्रिय ऐशीं पदें तिनी । एका जनार्दनी तेंचि झाले ॥ ५ ॥

या अभंगाचा मथितार्थ । अभंगांत चरणीं यथार्थ । एवं विरोध समस्त । निरसिला असे ॥ ४६ ॥ या ग्रंथींचें निरूपण । जीवाशिवाचें होय लग्न । ऐसें जे श्रीनाथवचन । तें साधनदशा द्योतून महा वाक्यार्थानंतर्यक ॥ ४७ ॥ देवीभागवताचें वचन । इन्द्राप्रति अंबा वदली आपण । तें तंव परमप्रमाण । कीं देवीदेव दोन्हीं ब्रह्मरूप ॥ ४८ ॥

## संमति श्लोक.

" रूपं मदीयं ब्रह्मैतत्सर्वकारणकारणम् ।
मायाधिष्ठानभूतंतु सर्वसाक्षिनिरामयम् ॥ ( देवी भागवत. )

माया मायेचें अधिष्ठान । हें सर्वथा अघटमान । या लागीं अस्मदीयोपपन्न । उत्तमपक्ष ॥ ४९ ॥ शिव तोचि शक्ती । एवं

कैवल्योपनिषदुक्ती । दोन्हीं उपाधीरहित शिवशक्ती । ऐसी तातोक्ती ह्मणूनि ब्रम्ह ॥ ५० ॥ “ ऐसी इये निरुपाधिके । जगाचीं जिये जनके । तिये वन्दिली मियां मुळिकें । देवोदेवी ” ( अमृतानुभव. ) “ दशेचि वैरिये ” वचन । तातांचेचिपरी द्वैतस्थिती प्रहरण । शिव-शक्ति एकपण । हें सज्ञान पूर्ण माधुर्यभक्ती ॥ ५१ ॥ “ जो प्रियूचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरी । चारुस्थळीं एकाहारी । एकां-गाचा ” ॥ ५२ ॥ ( अ. भ. ) या ओवींतील निरूपण भावो । तात्पर्यें तोचि पावला ठावो । जो रुक्मिणीसी यादवरावो । भेटण्यापूर्वी जो प्रवाहो अंतरींचा ॥ ५३ ॥ पत्रिका माळ सुदेव साक्ष ॥ अपरोक्षत्वें संलग्न पक्ष । कृष्णभेटी झालिया प्रत्यक्ष । तो अभिप्राय पक्ष पुढील तातोक्ती ॥ ५४ ॥ “ आवडीचेनि वेगें । एक एकातें गिळिताहे आंगे कीं द्वैताचेनि पांगे । उगळिते आहाती” ॥ (अमृतानुभव.) पूर्वार्धार्थ श्रीकृष्णदर्शन । उत्तरार्धार्थे कीं योगी वियोगोपलालन । आणि अनुभवाची आत्मखूण । जाणती सज्जन ब्रह्मवेत्ते ।५५। आतां तोचिस्पष्टार्थु । बोधावया सिद्धान्तू । तातवचन सुधाप्रान्तू । आश्रयिजें ।५६। ‘जें एकाचि नव्हें एकसरें । दोहा दोन्हीपण नाहीं पुरें । काय नेणों साकारें । स्वरूपें जिये’॥(अ. भ.) ब्रह्मवेत्तिया रुक्मिणी भक्ती । ब्रह्मत्वें श्रीकृष्णस्थिती । ऐसी पृथक्त्वप्रतीती । परी “ ब्रह्मविद्ब्रह्मैव भवति ” इया श्रुति एकपण ॥ ५७ ॥ एकपणें निरसलें द्वैत । दोनपणें सान्वय मुख्य व्यतिरेकास्थित । माया नाहीं ह्मणूनि जें जें साकृत । तें तें निराकृत ब्रह्मरूप ॥ ५८ ॥ सांख्यांतील अर्धवट दोनपण । योगांतील अर्धवट एकपण । साकार तितुकें निराकार पूर्ण । हें वेदान्तगुह्य ह्मणून आनिर्वाच्यता ॥ ५९ ॥ आतां ती आनिर्वाच्यभक्ती । स्वसुखें दोनपणइव प्रतीती । परी आलुकेपणाची स्थिती । वियोगोपळालनें ही ऐक्यता ॥ ६० ॥ हें तथापी एकपण । न फुटोनी प्रेमवर्द्धन । हें आश्चर्याचें क्रीडन । रुक्मिणीलग्न मुनिसेव्य ॥ ६१ ॥ आपणा आपणां माजि प्रेमें । आपणा आनन्दानुभवें संभ्रमें । नांदे हें दोनपण गमे । दोनपणावीण ॥ ६९ ॥ “जया एकसत्तेचें बैसणे । दोघा एक प्रकाशाचें लेणे । जें अनादी एकपणें । नांदती दोघे ” ( अ. भ. ) एवं एकपणावीण एकपण । आनंद नोहे संवित् सोडून । किंबहुना

एकोपजीवी हें वचन । तद्योतक ॥ ६३ ॥ एवं अंतर्व्यवहारु लग्नाचा । बाह्य व्यवहारु जो साचा । जेथोनी इतिहासाचा । उगमूं जाहला ॥ ६४ ॥ " जे स्वामीचिये सत्ता । वीण असो नेणें पतिव्रता । जियेवीण सर्वकर्त्ता । कांहीं ना जो " ॥ अ. भ. ॥ तो या ओवींत निश्चिती । सत्तेवीण नाहीं चिती । चितीवीण सत्ता-प्रतीती । कदापी नव्हे ॥ ६५ ॥ घेऊनि वृत्तिज्ञान । चौसष्टींत केलें निरूपण । तयाचा हाचि अर्थ पूर्ण । वृत्ति चितिप्रत्ययापन्न । आणि सत्ता सामान्यज्ञानगम्य ॥ ६६ ॥ बाधाभावो विशिष्टसत् । वृत्यवच्छिन्न ज्ञान ते चित् । ऐसें अद्वैतकौस्तुभीं प्रसिद्ध । प्रमाण आहे ॥ ६७ ॥ " सर्व शून्याचा निष्कर्षू । जिया बाइला केला पुरुषु । जेणें दादुलेन सत्ता-विशेषू । शक्ती जाली " । अमृता. ॥ सर्वशून्य ह्मणजे सर्वसत्ता । अभाव नोहे सर्वथा । हें गणितशास्त्र पाहतां । येईल कळुनी ॥ ६८ ॥ शून्य दाखवावें जरी झालें । तरी करणें लागे बिंदुलें । अभाव दाखवावया वहिलें । कांहींच नलगे ॥ ६९ ॥ शून्य अंकाच्या माथां चढे । तेंव्हां दशगुण मूळ वाढे । अंकाभाव अंकमाथा चढे । तरी मूल्य वाढे हें दिसेना ॥ ७० ॥ शून्य अभावार्थक होवावें । तरी अंक पुसूनि अंकमोल कां न वाढावें ? । छलदृष्टी नवातुनि एकास काढावें । मग सुखें गणावें नवलक्ष ॥ ७१ ॥ ऐसें जंव सर्वथा नाहीं । तरी अभावरूप शून्य नव्हे पाही । ययाचा अर्थ लवलाही । हाचि एक ॥ ७२ ॥ अंकावरी शून्य जोडे । तरी अंकाचा विस्तार वाढे । तेंवि मायेमाजीं ब्रह्म चढे । तैं विस्तार वाढे संसाराचा ॥ ७३ ॥ अंकाभावी उरें बिंदुले । ह्मणजे माया निरसूनि जें राहिलें । तें ब्रह्माचि बोलिलें । शून्यशब्दें ॥ ७४ ॥ बौद्धाचें शून्य आमची चिती । एकचि ऐसें वसिष्ठ ह्मणती । वृहद्वासिष्ठीं बहुत असती । श्लोक ऐसे ॥ ७५ ॥ आणि ब्रह्मास शून्यशब्द । ज्ञानेश्वर्यादिस्थानीं प्रसिद्ध । तात ही विशद । बहुधा बोलिले ॥ ७६ ॥ अमृतानुभवीं चतुर्थाध्यावीं । शून्यशब्दार्थ जो खंडिला पाही । तो अभाव शून्य समजती तयाही । व्हावया बोधू ॥ ७७ ॥ असो शून्य ब्रह्म अंक माया । हें प्रमाणा आणिलें गणितें यया । कीं बिंदु परमात्मा रेषा माया । अक्षरसृष्टी ॥ ७८ ॥ हें प्रणवाचें सार । गणितेंचि बोधिलें समग्र । ह्मणोनी सर्वशून्याचा

निष्कर्ष निर्धार । सत्तारूप ॥ ७९ ॥ चितीवीण न कळे सत्ता । हे शिवाची शक्ती अधीनता । चिती विशेष परी पाहिजे सामान्यसत्ता । म्हणजे 'जेणें दादुलेन सत्ता विशेषू शक्ती जाहली' ॥ ८० ॥ 'जेणें देवें संपूर्ण देवी । जियेवीण कांही ना तो गोसावी । किंबहुना एकोपजीवी । एकएकांची' ॥ ८१ ॥ ( अमृ० )॥ चिती आहे सत्ता कळे । हें परस्पर अनुभवीं मिळे । आनंदाचे सोहळे । सहजचि मग ॥ ८२ ॥ परस्पर सर्वत्र मिळणी । कासयाची दुःख शिराणी । आनंदरूपचि म्हणोनी । दोघे ही हे ॥ ८३ ॥ "सत्ताचि कीं सुखप्रकाशू । प्रकाशूचि सत्ता उल्हासू । हें न निवडे मिठांशू । अमृतीं जेवीं' ॥ ( अ. भ. ) ऐसें पंचमाध्यायीं तातवचन । आणि श्रीएकनाथ ही आपण । स्वात्मसुखीं निरूपण । ऐसेंचि करिती ॥ ८४ ॥ "सत तेंचि चित । चित तोचि आनंद । वस्तु नोहे त्रिविध । एकपद निजानंद'। ( स्वा. सु. ) आतां येथची कैसी भक्ती । हें कळावया आश्रयिजे तातोक्ती । जेथ सुखाची ख्याती । उमटली आहे ॥ ८५ ॥ बाह्य लक्ष्यार्थू प्रगटला । अंतर्लक्ष्यार्थु सिद्ध झाला । तो भक्तिरूपें फावो लागला । भलतिया नित्य ॥ ८६ ॥ "एरव्हीं सच्चिदानंद भेदें । चालिली तिन्ही पदें । परी तिन्हीं उणी आनन्दें । केलीं येणें' ॥ ( अ. भ. )॥ इतरव्यतिरेकी जी आत्मप्रीती । अन्वयें तीचि भगवद्भक्ती । जिणें ज्ञानाऽहंकृती । निःशेष जाय ॥ ८७ ॥ तें अनिर्वाच्य पैं सर्वथा । नित्य सणाचिया अर्थी । आपणां आपण परमार्थी । यथार्थता भोगिजे ॥ ८८ ॥ " येरव्हीं आडोळलिया डोळा । शिवयात्रेचा सोहळा । भोगिजे भलते वेळा । भलतेणें ॥ देव देऊळ परिवारू । कीजे कोरूनी डोंगरू । तैसा भक्तीचा व्यवहारू । कां न व्हावा ? ॥ भलतेउतेनी देवें । भलतेन भक्त होवावे । बैसला तेथ राणिवे । अकर्मू हा "(अ. भ.) ॥

टीकाः– न लगे लग्नाची तिथी । नलगे ऐतिहासिक संपत्ती । सत्ता दावावया मात्र दृढप्रतीती । इतिहासाची ॥ ८९ ॥ पाहिजे तेथ पाहिजे तेव्हा । पाहिजे तिया परिस्थितींत होवावा । स्वयमेव सुखाचा घ्यावा । प्रत्ययो कीं ॥ ९० ॥ भलतेणें कृष्ण होवावें । भलतेणें रुक्मिणीत्व घेयावें । परी आपुलें एकपण न मोडावें । मग भोगावें लग्नसुख ॥ ९१ ॥

" झाला देवोचि भक्तू । ठावोचि झाला पंथू । होवोनि ठेला एकांतू । विश्वचि हें ॥ अखतांची देवता । अखतींचि असे न पूजितां । मा अखतीं काया आतां । पुजों जावीं ' । ( अ. भ. ९-४४ )

टीकाः— एवं भक्ता देवपण जोडे । पूज्य पूजका बिंदुलें पडे । परी आनंदानुभव न मोडे । श्रद्धा सत्ता सत्ता श्रद्धा ॥ ९२ ॥ " ऐसाही स्वाभिभृत्युसंबंधा । लागी उठती श्रद्धा । तैं देवोचि नुसुधा । कामविजे ' ( अ. भ. ९-३८ ) व्यतिरेकीं समाधिस्थिती । व्युत्थानीं प्रारब्ध भक्ती । परी अन्वय होतां व्युत्थान निवृत्ती । संधिवृत्ति समाधिस्थ ॥ ९३ ॥ जनीं बोले चाले हिंडे । परी ज्याची समाधी न खंडे । ऐसें गुरुलक्षण रोकडें । श्रीधर वदले ॥ ९४ ॥ तिया समाधींत अन्वयें पूर्ण । प्रेमभजनें भोगिजे भगवान । ही भक्ती हेंचि ज्ञान । हेंचि अखंडध्यान समर्थोक्त ॥ ९५ ॥ घेरंडाचार्यांचा हा योगू । हा सज्जनांचा उघड मार्गू । तयाचा पाहोनि मागू । चलावें सकळीं ॥ ९६ ॥ " कोणी एक अकृत्रिम । भक्तीचें हें वर्म्म । योगज्ञानादि विश्राम । भूमिका हे ॥ [ अ. भ.] पाहतां ज्ञानाचा पुंज न चढे । कवटाळितां गत्यैकाग्न्य मोडे । परी प्रेमासी विरोध न जोडे । ह्मणोनी आलिंगितां वाढे न सुटावया ॥ ७ ॥ यालागीं योगज्ञान विश्रांती । तेथ प्रकटे अकृत्रिम भक्ती । एकत्वें दृष्टांत दार्ष्टान्ती । सिद्ध हें झालें ॥ ९८ ॥ तें फळीं चाखूनि बीजीं उरिलें । पुन्हां चाखावया फळीं पाहिजे आणिलें । ह्मणोनी बीजाचि हें पेरिलें । आत्मभूमी ॥ ९९ ॥ तो रुक्मिण्यंत स्वयंवर रसू । पत्रिकारूपें महासौरसू । अमरत्व पितांचि सुधारसू । परी रुच्यर्थ बीजोल्हासू पुढें वाढे ॥ १०० ॥ तो इतिहासांश निश्चिती । सत्ताऽवच्छिन्न श्रद्धा द्योती । भीमकी देतां शिशुपालाप्रती । तिनें स्वबळें श्रीपती वरियला ॥ १०१ ॥ पत्रिका घातली माळ । ती अम्लान असूनि सोज्वळ । भलतेणें रुक्मिणी होवून गोपाळ । घालुनी माळ वरावा ॥ १०२ ॥ ती ज्ञानें अद्वैत माधुर्य भक्ती । भीमककन्यका ब्रह्मव्यक्ती । श्रीकृष्ण हा ब्रह्मपती । ये विषयीं नाथोक्ती प्रमाण ॥ १०३ ॥ " ऐका भीमकीची व्युत्पत्ति । पत्रिका लिहिली चौथे भक्ती । वाचितांचि भक्तपती । सहजस्थिती धाविन्नला ' । [ रु. अ. ४ ओ. ३ ) एवं नाथाची

चवथी भक्ती । आणि मधुसूदनांची तृतीयस्थिती । " स एवाहं " ऐसी प्रतीती । तेही अंतर्भूत पत्रिकापुष्पीं ॥ १०४ ॥ परी अत्यन्त गूढ ती माळा सुरस । कळावया हरिप्रिय पात्रास । ज्ञानेश्वर भगवन्निर्माल्य सुवास । गुरुकृपें प्रकटला ॥ १०५ ॥ एवं जें झालें निरूपण । तें सद्गुरु जाणती आपण । ऐसा एवढा म्हणावया कारण । तनु आणि मन असमर्थ ॥ १०६ ॥ श्रीज्ञानेश्वर मायमाउली । तियेंची वंदोनी पाउली । ही ओवी कुसुममाळ अर्पिली । चरणीं प्रेमें ॥ १०७ ॥

हरिः ॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे श्रीभगवद्भक्तिसौरभे उपोद्घातो नाम प्रथमः परागः ॥

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

॥ श्रीज्ञानेश्वरमाउलीसमर्थ ॥

## ॥ द्वितीय परागः ॥

जय जयाऽजितजितभवजिता । जय जयाऽजिताजिगीपुदर्पहंता जय सर्वनतदीनावनता । पुढें ग्रंथा चालवी ॥ १ श्रोतीं असावें सावधान । आंत बाहेर करोनि कान । भगवद्भक्तिकलाज्ञानामृतपान । करोनि संपन्न तेचि व्हावें ॥ २ ॥ प्रथमश्लोकें निरूपण । साधनत्रय संपूर्ण । अंतःसाक्षात्काराचे चिन्ह । सप्रमाण रुक्मिणी बोलत ॥ ३ ॥ येथ वक्त्री श्रीरुक्मिणी बाळा । श्रोता चतुर घनसावळा । कीं स्वीय श्रुति रुक्मिणी बाळा । तत्प्रार्थनया गोपाळा श्रोतृत्व ॥ ४ ॥ कीं श्रुतीची तस्यैवाहंता ते येथ सएवाहंता ॥ जाहली होऊनि पतिव्रता । पतिसमानाधिकारता पाउनी ॥ ५ ॥

**रुक्मिण्युवाचः**— श्रुत्वा गुणान् भुवनसुंदर शृण्वतां ते ।
निर्विश्य कर्णविवरैर्हरतोऽङ्गतापम् ।
रूपं दृशां दृशिमतामखिलार्थलाभं ।
त्वय्यच्युताविशति चित्तमपत्रपं मे ॥ १ ॥

भुवन म्हणजे सदन । त्यांत तूं सुंदर आपण । या वचनें करून । पूर्वी-

नुभव पूर्ण दाखवी ॥ ६ ॥ गृहीं जें जें असे कांहीं । तें गृहिणी जाणे सर्वही । गृहांत सुंदर तूं शेषशायी । हें मी लवलाहीं जाणिलें ॥ ७ ह्मणजे आधींच मी तव गृहिणी । गृहांत सुंदर तूं चक्रपाणी । मज कळलें ह्मणोनी । आश्रय उघडपणीं मागतसे ॥ ८ ॥ गृहीं असतां तूं सुंदर । मज लुटों पाहती चोर । आणि गृहींच्यागृहीं लिहावें पत्र । प्रसंग साचार हा आला ॥ ९ ॥ तूं गृहीं सुंदर चक्रपाणी । मी तत्र कनकमयी रुक्मिणी । तुझें भूषण चक्रपाणी । नेऊं चोरांनि पाहती दुजे ॥ १० ॥ गृहींचि गृहीं पत्र पाठविणें । किंवा जवळी ह्मणोनि पाचारणें । कुलवधूचीं हींचि लक्षणें । न बोलतां लिहिणें तेवीं मम ॥ ११ ॥ आधींच अनुभव माझा । तूं भुवनीं सौंदर्यराजा । ह्मणोनि त्वरें नंदात्मजा । रक्षीं मातें ॥ १२ ॥ शिशु ह्मणजे अज्ञान । तयाचें करी जो पालन । तो हा शिशुपाळ आपण । अहंकारलक्षण बोलिजे ॥ १३ ॥ या पंचकोशमय भुवनीं । परमप्रेमास्पद तूं चक्रपाणी । मी चैतन्यमयी रुक्मिणी । अहंकार भुलवोनि टाकूं पाहे ॥ १४ ॥ तुझा आनंद न भंगतां । अनध्यस्तविवर्त स्थिता । आणि माझें चैतन्य न भंगता । अनध्यस्तविवर्ता मी ॥ १५ ॥ तूं कृष्ण म्हणजे पूर्णानंद । मी रुक्मिणी चैतन्य शुद्ध । दोघेंही एकचि प्रसिद्ध । नाहीं भेद अणुमात्र ॥ १६ ॥ परी अज्ञानपालक अहंकारू । पाहे मज जीव करूं । चैतन्यातिरोहित आनंदपरू । जीव साचारू बोलिजे ॥ १७ ॥ ऐसी दशा पावतां पावतां । स्वभावें ज्ञान जाहलें तत्वतां । जे ज्ञानचक्षुमंता भगवंता । पाहती तुज ॥ १८ ॥ तयांतें अनंत परमार्थाचा । लाभ जो कीं होय साचा । ऐसिया आनंदरूपाचा । समुद्र तूं ॥ १९ ॥ एवं जे तुज पाहती । तयां पासोनि यदुपती । जे तुझे गुण ऐकती । परमावधानें ॥ २० ॥ तरी ते ऐसे तुझे गुण । कर्णद्वारीं प्रवेशून । करिती त्रिविधतापहरण । हें अनुभवें करून मज कळलें ॥ २१ ॥ व्यतिरेकें मी भिन्नइव रुक्मिणी । परी अन्वयें तुजसी मिळाया सगुणी । जाहलें आत्मनिवेदनी । चिदानंदैक्यतोत्सुका ॥ २२ ॥ आतां त्रिविधतापांची निवृत्ति । प्रभु ! तुझे गुण कैसे करिती । ती मज आली अनुभूती । परमेश्वरा ॥ २३ ॥ तूं माझें अर्ध वा पूर्ण अंग । या-

लागीं संबोधितें अंग । वस्तुतः सच्चिदानंदैकांग । स्वानुभवी चांग बोलती ॥ २४ ॥

संमतिश्लोक.

मृद्रूपो हि यथा कुंभो तद्वद्देहोऽपि चिन्मयः ।

आत्मानात्मविवेकोऽयं मुधैव क्रियते बुधैः ॥ ( अपरोक्षानुभूति )

माती रूप जेवीं घट । तेवीं देहही चैतन्य स्पष्ट । मग आत्मानात्मविवेकखटपट । मूढ अचाट व्यर्थ कारिती ॥ २५ ॥ येणें सकळ सच्चिदानंद । हें सहजाचि झाले सिद्ध । परी आत्मरूपें तुज मज। ऐका गोविन्द आणि देहरूपें कां नसे? ॥ २६ ॥ देहही आहे चिती । चितित्वें नाहीं उपेक्ष्यवृत्ति । जेथ चिती तेथ आनंदप्राप्ती । ह्मणोनि श्रीपती सुयोग करी ॥ २७ ॥ आत्ममात्र चिदानंदयोग मुक्ति । स्वात्मदेह चिदानंदयोग भक्ति । परी मूढप्रश्न सिद्धाविद्येचे हाती । देहस्थिती न जावी ॥ २८ ॥ ती जाईल मज शिशुपाळ वरिता । ह्मणोनि सावध जाहलें अनंता । माझी अनध्यस्तविवर्तता । अध्यस्तविवर्तता न होवो ॥ २९ ॥ जारि अनध्यस्तविवर्त उत्कट । तारि किडाळसंगे कनक हिणकट । मग शोधावयाची खटपट । तैसे कचाट मज नको ॥ ३० ॥ तूं अनध्यस्तविवर्त कनकखाणी । मी अनध्यस्तविवर्त कनकाटणी । तुजमाजी माझी राखणी सावध ह्मणोनि वेळीं झालें ॥ ३१ ॥ अज्ञान पावलिया विवेक कारिती या नाव बोलिजती स्मृति । अज्ञान न पावता विवेक कारिती । या नाव श्रुति बोलिजे ॥ ३२ ॥ एवं न पावतां अज्ञान । रुक्मिणी आपणा जाणोन । मिळवूं पाहे अन्वयपण । परम प्रमाण अर्थत्वें ॥३३ ॥ चितित्वें देह शब्द भेदू । न मिळे हा परमार्थु शुद्धू । ब्रह्म अनध्यस्त विवर्त अभेदू । साधावया प्रसिद्धू नित्यैश्वर्यभावो ॥ ३४ ॥ ऐश्वर्ये ऐक्यश्रुती । अन्वयें सहज पावती । जीव न होऊनीं जीवदशा घेती । वेळी हरि भजती आधिकारिक ॥ ३५ ॥ तद्रूप तेवीं रुक्मिणी । तुज वाहतें प्रेमें करोनीं । तुझे गुण हृदयीं धरोनी । जेवीं ऐकोनि ऐकवी ॥ ३६ ॥ तुझें ऐश्वर्य भगवंता । अनध्यस्तविवर्ते असतां । सत्तेनें तया नित्यता । चेतनें अप्रतिबद्धकता विज्ञाना ॥ ३७ ॥ प्रेमास्पदता पदमानंदें । ताप हरिती विनोदें । गुरूपासोनि अधिकारियें

शुद्धें । आणालिया बोधें अंतरीं ॥ ३८ ॥ " आयका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे साही गुणवर्य । वसती जेथ । ( ज्ञानेश्वरी ) तो तूं आत्मा भुवनसुंदर । हृदय हें तुझें मंदिर । वाट पाहे दिवसरात्र । पाहोने पत्र आविर्भाव ॥ ३९ ॥ ह्मणसी साधनचतुष्टयसंपन्न । ते आधींच निघाले तापांतून । तयांचें तापहरण । माझें गुणश्रवण केविं करी ? ४० तरी ऐकें नारायणा । दुःखें दुर्बल झालिया जनां । प्रसंग ये नदीतरणा । होय बाधना अधिकची ॥ ४१ ॥ तरी पुढील सुखाचिया आशा । तरूनि जाय वीरेशा । मग परतटमलयानळू जैसा । श्रमा अपहरी ॥ ४२ ॥ तेवीं आधींच त्रिविधतापें । तापले जे अमूपें । ते साधनचतुष्टयकष्टप्रतापें अधिक तापती ॥ ४३ ॥ पूर्वी ताप आणि अनुताप । ऐसा जाहला सर्व ताप । तो सकळ होय निस्ताप । तव गुणप्रताप एवं असे ॥ ४४ ॥ संसारदुःख जन्म किती । भोगविले ही नाहीं मिती । तंव ब्रह्मसत्य जगन्मिथ्या ही विविक्ति । पातली वृत्ति अकस्मात ॥ ४५ ॥ आधील त्रिविधतापग्लानी । वरी कैं मिळेल ब्रह्म ही आशा मनीं । जगन्मिथ्या ह्मणोनी । तिरस्कार वाटे ॥ ४६ ॥ एवं विवेकें वाढली दुःखसंपत्ति । तंव अंगी इच्छाराहित्य आली विरक्ती । तथापी न झाली ब्रह्मप्राप्ती । ह्मणोनि भीती कीं ओढितील विषय ॥ ४७ ॥ यद्यपि हेयोपादेयशून्या वृत्ति । ऐसी वशीकारसंज्ञा विरक्ति । तथापि तियेच्या रक्षणीं उपरति । शमादि संपत्तिरूप असे ॥ ४८ ॥ मनोनिग्रह इंद्रियनिग्रह । तैसा द्वंद्वप्रत्ययनिग्रह । येथ दुःखाचा समूह अत्यंत वाढे ॥ ४९ ॥ वरी दृढ असावा विश्वास । सिध्यसिद्धयोः समता विशेष ब्रह्म परोक्षतंतु पदरास । धरूनि राहणें ॥ ५० ॥ प्राप्ति नसोनि समाधान । ठेवणें हें अतिकठिण । वरीं तीव्राशा सुटावें दुःखांतून । हे मुमुक्षा जाण पाहिजे ॥ ५१ ॥ मुमुक्षाऽभावीं इतर साधनीं अलसता । इतर साधनाभावें मुमुक्षा वृथा । एवं साधनचतुष्ट्य सांभाळितां । सीमा तत्वतां दुःखाची ॥ ५२ ॥ ते तुझिया आशा श्रीपति । एवढेंही सहन करिती । वरी योगादिकांची अभ्यासरीति । कडाड निश्चितीं वदवेना ॥ ५३ ॥ धन्य तत्तात धन्य जननी । तयास धन्यता चहूंकडूनी । ऐसिया भेटतां आचार्य गुणी । स्वद्रूपदर्शनी परमपटू ॥ ५४ ॥ तया

पासोनि तुझे गुण । साधनसंपन्न करी श्रवण । तैं तयाचें दुःख दारुण । होय संहरण क्षणमात्रें ॥ ५५ ॥ तूं आत्मा जगत्पति । तुझें ज्ञान महावाक्य द्योती । तें ऐकतां श्रीपती । अज्ञान निश्चिती हारपें ॥ ५६ ॥ तुझिया आज्ञेनें तुझी सत्ता । जी मागें कळली साधनवंता । तें तुझें ज्ञान ऐकतां । कळतें चित्ता दीनबंधो ॥ ५७ ॥ तूं आत्मा नित्य शुद्ध मुक्त ऐसें विशेषचैतन्य कळत । किंवा ( चिद्विज्ञान होत ) । तेणें सर्व दुःखाचें कारण नाशत । अज्ञान एक ॥ ५८ ॥ एवं अज्ञान मोहज्ञानें जाय । तुझें वैराग्य जैं श्रवण होय । तैं जगन्मिथ्या कळे स्वयें । मग श्रीती नोहे विषयकर्षणाची ॥ ५९ ॥ मृगजळीं बुडविला गभस्ति । हें न माने कवणिये रीति । ममतास्पद दुःखनिवृति । सहजाचि येणें ॥ ६० ॥ यश गुण ऐकतांचि जाण । कामादिकांचा जय पूर्ण । श्रीचें होतांचि श्रवण । जरा मरण भासेना ॥ ६१ ॥ नित्य श्री ह्मणोनि नाहीं भय । येणें अहंतास्पद दुःख जाय । एवं सहज नाशिलें होय । अध्यात्मिक दुःख ॥ ६२ ॥ तुझें औदार्य श्रीपति । श्रवण करितां कृपामूर्ति । तेणें अगाध धैर्य चित्तीं । वाढत असे ॥ ६३ ॥ तेणें धैर्य जाण । भूतीं पांचाळ ( शरीर ) करितां विछिन्न । किंवा ( भूत सकळ येती शरण ) । औदार्यें समाधान । अदुःखता ॥ ६४ ॥ भेद नाहीं म्हणोनि भूतीं । विछिन्नाविछिन्नीं एक स्थिति । सहज आधिभौतिक दुःखनिवृत्ती । जाहली येणें ॥ ६५ ॥ ऐश्वर्य श्रवणाची अगाध ख्याति । करी आधि-दैविक दुःखनिवृत्ति । आणि आनंदप्राप्तौ स्थिती । ऐश्वर्येचि करी ॥ ६६ ॥ ह्मणोनि परम प्रेमास्पदता । हेंचि अन्वयीं घटे तत्वतां । श्रव-णें फावे यथार्थता । दृष्टी जेव्हां ॥ ६७ ॥ श्रवणें तुझेठायीं आदरू । मननें उत्सुकता प्रकारू । संयोग क्रिया साचारू । निदिध्यासनें ॥ ६८ तैं आत्मपणें फुटे दिठी । तंव साक्षात्कार परिपाटी । जाहलिया सकळ परमार्थता गोमटी । पाणिसंपुटीं फावत ॥ ६९ ॥ एवं अंतःसाक्षा-त्कार होय । तै सहेतुक क्रिया संपोनि जाय । मग वृत्ति लागली राहे । जेवीं लवविते लवविते लवे तरुशाखा ॥ ७० ॥ मग अन्वयें आनंद प्राप्ति । व्युत्थानींही समाधिस्थिति । सप्रेमांतरीं बाह्यालिंगनीं प्रतीति । ज्ञानोत्तरभक्ति इष्टेव वाढे ॥ ७१ ॥ आत्मसाक्षात्कार झाला । आणि

चिदचिपरी अनध्यस्तविवर्त न भेटला । तथापि तयाला । ज्ञानोत्तर प्रेमें काल वेचे ॥ ७२ ॥ मग मी तंव आत्मसाक्षात्कारें रुक्मिणी । भुवन सुंदरत्वें अनध्यस्त विवर्तही अनुभवोनी । वियोग केविं साहुं ? तूं असतां सदनीं । वरी नेतां चोरूनी रिपुवृंदें ॥ ७३ ॥ एवं उपदेशें वा स्वभावें । तव प्रेम गौरवें । प्रतिबंधक लज्जा धावे । रानोमाळ ॥ ७४ ॥ ऐसें निर्लज्ज माझें चित्त । तुझिये ठायीं आवेशत । चिदाकारत्वेऽपि निरहंकृत । आश्लेषूं पाहत आनंदा ॥ ७५ ॥ सच्चिदानंद एकपणीं । परी पृथगिव भासती वृत्यवच्छिन्नीं । तथापि एकपणा नव्हे हानी । वरी व्यक्तैक्य-पणीं अनध्यस्तविवर्ती ॥ ७६ ॥ भेद न पावे पाणियापासुनी । आणि नानात्वाची वाहणी । अंतरी तें काय पाणी । मोडूं इच्छी ॥ ७७ ॥ मुद्दल न ढळतां मिळे । आणि सुख साह्य ऐसें पघळें । ह्मणोनि बाध कवणिये वेळे । काह्याचा नव्हे ॥ ७८ ॥ “ अहो ऐक्याचें मुद्दल न ढळे । आणि साजिरेपणाचा लाभू मिळे । तरी स्वतरंगांचीं मुकुळें । तुरंबू कां पाणी ॥ ( अ. मृ. )

टीका— मुद्दल न टाळूनि भेटे । अनुभवें दुणावलें वाटे । तें तिरस्क-रितां गोमटें । तरी सिद्धता नसोनी द्वेषमात्र ॥ ७९ ॥ आणि आपणा आपणांत दवडावें । तरी पूर्ण असोनि व्याप्तित्वा यावें । ह्मणोनि ऐसें न होवावें । तरंग माथां क्रीडावे पाणिपणें ॥ ८० ॥ पाणियाचें पाणीपण न ढळतां । तरंगामागेनि तरंगीं क्रीडतां । उणें नव्हेचि तत्वतां । तेवीं स्वरूपप्राप्तौ सिद्धता हरिभक्ति ॥ ८१ ॥ एवं तातवचन प्रमाण । यथाशक्ति दाविलें उघडून । येविषयीं संमति शिवकल्याण । देती स्वयें ॥ ८२ ॥ ‘ जेवीं आपुलें सभाग्यपण । आपणा सन्मुख होय जाण । तरी काय होय भाग्य हीन । कीं दुणावे सुख ॥ तेवीं स्वरूप प्रत्यय-मात्रचि आहे । ऐसें जरी प्रत्यया यें । तेथें स्वरूपहानि नव्हे । आणि दुणावे सुख ’ ॥ ( अ. शिवकल्याणी टीका ओवी ५७२-५७३ ) प्रत्यया आलें आत्मपणीं । साच ऐसें अंतर्गुणीं । परी अन्वयें सर्वपणीं । प्रत्यया यावें ॥ ८३ ॥ ह्मणोनि भेद नसोनियांचि ते । जें सुखचि दुणावतें । वृत्तिप्रवाहें धावतें । भक्तिधारया ॥ ८४ ॥ “ एवं नम्य आणि नमन । भज्य आणि भजन । हा भेद कांहीं नसून । प्रवाह न

खंडे ॥ उपरोधें प्रवाह खंडितां । भेदूचि दुणावे पुरता । तेथें अनुभवाची वार्ता । बोलूंचि नये " ॥ ( अमृ. शिवक० टीका, ५७४-५७५) मी ब्रह्म ऐसें ह्मणूनी । व्यतिरेकें होइजे ज्ञानी । तरी व्यक्तित्वें ब्रह्माभिमानी । ऐसे पणीं फुगोटा ॥ ८५ ॥ आपण एक ब्रह्म जाह्ले । येर ते कां व्यर्थ गेले । ब्रह्मीं असोनि गर्वे चुकविले । भेदीं पाडिले व्यक्तिपणें ॥ ८६ ॥ ह्मणोनि आपला व्यक्तिपणा पसरावा । ऐसा अन्वयो होवावा । तो प्रत्ययो आघवा । परमप्रेमें ॥ ८७ ॥ सर्व कांहीं भगवंत । परी तरंगाग्रीं श्लिष्ट वसत । ह्मणोनि क्रीडावया निश्चित । आधार कीं ॥ ८८ ॥ " आकाशें वायु केवीं सांडावा । सागरें तरंग केवीं दवडावा । तेवीं तूं आपल्या वृत्तिभावा । सांडिसी कैसा ? । ( परमामृत ) । वृत्ति तंव चितीवीण नव्हे । ह्मणोनि वृत्यग्र जें भासताहे । तें अग्रपणीं आनंदव्यक्ति लाहे । श्रीकृष्णरूपता ॥ ८९ ॥ पसरे तरी जग श्रीकृष्ण । संकोचे तरी अग्रीं कृष्णालिंगन । प्रसरण आणि संकोचन । चिदेकघनीं क्रीडनमात्र ॥ ९० ॥ किं करिष्यामि वृत्तिवानिति । अवधूतगीतेंत दत्तात्रयोक्ति । लोकवत्तु लीलाकैवल्य-मिति । श्री बादरायणोक्ति ब्रह्मसूत्र ॥ ९१ ॥ ' तस्मात् या प्रत्ययाची धरूनि सोय । नमस्कार आहे तेचि होय । भेदतम नसे सहज न राहे । प्रत्ययार्की ' ॥ ५७६ ॥ ( शिवकल्याण ) एवं सानुभव सर्वोपपत्ति । सर्व श्रौतसिद्धांतीं । तूं अच्युत ह्मणोनि निश्चिती । आवेशे चित्त ॥ ९२ माझी न होवोनि हानि । अनिर्वाच्य येईल शोभापणीं । श्रम न करितां निदिध्यासनी । साक्षात्कारें चित्त धावे ॥ ९३ ॥ चित्तनदी निघाली तेथ सिंधु । परी सिंधूंत मिळोनि चित्तनदी सिंधु ॥ होवावा ऐसा होऊं दे संबंधू । दीनबंधू दयाळा ॥ ९४ ॥ ' ऐसाही स्वामिभृत्यसंबंधा । लागी उठती श्रद्धा । तैं देवोचि तुसुधा कामविजे ' (अमृतानुभव ९-३८) या तातवचनाप्रमाणें । रुक्मिणीकृपे रुक्मिणीपणें । होऊनि केलें बोलणें । रुक्मिणीत्वाभिमानाविणे सहज ॥ ९५ ॥ इया श्रुत्युपपत्ती प्रसिद्धा । मागां बोलिल्या बहुधा । तिया साधोनि विशदा । जाणिजे प्रीति ॥ ९६ ॥ अच्युत येणें अनुभवें । आत्मज्ञानगौरवें । आणि चित्त आवेशे येणें अनुभवें । भक्ति विर-

क्ति ॥ ९७ ॥ तेवीं भुवनसुंदरादि पदें । तेंचि तें परी नवरुचिबोधें आलें अतिपरमानंदे । रसरूपची ॥ ९८ ॥ एवं हा प्रथम श्लोक । जेवीं वाङ्मय उत्तमश्लोक । रुक्मिणी कृष्ण पुण्यश्लोक । श्रोता वक्ता परम नमो ॥ ९९ ॥ चढते वाढतिये भक्ती । नाना रुचि नानादीप्ति । अनादि अनंत मुक्तस्थिति । अखंड भक्ति अनिर्वाच्य ॥ १०० ॥ 'पढियंते सदा तेची । परी भोगी नवी रुचि । ह्मणोनि हा उचितूची । अनुवादू सिद्धू ।' ( अमृ. अ. १० ओ. १३ ) एवं श्रीसद्गुरू तातवचनें । फावलें तें तेणेपणे । द्वितीयश्लोकादौ बोलणें । नवरुचिपणें जननीचे ॥ १०१ ॥ श्रोती होऊनि सावधान । रुची वाढविजे रुचित्वा येऊन । सूर्य सूर्यपणा येऊनि जाण । प्रकाश वाढवी माध्यान्ही जेवीं ॥ १०२ ॥ श्रीज्ञानेश्वर मायमाउली । निजबालका अक्षय साउली । ओविया कुसुमें गुंफोनि अर्पिली । माळा पदी प्रेमें ॥ १०३ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे श्रीभगवद्भक्ति सौरभे भक्त्याविष्कारो नाम द्वितीयः परागः ॥

---

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

॥ तृतीयः परागः ॥

श्रीगणेशायनमः । श्रीवृंदावनविहारिणे नमः ॥

जय विदर्भराजनंदिनीवरा । जय निजजनमानसचकोरचंद्रा । जय हृतजराजनिमरणतंद्रा । गुणातीता ॥१॥ जय गोपीनयनचातकजलदा । कलिमलहरणा निष्कलवरदा । सुखकर सुंदर इंदिराप्रमदा वंदारुमंदार व्रजपते ॥ २ ॥ चतुर श्रोते सावधान । भक्ति संप्रदाय संबोधन । ये श्लोकीं तेंचि शिक्षण । जननी आपण बोलत ॥ ३ ॥ स्त्रियांचें आपसांत शिकविणें । तें बहुधा असतें मित्रपणें । क्वचित प्रभुपणें । बालाविषयीं ॥ ४ ॥ आपणा घेऊनि लहानपण । पत्रिका

लिहिली ह्मणून । इतरां सकळां कारण । उपदेशू मित्रपणें ॥ ५ ॥ " कात्वां " इत्यादि पदीं । सर्व वारितील हा भरंवसा बुद्धी । आणूनि अभिप्रायसिद्धी । कीं सर्वी वरावें ॥ ६ ॥ गतिर्भर्ता या श्लोकेंकरून । ऐसें वदले राधारमण । कीं सकळा जगा कारण । मीचि कांतू ॥ ७ ॥ आणि सर्व जगाचा विराटपती । ऐशा बहुत असती श्रुती । ' वासुदेवः पुमानेकः स्त्रीरूपमितरज्जगदिति ' स्मृती । आणि आत्मपुराणीं उक्तिही एवं विध ॥ ८ ॥ ह्मणोनि सकळां होचि शिक्षा । कीं निकी साधावी माधुर्यदीक्षा । हृदयीं भगवत्समीक्षा । नित्य असावी ॥ ९ ॥ आणि आपणही मैत्रिणी । परस्पर भगवद्गुणी । परमानंदीं रमोनी । भीमकनंदिनी बोलत ॥ १० ॥

**रुक्मिण्युवाचः—** का त्वां मुकुंद महती कुलशीलरूप- ।
विद्यावयोद्रविणधामभिरात्मतुल्यं ।
धीरा पतिं कुलवती न वृणीत कन्या ।
काले नृसिंह नरलोकमनोभिरामं ॥

**टीकाः—** " न स्त्री स्वातंत्र्य मर्हति " । ऐसी मनूची उक्ती । सुं असूनि कुलयुवती । स्वतंत्र लिखिताप्रति पाठविशी ॥ ११ ॥ ऐसी शंका घेऊनि यदुपती । जरी अव्हेरिसी मजप्रती । तरी तुजवीण कृपा मूर्ती । मज कुळसंपत्ति असेना ॥ १२ ॥ तूंचि माझें कुळगोत्र । आनंद चैतन्याणुमात्र । भेद न सांपडे स्वतंत्र । दीनबंधो ॥ १३ ॥ येरव्हीं पाहतां दृष्टीं । तुझिया ऐकून सुगुण गोष्टी । कोण युवती हृदयसंपुष्टी । तुज जगजेठी न ठेवील? ॥ १४ ॥ ऐकावें श्रीमनमोहना । जी जैसी असेल गजगमना । तैसिया तुज जगजीवना । भावूनि अंगना होऊं इच्छी ॥ १५ ॥ तूं बालगोपाल व्रजपती । त्या शूद्रस्त्रिया तुज भाविती । तूं सच्चिदानंद भगवन्मूर्ती । जाणूनि शरण येती विप्रस्त्रिया ॥ १६ ॥ आपुलें मोल वेंचूनि सकळ । किती तुज घ्यावया उतावेळ । मग पाहूनियां ययातीकुळ । क्षत्रस्त्रिया न वरिती कां ? ॥ १७ ॥ एवं कुळीं तुल्य तूं यदुपती । शील पाहतां कृपामूर्ती । कोणी नाहीं तुजवरुती । तूं शीलसंपत्तिगुणोदार ॥ १८ ॥ कल्पानुकल्पीं युगानुयुगीं । पालन

शील तुझें शार्ङ्गी । दुर्जन भोगिसी प्रसंगीं । परी तेही मुक्तिचे रंगीं बैस विसी ॥ १८ ॥ कुला तुझेनि कुळ । शीला तुझेनि शीळ । तुज भजतां दु:शील । तरी होती सुशीळ गोविंदा ॥ २० ॥ प्रऱ्हादाचें दैत्यकुळ । परी प्रऱ्हादें केलें देवाहूनि प्रबळ । ऐसें सच्छिष्यहृदयपाळ । ज्ञानेश्वर तात कृपाळ वदले ॥ २१ ॥ ' पाहे पां भक्तीचेनि आथिलेपणें । दैत्यीं देवां आणिलें उणें । माझें नृसिंहत्व लेणें । जयाचिये महिमे ' ( ज्ञानेश्वरी अ. ९ ओ. ४५०) एवं तुझेंचि वचन । आतां जे नाहींत शीलसंपन्न । तेही तुज आश्रवून । सुशील वदन गान झालें ॥ २३ ॥ रामावतारीं भिल्लिणी । तुज केवळ बदरीफळें चारुनी । ब्राह्मणांसी चरणपाणी । पात्र झाली द्यावया ॥ २४ ॥ भक्तमालेंत ही कथा । नाभाजीनें वर्णिली तत्वतां । प्रिया दासांची टीका पाहतां । कळेल सकळ ॥ २५ ॥ आणि स्वर्गींचे शब्द ऐकून । नाभाजीनें लिहिली ह्मणून । भक्तमाल अप्रमाण । ऐसें कोणी न ह्मणावें ॥ २६ ॥ व्रजस्त्रिया यदुनंदना । तुझिया भजनें नारायणा । योग्य जाहल्या परमगुणा । उद्धवादि चरणा वादिती ॥ २७ ॥

संमतिश्लोक.

वंदे नंदव्रजस्त्रीणां पादरेणुमभीक्ष्णशः ।
यासां हरिकथोद्गीतं पुनाति भुवनत्रयं ॥
( भा० स्कं० १० पू० )

हा उद्धवमुखींचा श्लोक । चरणरजांसी सम्यक । वारंवार मस्तक । लगटूं इच्छी ॥ २८ ॥ ऐसी गोपिकांची ख्याती । जयांचिया गीतीं । तूं गाइला जगत्पती । तें गीत पुनाति भुवनत्रय ॥ २९ ॥ एवं कुळ रहिता तुझेनि कुळ । शीळ रहिता तुझेनि शीळ । तूं नंदनंदन घननीळ । जाश्वनीळ स्मरे तुज ॥ ३० ॥ तुझी संपत्ति हृषीकेशी । रमा झाली चरणदासी । श्रिये ऐशा जियेपाशीं । पाइका असती ॥ ३१ ॥ " नातरी आथिलेपणें सरिशी । कवणी आहे लक्ष्मीये ऐसी । श्रियेसारखिया दासी । घरीं जियेते ॥ ३२ ॥ तिया खेळतां करिती घरकुळी । तयां नामें अमरपुरें जरी ठेविली । तरी न होती काय बाहुलीं । इंद्रादिक तयांचीं ? ॥ ३३ ॥ तिया नावडोनि

जेव्हां मोडती । तेव्हां महेंद्राचे रंक होती । तिया जिया झाडाकडे पाहती । ते कल्पवृक्ष ॥ ३४ ॥ ऐसिया जियेचिया जवळिका । साम-र्थ्यं घरीचिया पाइका । ते लक्ष्मी मुख्य नायिका । न मनेचि येथ ॥ ३५ ॥ मग सर्वस्वें करून सेवा । अभिमान सांडोनि पांडवा । ते पाय धुवायाचिया दैवा । पात्र जाहलीं " ॥ ३६ ॥ ( ज्ञा. अ. ९ ओ० ३७३ ते ३७७) विद्ये तुझी बरोबरी । कोण करी पूतनारी । तूं सकळ गुरूंचाही निर्धारी । गुरू असती ।३७। तूं निरतिशय सर्वज्ञ । परी जगा निमित्तोपादान । यालागीं अनंतही आपण । तूंचि एक ॥ ३८ ॥ तूं निमित्त सर्वज्ञ जरी असतां । तरी दोष येता अंतवत्ता । आणि निमित्त अनंत असता । तरी असर्वज्ञता येता दोषू ॥ ३९ ॥ केवळ असता उपादान । तरीही असर्वज्ञताचि येती दारुण । यालागीं निमि-त्त आणि उपादान । उभय कारण तूंचि एक ॥ ४० ॥ ह्मणोनि विद्या आणि वयसे । कोणी तुळेना तुज ऐसें । जिया विद्यागत वेदवाक्यैकांशें । अनाद्यविद्यापिसें हरपे ॥ ४१ ॥ " पाहे पां जाणिवेचेनि बळें । कोणी वेदापासूनि असे आगळें । कीं शेषाहूनि तोंडाळें । बोलकें आथी ? ॥ ४२ ॥ तोही आंथरूणातळवटी दडे । येरू नेति ह्मणोनि बहुडे । येथ सनकादिक वेडे । पिसे जाहले ॥ ४३ ॥ करितां तापसांची कडसणी । कवण जवळां ठेविजे शूळपाणी । तोही अभिमान सांडूनि पायवणी । माथां वाहे " ( ज्ञा. अ. ९ ओ. ३७०-३७२ ) तुझिया रूपा मनमोहना । कवण न भाळे हंसगमना । विसरोनी आपुलेपणा । तुज आलिंगनां धांवले मुनी ॥ ४५ ॥ मग त्वां तयांसी दिधले वचन । कीं कृष्णावतारीं गोपिका होऊन । मज करावें आलिंगन । कृष्णोपनिषत्प्रमाण येविषयीं ॥ ४६ ॥

श्रुतिः— " हरिः ॐ श्रीमहाविष्णुं सच्चिदानंदलक्षणं । रामचंद्रं दृष्ट्वा सर्वांग सुंदरं मुनयो वनवासिनो विस्मिता बभूवुः । तं होचुर्नोऽवद्यमवतारान्वै गण्यन्ते आलिंगामो भवंतमिति । भवांतरे कृष्णावतारे यूयं गोपिका भूत्वा मामालिंगथ ।

ओवीः— तुझें कपटरूप पाहोनी । स्वयें भुलला शूळपाणी ।

तुझिया रूपाचा छंद ह्मणूनी । लोळत श्मशानीं आनंदें ॥ ४७ ॥ एवं दैविकी ऐसी गती ।भस्मासुर विसरूनि आपणाप्रती । तुझिया कपट- रूपें श्रीपती । भस्म निश्चितीं जाहला ॥ ४८ ॥ तो तूं मोहिनी अवतार । जाहलासी अंशमात्र । आणि कृष्णरूपें तंव साचार । पूर्ण आहासी ॥ ४९ ॥ मग तुझिया रूपा वनमाळी । तुळावया कवणा तुळीं । रति- कांताची रूपता आगळी । परी तोही बाळ पोटींचा ॥ ५० ॥ तुझें सामर्थ्य नारायणा । कवणा करवेल गणना ? । येथ उपमा देतांचि जाणा । होईल वल्गना कांहीं तरी ॥ ५१ ॥ एवं कुळ शीळ विद्या द्रव्य रूपसा । ऐश्वर्य आणि वयसा । जगज्जीवना तुज ऐसा । तूंचि एक ॥ ५२ ॥ जीवांचा काढोनि वाच्यांश । तुजसी तुळावा लक्ष्यांश । हें साच परी तोही विशेष । प्रभाव तव वेदवाक्याचा ॥ ५३ ॥ ह्मणूनि तूं निरूपम । नरलोकमनोभिराम । ह्मणजे प्रेमास्पद परम । आत्माराम अक्षय ॥ ५४ ॥ तूं मोक्षदाता मनमोहन । यालागीं मुकुंद नामाधि- धान । नरामाजीं पंचानन । नृसिंह ह्मणून तूं एक ॥ ५५ ॥ नर ही तुझा शिष्य अनंता । निवविला बोधूनि गीता । तूं सिंहमुखें दुष्ट भक्षिता । भक्तां रक्षिता नररूप ॥ ५६ ॥ तूं नरलोक मनोभिराम । आत्मरूपें असती परम । परी सगुणरूपें नरलोक मनोभिराम । येथ श्रुत्युद्यम साक्ष असे ॥ ५७ ॥ वीतराग महामुनी । तेही इच्छिती आलिंगनीं । एवं मनुष्य असूनि तुज लागुनी । शार्ङ्गपाणी वरूं पाहती ॥ ५८ ॥ मग ऐसी कवण आहे कामिनी । जी फुगेली राहील मोठेपणीं । नाना तपें आचरोनी । तुज विवाहसमयीं न वरील ? ॥ ५९ ॥ जयासी तूं आडळसी जेथ । तेचि लपत्रूं पाहती तेथ । एक स्वतः अनंत । ह्मणूनि दिससी पुढत पुढती ॥ ६० ॥ तुज ऐसा एखादा असता । तरी तो कोठें केव्हांचि लपता । परी तुझा महिमा भगवंता । हृदयीं लपूनि तत्वतां प्रकट दिससी ॥ ६१ ॥ "येथ जाणीव करी तोचि नेणे । आथिलेपण मिरवी तेंचि उणें । आह्मी जाहलों ऐसें जो ह्मणें । तो कांहींच नव्हे " ॥ ६२ ॥

**टीका**:—जाणिवपणें प्राप्त व्यष्टि । आथिलेपणें अहंता गांठी । पूर्णता अभिमानें शेवटीं । रसास्वाद विघ्न उठे ॥ ६३ ॥ ' अथवा

यज्ञदानादि किरीटी । कां तपें हन जे हुटहुटी । ते तृणा एकासाठीं । न सरे येथ ' ॥ ६४ ॥

**टीका**:—नास्त्यकृतः कृतेन । ऐसें श्रुतीचें वचन । या लागीं यज्ञ-दानादिकीं जगज्जीवन । तूं आपण अगम्य ॥ ६५ ॥ ' ह्मणोनि थोर-पण पऱ्हां सांडिजे । येथ व्युत्पत्ती आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ' ॥ ६४ ॥

**टीका**:—नास्त्यकृतः कृतेन । ऐसें श्रुतीचें वचन । या लागीं यज्ञ दानादिकीं जगज्जीवन । तूं आपण अगम्य ॥ ६५ ॥ " ह्मणोनि थोरपण पऱ्हां सांडिजे । येथ व्युत्पत्ती आघवी विसरिजे । जैं जगा धाकुटें होइजे । तैं जवळीक माझी ' ॥ ६६ ॥

**टीका**:—पर्वता आहे थोरपण । तरी घटामाजीं न शिरवे जाण । आणि आकाशातें सूक्ष्मपण । या लागीं सर्वत्र सर्वी राहे ॥ ६७ ॥ तैसे जगाहूनि वरिष्ठ जाहले । ते विराडादि अंतर्यामित्वा न आले । माझें सूक्ष्मत्व वहिलें । अंतर्यामी ह्मटलें ह्मणोनि मज ॥ ६८ ॥ एवं जगा धाकुटें होवावें । थोरपण रसास्वाद सांडावे। ज्ञानाऽहंता व्युत्पत्ति-तें त्यजावें । मग सानचि परी होवावें मज एवढें ॥ ६९ ॥ ' अगा सहस्त्रकिरणाचिये दिठी । पुढां चंद्रही लोपे किरीटी । तेथ खद्योत कां हुटहुटी । आपुलेंनि तेजें ? ' ॥ ७० ॥ तैसें लक्ष्मियेचें थोरपण न सरे । जेथ शंभूचेंही तप न पुरे । तेथ येर प्राकृत हेंदरें । केंवि जाणों लाहे ? ॥ ७१ ॥ यालागीं शरीर सांडोवा कीजे । सकळ गुणांचें लोण उतरिजे । संपत्तिमद सांडिजे । कुरवंडी करूनी ' ॥ ७२ ॥ ( ३७९ ते ८१ )

**टीका**:—एवं तातांचें स्थळीं स्थळीं वचन । तें तुझेंचि आहे ह्मणोन । तुज सानन्य दीन । होआवें सकळीं ॥ ७३ ॥ हें गळींचि जरी आलें । तरी दोष मज कां लागलें। ह्मणोनि मियां लिहिलें । नेणतेपणें ॥ ७४ ॥ तूं नरलोकमनोभिराम परेशा । ह्मणोनि तिहीं घेयावी माधुर्यदीक्षा । मग कामिनी तंव मधुरप्रिय धीरेशा । तिहीं माधूर्यदीक्षा कां न घ्यावी? ॥ ७५ ॥ तूंचि बोलिलासी वचन । तेंचि येथें परम प्रमाण । तुझीचि आज्ञा पाळून । लिखित सुज्ञाण लिहिलें म्यां ॥ ७६ ॥

॥ श्लोक ॥ "मांहि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्" ॥
भगवद्गीता.

या तंव वचनाचा अर्थ । स्पष्ट वदती तात । तोही परम प्रमाण येथ । ह्मणोनि लिखित युक्तचि ॥ ७७ ॥

ज्ञानेश्वरीः– 'अगा नांवें घेतां ओखटीं । जे आघविया अधमाचिये शेवटीं । तिये पापयोनीही किरीटी । जन्मले जे ॥ ७८ ॥ ते पापयोनि मूढ । मूर्ख जैसे कां दगड । परि माझ्याठायीं दृढ । सर्वभावें ॥ ७९ ॥ जयांचिये वाचे माझे आलाप । दृष्टी भोगी माझेंचि रूप । जयांचें मन संकल्प । माझाचि वाहे ॥ ८० ॥ माझिया कीर्तीविण । जयांचे रिते नाहीं श्रवण । जयां सर्वांगीं भूषण । माझी सेवा ॥ ८१ ॥ जयांचें ज्ञान विषो नेणें । जाणीव मज एकातेंचि जाणें । जयां ऐसे लाभे तरी जिणें । येऱ्हवीं मरण ॥ ८२ ॥ ऐसा आघवाचि परी पांडवा । जिहीं आपुलिया सर्वभावा । जियावयालागीं ओलावा । मीचि केला ॥ ८३ ॥ ते पापयोनीही होतु कां । ते श्रुताधीतही न होतु कां । परि मजसीं तुकितां तुका । तुटी नाहीं ॥ ८४ ॥ तो प्रऱ्हाद गा मजसाठीं । घेतां बहुतें सदा किरीटी । कां जें मियां द्यावें ते गोष्टी । तयाचिया जोडे ॥ ८५ ॥ येऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें। परि इंद्रही सरी न लाहे उपरें। ह्मणोनि भक्ति गा येथ सरे । जाति अप्रमाण ॥ ८६ ॥ राजाज्ञेचीं अक्षरें आहाती । तियें चामा एका जया पडती । तया चामासाठीं जोडती सकळ वस्तु ॥ ८७ ॥ वांचूनि सोनें रुपें प्रमाण नोहे । एथ राजाज्ञाची समर्थ आहे । तेंचि चाम एक जैं लाहे । तेणें विकती आघवीं ॥ ८८ ॥ तैसें उत्तमत्व तैंचि तरे । तैंचि सर्वज्ञता सरे । जैं मनोबुद्धि भरे । माझेनि प्रेमें ॥ ८९ ॥ ह्मणोनि कुळ जाति वर्ण । हें आघवेंचि गा अकारण । एथ अर्जुना माझेंपण सार्थक एक ॥ ९० ॥ तेंचि भलतेणें भावें । मन मजआंतु येतें होआवें । आलें तरी आघवें । मागील वावो ॥ ९१ ॥ जैसें तंवचि वहाळ वोहळ । जंव न पवती गंगाजळ । मग होऊनि ठाकती केवळ । गंगारूप ॥ ९२ ॥ कां खैर चंदन काष्ठें । हे विवंचना तंवचि घटे । जंव न घापती एकवटे । अग्नि-

माझा ॥ ९३ ॥ तैसे क्षत्रिय वैश्य स्त्रिया । कां शूद्र अंत्यजादि इया । जाती तंवचि वेगळलिया । जंव न पवती मातें ' ॥ ९४ ॥

टीका:—ह्मणोनि माते अधिकारू । तुज लिहावया साचारू । आणि ऐसाचि माधुर्यदीक्षाप्रकारू । चालावयास्तव द्योतन अन्यांचें ॥ ९५ ॥ तूं आपुलिया भक्ता । ह्मणसी माझी कांता । ये विषयीं प्रमाण तत्वतां । तातवचन ॥ ९६ ॥ 'येऱ्हवीं तरी माझिया भक्तां । आणि संसाराची चिंता । काय समर्थाची कांता । कोरान्न मागे । ॥ ९७ ॥ तैसे ते माझे । कलत्र हें जाणिजे । कायिसेनिही न लाजे । तयाचेनि मी ॥ ९८ ॥ अर्जुना तो भक्त । तोचि योगी तो चि मुक्त । तो वल्लभा मी कांत । ऐसा पढिये ' ॥ ९९ ॥

टीका:— एवं प्रमाणबळेंकरून । नारीनरां तूंचि रमण । ह्मणून माधुर्यभक्ति पूर्ण । सज्ञान संप्रज्ञान नित्य घडो ॥ १०० ॥ ऐसें जंव प्रभू आहे । तरी मजही सत्संगती लाहे । आणि वर तुझा भरंवसा पाहे। ह्मणोनि लिहिलें लिखित ॥ १ ॥ तरी तुवां येउनी । मज स्वसदना नेउनी । माधुर्यभक्ति अनंतगुणी । संप्रदायीं वाढविजे ॥ २ ॥ ज्ञानेश्वर तुकारामादि संत । विराण्या बोलले बहुत । माधुर्यादिसंप्रदाय त्यांत । व्यक्त श्रोतीं पहावा ॥ ३ ॥

॥ अभंग ॥ ( ज्ञानेश्वर. )

याति कूळ माझें गेलें हारपोनी । श्रीरंगावांचोनी आनू नेणे॥ १ ॥ किती वो शिकवाल मज वेळोवेळां । मी तंव गोवळा रातलीये ॥ २ ॥ अष्टभोग भोगितां मातें नाहीं चाड । भक्तिप्रेम गोड लेयिलें गे माय ।३। बाप रुखमादेवीवरू जिवींचा जिव्हाळा । कांहीं केलिया वेगळा नव्हे गे माय ॥ ४ ॥

॥ अभंग ॥ ( तुकाराम. )

हाचि नेम आतां न फिरे माघारी । बैसलें शेजारी गोविंदाच्या ।१। घर रिघोनियां पट्टराणी जालें । वरिलें सावळें परब्रह्म ॥ २ ॥ बळीयाचा अंगसंग झाला आतां । नाहीं भय चिंता तुका ह्मणे ॥ ३ ॥

॥ २ ॥

न देखें न बोलें नाइकें आणीक । बैसला हा एक हरि चित्तीं ॥१॥
सासुरें माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्हीं मिळोनियां ॥ २ ॥
आळ आला होता आह्मी भांडखोरी । तुका ह्मणे खरी केली मात । ३ ।

ओव्याः—तो संप्रदाय येथवरी । पुढें पुढें चालवुनी श्रोतीं चतुरी । अखंड हृदयीं श्रीहरी । सुखावतार धरी तें कीजे ॥ ४ ॥ कुळ रूप देहाभिमान । तो जाये केलिया नमन । द्रव्यादि ममतास्पद जाण । तें दास्यत्वें अर्पण केलिया जाय ॥ ५ ॥ विद्या ती वागहंता । हरपे हरिनाम स्मरतां । शीळ ती मानसाऽहंता । हरी ध्यातां विनष्ट ॥ ६ ॥ सामर्थ्य तो तपोभिमान । हरिसख्यें जाय झडून । कारितां आत्मनिवेदन । सर्वाभिमान हारपे ॥ ७ ॥ ऐसा 'त्वंपद' वाच्यांश आटे । तैं हरी आपण तुल्यत्वें भेटे । तथापि ब्रह्माऽहं वाचारूण उठे । तें नाशावया गोमटें पतित्वें भजन ॥ ८ ॥ सुरतसुखीं अद्वैत । समान दोघांचा पुरुषार्थ । किंचित् जरी भासेल द्वैत । तरी अनन्यसेवा सुटेना ॥ ९ ॥ द्वैत तरी निराभिमान सुख । अद्वैत तरी स्वातंत्र्य सम्यक । समानत्वें सर्व सुख । कदा असुख न सांपडे ॥ ११० ॥ हें माधुर्यभक्तिरहस्य होय । साधोनि ऐसा संप्रदाय । पुढती आपुलाही नित्य प्रेमझरा वाहे । तो उल्हास पाहे तृतीयश्लोकादौ ॥ ११ ॥ ह्मणाल पूर्ण जालिया पत्र । स्थापावा होता संप्रदाय पवित्र । तरी याचें उत्तर । ऐसें आहे ॥ १२ ॥ नदी जाये सिंधु मिळणी । तैंचि स्नान नदिया जाय घेउनी । कां सिंधूची एक गति ह्मणुनी । आवडीनें ॥ १३ ॥ पुढें सिंधूहूनि नाहीं निघणें । यालागीं मिळेल तें सिंधूंत आतांचि नेणें । आपण अशक्तही परी दुसरिया देणें । हात दुःखीं ॥ १४ ॥ हें परम औदार्याचें लक्षण । जेवीं घडे नदीकडून । तेवीं पत्रिका लिहितां रुक्मिण । संप्रदाय स्थापन द्वितीयश्लोकीं ॥ १५ ॥ आपण मिळतां श्रीकृष्णीं । द्यावें इतरांही मिळवुनी । यालागीं संप्रदाय बोलणीं । द्वितीयश्लोकीं ॥ १६ ॥ सिंधूंत गेलियाही नदी पुरती । पुन्हां नूतन मध्यें ओघ भेटती । तरी तेही नदीस मिळोनि जाती । समुद्रीं जैसें

॥ १७ ॥ तेवीं बहुत रुक्मिणी-जान्हवी-नदी । संगें मिळाल्या कृष्ण सुधाब्धीं । परी आतांही जिया निर्मळ बुद्धी । तिया पत्रिकानदी मिळोनि जाती ॥ १८ ॥ एवं सह मिळालिया नद्यन्वयें । मुळीं ओघाचें खंडन नोहे । तेवीं स्थापोनि संप्रदाये । ओघ माधुर्यें पुढें चाले ॥ १९ ॥ ते श्रीजननीची व्युत्पत्ती । पुढें परिसावी संत श्रोतीं । जे ऐकतांचि तनुमन चित्तीं । आत्मीय माधुर्यभक्ति स्थापी ॥ २० ॥ श्रीज्ञानेश्वर तात जननीं । ओवियां कमलमाळ गुंफोनी । सप्रेमें वाहिलीं चरणीं । रिघालें नमनीं अद्वैतपणें ॥ १२१ ॥

हरि: ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे श्रीभगवद्भक्तिसौरभे माधुर्यप्रेमानुसंप्रदायो नाम तृतीयः परागः ॥

---

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

## ॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## ॥ चतुर्थः परागः ॥

॥ श्लोक ॥ तन्मे भवान्खलु वृतः पतिरंग जाया
मात्मार्पितश्च भवतोऽत्र विभो विधेहि ।
मा वीरभागमभिमर्शतु चैद्यआरात्
गोमायुवन्मृगपतेर्बलिमंबुजाक्ष ॥ १ ॥

ओव्या:—जयजय सद्गुरू करुणाघना । आळंदीपते कल्याणनिधाना । पुढें चालवी ग्रंथरचना । सच्चित्पूर्णा सुखमूर्ते ॥ १ ॥ पूर्वसौरभीं निरूपण । जगन्मातेचें गूढवचन । कीं तूं सकळांचाचि पती म्हणून । अधिकार जाण मधुरभक्ती ॥ २ ॥ कां पतिसेवा करूनि पतिव्रता । ज्या ज्या जाती मोक्षपथा । त्याही तुझीच भावना करूनि अनंता । सिद्धसिद्धांता पावती ॥ ३ ॥ एवं ब्राह्मणादि करिती कर्म । त्याचा साक्षी तूं पुरुषोत्तम । याचिलागीं फळधर्म । मिळे प्रभो ॥ ४ ॥ म्हणूनि भगवंता तुझे ठायीं । जंव दृढ चित्त नाहीं । तंव वायां केला सकळही । कर्मधर्म

॥ ५ ॥ जरी जाहली उत्तम कांता । न जाणे पतीच्या मनोगता । तरी ते सद्गुणी असोनी तत्वतां । उपयोगी नये ॥ ६ ॥ तैसा धर्मनिष्ठ तपःसंपन्न । जंव नाठवी तुझे चरण । तंव तें मायाजाळ पूर्ण । जना कारण जाणे गर्वा ॥ ७ ॥

**संमतिश्लोक.**

'धर्मः स्वनुष्ठितः पुंसां विष्वक्सेनकथासु यः ॥
नोत्पादयेद्यदि रतिं श्रम एवहि केवलम्' ॥ ( भा. २ स्कं. )

जैसे करोनी नानाकष्ट । धन संपादावें अति उद्भट । आणि घरीं येवोनी पाहतां अवचट । तंव अन्न उत्तम मिळेना ॥ ८ ॥ तैसे यज्ञ दान तपें । आचरलियाही अमूपें । तुझिया चरणीं न निक्षेपें । प्रेम जंव ॥ ९ ॥ तंव तो धर्म तें कर्म सकळ । तें व्रत तो यज्ञ प्रबळ । जळोनि जावो क्षणेंचि केवळ । जंव तूं घननीळ हृदिं नाहीं ॥ १० ॥ नवमास पाळोनी उदरीं । मृतबाळ निघावें तयापरी । तुझिया भक्ती वांचोनि हरी । धर्म निर्धारीं वांझ निपजे ॥ ११ ॥ तुझे चरण नारायणा । अशुद्धां आणिती शुद्धपणा । तुज वांचोनि मनमोहना । कवण अंगना पति इच्छी ॥ १२ ॥ ह्मणोनी मी भीमकबाळा । तुज वरो इच्छी त्रिभुवनपाळा । तूं येवोनी प्रेमळ स्नेहाळा । मज घेवोनी जाई पराक्रमें ॥ १३ ॥ ह्मणसी तूं अससी भीष्मक नगरीं । मी आहे द्वारकेभीतरीं । तेथोनी येईल तंववरी । घेवोनी जातील खळ तुज ॥ १४ ॥ तरी हे करुणाकरा निष्कलंका । ऐसी तंव मनीं नको शंका । तूं सकळांचिया हृदयीं आवांका । वसोनी चित्सुखा राहसी ॥ १५ ॥ तूंचि आपुल्या मुखें करोन । स्वयें बोलिलासि वचन । कीं सर्वांच्या हृदयीं मीचि आपण । राहोनि आठवण देतसों ॥ १६ ॥

श्लोकः– 'सर्वस्य चाहं हृदि संन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनंच
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदांतकृद्वेदविदेव चाहम्' ॥ १ ॥

तूं बोलिलासि देवाधिदेवा । मी सर्वांच्या हृदयीं पांडवा । जाणणें नेणणें स्मरणें अनुभवा । मजपासोनि येतसे ॥ १७ ॥ जाणणें जागृतींत मुख्य जाण । तें कळे मी साक्षी ह्मणोन । घट जाणला हा प्रत्ययपूर्ण ।

घटज्ञानासहित मी जाणें ॥ १८ ॥ स्वप्नामाजी अंतःकरण। पूर्वींचे संस्कार घेवोन । जें नानाविकारीं उत्पन्न । त्या विकारांसहित मन मी जाणे ॥ १९ ॥ नसतां स्वप्न नसतां जागृती । गाढ निद्रा लागे सुषुप्तीं । त्या सुषुप्तीमाजीं सुखाची ख्याती । मी श्रीपती ओळखतां ॥ २० ॥ वेद वेदांत उत्पन्नकर्त्ता । मी एक परमात्मा तत्वता। ऐसें अर्जुनाप्रती अनंता । श्रीभगवंता वदलासि तूं ॥ २१ ॥ एवं तुझेंचि वचन प्रमाण । जरी मानलें संपूर्ण । तरी माझ्याचि हृदयीं तूं नाहींस हें चिंतन । केवीं कीजे? ॥ २२ ॥ ह्मणोनी प्रभू माझिया ठायीं । तूं आयता अससी शेषशायी । मग मी बोलावितांचि लवलाही । प्रगट होणें मात्र असे ॥ २३ ॥ अथवा 'तत्' या शब्दें करून । तूं तत्पद लक्ष्य मनमोहन । आणि मुळीं 'आत्मार्पित' या पदें करून । त्वंपद तत्पदीं मेळवी ॥ २४ ॥ 'खलु' या अव्ययाचा अर्थ । निश्चयरूप वदती समर्थ । निश्चयवक्ता बुद्धिस्थित । आणि बुद्धि अपेक्षां आत्मज्ञानीं ॥ २५ ॥ ब्रह्मबोधीं न फलव्याप्ती । तथापि आहे वृत्तिव्याप्ती । यालागीं आत्मा जाणावया निश्चिती । शुद्धबुद्धी श्रीपती योग्य होय ॥ २६ ॥ इन्द्रेन्द्राणी संगम । सुषुप्तीमाजीं होय परम । ह्मणजे आत्मा आणि बुद्धिसंगम । श्रुत्यर्थ परम हा असे ॥ २७ ॥ परी सुषुप्तींमाजीं अज्ञान भारी । तेथ बुद्धी असे कुमारी । आणि तूं आत्मा तंव ब्रह्मचारी । ह्मणोनी संग निर्धारी योग्य नव्हे ॥ २८ ॥ तेचि ज्ञानमंत्रसंस्कारें करून । समाधींत आत्मा-बुद्धीचें लग्न । तेधवां तत्पदलक्ष्यांश जाण । बुद्धीचि होय ॥ २९ ॥ येथवरी योग साधलिया । मग वेदांतज्ञान जें करुणालया । तेणें अहं-कार नाशोनियां । आत्मार्पण सहज होय ॥ ३० ॥ मग समाधीं व्यु-त्थानीं दोहो पक्षीं । तूं परमात्मा सर्व साक्षी । एवं लक्ष्यपक्षें सन्निध लक्षी । मी अपरोक्षी प्रभु तुज ॥ ३१ ॥ ह्मणोनि द्वारकेहूनि यावें । मग मज त्वां उचलोनि न्यावें। हें कुडें प्रेम आघवें । मज चित्तीं नाहीं ॥ ३२ ॥ तूं जवळीं नसतासि यदुपती । मग जगीं मज खळ नेती । तरी त्याची न वाटती खंती । परी तूं हृदयीं असोनी हे श्रीपती योग्य नव्हे । ३३ । द्वारकेमाजीं जो तूं अससी । तोचि माझ्या चित्तीं वससी । ह्मणोनी विभु संज्ञा तुजसी शोभतसे ॥ ३४ ॥ तुज वांचोनि दीनदयाळा । अन्य

विभू न यशुमतिबाळा । कारण अनेक विभू मानलियाचि वेळां । अवघा परिच्छेद गोळा होय ॥ ३५ ॥ मग ईश्वर न्यून जीव न्यून । दोघांचीही शक्ती न्यून । आणि वासनामात्र मिळावी पूर्ण । हें आश्चर्य गहन मूढबुद्धी ॥ ३६ ॥ ह्मणोनी माझा निश्चय एक । तूंचि प्रभू सर्व व्यापक । यालागीं माझी ऐकूनि हाक । धांव कार्य सकाळिक सांडोनी । ३७ आतां तूं ह्मणशील आपुल्या मनीं । त्वां पत्र लिहिलें लज्जा सांडोनी । हाही शंका मोक्षदानी । आपण मनीं घेऊं नये ॥ ३८ ॥ मी लाजावें तरी कवणा । आत्मया कीं अनात्मया श्रीकृष्णा । अनात्मया लाजावें तंव तो जाणा । नाहींचि नाहीं ॥ ३९ ॥ आत्मया लाजावें कृपामूर्ती । तंव मी काय अनात्मा होय श्रीपती । इतुकेंही करोनी मजप्रती । लज्जा कोणती सांगते ॥ ४० ॥ लज्जेनें अहंकार नम्र होय । तो ब्रह्मीं मिळोनियां जाय । ऐसी लज्जेची सांपडे सोय । तैं तुझे पाय आवश्यक । ४१ । ह्मणोनी तुज जगत्पती । मी मानिला आपुला पती । तरी साक्षित्वें राहोनि श्रीपती । सामान्य चेतनत्वें येथ मति द्यावी ॥ ४२ ॥ पत्रादिलेखनें करोनी पाहतां । तुज मिळवाया प्रयत्न मीचि करितें अनंता । परी अधिष्ठान सामान्यचैतन्यत्वें भगवंता । वृत्तिरूपा मज स्फूर्ति सत्ता त्वां द्यावी ॥ ४३ ॥ एवं तूं येथ यावें या वचनेंकरून । सामान्यचैतन्यत्वें तूं करी सत्ताप्रदान । मी आत्मा अर्पिला या वचनेंकरून । चैतन्यज्ञान शुद्ध असे ॥ ४४ ॥ आतां ' पतिरंगजाया ' यावचनें निश्चिती । साकारपरमानंदप्राप्ती । एवं मिळोनिया ज्ञान भक्ति । सच्चिदानंद स्थिती जगज्जननी ॥ ४५ ॥ जैसें चंचल नारीचें मन । पतीहूनि उडे क्षणक्षण । तैसें पावोनी ब्रह्मज्ञान । विषयार्थ मन प्रपंचीं धावें ॥ ४६ ॥ जळो तें ज्ञान ती जळो विरक्ती । जळो वटवटमय मुक्ती । तैसी नाहीं तुझी भक्ती । जे व्युत्थानींही स्वरूपस्थिती विसरेना । ॥ ४७ ॥ तंव तूं हें एक करी । तुझी सत्ता असो श्रीहरी । मी आत्मा अर्पिला तव चरणांवरी । ह्मणोनी अज्ञान मम गेलें ॥ ४८ ॥ आतां तुजचि केलें पती । यालागीं साधिली आहे भक्ती । परी मज चिंता एक निश्चिती । जे व्हाया सगुण श्रीपती तूं जतन ॥ ४९ ॥ तेथ ऐसें पहावें करुणाघना । स्वयंपाकीं गुंतलिया अंगना । तंव बाळ सांभाळा-

वया जाणा । पुरुषा लाज कांहीं नसे ॥ ५० ॥ कीं बाळ सांभाळिते- क्षणीं । पाक न कर्म्ं शके कामिनी । तैसें जाहलें माझे मनीं । तें चक्रपाणी ऐकावें ॥ ५१ ॥ मी जरी आत्माकार ठेविते वृत्ती । तंव तुझी सेवा इंद्रियें न करिती । आणि इंद्रियांवरी जैं आणिते वृत्ती । तैं तुझी विस्मृती होऊं पाहे ॥ ५२ ॥ ह्मणोनी ज्ञान जाहलिया वरी । कोणताही यत्न जरी । ज्ञानामाजी प्रतिबंध करी । हें मी निर्धारीं जा- णतसे ॥ ५३ ॥ ज्ञान जों पर्यंत झालें नाहीं । यत्न तोंवरी सफळचि पाही । परी ज्ञान झालियाचि लवलाही । मग यत्न उपजवी अज्ञान ॥ ५४ ॥ आत्मा अकर्त्ता सांगे ज्ञान । यत्न उपजवी कर्तृपण । या- लागीं कैसें रक्षावें ज्ञान । हें तव कृपेवीण आकळेना ॥ ५५ ॥ रत्न सांपडलें आंधळिया । तो घेवोनी गेला विकावया । तरी कांहीं पैका घेवोनियां । गार समजोनी विके जेवीं ॥ ५६ ॥ तेवीं वेदांतबोल कोरडे । आणि विषयसुखास्तव पायां पडे । ते मुक्ति नोहे नरकवाडे । यम- गृहींचे ॥ ५७ ॥ ह्मणोनी मज कळलें कळलें अनंता । ज्ञान झालिया- वरी भगवंता । इंद्रियपण तुज निःशेष समर्पितां । तरी तूंचि रक्षिता मग होसी ॥ ५८ ॥ " योगी इंद्रियें कोंडिती । ते कोंडितांचि कष्टी होती । भक्त भगवंतीं अर्पिती । तेणें ते होती नित्यमुक्त " ॥ ५९ ॥ ( एक० भागवत. ) ऐसें श्रीएकनाथवचन । आणि तूंही बोलसी आपण । जें माझ्या भक्तीवीण योग ज्ञान । तेथ पुनरुत्थान सोडींना ॥ ६० ॥

॥ श्लोक ॥ " युंजनानामभक्तनां प्राणायामादिभिर्मनः ।
अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम् " ॥

श्रीमद्भागवत.

पाहे पाहे भक्तीवीण । योगियांचें चाळकपण । तें तयां कैसें आपण । बाधूं शके ॥ ६१ ॥ केवळ पतीवरी ठेवोनि प्रीती । पतिव्रता जाती सती । आणि जे योगी ह्मणविती । ते प्राण घाबरेल म्हणोनी करिती नियमित प्रणायाम ॥ ६२ ॥ शरीराची धरिती प्रीती । मग नियमित प्राणायाम करिती । नातरी हृदय फुटेल निश्चिती । ऐसी भीती अंतरीं ॥ ६३ ॥ हें त्यांच्या न कळे मनीं । कीं भगवंत भरतां अंतःकर- णीं । मग मरण येईल ज्या क्षणीं । मुक्ती त्याचिक्षणीं चरणीं लोळे

॥ ६४ ॥ जवळीचें वित्त लोपोनी । भिक्षा मागती सदन सदनीं । तुझे पाय विसरोनी । योगी यत्नें कष्टी होती ॥ ६५ ॥ देवा तुझा प्रेमबाण लागतां । तरी पंचकोश भेदोनी तत्त्वतां । एक्याचि क्षणीं तव समता । प्राप्त होय ॥ ६६ ॥ ते शतशत वर्षे साधोनी समाधि । योगी येती व्युत्थानावधी । आणखी हास्यास्पद प्रसिद्धी । योगियांची ॥ ६७ ॥ देवा हातपाय हालवितां । तुझीच सेवा घडे भक्तां । गंगेतूनि जळ आणिती तत्वतां । तुझिया मंगळ स्नानास्तव ॥ ६८ ॥ तुजसाठीं उगाळूनि चंदन । हाताचें सार्थक करिती पूर्ण । तें न करोनी योगीजन । इन्द्रियें कोंडोन कष्टी होती ॥ ६९ ॥ मग प्रेत मोटकळी वळे । तैसे आंत घालिती बुबुळें । आणि हृदयींचे जे ज्ञानडोळे । ते बाहेर घालिती देहगर्वे ॥ ७० ॥ प्राणायाम करोनी मन रोधिती । आणि मग मीचि योगी ऐसें ह्मणती । मन सोडोनि जाय देहाप्रति । परी योगीपणाभिमान निश्चिती देहीं राहे ॥ ७१ ॥ भक्तमालेंत ऐसी कथा । कीं तूं मथुरे गेला हें ऐकतां । एक प्रेमवश बाळा तत्वतां । असुस्वार्थी त्यजिति झाली ॥ ७२ ॥ पतीनें रोधितां यज्ञपत्नी । ते मृत्यु पावली प्राण त्यजुनी । एवं तुझा प्रेम भरतां अंतःकरणीं । तरी अक्षय तव अंतःकरणीं जीव राहे ॥ ७३ ॥ यापुढें कोठें नाक दाबणें । कवण निरोधी नेत्रकरणें । श्वास ओढोनी सोडोनि रोधणें । हे कष्ट कवणें करिजेती ॥ ७४ ॥ ह्मणोनी तुझें ज्ञान झालिया । तुझा सगुणप्रेम जडलिया । तूंचि सांभाळी इन्द्रियां । करुणानिधे ॥ ७५ इन्द्रियें हीं अल्लड बाळें । अहंकार पाळी त्याचे लळे । यालागीं शिशुपाळ नाम मिळे । लोकांतूनि तयांप्राती ॥ ७६ ॥ मी सुवर्णमयी बुद्धि-रुक्मिणी । तो घ्यावया आपुलिया बाळांलागोनि । मज करूं पाहे पत्नी । येथ त्वां मोक्षदानी धांवावें ॥ ७७ ॥ रूपक तो चितीचा भावो । आणि इतिहास जगदुपकार सावेवो । इतिहास आणि रूपका मिळतां ठावो । मग आत्मा आणि वासुदेवो एकरूप ॥ ७८ ॥ जेव्हां तुझा अनुभव नसे । तेव्हां हा अहंकार घाली वळसे । केसरी नसतां गर्जना दिसे । जंबुकाची ज्यापरी ॥ ७९ ॥ तैसी असतां आत्मविस्मृती । अहंकार नाचवी निश्चिती । आतां तुझी मज जाहली स्फूर्ति । परी बाधिता-

नुवृत्याऽहंकृति ओढूं पाहे ॥ ८० ॥ परी तुझिया प्रेमांत असतां । तितु-केंही न साहे अनंता । यालागीं चतुराननताता । सांभाळी सर्वथा सर्वपरी ॥ ८१ ॥ आतां जैसें जें हृदयांत व्हावें । तेंचि ब्रह्मांडांत ही स्वभावें । जें पिंडी तें ब्रह्मांडीं आघवें । ह्मणोनियां ॥ ८२ ॥ तरी पिंडा-माजीं जें रूपक । त्याचाचि तीव्रसंवेग देख । तूं होवोनी ब्रह्मांडीं ऐति-हासिक । रूप यावें तयासी ॥ ८३ ॥ ह्मणजे पिंडीं त्वां सांभाळाव्या वृत्ती । आणि ब्रह्मांडाची ऐसी स्थिती । तूं द्वारकेहूनि येवोनि श्रीपती । मज रुक्मिणीप्रति पर्णी ॥ ८४ ॥ मीं आपुलेंपण अर्पिलें तुज । तूं मम हृदयातें ह्मणे धाम निज । एवं जोडा जाहलिया सहज । मग उघड-पण कां न व्हावें ? ॥ ८५ ॥ अंतरीं जें चोरोनी रूपक । उघड तें ब्रह्मांडीं ऐतिहासिक । जंव बाहेर नदी न निघे निःशंक । तोंवरीचि राहे पृथ्वीमाजीं ॥ ८६ ॥ तैसी द्विविध आत्मप्रतीति । येथ साधन अनुभव आणि उपपत्ति । अनुभवें अहंब्रम्हस्थिती । आणि खल्विदंब्रम्ह निश्चिती उपपत्त्या ॥ ८७ ॥ तें अनुभवाचें अंतरीं गूढ । परी खल्विदंब्रम्ह व्हावें उघड । ह्मणजे अंतरीं जो प्रेम निगड । तो विवाहबंधनें उघड व्हावा ॥ ८८ ॥ प्रेमाचें बीज अंतःकरणीं । त्याचा विवाहवृक्ष होवोनी । माधूर्यरसापन्न फळ येवोनी । पुढें कामिनी मनीं पडोत बीजें ॥ ८९ ॥ एवं मायाकृत कर्मवृक्ष । जंव अनादी चालतसे प्रत्यक्ष । तंव प्रेमकृत हा भक्तिवृक्ष । अनादी अनंत कां न चले ? ॥ ९० ॥ यालागीं हेंचि हें करावें । ऐसें मी प्रार्थी स्वभावें । तूं ह्मणशील मज म्हटलें करावें । येणें आज्ञा जाहली ॥ ९१ ॥ परी माझिया आरोपावीण । प्रभु तुज नाहीं कर्तेपण । हें ही साधकस्थितींत बोलण । येऱ्हवीं मीचि तूं, तूं ही मीचि ॥ ९२ ॥ ह्मणोनी म्यां मज ह्मटलें करावें । तरी आज्ञा नव्हे स्वभावें । आणि तुज कर्तेपण आरोपावें । तेथही उपकार जगाचा ॥ ९३ ॥ यास्तव नाथ हें हें करी । पिंडीं ब्रह्मांडीं माधूर्य भरी । आणि भक्ति व्यापक हे जगीं बिस्तारी । मज निजनारी करोनियां ॥ ९४ ॥ एवं जननीचीं वचनें । जीं सुधासुखाचीं उपपानें । प्रेमळमीनजीवांचीं जीवनें । सद्धृदयभुवनें व्यापोत कीं ॥ ९५ ॥ आतां आपुलिया आक्षेपा-वरून । जननी सकळांस सांगेल साधन । तें पुढील सौरभीं निरूपण

। श्रोत्रवधान असो प्रेमें ॥ ९६ ॥ श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेचीं वंदोनी पाउलीं । हे प्रेमकमळमाळ अर्पिली । चरणीं प्रेमें ॥ ९७ ॥ श्रीज्ञानेश्वर साक्षी गुप्त उघड संबंध । येथ साक्षी श्रीज्ञानेश्वर प्रसिद्ध । आतां ज्ञानेश्वर गोविंद गोविंद । शिवस्मरणें आनंद शिवरूप ॥ ९८ ॥ श्रीज्ञानेश्वर ज्ञानेश्वर । ज्ञानेश्वराचि अंतर । आत्मा होवोनी ज्ञानेश्वर । प्रारब्ध ज्ञानेश्वर गुरुभजनें ॥ ९९ ॥ ज्ञानेश्वर स्मरणीं । जन्मजन्म ज्ञानेश्वरजननी । गुरु ज्ञानेश्वरतात असतां सन्निधानीं । मग जन्ममरणीं अपवर्ग ॥ १०० ॥ ह्मणोनी आतां ज्ञानेश्वर आई । तुज माझेंपण वाटेल तैसें करीं लवलाही । मज माझेंपण आहे नाहीं । परी तुझे पायीं प्रीति जडो ॥ १०१ ॥

हरिः ॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे श्रीमद्भगवद्भक्तिसौरभे पिंडब्रह्मांडसंबंधिनीगुप्तप्रगटप्रेममयी-मृदुलवृत्तिनिरूपणं नाम चतुर्थः परागः ॥

---

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

## ॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## ॥ पंचमः परागः ॥

जय सच्चिदानंदकरुणाघना । कैवल्यश्रीवल्लभा निर्गुणा । प्रेमळानुरोधी साकारसुगुणा । सर्वत्रपूर्णा अद्वया ॥ १ ॥ तूं गणेश तूं सरस्वती । तूं सद्गुरु कृपामूर्ती । ज्या ज्या दिसती सज्जन विभूती । तुझिया व्यक्ती दयाळा ॥ २ ॥ पूर्वपरागीं निरूपण । आत्मत्वें पति नारायण । आतां आपुलाचि वर घ्यावया आपण । भीमकी वचन बोलत ॥ ३ ॥ वर शाप देवतांचे । तेव्हांचि होती साचे । जैं आपुलिया मनाचें । निश्चितत्व घटे ॥ ४ ॥ आपुलिया चित्तीं निश्चयो नाहीं । मग ईश्वर तरी करील काई । कुलटा स्त्रीतें रोधावया पाहीं । समर्थ नाहीं निजभर्ता ॥ ५ ॥ तेवीं विषयासक्तजना । प्रकृत्यनुसारी चंचलमना । निग्रह करावया जाणा । चाड नारायणा किंचित नसे ॥ ६ ॥ येथ आशंकिती जन । ईश्वर पूर्ण कृपाघन । तरी बुडत असतां जन । तो कि-

मर्थ आपण न काढी ॥ ७ ॥ दयेचा स्वभावचि ऐसा । परदुःखनाश करणें सहसा । आणि ईश्वर नोद्धरी जरी आपैसा । कृपाळू कैसा होय तरी ? ॥ ८ ॥ तरी येथ समाधान । दृष्टांतेची कीजे श्रवण । कोणी आपुले प्रतिबिंब पाहोन । बुडालो ह्मणून रडतसे ॥ ९ ॥ आपण बैसला वृक्षावरी । प्रतिबिंब पाहे तळीच्या नीरीं । मग बुडालो बुडालो ह्मणोनि निर्धारी । तारकालागीं रडोनि बाहे ॥ १० ॥ तंव तो तारक ह्मणे तया । तूं बुडालो ह्मणसी वाया । अरे ! प्रत्यक्षचि बुडालिया । रडणें कैसें होईल ? ॥ ११ ॥ परी तो नायके भ्रांतदृष्टि । आरडोनियां होय कष्टी । । तारकाचिया उपदेश गोष्टी । अव्हेरीत ॥ १२ ॥ येथ तारकें काय करावें । कीं प्रतिबिंबार्थ जावोनि मरावें । दयाळूपण तरी धरावें । कवणेंरीति ? ॥ १३ ॥ इतुकेंही करोनी तारक । प्रतिबिंबार्थ धांवतां देख । तरी तोही मूर्खासमान मूर्ख । निश्चयें लोक बोलती ॥ १४ ॥ तेवीं मायामय संसारू । हा मृगजळाचा पुरू । कीं स्वप्नींचा स्वर्णमेरू । वंध्याकुमर अवतरला ॥ १५ ॥ या मायेंत आपुलेपणा । आभासवोनी जीव नाना । धरोनियां देहाभिमाना । मग विषयसुखा इच्छिती ॥ १६ ॥ आपुलें अज्ञान दृढ असत । तेथ मिथ्यात्वें आपणा देखत । परी तेंचि मानूनि यथार्थ । मग धांवा करीत हरीचा ॥ १७ ॥ आणि तें विषयसुख न मिळतां । ईश्वरावरी दोष आरोपितां । दयाळुत्वाविषयीं तत्वतां । घेती शंका अनंत ॥ १८ ॥ तें जीवरूपणें पाहोनी । वेद उपदेशी चक्रपाणी । 'तत्वमस्यादि' महावाक्येंकरोनी । अज्ञान सोडा ह्मणतसे ॥ १९ ॥ परी तो नायकोनी त्या उपदेशा । जीव धरी विषयाभिलाषा । आणि मग ह्मणती मेळवा मोक्षा । वरी ईश्वर परीक्षाही पाहती ॥ २० ॥ येथ ईश्वरें काय काय करावें । कीं मिथ्या भावातें सत्य करावें । मग विषयसुख नित्य भरावें । हृदयीं जीवांचिया ॥ २१ ॥ ऐसें ईश्वर करी जरी आपण । तरी प्रभूसचि येईल जीवपण । ह्मणोनि ईश्वर आज्ञाचि पाळोन । उपदेशाचरण करावें ॥ २२ ॥ तात्पर्य, आपुलिया मनीं । निश्चय नसलिया दृढत्वेंकरोनी । मग सद्गुरू आणि चक्रपाणी । समर्थ निर्वाणीं ते नव्हती ॥ २३ ॥ सद्गुरू उपदेश व्यवस्थिति । यत्ननिश्चय आपुल्या चित्तीं । ईश्वर दूर करी विघ्नपंक्ती

तो जीवन्मुक्ति सांपडे ॥ २४ ॥ येचविषयीं वसिष्ठ मुनी । बृहद्वासिष्ठीं बदले वाणी । तें वाक्य परम प्रमाणीं । समाधानीं योजिजे ॥ २५ ॥
॥ श्लोक ॥ ' उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्रपालनम् ।
ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञैव केवला ' ॥ ( योगवासिष्ठ )

**टीका**:--रघुराया उपदेश तत्वतां । दाखवी नानापरी व्यवस्था । परी शिष्याचा प्रयत्न नसतां । होय वृथा सकळही ॥ २६ ॥ जरी शिष्यप्रयत्नावीण । गुरूपदेशें होईल कल्याण । तरी श्वान आणि वृक्ष-पाषाण । जावेत उद्धरोन क्षणमात्रें ॥ २७ ॥ मग वेदीं मनुष्यजन्मप्रशंसा । ही व्यर्थ कां केली दंतमीमांसा । एवढा आयता मोक्षठसा । असतां हातीं ॥ २८ ॥ जरी मस्तकीं हस्त ठेवून । मुक्त होऊं शकेल जाण । तरी ' ज्ञानादेवतु कैवल्यं ' हें श्रुतिवचन । पावलें मरण सर्वथीं ॥ २९ ॥ उपदेशं विनाऽपि कृपेंकरून । जरी होतें ह्मणावें ज्ञान । तरी महावाक्यांचें कारण । नाहींच जाण सर्वथा ॥ ३० ॥ आतां श्रवण केलियावीण निश्चिती । महावाक्येंही येतील चित्तीं । हे मनसाही कल्पितां नये स्थिति । मग घडेल ती रीति आम्ही नेणों ॥ ३१ ॥ ह्मणवोनि गा दशरथनंदना । गुरूपदेश व्यवस्थापालना । ती व्यवस्थाही जाणा । नानापरी ॥ ३२ ॥ श्रवणीं श्रुत्यविरोधव्यवस्था । मननीं साधकयुक्तिव्यवस्था । निदिध्यासनीं वृत्तिव्यवस्था । अथवा रहस्यव्यवस्था ऐकांतिकी ॥ ३३ ॥ प्रेम भक्तिसंप्रदायव्यवस्था । एवमादिक तत्वतां । या सर्वांवरी सत्ता श्रीगुरूची ॥ ३४ ॥ परी बोधानुसार ब्रह्म अनुभवणें । तें शिष्य अनुभवावीण न होणें । हें स्पष्ट वासिष्ठीं बोलणें । वसिष्ठांचें ॥ ३५ ॥ ह्मणवोनि आपुलेंचि मन । जैं आशीर्वाद घेईल आपण । तैं तेंचि तीव्रसंवेगी होऊन । कार्य संपूर्ण करील कीं ॥ ३६ ॥ ब्रह्मयाजवळीं शाप वर । आपुलें गाऱ्हाणें सांगतां सत्वर । ब्रह्मा ह्मणे तयाचें अंतर । जिकडे असेल तो जिंकेल कीं ॥ ३७ ॥ ऐसी वासिष्ठीं एक कथा । ती मनीषाचेदवलोकिजे श्रोता । असो येथ सिद्धांतसत्ता । आपुलें तया आपण फळे ॥ ३८ ॥ ह्मणोनी आपुल्या मनाचा वर । आधीं आपण घ्यावा सत्वर । मग देवतादिकांचे वर । सिद्ध होती ॥ ३९ ॥

॥ श्लोक ॥ ' मनएव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ।
बंधाय विषयासक्तं मुक्तं निर्विषयं स्मृतम् ॥ '
( अमृतबिंदूपनिषत्. )

' आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ '
( भगवद्गीता. )

' मन एवोल्लसन्मात्रं बद्धतामगमद्यतः ।
मनःप्रशमने राम मोक्ष एवावशिष्यते ॥ '
( योगवासिष्ठ. )

' नह्यस्त्यविद्या मनसोऽतिरिक्ता ।
मनोह्यविद्या भवबंधहेतुः ॥
तस्मिन्विनष्टे सकलं विनष्टं ।
विजृंभितेऽस्मिन्सकलं विजृंभते ॥ '
( विवेकचूडामणि. )

॥ अभंग ॥ ( तुकाराम )

' आधीं मन घेई हातीं । तोचि गणराज गणपती ॥ '

॥ पद. ॥ ( गोपालनाथ. )

' आधीं मन मुंडा बा मन मुंडा । मग तुह्मी ब्रह्म धुंडा ॥धृ०॥ मनाचि हातीं नाहीं । तेथें ब्रम्हचि करील कायीं ॥ आ० ॥ १ ॥ मनचि मुंडलें नाहीं । तेथें सद्गुरु करील कायीं ॥ आ० ॥ २ ॥ गोपालनाथ सांगतो सोयी । लागा तुह्मी सद्गुरुपायीं ॥ आधीं मन मुंडा बा० ॥ ३ ॥ '

ओव्या.

एवं श्रुति स्मृति समर्थोक्ति । प्रमाणार्थ बहु असती । आणि आपुली अनुभूती । ऐसीच आहे ॥ ४० ॥ आपुलिया मनें रुचे अन्न । भीतीनें आपणचि सांडी प्राण । आपण समर्थ आपण दीन । येथें नये निर्वाण संशयो ॥ ४१ ॥ ह्मणोनी आपुलें मन । आशीर्वाद द्यावया संपन्न । तेथ वैदिक कर्मादिसाधन । निमित्तकारण सिद्धींचें ॥ ४२ ॥ त्या साधनांसहित मनाचा वर । जगन्माता बोलत सुंदर । सावध होऊनि श्रोते चतुर । लक्ष अणुमात्र चळों ने द्या ॥ ४३ ॥

रुक्मिण्युवाचः—

॥ श्लोक ॥ पूर्तेष्टदत्तनियमव्रतदेवविप्र-
गुर्वर्चनादिभिरलं भगवान्परेशः ।
आराधितो यदि गदाग्रज एत्य पाणिम्
गृण्हातु मे न दमघोषसुतादयोऽन्ये ॥

ओव्याः— रुक्मिणी ह्मणे करुणाघना । ऐसा निश्चयो माझिया मना । जरी पूर्वी केलें असेल साधना । तरी तूं जगन्मोहना पावसी ॥४४॥ साधनीं नसतां आपुलें मन । व्यर्थ होय अवघेंचि करून । ह्मणोनी बाह्य साधन अंतरीं दृढ मन । सिद्ध संपन्न तैंचि होय ॥ ४५ ॥ पूर्वजन्मीं नारायणा । पूर्तकर्में कल्याणनिधाना । केलीं असतील जरी नाना । तुझिया कृपें ॥ ४६ ॥ शिवविष्णुमंदिरें बांधिलीं । कूप तडागें वा खांदिलीं । एवमादिक असतील केलीं । पूर्तकर्में ॥ ४७ ॥ निष्काम पूर्तकर्में करून । परोपकारीं धावे मन । तेणें व्यक्ति अभिमान । नाश पावे ।४८। वर्णाश्रमविहित यज्ञादिकें । तीं इष्टकर्में सकळिकें । तीं आचारितां अकामुकें । पारलौकिकें तोषती देवो ।४९। तयां देव करोनि कृपा । वारिती सर्व विघ्नतापा । मग स्फूर्तिमार्ग सोपा । सहज होय । ५० । अन्नदानादिक दानें । सुपात्रीं अर्पिलिया क्षणें । नानाठायींचें ममत्वपण । नासोनि जाय । ५१ । शौचसंतोषस्वाध्यायादिकें । नियम आचरितां अनेकें । इंद्रियें विषयांतूनि सकळिकें । निघोनि शांति पावती ॥ ५२ ॥ कृच्छ्रचांद्रायणादि व्रतें । करितां नासती दुरितें । दुरित नासलिया विघ्नदातें । कोणी न राहे ॥ ५३ ॥ कोणता मार्ग धरावा । कोणता यत्न करावा । हा चंचलपणा आवरा । हरिहरभजनें नाशत ॥ ५४ ॥ कर्में शुद्ध झालिया मन । मग करावें देवार्चन । तेणें नाशे चंचळपण । स्थैर्य संपूर्ण साधत ॥ ५५ ॥ सकल पूज्यांचा शिरोमणी । सद्गुरु एक कैवल्यदानी । पूर्णपणा सकल आचरणीं । गुरुपदपूजनें ॥ ५६ ॥ ह्मणोनी गुर्वर्चनस्थानीं शुद्ध । मुळीं ' अलं ' पद प्रसिद्ध । मध्यें जो असे ' आदि ' शद्ब । तो गुरु आज्ञादिपालनदर्शक ॥ ५७ ॥ इतर स्थानीं परोक्ष देवो । गुरु चरणीं अपरोक्ष ब्रह्मभावो । यास्तव गुरु सकलसाध्यठावो । तुकाराम पहाहो बोलिले ॥ ५८ ॥

## ॥ अभंग १. ॥

सकळ देवांचें दैवत । सद्गुरुनाथ एकला ॥ १ ॥ राम केला ब्रह्मज्ञानी । वसिष्ठमुनी तारक ॥ २ ॥ कृष्ण गुरू संदीपन । ब्रह्म पूर्ण दाविलें ॥ ३ ॥ तुका ह्मणे सद्गुरुसेवा । सकळ देवावरिष्ठ ॥ ४ ॥

॥ २ ॥

आधीं पूजा सद्गुरुनाथा । चाले देवावरी सत्ता ॥ १ ॥ ज्याचें होतां अवलोकन । करी आपुल्या समान ॥ २ ॥ एका सद्गुरुचे भावा । काळ कापे ज्याचें नांवा ॥ ३ ॥ तुका गर्जितो पवाडे । गुरुभक्त पाहतां थोडे ॥ ४ ॥

॥ श्लोक ॥ ' यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ ।
तस्यै ते कथिताह्यर्थाः प्रकाशंते महात्मनः ॥ '
( श्वेताश्वतरोपतिषत्. )

' तद्विज्ञानार्थं सद्गुरुमभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम् । '

' तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्वदर्शिनः ॥ '
( भगवद्गीता. )

आर्व्याः—' ह्मणोनी जाणतेनें गुरु भजिजे । तेणें कृतकार्य होइजे । जैसें मूळसिंचनें सहजें । शाखापल्लव संतोषती ॥ ' ( ज्ञानेश्वरी अ० १ ओवी २५ ) ह्मणोनी वरिष्ठ सर्वदेवां । एक सद्गुरुनाथ भजावा । 'यथा देवे तथा गुरौ ' या श्रुतिवाक्यभावा । आश्रवुनी ॥ ५९ ॥ एवं पूर्तापासोनि गुर्वर्चनावरी । साधनें बोलिलीं बहुपरी । तें कृष्णार्पणबुद्ध्या निर्द्धारीं । कीजती सकळ ॥ ६० ॥ कृष्ण आणि गुरु कृपानिधी । येथ असावी अभेदबुद्धि । तेणें गुरुसमर्पणप्रसिद्धी । वृत्ति ठाके ॥ ६१ ॥ एवं गुरुकरुणावशें । आपणांचि ईश्वरत्व आपैसें । मग तो बोलावोनि जवळी येतसे । हें आश्चर्य कायसें वाटेल? ॥ ६२ ॥ ये विषयीं तात वचन । अमृतानुभवीं प्रमाण । तें ऐकोनी सज्जन । समाधान साधतील ॥ ६३ ॥

' जीवपणाचेनि त्रासें । यावया आपुलिये दशे ।
शिवही मुहूर्त पुसे । जया जोशियातें ॥ '

( अमृतानुभव प्रक० २ ओवी २२ )

' जयाचेनि कृपासलिलें । जीवू हा ठाववरी पाखाळे ।
जें शिवपणही वोविळें । अंगीं न लवी ॥ '

( अमृतानुभव प्रक० २ ओवी ११ )

' जयाचा दिठिवा वसंतु । जंव न रिघे निगमवनाआंतू ।
तंव आपुलिये फळीं हातू । न घेपती ही ॥ '

( अमृतानुभव प्रक० २ ओवी १८ )

॥ ओव्या ॥

एवं अनेक तात वचनीं । कैवल्य लोळे श्रीगुरुचरणीं । मग इतर साध्यालागुनी । नाहीं कवण ह्मणे ॥ ६४ ॥ इतुकें हें सर्व कृपानिधी । त्यां केलें असतील ब्रह्मबुद्धि ! तरी गदाधर येवोनि ये अवधीं । पाणिग्रहण करील माझें ॥ ६५ ॥ मी शुद्ध इतुकिया साधनीं । असेल जरी अंत:करणीं । तरी तो रमावल्लभ पाणि- । ग्रहण करील पैं माझें ॥६६॥ कामक्रोधादिक समस्त । विकार झाले असतील यांत । तरी तो व्रजकामिनीकांत । करील हस्तग्रहण माझें ॥ ६७ ॥ जरी मी केलें नसतें कांहीं । तरी वृत्ति न धांवती श्रीहरीपायीं । तस्मात् गृहां येवोनि शेषशायी । पाणिग्रहण मम करो ॥ ६८ ॥ जरी शुद्ध नसतें माझें मन । तरी गा राज्याचें वैभव सोडोन । मज न लागतें कृष्णचिंतन । तस्मात् पाणि ग्रहण करो हरी ॥ ६९ ॥ मज भोंवता भवसागर । शिशुपालादि त्यांत मकर । यास्तव येवोनि करुणाकर । करग्रहणें मज काढो ॥ ७० ॥ अथवा हा मिथ्या सकल भवु । मग मी कवणा हातीं हात देवू । यास्तव तो सत्य बालिभद्रभाऊ । पाणिग्रहण मम करो ॥ ७१ ॥ शिशुपालादि मज आघवें । न भासवोत भवसद्भावें । यास्तव येवोनि वासुदेवें । मम करावे पाणिग्रहण ॥ ७२ ॥ एवमेव भीमकबाळा । पावोनि पावत हृदयवेल्हाळा । तो ब्रह्मानंद सोहळा । ज्ञानेश्वरबाळा होउनी इच्छू ॥ ७३ ॥ येथ ज्ञानेश्वरकन्यापंगती । जिया यावया चाड चित्तीं । तिहीं उमा शिव हरी गुरु कृपामूर्ति । परमप्रीतीं स्मरावें ॥ ७४ ॥ त्या-

वध होवोनि श्रोते सज्जन । पुढें असोद्यावें अवधान । जगन्मातेचें प्रबोध-वचन । ऐकोनि आपण तेविं व्हावें ॥ ७५ ॥ श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेचीं वंदोनि पाउलीं । ही ओवीकुसुममाळ अर्पिली । चरणीं प्रेमे ॥ ७६ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे
श्रीभगवद्भक्तिसौरभे श्रीगुरुवचनादिसाधनसंपन्न-
सज्ञानभक्तिवर्णनं नाम पंचमः परागः ॥
॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ॥

## ॥ षष्ठः परागः ॥

॥ श्लोक ॥

रुक्मिण्युवाचः— श्वोभाविनि त्वमजितोद्वहने विदर्भान्-
गुप्तः समेत्य पृतनापतिभिः परीतः ।
निर्मथ्य चैद्यमगधेंद्रबलं प्रसह्य
मां राक्षसेन विधिनोद्वह वीर्यशुल्काम् ॥ ५ ॥

ओव्याः— जय जय परमानंदपरेशा । जय अध्यासरहिता विवर्तवेषा । जय निर्विकारा श्रुतिसर्वेशा । सुराधीशा सूरिप्रिया ॥ १ ॥ सज्जन श्रोते सावधान । पूर्वाध्यायीं अनुसंधान । नाना साधनें भक्ति ज्ञान । बोलिली आपण जगज्जननी ॥ २ ॥ आतां या अध्यायीं निरूपण । माता बोलेल आवडीकरोन । जे वृत्तिकृत प्रतिबंध पूर्ण । ते वृत्तीनें निर्याण पावती ॥ ३ ॥ अहो! आत्मयाचिया ठायीं । प्रतिबंध तो सर्वथा नाहीं । परी वृत्तिकृत प्रतिबंध लवलाहीं । नाश पावे वृत्तिवशें ॥ ४ ॥ येचविषयीं कपिल मुनी । कपिलगीतेंत वदले वाणी । ते श्लोक प्रमाण घेवोनी । समाधान मनीं मानिजे ॥ ५ ॥

॥ श्लोक ॥ ' उदकेन भवेत्पंक: स च तेनैव शुद्धयति ।
मन: करोति वै कर्म मुच्यते मनसैव तत् ' ॥ १ ॥
( कपिलगीता. )

अहो उदकीं पंक होय । तो उदकेंचि धुतल्या जाय । तेवीं मनापासोनी कर्म होय । तें मनेंचि जाय विलयातें ॥ ६ ॥ स्त्री पुत्र माझे माझे ह्मणोन । अंतरीं कल्पना करी मन । जागृतीअवस्था सुटतांचि जाण । स्त्रीपुत्र आपण तो विसरे ॥ ७ ॥ अहो स्वप्नीं देखे सुतकुमारा । मग मानोंचि लागे खरा । जागृतींत आलिया अवसरा । मिथ्या मानी ॥ ८ ॥ स्वप्नींचा पुत्र देखिला तत्वतां । तो मनानेंचि सत्य मानिला होता । मनचि जागृतींमाजी येतां । मिथ्या सर्वथा तें मानी ॥ ९ ॥ तैसें जागृतींत जीवंत नंदन । स्वप्नीं देखे तयाचें मरण । तेंचि मनानें सत्य मानोन । करी रुदन अटाहासें ॥ १० ॥ एवं मन जें जें कल्पना करी । मनचि पुढती उपसंहरी । आपुला मित्र आणि वैरी । मन निर्धारी आपण ॥ ११ ॥ एका वस्तूवरी प्रीति । मन आपण ठेवी निश्चिती । मग दुसरियावरुती । द्वेष करी ॥ १२ ॥ माझा ह्मणूनि आवडीचा । आणि माझा नोहे तो दुसरियाचा । हा अवघा भाव मनाचा । एथ आत्मयाचा लेशू नसे ॥ १३ ॥ एवं शत्रुमित्र जनिमरणाऽवस्था । आघवी मनाचिया माथां । मन आहे ह्मणोनि सत्ता । मन नाहीं ह्मणतां विनाशू ॥ १४ ॥ बंध आणि मोक्षाप्रति । मन कारण ह्मणे श्रुति । अमृतबिंदूपनिषदीं उक्ति । ऐकिजे श्रोतीं आवडी ॥ १५ ॥

॥ श्लोक ॥ ' मनोहि द्विविधं प्रोक्तं शुद्धंचाशुद्धमेवच ।
अशुद्धं कामसंकल्पं शुद्धं कामविवर्जितम् ॥१॥ '
( अमृतबिंदूपनिषत् )

ओव्या:— मनाचें प्रकार दोन । शुद्ध आणि अशुद्ध जाण । नानाभोगांचें संकल्पन । अशुद्ध मन त्या ह्मणती ॥ १६ ॥ जैसे कां चंचळ श्वान । खाऊनि हिंडे नाना सदन । बहु मंदिरीं तुकडे खावोन । तृप्ति पूर्ण न मानी ॥ १७ ॥ तैसें अनंत जन्म करोनि संसार । तृप्ति न मानीच अंतर । शेवटीं देह होवोनि जर्जर । नेती यमकिंकर निजबळें

॥ १८ ॥ नित्य खावोनि मिष्टान्न । पुन्हा नवें नवें करी पक्वान्न । जव-ळीं पोटापुरतें असतां धन । व्यापार करून मिळवूं इच्छी ॥ १९ ॥ एकस्त्री भोगोनि जाहलें जरी । मग विवाहा पाठीं विवाहो करी । तेथ ही तृप्ति नोहे ह्मणोनि नारी । पराविया निर्धारी पाहूं इच्छी ॥ २० ॥ अहो! दैववशें मिळालिया धन । तरी इच्छी होवावें राज्यसंपन्न । रा-ज्य मिळालिया ही जाण । सार्वभौम पद मन इच्छी ॥२१॥ जाहलि-या ही सार्वभौमता । मग आकाशाचें राज्य इच्छी तत्वतां । पंख अथवा विमान असतां । मनोवेगता वांच्छी ॥ २२ ॥ बहु काय मिळालिया त्रिभुवन । तरी नवे नवे ब्रह्मांड निर्मी मन । एवं अशुद्धमनाची जाण । तृप्ती निर्वाण असेना ॥ २३ ॥ ह्मणोनि जंव जंव वासना । वाढों देणें आपुल्या मना । तंव तंव अतृप्ति जाणा । वाढतचि जाय ॥ २४ ॥ या-लागीं नानासंकल्पभरित । तेंचि ह्मणावें अशुद्ध चित्त । वासना त्यागूं इच्छी निश्चित । शुद्ध चित्त तें जाण ॥२५ ॥ भोगभोगलिया नाना परी । समाधान नोहे क्षणभरी । नवल भोगवासनेचि परी । शरीराहूनि निर्धारी अधिक वाढे ॥२६॥ पोट भरे जेवोनि अन्न । परी वासनेचें न जाय रुचिकरपण । ह्मणोनि भोजना नंतर ही जाण । फळें आणोन भक्षितसे ॥ २७ ॥ या वासनेचिया पायीं । कित्येक जन्म पुरले नाहीं । पुढें होतील किती ही । मिती नाहीं तयांची ॥२८॥ ह्मणोनि शहाणे जे असती । ते पदोपदीं दोष पाहती । मग वासना अंतरीं मुरडविती । सत्संगति करूनियां ॥ २९ ॥ अंतरींची न जाये वासना । आणि तपें आचरिला जरी जाणा । तरी तीं तपें बंधना— । कारण होती ॥ ३० ॥ वृद्धाचे पडोनि जाती दंत । परी तांबूल कुटोनियां भक्षित । शरीर हळू-हळू जीर्ण होत । वासना वाढत नवी नवी ॥ ३१ ॥ या युक्तीनें पाहतां । वासना शरीराहूनि भिन्न तत्वतां । शरीर जीर्ण होतां होतां । वासना जीर्ण न होय ॥ ३२ ॥ एवं एक शरीर पडोनी जाय । तंव दुसरें शरीर वासना पाहे । यास्तव जेणें वासनाक्षय । तोचि उपाय साधु करिती ॥ ३३ ॥ अग्नीवरी घालितां घृत । तरी तो कदापि नव्हे शांत । तेंवी आवडे तें पुरवितां चित्त । अधिक वाढत जन्मजन्मीं ॥ ३४

ह्मणोनि वासना विवर्जित । तेंचि ह्मणावें शुद्ध चित्त । बंधन आणि मोक्ष निश्चित । अशुद्ध चित्त दाविती ॥ ३५ ॥

॥ श्लोक ॥ ' मनएव मनुष्माणां कारणं बंध मोक्षयोः ।
बंधनं विषयासक्तं मुक्तं निर्विषयं स्मृतम् ' ॥ १ ॥

अहो मनुष्याकारण । मनचि करी मोक्ष बंधन । विषयीं गुंते जेधवां मन । अति बंधन तैं होय ॥ ३६ ॥ कोणाची कन्या गृहीं येत । तिज जैं आपुली ह्मणे चित्त । तैं बंधनीं अति पडत । होय आसक्त परविषयीं ॥ ३७ ॥ जया मनाचिया ठायीं । आपुलें परावें सर्वथा नाहीं । तया बंधन करावया कांहीं । त्रिभुवनीं नाहीं नाहीं सत्य ॥ ३८ ॥ तात्पर्य वृत्तीचे प्रतिबंध । वृत्तीनेंचि जाती प्रसिद्ध । परी अनुमन्ता श्रीगोविन्द । वृत्त्याश्रय असावा ॥ ३९ ॥ हस्ति धुतला नाना परी । सोडितां लोळे मृत्तिकेभीतरीं । तैसें मन शुद्ध जालें तरी । सहाय नसतां श्रीहरी विषयीं धावे ॥ ४० ॥

॥ श्लोक ॥ " त्वं सर्वभूतहृदयेषु कृतालयोऽपि ।
त्वं मंत्रजाप्यविमुखेषु तनोषि मायाम् ।
त्वन्मत्रसाधनपरेष्वपयाति माया ।
सेवानुरूपफलदोऽसि यथा महीपः ॥
( अहल्यास्तव—अध्यात्मरामायण. )

अहो सूर्य जैसा सर्वाठायीं । परी जे डोळे उघडती पाहीं । तयासचि दिसे लवलाहीं । इतरां नाहीं प्रत्यय ॥ ४१ ॥ तैसा तूं श्रीभगवंता । सर्वांच्या ही हृदयीं असतां । जे तुज न स्मरती अनंता । त्यांच्या मायेस तत्वतां आधार तूं ॥ ४२ ॥ तुज स्मरती जे करुणाघना । त्यांची माया निवटे जगन्मोहना । तुज जैसे जे भजती इंदीरारमणा । तूं तैसा तयांनां नृपसम ॥ ४३ ॥ अहो दोरीची जया नाहीं स्मृति । ते सर्पचि आपण ह्मणती । परी त्यांच्या सर्पासही निश्चिती । रज्जूचि धरी ॥ ४४ ॥ दोरीची झालिया आठवण । तरी सर्प नासलिया दोरीचि जाण । तेवीं तुज न स्मरती ते मायापन्न ॥ जे माया रहित जाण ते तुझेनि ॥ ४५ ॥ ऐसी अहल्येची वाणी । श्रीमदध्यात्मरामायणीं ।

यास्तव हरिसहायावांचोनि । न टिके मनीं शुद्धपणा ॥ ४६ ॥ आणि मुचकुंदाकारणें भगवान । एवंविध बोलिले किं माझिया भक्ती वीण । मन पावे उत्थान । समाधींतुनी ॥ ४७ ॥

॥ श्लोक ॥ 'युञ्जानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मनः ।
अक्षीणवासनं राजन्दृश्यते पुनरुत्थितम्' ॥ ( भागवत. )

हरि ह्मणे मुचकुंदराया । एक मजवरी प्रेम नसलिया । प्राणायामादिक केलिया । जाति वायां सर्वस्वें ॥ ४८ ॥ अगा पोहणार जे असती । ते दोन दोन प्रहर श्वास रोधिती । त्यां सर्वांस जीवन्मुक्ति । सांग निश्चिती काय झाली? ॥ ४९ ॥ मी एक सच्चिदानंदघन । भक्तासाठीं सकरुण । त्या माझे न स्मरतां चरण । शपथचि मन स्थिर नव्हे ।५०। सकल साधनां म्हणवोनी । आदरें तिळांजळी देवोनी । मी परमात्मा चक्रपाणी । अंतःकरणीं असों दे ॥ ५१ ॥ तस्मात् सहाय भगवंत । आणि वृत्ति ही सादर निश्चित । तैं जे जे येती अपघात । ते होती समस्त उपायची ॥ ५२ ॥ जेथ इंद्रियांपासोनि सावध मन । हृदयीं आकळिला नारायण । तेथ जे जे येती विघ्न । ते होती साधन परमार्थी ॥ ५३ ॥ वैद्य असतां धन्वंतरी । मग विषें सांपडलीं नाना परी । तरी त्रिपुके ही सन्निपातावरी । औषधचि होय ॥ ५४ ॥ तेवीं मन अर्पिलिया भगवंतीं । मग जीं जीं संसारीं विघ्नें येती । तेणें तेणें परमार्थस्थिति । होय चित्तीं दृढतर ॥ ५५ ॥ ह्मणोनि ह्मणे जगन्माय । स्वामी जेथें तुमचे पाय । तेथ अपाय तें उपाय । हें मी स्वयें जाणतें ॥ ५६ ॥ ह्मणोनि येथवरी माझी स्थिति । तयाची न व्हावी व्युत्थिती । याळागीं प्रार्थना निश्चिती । तुम्हांप्रती यदुनाथा ॥ ५७ ॥ अहो! मनास जेथ प्रतिबंध व्हावा । तेथ मनानेंच उपाय शोधावा । तो भगवंतें सिद्धी मात्र न्यावा । ऐसाची ठेवा पूर्वपर ॥ ५८ ॥ ह्मणोनि मी पडणार बंधनीं । आणि उपायही सुचवितें कैवल्यदानी । तो तूं आपण प्रकटोनी । सिद्धी निर्वाणीं पाववी ॥ ५९ ॥ म्हणशील तूं नितंबिनी । मज पत्र लिहिलें धिटाई करुनी । तरी मज माझीच चाड ह्मणोनि । कैवल्यदानी लिहिलें म्यां ॥ ६० ॥ मी पूर्ण जाणतें अनंता । तूं मायातीत

सर्वथा । तूं नव्हसी कर्ता करविता । नित्य तृप्तता तुझी तुज ॥ ६१ ॥ बुडणें तरणें तुझ्याठायीं । न जन्मलें जन्मणार नाहीं । मज माझीच चाड शेषशायी । लिहिलें लवलाही यास्तव ॥ ६२ ॥ आतां धीट समजोनि तत्वतां । मज न मानसील पतिव्रता । तरी तें मी न इच्छीं अनाथनाथा । वेश्याही परी तत्वतां होईल तुझी ॥ ६३ ॥ ह्मणोनि न करितां विवाह उत्तम । सुखें उचलोनि न्यावें परम । हा तुज मार्ग सुगम । पुरवी पुरुषोत्तम ही इच्छा ॥ ६४ ॥ येच विषयीं उपपत्ति । भीमकीसंज्ञा तीव्रवृत्ति । बोलतसे तें सज्जन श्रोतीं । सावध चित्तीं ऐकावें ॥ ६५ ॥

**श्रोभाविनीतिः—** दर्भ उपलक्षणें सकळ तृण । तें जेथ तेथ पशूंचें स्थान । हा विदर्भ ह्मणोन । हें नोहे स्थान पशूंचें ॥ ६६ ॥ या विदर्भाठायीं । देवा तुझेची सर्वही । आणि माझें हृदय तें ही । विदर्भ असे ॥ ६७ ॥ धूममार्गी जे जाती । तयांच्या श्राद्धा दर्भकृति । माझे मार्गीमार्ग तूं श्रीपति । मज जनिमरणस्थिति असेना ॥ ६८ ॥ ह्मणोनि दर्भाधिष्ठितकर्मरहित । माझें हृदय तुज आसनभूत । यालागीं आधीं येथ गुप्त । यावें प्रभू ॥ ६९ ॥ अहो खळ विवाहसमयीं रोकडे । आधीं येतील माझ्याकडे । माझें हृदयीं असतां तव रुपडें । मग मी वश न तयां कदा ॥ ७० ॥ तूं परमात्मा अजित । आत्मत्वें प्रगटतां मम हृदयांत । मग माझें लोभें चित्त । होईल व्युत्थित सर्वथा ॥ ७१ ॥ मज ठाऊकें आहे पूर्ण । लग्नसमयीं खळ येऊन । मज बाळे बाळे ह्मणवून । लोभ उत्पन्न करितील कीं ॥ ७२ ॥ तो तूं आधींच हृदयीं प्रगटतां । मग तो लोभचि न येईल तत्वतां । एवं मृदुसंवेगीं मी वश न होतां । मग तीव्रसंवेगीं तत्वतां खळबळ न चले ॥ ७३ ॥ तूं प्रगटतां प्रगटशील आत्मरूपें । तेणें हृदय माझें लोभें न लोपे । एवं निर्गुणत्वें मज सांभाळितां कृपें । मग शरीर सगुणरूपें सांभाळीं ॥ ७४ ॥ तूं गुप्त प्रगटतां करुणाघना । मी मन न देईन तयां दुर्जना । मग सगुणत्वें नारायणा । युद्ध करुनि सोडवी शरीरातें ॥ ७५ ॥ तुझें परमानंद वीर्यमूळ अनंता । तेणें मज वृत्तित्वें सांभाळी आतां । मग योग्य फलदान जें वीर्य भगवंता । तेणें मम तनु तत्वतां सांभाळी ॥ ७६ ॥ उद्यां विवाह होणार ह्मणती । तों येवोनी कृपा मूर्ती । संगें

घेवोनि येई मुक्ति । जे नोवरी निश्चितीं होईल खळा ॥ ७७ ॥ मुक्ति-नोवरी खळासी देसील । हें तों तुझें पूर्वशीळ । मज ही काय तेंची मिळेल? । यास्तव भय खोल मज होतें ॥ ७८ ॥ ह्मणोनि न इच्छीं मुक्ति । मज देई माधूर्यभक्ति । जियेच्या पायीं चारी मुक्ती । लाजोनि लोळती सर्वदा ॥ ७९ ॥ चैद्यमागधांचें बळ । निजबळें निर्दळूनि सकळ । राक्षसविधीनें हे घननीळ । पर्णोनि तत्काळ मज नेई ॥८०॥ आपलिया विभागावरी निश्चितीं । राक्षस जैसे अविचारें धांवती । तैसा विचार न करूनि श्रीपति । एकांतीं प्रीति मज द्यावी ॥ ८१ ॥ अथवा तूं जरी आहेस भगवंत । परी मी धीट राक्षसी निश्चित । यालागीं दैवविवाह नोहे उचित । साक्षसविवाहविधि प्रशस्त मज वाटे ॥ ८२ ॥ धर्मशास्त्र विचारें करून । क्षत्रियास हाच विधि युक्त पूर्ण । खळ ह्मणती तुज नाहीं छत्रसिंहासन । तो प्रत्यय दावावया पूर्ण । राक्षस विधीनें मज देइ ॥ ८३ ॥ अथवा ब्राह्मदैवविवाहे अनंता । लग्न केलिया कृपावंता । तुजपुढें लाजोनि तत्वतां । राहणें लागेल कुलवधूवत ॥ ८४ ॥ परी तुझ्यापुढें नारायणा । मी होऊं न इच्छी कुलांगना । जैशा व्रजयुवती लंपटल्या चरणा । मज दशा करुणाघना ती येवो ॥ ८५ ॥ स्वर्णनगरीची पट्टराणी । मी व्हावया नेच्छी कैवल्यदानी । एक तुझ्या मात्र चरणीं । प्रीति निर्वाणी गोविंदा ॥ ८६ ॥ जरी त्वां योग्य केलें लग्न । तरी व्यावहारिक प्रेम होईल जाण । लोकांची निंदा करोनि सहन । तुजवरी प्रेम पूर्ण न घडेल ॥ ८७ ॥ यास्तव राक्षसविधीनें नेतां । मज लोक दासी ह्मणतील अनंता । ऐसीया समयीं प्रेम सर्वथा । तुजवरी ठेवीन आदरें ॥ ८८ ॥

### ॥ अभंग विराण्याचे ॥ ( १ )

हाचि नेम माझा न फिरे माघारी । बैसलें शेजारीं गोविंदाच्या ॥ १ ॥ घररिघी झालें पट्टराणी बळें । वरीलें सांवळें परब्रह्म ॥ २ ॥ बळियाचा अंगसंग झाला आतां । नाही भय चिंता तुका ह्मणे ॥ ३ ॥

( २ )

न देखें न बोलें नाइकें आणिक । बैसला हा एक हरि चित्तीं ॥१॥ सासुर माहेर मज नाहीं कोणी । एक केलें दोन्ही मिळोनियां ॥ २ ॥

आळ आला होता आह्मी भांड खोरी । तुका म्हणे खरी केली मात ॥ ३ ॥

( ३ )

दुजा ऐसा कोण बळी आहे आतां । हरी या अनंतापासूनिया । १ ।
बळियाच्या आह्मी जालो बळिवंता । करूं सर्व सत्ता सर्वांवरी ॥ २ ॥
तुका ह्मणे आह्मी जीवाच्या उदारा । जालों प्रीतिकरा गोविंदासी ।३।

**ओव्याः—** एवं श्रीतुकारामवचन । माधुर्यभक्ती परमप्रमाण । जगन्मातावचनानुरोधेंकरून । आह्माही निर्वाण होतें फळ ॥ ८९ ॥ तुझें वीर्य जें भगवंता । अमोल जें कृपावंता । तें वीर्यचि मी कृपावंता । दुसरी नव्हे ॥ ९० ॥ तुझें वीर्य जें मोल सकळ । तीचि मी चित्प्रभा केवळ । अथवा तुझें वीर्य तें मोल प्रबळ । तेणें मी दासी जन्मजन्मीं ॥ ॥ ९१ ॥ प्रभो अशुल्कदासी व्रजयुवती । आणि मी दासी शुल्कें निश्चिती । परी अशुल्कदासी मज करावया श्रीपती । राक्षसीवधानें पर्णावें ॥९२॥ गोपिका सोसूनि कष्ट । तुझें चरणीं पावल्या स्पष्ट । आणि मी तुज पावावया कृपानिष्ट । देतें कष्ट अतितर ॥९३॥ ह्मणोनि गोपिकांची स्थिती । मज मिळेल तेव्हां मिळो श्रीपती । परी पत्र लिहिलें निश्चिती । भरंवसा चित्तीं जाणोनी ॥ ९४ ॥ रास रचिला गोकुळीं । तैं अनंतरूपें जाहलासी वनमाळी । एकरूप मजसाठींही येवेळीं । करोनि भीमकबाळी पर्णिजे ॥ ९५ ॥ एवं त्वं विजातीयत्वे सति गोचरचैतन्य ईश्वरू । त्वं सजातीयत्वे सति गोचर चिदानंद गुरू । यालागीं स्वसजातीय सद्गुरू । भीमकी साचारू पाहत ॥९६॥ ज्या गुरुवचनें ईश्वर पर्णे । तो गुरू मानोनियां अपर्णे । श्री परमेश्वराचीं चरणें । जे जनिमरणें [illegible] ॥ ९७ ॥ [illegible]गीं मिळवावया जगज्जननी । पुढील श्लोकीं वदेल वाणी [illegible] सजातीय अपर्णास्थानीं । संकेतें चक्रपाणि प्रगटवी ॥९८॥ तो पुढील [illegible] अति सुरस । श्रोतीं ऐकिजे सावकाश । परी ज्ञानेश्वरकृपाविलास । अंतरीं विशेष

आठवा हो ॥ ९९ ॥ श्रीज्ञानेश्वरमायमाउली । तियेचीं वंदोनि पाउलीं । एषा कुसुममाळा समर्पिली । चरणीं प्रेमें ॥ १०० ॥

हरिःॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे श्रीमद्भगवद्भाक्तिसौरभे निःशंकभक्त्युद्रेको नाम षष्ठः परागः ।
। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ॥

# ॥ सप्तमः परागः ॥

जयजय जगदंकुरकंदा । परब्रम्ह सच्चिदानंदा । श्रीसद्गुरो अगाधबोधा । अलकावतीवल्लभा ॥ १ ॥ माये ! तुझिया करुणावशें । निःशेष नाशे भवभयपिसें । देखतां देखतां बोळसे । अविद्येचे हारपती ॥ २ ॥ माये ! तूं नसतीस जरी कुंभिनी । तरी शक्तिहीन होता चक्रपाणी । तूं सद्गुरु मोक्षदानी । आपुलेपणीं भेटसी ॥ ३ ॥ अंबे ! तुझिया कृपादृष्टी । बंधमोक्ष मिथ्या शेवटीं । द्रष्टा दर्शनाचिया पोटीं । तुज जो नेहटी तो धन्य ॥ ४ ॥ जननी तुझे सुकुमारचरण । स्मरतां हारपे जन्ममरण । पुढें ग्रंथ हा भक्तिसंपन्न । करुणेंकरून चालवी ॥ ५ ॥ सावध असावें अमलश्रोतीं । जगज्जननीची व्युत्पत्ति । ये श्लोकीं कवणेरीती । ती प्रतिपत्ति ऐकावी ॥ ६ ॥ कामक्रोधादिक सकळ । आपण न सोडतां केवळ । मज उद्धरोन नेवो घननीळ । बोलणें किडाळ हें असे ॥ ७ ॥ आपुलें न सुटतां जारपण । कान्त मज सदनीं ठेवो ह्मणोन । कोल्हाळ युवती करी दारुण । परी तें कवण मानी सांगा ? ॥ ८ ॥ अहो ! आपलें आंगीं विषय असोनी । जरी उद्धरील चक्रपाणी । तरी वृक्षपाषाणांलागोनी । कां न तेणें उद्धरावें ? ॥ ९ ॥ उद्धरावेंचि ह्मणतां पुढती । तरी आधींच उद्धरावें होतें निश्चिती । मग जीव दिसावया जगतीं । कारण काय ? ॥ १० ॥ ऐसें ही जरी ह्मणतां । कीं न होवूं द्यावें होतें जगता । तरी उद्धार तो कैसा तत्वतां । केला पाहिजे होता

हरीनें ॥ ११ ॥ दयावश केला उद्धार । काय अभिन्न कीं भिन्न ठेवावें निर्धार । अंत्यपक्ष धरितां साचार । तरी भय निर्धार सुटेना ॥ १२ ॥ " द्वितीयाद्वै भयं भवति " । ऐसी झडझडूनि सांगे श्रुति । यालागीं आभिन्न स्थिति । करावी होती ह्मणाल कीं ॥ १३ ॥ तरी जो अभेद हरीनें करावा । तो चेतनरूप कीं जडरूप असावा ? । जडरूप ह्मणतां आघवा । उपयोगु नाहीं ॥ १४ ॥ चेतनरूप म्हणतां तरी होवावें ज्ञान । ज्ञाना आपणां नव्हे भिन्नपण । मग ईश्वरावरी दोष ठेवावा पूर्ण । तरी तो आपण कां न घ्यावा ॥ १५ ॥ ज्ञानरूप नारायण । आणि ज्ञानस्वरूपचि आपण । मग दोष घ्यावया कारण । एकला जगज्जीवन पात्र कां? ॥ १६ ॥ आणि ज्ञान न देतां । उद्धरावें होतें तत्वतां । तरी मग अविद्येस ही उद्धरतां । कां न होते शक्य? ॥ १७ ॥ उद्धरावें होतें अविद्येकारण । तरी काय द्यावें होतें सत्यपण कीं मिथ्यापण । अंत्य-पक्ष तो ज्ञानावीण । सिद्ध नोहे ॥ १८ ॥ आद्यपक्ष स्वीकारितां । तरी उद्धार ह्मणजे संसार तत्वतां । त्यां तो न्यून नाहीं आतां । मग दोष तत्वतां हरीवरी नये ॥ १९ ॥ अविद्या नाहीं अक्रियाप्राप्त । कीं जे क्रियेनें होईल निवृत्त । ह्मणोनि ईश्वरोद्धारक्रिया विवक्षित । तेथ न पडे ॥ २० ॥ आणि अविद्येवरी क्रिया करितां । तरी ईश्वरासी येईल मूर्खता । जैसें रज्जुसर्पास भिवोन पळतां । तो एक मूर्ख ॥२१॥ परी रज्जुसर्पासी मारूं धांवतां । तरी ती काय म्हणावी सुविद्वत्ता । तेवीं अविद्या मिथ्या सर्वथा । तेथ उद्धारक्रिया करितां तो मूर्ख ॥ २२ ॥ यालागीं अविद्या वाटे जया । ज्ञान होणें युक्त तया । तो आपण प्रयत्न न केलिया । तरी यदुराया काय अडित ॥ २३ ॥ ननु बाळ विष भक्षितां । तरी निवारी जेवीं माता । तेवीं ईश्वर दयाळू तत्वतां । तो जगा समस्ता विनिवारू ॥ २४ ॥ तरी याचें हें उत्तर । दृष्टान्त हा विषम साचार । मायबापासी अभिमान थोर । ममत्ववृत्ति ॥ २५ ॥ तें ममत्व हरीच्या ठायीं । कदापि ही नाहीं नाहीं । यालागीं दृष्टान्त लवलाहीं । न घटेचि हा ॥ २६ ॥ अथवा दृष्टांतसम मानोनी । जेवीं विष भक्षितां बाळकांनीं । निवारिती जनकजननी । आज्ञा करूनी प्रथमचि ॥ २७ ॥ नायकतां तरी शिक्षा करिती । तैसीच आहे हरीची

स्थिती । प्रथम वेद आज्ञा करिती । प्रथम निश्चय निवारितां ॥ २८ ॥ परी वेदास हीं न मानी । तरी शिक्षा देतो यमसदनीं । तात्पर्य ' दुर्जन तोषे ' या न्यायेंकरूनि । दोष नारायणीं घटों न शके ॥ २९ जीव आपण बद्ध असतां । त्यानें प्रयत्न न करितां तत्वतां । आणि ईश्वरानें यत्न करावा ह्मणतां । येईल जीवता हरीतें ॥ ३० ॥ तरी हरीनें निर्मिले वेद । येथ कारण काय सिद्ध । तरी जीवत्व न येतां प्रसिद्ध । दया दाखविणें जितुकें शक्य ॥ ३१ ॥ तितुकी शुद्धसत्वपणें । कृपा केली नारायणें । किंवा वस्तुतः अनुभवगुणें । समाधान दुसरें ॥ ३२ जीवप्रतिबिंबापेक्षी बिंबत्वोपहितता । या अारोपें उठ तत्वतां । अहंब्रह्माऽस्मिवृत्तिसत्ता । त्याचा उपयोग सर्वथा । हरीस नाहीं ॥ ३३ ॥ अहो जेथ होईल आत्मविस्मृति । तेथ उपयोगीं पडेल ब्रह्मास्मिवृत्ति । जेथ नाहीं नाहीं आत्मविस्मृति । तेथ ही वृत्ति उपयोगीं नये ॥ ३४ ॥ आणि ब्रह्माहमस्मि ऐसी वृत्ति । शुद्धसत्वमयबिम्बत्वारोपें उठे निश्चितीं । त्याचा उपयोग जीवाप्रती । त्याचि श्रुती अवतरल्या ॥ ३५ ॥ त्या वृत्तिकल्लोळ चिदाकाशशद्ब । तेचि पैं बोलिजती वेद । हा सिद्धान्त अनुभवसिद्ध । अतितर शुद्ध ओळखावा ॥ ३६ ॥ यालागीं हरिवचनानुसारेंकरून । कामक्रोधादि सोडावें आपण । आपणचि शुद्धचित्त होवोन । हृदयीं स्थापन हरि कीजे ॥ ३७ ॥ आपणाचि सोडोनि संसारआशा । हृदयीं येऊं द्यावें जगदीशा । ह्मणजे मोकळे वृत्तींत साक्षिप्रकाशा । खेळों द्यावें स्वानन्दें ॥ ३८ ॥ ते मी जाणतें जननी ह्मणे । यालागीं श्रीकरुणाघनें । ऐकोनि सलगींचें बोलणें । हृदयीं राहणें करावें ॥ ३९ ॥ ह्मणाल कीं तूं बद्ध असतां । तुज मुमुक्षा कांहीं नसतां । मी हृदयीं कैसा प्रकटूं तत्वतां । तरी उत्तरार्थ ऐकावें ॥ ४० ॥

॥ श्लोक ॥

रुक्मिण्युवाचः— अंतःपुरान्तरचरीमनिहत्य बंधून्
त्वामुद्वहे कथमिति प्रवदाम्युपायम् ॥
पूर्वेद्युरस्ति महती कुलदेवियात्रा
यस्यां बहिर्नववधूर्गिरिजामुपेयात् ॥ ६ ॥

अंतःपुर ह्मणजे पुर्यष्टक । त्यामाजीं अध्यस्त तूं जीव देख । आणि अभिमानादिक । बंधू तुझे ॥ ४१ ॥ जेव्हां तेव्हां पाहतां । तूं पुर्यष्टक न सोडिसी तत्वतां । तेथ मी साक्षी येवोनि आतां । विवाह सर्वथा करूं केवीं? ॥ ४२ ॥ हें रूपक परी सन्निवेश । साक्ष प्रमा दे इतिहासें । ह्मणी तुज सगुणा ऐसें । वाटेल कीं हो ॥ ४३ ॥ तरी ऐका जी यदुराय । आपणा केला ज्यांचि अपाय । तरी मियांचि पुन्हा उपाय । सांगितला पाहिजे ॥ ४४ ॥ ह्मणोनि आतां तुह्मांप्रति । ही शंका न यावी कृपामूर्ति । यालागीं मत्कथितयुक्ति । ऐसी आहे ॥ ४५ ॥ तुह्मास वाटेल कीं मनीं । बंधूस मारतां क्षोभेल रुक्मिणी । परी हें योग्य नोहे चक्रपाणी । मी बंधू निर्वाणीं मानीना ॥ ४६ ॥ अहो तुह्मी बंधू मारोनि मज नेयावें । इतुके तुह्मां कष्ट द्यावें । हें मज नावडे स्वभावें । मीचि सोडितें बंधुआशा ॥ ४७ ॥ मृदुसंवेगीं जो अहंकार । तो तीव्रसंवेगीं धरूनि शरीर । रुक्मी जाहला साचार । हें मी सत्वर जाणतें ॥ ४८ ॥ माझे बंधू जे मृदुविकार । ते मी हृदयांतूनि सोडितें समग्र । तुजसाठीं उपासिले उमावर । तेथ नेवोनि अंतर ठेवितें ॥ ४९ ॥ आणि तीव्रविकारबंधुरुक्मीपासून । मी आपुलें शरीर घेतें सोडवून । तीचि आतां प्रक्रिया पूर्ण । करुणानिधान ऐकावी ॥५०॥ अहो झोपेंतूनि जागृतींत येतां । मध्यें संधींत ब्रम्ह मिळे तत्वतां । तेवीं देहगर्वशिशुपाळासी लग्न होतां । तरी पूर्व दिवशीं तत्वतां । अवश्य संधी ॥ ५१ ॥ जागृतींत देहाहंकारावरी । यावयाच्या आधीं ब्रम्हसंधी निर्धारीं । तैसी शिशुपाळासी लग्न होतां साचारी । पूर्वदिवशीं ब्रम्हरूप उमात्रिपुरारी पुजणें असें ॥ ५२ ॥ हृदयीं देहगर्व धरण्यापूर्वीं संधी । बाहेरीं शिशुपाळलग्नापूर्वीं अवधी । उमावल्लभ करुणानिधी । पूजणें कुलविधिपरंपराप्राप्त ॥ ५३ ॥ ब्रम्हसंधिप्रकाशावीण उघडे । जैसें देहावर येणें न घडे । तेवीं कुळदेवी पूजालियावीण रोकडें । लग्न न घडे सर्वथा ॥ ५४ ॥ यालागीं देहावर येतां वृत्ती । आधीं संधींत झगटे ब्रह्मस्थिति । तैसें लग्नापूर्वीं श्रीव्रजपति । उमादर्शनाप्रति जाणें घडे ॥ ५५ ॥ अहो संधींत पूर्वीं गेलियावीण । जेवीं ब्रम्हानंद न मिळे पूर्ण । तेवीं लग्नापूर्वीं उमा पूजालियावीण । नोहे कल्याण सर्वथा ॥ ५६ ॥ संधींत ध्यावया

ब्रम्हानन्दु। वृत्ती देहास सोडी जेवीं प्रसिद्ध । तेवीं उमादर्शनास जातां अशुद्ध । अंतःपुर त्यागीन मीं ॥ ५७ ॥ कूट ह्मणजे पर्वतशिखर । तैसा जो कां निर्विकार । तो कूटस्थ ह्मणावा साचार । अधिष्ठानरूप साक्षी ।५८। तया कूटस्थाची प्रभा निश्चितीं । तो कूटस्थ ज्या सांपडे संधि-स्थितीं । तो कूटस्थचि गिरिरूप निश्चितीं । यालागीं गिरिजा चिति तीचि उमा ।५९। अंतरीं साक्षिरूप अखंड । बाहेरीं अनध्यस्तविवर्त प्रचंड । मध्यें सांपडतां अहंकारधेंड । तरी त्याचे खंड कां न होती ? ॥६०॥ बद्ध बालपण माझें गेलें । साधकत्वें नववधूपण आलें । यास्तव गिरिजादर्शना वाहिलें । जात्रे लागेल मजप्रति ॥ ६१ ॥ ती कुलदेवीची यात्रा म्हणून । तेथें येतील बहुत सज्जन । जेथ सज्जन तेथ जगज्जीवन । तुज प्रगट व्हावया जाण उशिर न लगे ॥ ६२ ॥ ती यात्रा ही अविद्या नाहीं । यालागीं श्रुतीं ' द्यु ' शब्द पाहीं । विद्या ह्मणून तूं शेषशायी । प्रगट लवलाहीं होई स्वामी ॥ ६३ ॥ अहो सकळ जीव संधींत जाती । परी आशा ह्मणूनि देहावरी परतती । जे आशा सोडून संधींत जाती । ते समाधि साधिती तेथल्या तेथ ॥ ६४ ॥ तेवीं मीही सोडूनि बंधुआशा । गिरिजादर्शना येते जगन्निवासा । तरी समाधिरूपें परेशा । मज जगदीशा भेटे तूं ॥ ६५ ॥ समाधीमाजी वृत्तिरक्षण । हरीचि करी करुणाघन । हें निदिध्यासनप्रकाशावरोन । श्रोतेजना कळो कीं ॥ ६६ ॥ ह्मणोनी वृत्ति काढिते देहाहून । ते संधींत ठेविते नेवोन । तेथ तूं समाधिरूपें रक्षण । करुणाघन करावें ॥ ६७ ॥ आणि रुक्मियादिबंधुआशा । तोडूनि उमाभेटी जाते जगदीशा । तेथ सगुण तूं भेटोनि जगन्निवासा । भक्तिउल्हासा वाढवी ॥ ६८ ॥ एवं बोलेनि रुक्मिणी माय । ज्ञानभक्ती संप्रदाय । जे सकळांचीही शुद्ध सोय । तो हा होय परागू ॥ ६९ ॥ येथ ओविया तरी थोड्याचि असती । परी दृष्टांतसिद्धांताची रीति पाहतां दोन्ही सिद्धांतपंक्ती । दृष्टान्त निश्चितीं आतुळेना ॥ ७० ॥एक अंतरीं ब्रह्मानंद । तेथ दृष्टांतारोप करून प्रसिद्ध । जे बाहेरीं भक्ति अभेद । तेथ दृष्टांत आरोपिला ॥ ७१ ॥ एऱ्हवीं अंतरीं आणि बाहेरींचें । ब्रम्ह काय दोन जाहलें साचें । यालागीं दृष्टांत सिद्धांताचें । व्यर्थ वाचें बोलणें ॥ ७२ ॥ जैसें आचार्य वदले आपण । तो श्लोक येथ

प्रमाण घेवोन । मी काय बोलिलों तें किंचित् समजून । श्रोतेजन घेतील कीं ॥ ७३ ॥

॥ श्लोक ॥

आत्माऽनात्मप्रतीतिः प्रथममभिहिता सत्यमिथ्यात्वयोगात् ।
द्वेधा ब्रह्मप्रतीतिर्निगमनिगदिता स्वानुभूत्योपपत्त्या ।
आद्या देहानुबंधाद्भवति तदपरा सा च सर्वात्मकत्वात् ।
आदौ ब्रह्माहमस्मीत्यनुभवउदिते खल्विदं ब्रह्म पश्चात् ॥ १ ॥
( शतश्लोकी )

आत्मा आणि अनात्मप्रतीति । विवेकें आधीं घेतसे वृत्ति । तेथ देहादी अनात्म मिथ्या ह्मणती । आत्मचित्ती एक सत्य ॥ ७४ ॥ तेवीं देहरुक्म्यादी समस्त । अनात्मा जाणोनि यथार्थ । मी रुक्मिणी निश्चित । याहोनि वेगळी हें जाणिलें ॥ ७५ ॥ मी याहोनि वेगळी ह्मणोन । मी सत्य आहे आपण । ऐसें जाणोन रुक्मिण । अनात्मा त्यागावया-कारण उदार कीं ॥ ७६ ॥ परी आत्मप्रतीति जे बोलिली कांहीं । ती ही द्विविध असे पाहीं । प्रथम अनुभवानें होत लवलाहीं । आणि दुसरी होत उपपत्तीनें ॥ ७७ ॥ तेवीं मी वेगळी रुक्मिणी । हें मज कळलें अनुभवेंकरूनी । आणि श्रीकृष्णउपपत्ती केलिया कीर्तनीं । यालागीं उपपत्ति गुणीं हरिप्रतीति ॥ ७८ ॥ तेथ पहिली प्रतीति देहाश्रयेंकरून । देहत्रयातें वेगळें टाकून । मी ब्रह्म आहे ऐसा पूर्ण । अनुभव होय ॥ ७९ ॥ मग सर्वव्यापक ब्रह्म निश्चितीं । ऐशा साधूनि नाना उपपत्ती । सर्वदांही स्वानुभूति । 'खल्विदं ब्रह्म' या श्रुतीं सांपडे ॥ ८० ॥

"आत्माऽरे द्रष्टव्यः श्रोतव्यो मंतव्यो निदिध्यासितव्यः"
( बृहदारण्यक. )

आधीं आत्मदर्शन । अनंतर श्रवणमननिदिध्यासन । ऐसें बृहदारण्यकीं वचन । याज्ञवल्क्यमुनीचें ॥ ८१ ॥

'आधीं आत्मयातें जाणावें । मग तयातें साधावें । एऱ्हवीं नुसतें अनुभवावें । काय धरूनी' ॥ ( परमामृत अ. २ ओं. ९ )

हें श्रीमुकुंदराज । परमामृतीं बोलिले सहज । 'ज्ञानाद्धयानं विशिष्यते' अस्मत्कांतराज । बोलिले ऐसें ॥ ८२ ॥

॥ श्लोक ॥ ' ब्रह्मभूत: प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् '॥ (भगवद्गीता.)

ऐसी पुन्हा कांतोक्ती आहे । आणि 'क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ती आहे । तें अनुभवाचिजोगें ' हें तातवचन ॥ ८३ ॥ ' विभाति यस्य भासा। सर्वमिदं' हा ऐसा । श्रुति काय वायसा । ढेंकरू देती? ॥' ( अमृ० प्रक० ७ ओवी २९० )

ऐसी श्रीगुरुतातवाणी । अनुभवामृतीं अनुभवखाणी । यालागीं प्रत्ययें रुक्मिणी । झाली निर्वाणीं एवंविध ।८४। यें अध्यायीं जें अंतरींचें ज्ञान । बोलिलें दृष्टांतारोपेंकरून । तें अनुभवानें होवूनि रुक्मिण । मग उपपत्त्या सिद्धांतभूत कृष्ण वरूं पाहे ॥ ८५ ॥ आधीं अनुभवें ब्रह्म जाहली । मग सर्व व्यापक ब्रह्मपणाची खोली । लग्नें वरूनि वनमाळी । मिळणी केली अवाचित ॥ ८६ ॥ तें अनुभवानें संधींत जाणलें ब्रह्म । आणि सर्वव्यापक कृष्ण मिळवावया उपपत्ति उमा । परी त्या उपपत्ती ही चेतनप्रतिमा । या लागीं कृष्ण रुक्मिणी आणि उमा भिन्न नव्हती ॥ ८७ ॥ इकडे मित्र हरिहर । दोन्ही एकरूप साचार । इकडे उमा रुक्मिणी निर्धार । दोन्ही प्रकार एकरूप ॥ ८८ ॥ अनध्यस्त पुंविवर्ती शिवचक्रपाणी । अनध्यस्त स्त्रीविवर्त उमारुक्मिणी । स्वानंद सुखें पाहता निर्वाणीं । भेद लाजोनि हारपला ॥ ८९ ॥ 'जेणें देवें संपूर्ण देवी । जियेवीण कांहीं ना तो गोसावी । किंबहुना एकोपजीवी । एक-एकांची ' ॥ ९० ॥ ( अमृतानुभव प्रक. १ ओवी १० ) हें स्वामी श्रीगुरुचें वचन। आणि अनुभवही ऐसाचि पूर्ण । यालागीं अनुभवे ब्रह्म होऊन । उपपत्ति पूर्ण साधित ॥ ९१ ॥ अनुभवें ब्रम्ह जाहली निश्चितीं उपपत्ति पाहिजे ब्रह्मसजाती । मी रुक्मिणीरूपें युवती । उमा सजाती माझिया ॥ ९२ ॥ सजातीय अनुभव सजातीय उपपत्ती । मग कां न सांपडेल अंतरबाह्य व्यापकचित्ती । यालागीं उमेजवळीं येतां श्रीपती । प्रगट निश्चितीं तुह्मी व्हावें ॥ ९३ ॥ एवं रुक्मिणीचें वचन । इयें परागीं स्पष्ट केलें यथाज्ञान । पुढें जननीच स्वानंदबोलण । तें श्रोतीं सावधान परिसावें ॥ ९४ ॥ ऐसी स्थिति ही असूनी । जरी तूं न भेटशील चक्रपाणी । तरी हा मार्ग सोडूनी । मी विषयीं न पडे

कदा ॥ ९५ ॥ अनंत जन्म घेऊनी । हाचि अधिकार मिळवीन निर्वाणीं । संयोगीं वियोगोपलालन निर्गुणप्रत्ययाश्रयेंकरूनी । बोलेल जननी पुढील श्लोकीं ॥ ९६ ॥ श्रीज्ञानेश्वर माय माउली । तियेचीं वंदूनि पाउलीं । भक्तिज्ञानकमळमाळ अर्पिली । चरणीं प्रेमें ॥ ९७ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे श्रीभगवद्भक्तिसौरभे अपूर्वभक्तिज्ञानसमन्वयो नाम सप्तमः परागः ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

## ॥ अष्टमः परागः ॥

॥ श्लोक ॥

रुक्मिण्युवाचः— यस्यांघ्रिपंकजरजःस्नपनं महांतो ॥
वाञ्छन्त्युमापतिरिवात्मतमोऽपहत्यै ॥
यर्ह्यंबुजाक्ष न लभेय भवत्प्रसादं ॥
जह्यामसून्व्रतकृशान् शतजन्मभिः स्यात् ॥ ७ ॥

जय जय सद्गुरो करुणामूर्ते । जय जय सद्गुरो विमलकीर्ते । जय जय सद्गुरो अविकुंठस्फूर्ते । चैतन्यदीप्ते तनुजजननी ॥ १ ॥ जय जय सद्गुरो विज्ञानगम्य । जय जय सद्गुरो परम अनुपम्य । जय जय सद्गुरो कैवल्यरम्य । निजजनसाम्य सुखप्रद ॥ २ ॥ जय जय सद्गुरो अक्षय । जय जय सद्गुरो चिन्मय । जय जय सद्गुरो निरस्ततनुत्रय । जय मायापनय शरणशरणा ॥ ३ ॥ जय जय सद्गुरो निरभिधान । जय जय सद्गुरो कल्याणनिधान । जय जय सद्गुरो विश्वाधिष्ठान । स्वसंवेद्य दृष्टिरूप ॥ ४ ॥ जय जय सद्गुरो षड्भगमेरो । जय जय सद्गुरो नतसुरतरो । जय सत्यज्ञानानंत सद्गुरो । स्वीयसाकार निराकृते

॥ ५ ॥ जय जय सद्गुरो माय बहिणी । जय जय सद्गुरो अपवर्गदानी । मम मस्तकीं करुणापाणी । ठेऊनि वाणी अधिष्ठी ॥ ६ ॥ तनुमनाचें करोनी श्रवण । चतुर श्रोतें सावधान । पुढें जगज्जननीवचन । भवरसायन श्रवण कीजे ॥ ७ ॥ सामान्यचैतन्य जें होय । तें भ्रमासी देत सत्तासोय । आणि विशेषचैतन्य जें होय । तें निवर्तक पाहे भ्रमातें ।८। सामान्य आणि विशेष कांहीं । चैतन्यामाजीं भेद नाहीं । परी उपाधिभेद लवलाहीं । उपहितीं भासे ॥ ९ ॥ उपाधि उपहित दोन्ही । समसत्तेंत नाहींत ह्मणोनी । न सांपडे द्वैतकहाणी । परी स्वसत्ताभेदभानीं उपाधि वर्ते ॥ १० ॥ उपाधिवृत्ति प्रातिभासिक । यालागीं उपहितभेद प्रातिभासिक । येथ कोणी होती साशंक । कीं चैतन्य वृत्ति उपाधिक दृष्टि ह्मणिजे ॥ ११ ॥ विशेषचैतन्यही वृत्ति उपाधिक । यालागीं तें दृष्टिरूपक । मग शुद्ध ब्रह्म जें अखंड एक । तें होईल दृष्टिसृष्टि । १२ । तरी येथ समाधान । श्रोतीं ऐकावें दत्तावधान । उपाधिकृत कल्पितभेद जाण । द्विविध असे ॥ १३ ॥ स्वाधीन आणि उपाध्यधीन । जेवीं सूर्यी बिंबत्वभेद जाण । तो भेदइव परी सूर्याधीन । जलोपाध्यधीन प्रतिबिंबत्व भेद ॥ १४ ॥ तैसा सामान्यविशेषचैतन्यभेद । तो कल्पितचि परी विद्यासिद्ध । यालागीं चेतन स्वाधीन शुद्ध । ह्मणोनी दृष्टिरूपबंध तो नव्हे ॥ १५ ॥ जीवही कल्पितत्वें भिन्न । परी तो अविद्यावृत्त्युपाध्यधीन । ह्मणोनी दृष्टिरूपबंधन । तयाचें ठायीं ॥ १६ ॥ यास्तव भ्रमनिवर्तक विशेषचेतनीं । नाहीं दृष्टिसृष्टित्व संपादनी । आणि विद्याकृतस्वाधीनभेद एकें चेतनीं । बोलिले मुनी ब्रह्मविद ॥ १७ ॥

'आनंदो विषयानुभवो नित्यत्वं चेति सन्ति धर्मा ब्रह्मणोऽपृथक्त्वेऽपि पृथगिवावभासंतइति ' ( पंचपादिका )

आनंद चैतन्य आणि सत्ता । हे तंव अभिन्नची सर्वथा । परी विद्याकृतस्वाधीनभेदें तत्वतां । पृथगिव भासती ॥ १८ ॥

चूर्णिकाः— बाधाभावविशिष्ट सत्ता । वृत्त्यवच्छिन्नचित् ज्ञानवत्ता । प्रीत्यवच्छिन्न आनंदता । परी एकीएकता मोडेना ॥ १९ ॥ सूर्य आणि प्रकाश दोन्ही । भिन्न मात्र दिसती नयनीं । परी सूर्य काय प्रकाशावांचोनी । वेगळा आहे ? ॥ २० ॥ सोनें आणि त्याची कांती ।

कीं रत्न आणि त्याची दीप्ति । इंद्रियउपाधीनें भिन्न भाती । एऱ्हवीं निश्चितीं एकींएक ॥ २१ ॥ वस्तु एक असोनी तिचें ठायीं । भेद नसो-नी भेदभान पाहीं । उपाधीनेंच लवलाहीं । होत असे ॥ २२ ॥ तैसें सच्चिदानंद एकींएक । परी वृत्त्युपाधीनें भिन्न देख । तैसी मी तुझे ठायीं एकींएक । वृत्त्यवच्छिन्न ज्ञानमयी ॥ २३ ॥ परी ' एकाकी न रमते ' या श्रुति । प्रीत्यवच्छिन्न तूं विश्वपती । तुज प्रीत्यवच्छिन्न मी श्रीपति । मज प्रीत्यवच्छिन्न आनंदमूर्ती तूं ॥ २४ ॥

' जेणे देवें संपूर्ण देवी । जियेवीण कांहीं ना तो गोसावी । किंबहुना एकोपजीवी । एकएकांची '॥ ( अमृ. प्रक. १ ओ. २ )

' जो प्रियूची प्राणेश्वरी । उलथे आवडीचें सरोभरी । चारुस्थ-ळीं एकाहारी । एकांगाचा'॥ ( अमृ. प्रक. १ ओ. १० )

' आवडीचेनि वेगें । एकएकातें गिळिताहे आंगें ' ॥ ऐसें तात-वचन चौरंगें । अनुभवा आलें ॥ २५ ॥ व्यतिरेकज्ञानें स्वानंदभान । परी तूं अन्वयें प्रीत्यवच्छिन्न । अनध्यस्तविवर्त म्हणोन । वेधलें मन पैं माझें ॥ २६ ॥

' देव देऊळ परिवारू । कीजे कोरूनी डोंगरू । तैसा भक्तीचा व्यवहारू । कां न व्हावा ? ' ॥ १ ॥ ( अमृतानुभव )

' ऐसिया स्वामिभृत्यसंबंधा- । लागीं उठती श्रद्धा । तरी देवोचि नुसुधा । कामविजे' ॥ १ ॥ ( अमृता. प्रक. ९ ओ. ३८ )

' शिवो भूत्वा शिवं यजेदिति' । ' यं सर्वे देवा नमंति मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्च ' पुनश्च ही श्रुति । ' समस्तसर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते परामिति ' । जागृच्छ्रुति तव वचन ॥ २७ ॥ ' आम्हां भोग मोक्षाच्या ठायीं । इये श्रीमूर्तीवांचोनि नाहीं ' । हें तातवचननवाई । निश्चयदात्री ॥ २८ ॥

" तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें नोहे । बोला ऐसें " ॥ ( अमृ. )

अहो जेविलेंचि जेवावें । तैसें सेविलेंचि सेवावें । तरीच तें स्वभावें । अविट होईल ॥ २९ ॥ ब्रह्मानंद अविट पूर्ण । त्याची कैसी काय खूण । तें नकळेचि भक्तीवीण । न घडे सेवन पुनः पुनः ॥ ३० ॥

केवळ ज्ञानी जे होती । तेही निर्गुणानंद घेती । परी तेथें अन्वयव्याप्ती सांपडेना ॥ ३१ ॥ ह्मणोनी अनध्यस्तविवर्त । प्रीत्यवच्छिन्न आनंद निश्चित । तूं परमात्मा अखंड शांत । मी तुझें इच्छित अंगलग्न ॥ ३२ ॥ प्रीतिवृत्तिसंधींत निर्गुणानंद । प्रीतिवृत्तिस्थ सगुणानंद । एवं निःशेष आटला भेद । ब्रह्मानंद चहूंकडे ॥ ३३ ॥ तुझा वियोग तेव्हां प्रीतिवृत्तिसंधि । संयोग तेव्हां प्रीतिवृत्त्यानंदी । अथवा संयोग वियोग प्रीतिवृत्त्यानंदीं । समाधान संधीं अक्षय ॥ ३४ ॥ ह्मणोनी सख्या मनमोहना । वृत्ति लंपट तुझ्या चरणा । मज भेद नाहीं जन्म मरणा । आधिकारिकपणा ह्मणोनी ॥३५॥ अथवा तुज मज नाहीं भेद । तुज अवतारद्वेष नाहीं हे प्रसिद्ध । ह्मणोनी तुझ्या भक्तीस्तव शुद्ध । मजही जन्मविनोदद्वेष नसे ॥ ३६ ॥ तूं भेटतांही जगन्मोहना । मी नित्यचि आहे तुझी अंगना । परी तुझिया वियोगदर्शेतही जगज्जीवना । मुक्त असोनि नानाजन्म घेईन तुजसाठीं ॥ ३७ ॥ म्हणाल आटलिया भवकारण । पुनः जन्म कैसा उत्पन्न । तरी अनध्यस्तविवर्तपण । विरुद्ध नाहीं जाण ब्रह्मातें ॥ ३८ ॥ इतर जीव जे होती । त्यांस जन्म नाहीं झालिया मुक्ति । कारण अविद्या ही निश्चितीं । ब्रह्मज्ञानविरोधी ह्मणोनी ॥ ३९ ॥ परी अनध्यस्तविवर्तता । ज्ञाना विरोधी नाहीं तत्वतां । ही 'निदिध्यासनप्रकाशीं' वार्ता । निरूपिली ॥ ४० ॥ ह्मणोनी जन्माचा द्वेष नाहीं । परी जन्म घेवोनी राहीन तुझिया पायीं । ऐसा आपुला अभिप्राय पाही । भीमकी आई बोलत ॥ ४१ ॥

यस्येति— यत्तदोर्नित्यसंबंध ह्मणोनी । तत्पदाचिया अनुगुणीं । निःशेष लक्ष्यसंबंधेंकरूनी । यच्छद्बवाहनीं बैसले ॥ ४२ ॥ लक्षणावृत्ति तत्पदार्थू । जो त्वंपदलक्ष्यें परमार्थू । तोचि तूं अनध्यस्तविवर्तू । परमपरेशू परेशा ॥ ४३ ॥ ह्मणोनी ज्या तुझें मनमोहना । चरणसरोरुहमधुपाना । आत्मारामही जगज्जीवना । वृत्त्यनुगुणा अनुसरले ॥ ॥ ४४ ॥ ध्रुवमुखींची सम्मती । तीचि आठवूनि चित्तीं । आत्मारामही जगत्पति । धरिती वृत्ति तव पदाकार ॥ ४५ ॥

॥ श्लोक ॥ या निर्वृतिस्तनुभृतां तव पादपद्म-

ध्यानाद्भवज्जनकथाश्रवणेन वा स्यात् ।

सा ब्रह्मणि स्वमहिमन्यपि नाथ माभूत्
किंत्वन्तकासिलुलितात्पततां विमानात् " ॥
( श्रीमद्भागवत. )

तुझिया चरणाविणें हारि । आत्मरूपीं कळाकुसरी । केलियाही अहं-कारीं । नव्हे निर्धारीं मुक्तता ॥ ४६ ॥ येथ आशंकिती कोणी । वृत्ति अज्ञान कार्यपणीं । ब्रह्मज्ञान होताक्षणीं । वृत्ति होय समूळ मिथ्या ।४७। यास्तव अनध्यस्तविवर्ती । कदा जडे न शके वृत्ति । अहो मिथ्यावृत्त्या केलिया भक्ति । तरी आसक्ति ह्मणिजेल ॥ ४८ ॥ ह्मणवोनी झालिया ब्रह्मज्ञान । कदापि नुरे सगुणभजन । परी हें बाग्फळ वचन । तुझे चरण न ध्यातां ॥ ४९ ॥ वस्तू जेव्हां दोन असती । तत्संस्कारावच्छिन्न भ्रांती । तेव्हांचि अज्ञानकार्यप्रतीति । अधिष्ठानस्थिति भेद पावे । ५० । आणि एकाचि अधिष्ठान संस्कार । भ्रांतीनें भासला हे प्रकार । तरी तो भिन्न न होय साचार । तात निर्धार वदती ऐसें ॥ ५१ ॥

' नातरी चंद्र एकू असे । तो व्योमीं दुणावला दिसे । तें तिमिर-कार्य जैसें । तिमिर नव्हे' ॥ ( अमृ० प्रक० ७ ओ० ४५ )

**टीका**—तैसें अज्ञानाचें कार्य जाण । परी तें न ह्मणिजे अज्ञान । दिसे अधिष्ठान समान । ह्मणोनियां ॥ ५२ ॥ अहो ! पाणियावरी निश्चिती । वायूचें कार्य तरंग होती । परी ते वायू नसोनी असती । पाणीचि जैसें ॥ ५३ ॥ तेवीं चेतनीं अज्ञानकार्यवृत्ति । परी प्रकाशक-त्वास्तव ती चिती । यालागीं अज्ञानकार्यवृत्ति । अज्ञान नोहे ॥ ५४ ॥ येच विषयीं प्रमाण । श्रीमुकुंदराजवचन । संशय करावया छिन्न । समाश्रयिजे ॥ ५५ ॥

' कापुसापासूनि दोरा । होय परी तो कापूस खरा । तेवीं मन बुद्धि चित्त अहंकारा । होणें स्वरूपापासुनी ॥' ( परमामृत. )

तात्पर्य देवा चित्तवृत्ति । चैतन्याच्या विरोधी नसती । वृत्तिब्रह्मानुभवीं वृत्तिव्याप्ति । मानिती वेदांती निश्चयें ॥ ५६ ॥ फलव्याप्तिरहित वृत्ति । ब्रह्मानुभवीं मानिती । जरी ती चैतन्यविरोधि असती । तरी सच्चित्सुख-स्थिति प्रगटतीना ॥ ५७ ॥ अविरुद्ध चेतनीं वृत्तिव्याप्ति । आणि अवि-रुद्ध तूं अनध्यस्तविवर्ती । ज्ञानीं जंव अविरुद्ध राहे वृत्ति । तरी

अविरुद्ध भक्ति नको कां ? ।। ५८ ।। ज्ञानांत राहे वृत्तिव्याप्ति । परी न भेडे व्यतिरेकस्थिति । तेची अन्वयें देखावया पुढतीं । अविरुद्ध भक्ति तुझी प्रिया ।।५९।। अध्यस्तविवर्तांचा व्यतिरेक । अध्यस्तविवर्तीं अन्वय देख । यालागीं ज्ञान झालियाही सम्यक । तूं जगन्नायक परमप्रिय ।। ६० ।। व्यतिरेकीं वृत्तिव्यापन । तेंचि बोलिजे वाचारमण । तें फिटा-वया अहंपण । अन्वयें तव चरण सेवणें ।। ६१ ।। यालागीं सख्या तव पदकमळ । ध्यानीं न आणतां परम विमळ । जंव तुझिये ठायीं नाहीं प्रेमळ । तंव विज्ञानबळ सुख नेदी ।। ६२ ।। तुझिया चरणाचें मंगळ ध्यान । तुझिया भक्ताचें सुगुणगान । येथ जी लाधे तृप्ति पूर्ण । ते ज्ञान-संपन्नपणें नव्हे ।। ६३ ।। ऐसी ज्ञानियाची स्थिती । मग पुसे कोण स्वर्गाप्रती । यास्तव स्वामिन् तव पददीप्ति । पाहुनी चित्तीं प्रीति वाढे ।।६४।। मेला तो न ये पुढतीं । परी आशा नसोनी लोक रडती । तुझी आशा असोनी न हळहळती । हेंचि आश्चर्य वाटतें।६५। संसारीं निश्चयें नाहीं सुख । तुजची भजती उत्तमश्लोक । तथापि न वळती मूर्ख । हेंचि आश्चर्य वाटतें ।। ६६ ।। स्वस्त्रीचें वर्तन न कळूनी । विश्वास ठेविती उत्तम म्हणुनी । परी लाजती नमाया तव चरणीं । हेंचि आश्चर्य वाटतें ।। ६७ ।। सदा मौन राहोनी चित्तीं । अंधविश्वासें व्यवहार करिती । तुजवरी मात्र श्रद्धा न ठेविती । हेंचि आश्चर्य वाटतें ।।६८।। तर्कावयव ग्रहण करिती । परी अवयवीं विश्वासिती । तुजची एका न मानिती । हेंचि आश्चर्य वाटतें ।। ६९ ।। असो इतरांची कथा । एकत्वें मी गोपीनाथा । चरणीं सदा वाहतें माथा । मानोनी स्वकांता अंगिकारा ।। ७० ।। तुझिया चरणाची रजधूळ । घ्यावया श्मशानीं जाश्वनीळ । बैसोनी आवडी ओढवी भाळ । एकत्वें प्रेमळ पूर्णपणें ।। ७१ ।। प्राण-प्रिया मनमोहना । भेद नाहीं तुज त्रिनयना । तथापि तव पदांगुष्ठ-जीवनां । कैलासराणा मस्तकीं धरी ।। ७२ ।। परमाणूमांदी ब्रह्मस्फुरण । प्रियजनप्रेम तेंची जीवन । तेथ अनध्यस्तविवर्त तव चरण । पंक-जाभिधान यास्तव ।। ७३ ।। तद्रज म्हणजे परम राग । परी चिदविरो-धास्तव न बंधनांग । यालागीं वांछिताती चांग । शिवादिभृंग रसवेत्ते ।। ७४ ।। तमोपहितत्वें कार्यकरण । परी तैसेंची भक्त करिती ध्यान

। त्यांना तो तम न बाधावा ह्मणून । शिव तव चरण आठवी ॥ ७५ ॥ शिवा न सुटे ध्यानबेडी । नारद वीणा तो न सोडी । सनकादिकांची बुद्धि वेडी । प्रेमगोडी घेतघेतां ॥ ७६ ॥ योगामाजीं शिवासमान । ज्ञानामाजीं ब्रह्मपूर्ण । परी आत्मतमरूप वाचाऋण । फेडावया चरण ध्याती तुझे ॥ ७७ ॥

' आणि ज्ञान बंधु ऐसे । शिवसूत्राचेनि मिषें । ह्मणितलें ऐसें । सदाशिवें ' ॥ ( अमृ० प्रक० ३ ओ० १६. )

' आणि वैकुंठींचेनिही सुजाणें । ज्ञानापाशीं सत्वगुणें । बांधिती हे बोलणें । बहु केलें ' ॥ ( अमृ० प्रक० ३ ओ० १७. )

' तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपुली भ्रमा । करीतसे सोहंमा । ऐसा बंधू ' । ( अमृ० प्रक० ३ ओ० २३. )

एवं तातवचन प्रमाण । ज्ञानपाश सत्वगुण । तो आत्मदृष्टया तमाचि ह्मणून । वाचाऋण बोलिजे ॥ ७८ ॥ यद्यप्यज्ञान नोहे वृत्ति । ह्मणोनी साजेना तमस्त्वउक्ति । तथापि व्यतिरेकीं अल्पास्थिती । ब्रह्म-दृष्टया निश्चिती । ह्मणुनी तम ॥७९॥ तो आत्मतम निवारावया । महंत लंपटती तव पाया । तेथ मी होऊं पाहतां जाया । केवीं अन्याया करी-तसे ॥ ८० ॥ अतो हृन्मानसराजहंसा । न मिळतां तव प्रसादधिवंसा अनंतजनिमरणवळसा । सोसेन वीरेशा तुजसाठीं ॥ ८१ ॥ तूं परमात्मा परिपूर्ण । तुज नाहीं जनन मरण । हें काय बोलणें परी त्वच्चरण । ध्याती तज्जनिमरण निवारिसी ॥ ८२ ॥ प्रभो जनिमरण तुज नाहीं । हें तव सत्ताज्ञान पाही । आणि सत्ताश्रयें लवलाहीं । अविद्या राही अनिर्वाच्य ॥ ८३ ॥ सत्ताश्रयें राहे अज्ञान । ह्मणोनी ती नको पृथक्त्वेंकरोन । आणि चेतनाश्रय राहे ज्ञान । परी तेथही अभिमान निवटेना ॥ ८४ ॥ यालागीं पृथक्त्वें नको चिती । आतां तुझी आनंद-स्थिती । तेथ निरपेक्ष जडे प्रीति । अकृत्रिमभक्ति जगद्गुरो ॥ ८५ ॥

' कोणी एक अकृत्रिम । भक्तीचें हें वर्म । योगज्ञानादि विश्राभ । भूमिका हे ' ॥ ( अमृ० )

एवं तातवचनानुगुणें । अक्षय तव प्रेमाचें लेणें । तयापुढें वाटे उणें । कैवल्यही ॥ ८६ ॥ ज्ञान नसोनी कमलापती । विषयीं परमानंदा-

न्विती । लेशमात्र पाहोनी भुलती । पामर विषयीं कृतिवेत्ते ॥ ८७ ॥ मानुषानंदापासोनि निश्चित । हिरण्यगर्भानंदपर्यंत । ज्या आनंदलेशें समस्त । आनंदमय ।८८। त्या लेशानंदासाठीं । कित्येक तपती तपें कोटी । वाजिमेधादि हुटहुटी । याचिकारणें ॥ ८९ ॥ एवं लेशानंदान्वयें-करून । विषयपंकीं फसती जन । पूर्णानंदान्वय तूं सगुण । श्रीकृष्ण अनध्यस्तविवर्त ॥ ९० ॥ त्या गोविंदा तुझ्या पायीं । समर्पाया वाङ्मन-डोई । कवण धात्रीनी येणार नाहीं । जरी असलाही ब्रह्मनिष्ठ ॥ ९१ ॥

॥ श्लोक ॥ निवृत्ततर्षैरुपगीयमानात्
भवौषधाच्छ्रोत्रमनोभिरामात् ॥
क उत्तमश्लोकगुणानुवादात्
पुमान्विरज्येत विनाऽपशुघ्नात् ॥ १ ॥
( श्रीमद्भागवत. )

अखंडैकरसपणें जया । न दिसे नारीमनुजकाया । आघवीच गेली लया । विषयतृष्णा जयांची ॥ ९२ ॥ प्रभो ! तुझिया प्रेमापुढें । जया मोक्षही तो नावडे । प्रार्थिती ऐसें रोकडें । गद्गदहृदयें ॥ ९३ ॥

॥ श्लोक ॥ ' प्रल्हाद गर्भी हरि आठवीला ।
त्याकारणें नारद पाठवीला ॥
मुक्तींतही प्रीति न देव दावी ।
त्या मुक्तिची गोष्टहि कां वदावी ? ॥ १ ॥
जहीं पांख पक्षी पिल्यांच्या निघालीं ।
न माता मुखीं अन्न आणोनि घाली ॥
क्षणीं ज्ञांकिसी पक्क होतां कृपा हे ।
ज़ळो पक्कता ती तिला कोण पाहे '॥ २ ॥
( वामन . )

तुझे चरणीं जें कैवल्य यदुपति । त्याची तों वैरियाही प्राप्ति । परी तुजवरी जे करिती प्रीति । त्यांप्रति अपवर्ग योग्य नव्हे ॥ ९४ ॥ तूं जरी समान सर्वांभूतीं । तरी भक्तहृदयीं अधिक स्थिती । हें तूंचि बोलिलासी निश्चितीं । मनमोहना ॥ ९५ ॥

॥ श्लोक ॥

' समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ' ॥
( भगवद्गीता. )

॥ पद ॥

मी सर्वत्र समान । पार्था ॥ धृ० ॥
शत्रु मित्र मज नाहीं कोणी । नेणें मान गुमान ॥ १ ॥
वैरियाहि मी निजपद देतो । करुनी निरभिमान ॥ २ ॥
परि मजमाजीं ते मी त्यांतचि । ज्या मद्भक्ति प्रमाण ॥ ३ ॥
श्रीज्ञानेश्वरनंदिनिवल्लभ- । वचन वारि मद मान ॥ ४ ॥

॥ ओव्या ॥

एवं प्रिया ! तुझें वचन । भक्तां आधिक्य साम्याहून । ह्मणसी अद्वैतीं अधिकपण । घातक पूर्ण तरी सत्य ॥ ९६ ॥ तथापि कळलिया अधिष्ठान । अध्यासनिवृत्ति तंव समान । परी हेम कळोनी लेणें भूषण । ते आवडी पूर्ण आत्रेटाचि ॥ ९७ ॥ तैसें ज्ञान होईल ज्या । सखिया अपवर्ग मिळेल तया । परि ब्रह्म जाणोनी भजती तव पाया । ते सजीव काया अतिधन्य ॥ ९८ ॥ ह्मणोनी निवृत्तराग । परी त्यांचा तव पदीं अनुराग । गद्गदहृदयें तुज चांग । गाती सांग सप्रेम ॥ ९९ ॥

॥ श्लोक ॥

' वाणी गुणानुकथने श्रवणौ कथायां ।
हस्तौ च कर्मसु मनस्तव पादयोर्नः ॥
स्मृत्यां शिरस्तव निवासजगत्प्रणामे ।
दृष्टिः सतां दर्शनेऽस्तु भवत्तनूनाम् ' ॥
( श्रीमद्भागवत. )

॥ अभंग ॥

केशव माधव गोपाळ गोविंद । अक्षय प्रबंध आठवावे ॥ १ ॥
अंतरीं दीनता बाहेरीं सरळ । वदावें केवळ हरिगुण ॥ २ ॥
आइकावें कानीं कथा भागवत । सांडोनी गवतज्ञानगर्व ॥ ३ ॥

पाणिद्वयें पूजा तुझी केशवराजा । मनोभाव माझा पायावरी ॥ ४ ॥
बुद्धि करो तुझी सदा आठवण । विश्वनारायण पाहोनीयां ॥ ५ ॥
विश्वनमस्कारा लागो माझें शिर । जेथ शार्ङ्गधर वस्ति तुझी ॥ ६ ॥
सावळें सुंदर दिसो डोळेभरी । तुझ्या तनू हरि संत तेही ॥ ७ ॥
सर्व श्रमहारी सज्जनांचे पाय । आणिक उपाय नाहीं नाहीं ॥ ८ ॥
हारपोनि स्वामी सर्व देहभाव । ताऊ ज्ञानदेव हृदि राहो ॥ ९ ॥

॥ ओव्या ॥

एवंविध गुणानुगानें । मुक्तां तुझे भाट होणें । ऐसें मत्परमार्थ-जनिदानें । बोलिलीं वचनें सुखमय ॥ १०० ॥

' विषय जिणोनि जन्मले । जे शुकादिक दादुले । ते विषयचि वर्णितां झाले । भाट जयाचे '॥ ( ज्ञानेश्वरी. )

एवं निवृत्तराग ते तुज गाती । तव नामभेषजें भवरोगी तरती। हालहलत्रस्त पार्वतीपति । तव नाम श्रीपति अगद सेवी ॥ १ ॥ कृष्ण व्रजनाथ मेघश्याम । प्रियप्रेम कृष्णद्रुम । हीं नामें श्रोत्रमनो-भिराम । आत्माराम प्राणप्रिया ॥ २ ॥ जय मम हृदयरसरक्षका । जय अतिजनशोकहारका । जय लोकनिवास उत्तमश्लोका । तव गुण कां पुरे ह्मणवती ॥ ३ ॥ उत्तर या प्रश्नाचें । गूढ तुझें तुज साचें । जें प्रेम कळोनी प्रेमाचे । उद्गार न वदवती ॥ ४ ॥ यास्तव सखया तुझिया गुणीं । विरक्त न होय सर्वथा कोणी । तेथ मी होऊं इच्छितां कामिनी। नव्हे चक्रपाणि अपराध ॥ ५ ॥ आनंदान्वयें तुझा प्रेम । हाचि प्रसाद तपोदुर्गम । मज न मिळतां पुरुषोत्तम । अनंत जन्म करीन सेवा ॥ ६ पाषाणजन्मीं भक्तभूषणा । पायरी होईन तव मंदिरांगणा । करोनि तव प्रियपदरजस्नाना । तुज मनमोहना मिळवीन मी ॥ ७ ॥ वृक्षजन्मीं जगत्पति । पर्णछाया तव चरणावरुति । अथवा तव जनां निववोनि प्रीति । परी तुज श्रीपति मिळवीन ॥ ८ ॥ पावतां काकजन्मप्रतिष्ठा । भगवन् भक्षूनि तुझी विष्ठा । साधोनियां परमकाष्ठा । मेळवीन तुज स्वामी ॥९॥ पावतां साळिकाजन्म । गोविंद मुकुंद घनश्याम । हींचि नामें अतिउत्तम । गात्रोत्ति प्रेम अर्पीन तूतें ॥११०॥ पशुजन्म पावतां मन-

मोहना । दुग्धें अभिषेकीन तव चरणा । मनुष्यजन्म पावतां नारायणा । करीन तव भजना रात्रंदिन ॥ ११ ॥ ऐसे जन्मशतांचे शत । कल्प अनंताचे अनंत । होवोत कां कितीही आवर्त । परी राहीन आर्त तुझ्या-स्तव ॥ १२ ॥ एवं अंतरीं बाहेरीं संयोग । लालन तो प्रेममय वियोग । जाणोनियां इंदिरारंग । वाचीत चांग पत्रिका ॥ १३ ॥ पत्र वाचितां जगत्पति । अष्टभाव अंगीं दाटती । श्रीकृष्णपण विसरूनि प्रीति । सुदेवाप्रति हृदयीं धरी ॥ १४ ॥ धन्य भाग्य सुदेवाचें । आलिंगनप्रेम जें भीमकीचें । तें आधीं पावला साचें । सुख अनिर्वाच्य न वर्णवे ॥ १५ ॥ हृदयीं धरितांचि सुदेव । आपणां विसरला वासुदेव । परी तो विस्मृतीचा स्वभाव । स्वानंदभाव उमटला ॥ १६ ॥ जड सात्विकांचिया मति । होती कृष्णपणा वृत्ति । रुक्मिणी भेटतां चैतन्यबुंथी । आनंदें विस्मृति कृष्णपण ॥ १७ ॥ तो समष्टिचिदानंदभाव । अंतरीं बाहेरीं सावेव । कुंडिनपुरा यास्तव यादवराव । पातले स्वयें ॥ १८ ॥ गोपींनीं पूजिली कात्यायनी । तेवीं अंबिका पूजी रुक्मिणी । मग अंबिकादत्त माळा घेउनी । घातली नेवोनी कृष्णगळां ।१९। रुक्मिणी मीनलिया गोपाळा । भिन्न कैंची राहेल माळा । अंतरींचा जो प्रेमउमाळा । तो बाहेरीं माळामय झाला ॥ १२० ॥ तंव आश्चर्य जाहलें येथ । अंतरीं चित्सुखबंधन जें गुप्त । तें प्रकट दाविलें यथार्थ । जडमाळिकेनें ॥ २१ ॥ आतां पुढें काय जाहलें । रुक्मिणी कृष्णा समत्व आलें । श्रोते ऐकोनियां वहिले । होऊनि राहिले प्रेममय ॥ २२ ॥ आतां हा एवढा ऐसा । परिहार[1] देऊं कायसा । प्रभुप्रभावविन्यासा । आड ठाउनी ॥२३॥ ग्रंथकर्त्री विश्वजननी । माझी ज्ञानेश्वर करुणाखाणी । उगी निमित्तपणाची काहणी । तेही चरणीं समर्पिली ॥ २४ ॥ जय जय सद्गुरो जगज्जीवना । जय जय सद्गुरो विश्वभूषणा । जय जय सद्गुरो निर्माय सुगुणा । कौतुकघना परमेशा ॥ २५ ॥ जय जय सद्गुरो मायाविहिणी । जय जय सद्गुरो कैवल्यदानी । मज जन्म जन्म ठेविजे चरणीं । ज्ञानेश्वरजननी कृपाळे ॥ २६ ॥

---

१ शोभापूर्वकवस्त्वाधियाधीनत्वम् ।

॥ पद ॥

करि करुणा मजवरि माये वो ॥ जेणें मी न भुलेन विपाये वो॥
॥धृ०॥ निगमागम जप तप नेणें वो । मज निजपदसदनीं नेणें वो ॥१॥
ज्ञानेश्वर दीनदयाळे । सोडवि गिळितां भवव्याळें वो ॥ २ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे श्रीभगवद्भक्तिसौरभे स्वयमनिर्वाच्यानिश्चयात्मकप्रीतिवर्णनं नाम अष्टमः परागः ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

समाप्त.

॥श्रीज्ञानेश्वरमाउली॥

# ॥ प्रीतिनर्तन ॥

## ( विषयदिग्दर्शन. )

अंत:करणांतील अनंत जन्मीचें दैन्य नाहींसें करून नित्य सर्वत्र आनंदच आनंद करून सोडणारी "भक्तेषु गोविंदसरूपकर्त्री प्रेमैकधर्त्री भवरोगहंत्री" अशा प्रकारची भगवद्भक्ति आपला सौरभ व्यक्त करीत करीत प्रियलीलामहोत्सवाचा अपूर्व मंगलसमारंभ पुढें प्राप्त होणार म्हणून अत्यंत आनंदित होत्साती "गोविंदानंदसुधे"चा सुवर्णकलश हातीं घेऊन सद्गुरूचा हस्तावलंब करून अखंड आनंदैकरसांत एकतानता पावलेल्यांना भगवंताच्या रासलीलेंत नानाप्रकारचें अभिनययुक्त लास्य दाखवित दाखवित एकदम प्रगट झाली. तिचे चार अभिनय असून सहा पदन्यास आहेत.

### पदन्यास १ ला.

—:०:—

ज्ञानानें ब्रह्माच्या सच्चिदंशाचें ज्ञान झालें तरी खरा ऐक्यानुभव प्रेमाशिवाय येत नसल्यामुळें प्रेमरूप भगवद्भक्तीची आवश्यकता. अध्यासव्यवहारही प्रेममूलकच आहे. प्रेमाचा एकीकरणस्वभाव. प्रेमांत ज्ञानाचा व अज्ञानाचा अविरोध. ज्ञानानें संसारनिवृत्ति झाल्या--वर अंत:प्रेम तो भक्त व बाह्यप्रेम परमेश्वर होतो, व परमेश्वराचें शरीर प्रेममयच असून प्रेम नित्य असल्यामुळें तेंही नित्यच आहे. ज्ञानापेक्षां

भक्तीची श्रेष्ठता. वैषयिक प्रेमाचें आलंबन नित्य बदलणारें असल्या- मुळें अखंड चिदानंद मिळत नाहीं. परंतु भक्तींत प्रेमाचें आलंबन स्वाभिन्न नित्य असल्यामुळें तज्जन्य आनंदही नित्य आहे. याप्रमाणें अखंडानंदैकरूप प्रेममय अद्वैतभक्तीचें स्थापन करून तिचे तीन प्रकार सांगून परामधुरश्रेष्ठ्यवर्णनानंतर त्याच प्रेमांत श्रीमत्सद्गुरुनाथ ज्ञानेश्वर महाराजांचें चरणीं प्रथमनिरूपणाभिनयसमर्पण.

## पदन्यास २ रा.

—o:o—

श्रीगुरुस्तवन. ज्ञानोत्तरभक्तीचें त्रैविध्य. ज्ञानानेंही 'स एवा हंता' येते, परंतु ती वागृण उत्पन्न करीत असून प्रेमज 'स एवाहंता' त्याचा नाश करिते व त्या प्रक्रियेनें तर वागृण मुळीं उत्पन्नच होत नाहीं. जीवन्मुक्त्यर्थ भक्तीची अपेक्षा. मनोनाश व वासनाक्षय यांच्या अभ्यासाबद्दल स्वामी विद्यारण्यांचें व वासिष्ठमत. विद्यारण्यांचा स्वग्रंथविरोध. भक्तीनें मनोनाश व विरक्त्याद्यभ्यास लवकर साधतो. भक्तीशिवाय योगाचें वैयर्थ्य. सर्व वृत्ती भगवंताचें ठिकाणीं अर्पण केल्यानेंच खरी एकतानता होते. त्याकरितां प्रथम 'तस्यैवाहंता'रूप प्रथमभक्तिसिद्धि. भगवंतास आपल्यावर अत्यंत प्रेम करणारा आप्त समजून त्या त्या प्रमाणें त्याचें ठिकाणीं संयोगवियोगाची भावना धरून आपले निरनिराळे विकार अर्पण करण्याच्या प्रक्रिया. याप्रमाणें परमेश्वरास अथवा श्रीगुरूस मातापिता कल्पून त्याच्या लालनांतच एकतानता पावणें. उपसंहार.

## पदन्यास ३ रा.

—:o:—

श्रीगुरुस्तवन. भक्तीनें अखंड समाधि साधतो. भगवद्भक्तांना व्युत्थानींहि नित्य समाधिच असतो. समाधीहून श्रीगुरुभक्तीचें श्रैष्ठ्य. वात्सल्यप्रेमाचें लक्षण. आलंबनोद्दीपनविभावानुभावादिकेंकरून वत्सलरसास शास्त्रीयस्वातंत्र्य, त्याचें रहस्य. वात्सल्यभक्तीचा इतिहास व तिची मार्मिकवर्णनपर प्रक्रिया.

## पदन्यास ४ था.

—:o:—

श्रीगुरुस्तवन. अनध्यस्तविवर्तलक्षण. जीवन्मुक्तीनंतर विदेह-मुक्तीचें यौक्तिक वैयर्थ्य. जीवन्मुक्तींतील वाचाऋण मरून फेडणें शक्य नाहीं; त्याच्या करितां भगवद्भक्तीची आवश्यकता. भक्ति आणि मुक्ति हे केवळ कोरडे आग्रहवृत्तिमूलक शद्बच असून वास्तविक एक प्रेमानंदच खरा आहे. अद्वैतांत भक्तीचें अनुभवगम्यत्व. निष्कामभक्ति 'तमसः परिणाम' ह्मणणारांचें खंडन. भक्तीचें ठिकाणीं अलंकार-शास्त्ररीत्या रससिद्धि. सशान्तशृंगारान्त परिणाम पावणारी परा मधुर-भक्ति. आलंबनोद्दीपनविभावानुभावादिकेंकरून अलंकारशास्त्रीयरीत्या तिची सिद्धि. तिचा इतिहास.

## पदन्यास ५ वा.

—:o:—

श्रीगुरुस्तवन. प्रेमाचे प्रकार. श्रीमन्नारदाचार्य व शांडिल्य यांचें मतांचा समन्वय व स्वीकार. पराभक्तिमिष्ठ मधुररसाचे दोन प्रकार. संभोग व विप्रलंभ. संभोगशृंगाराचे गुप्त व स्पष्ट असे दोन प्रकार अहं-कारादि कुटुंब कल्पून आपण परस्त्री होऊन भगवंताचें ठिकाणीं मनसा रममाण होणें याला गुप्त व त्याच्याच ब्रजगोपिकांप्रमाणें तीव्रसंवेगास प्रकटसंभोगशृंगार ह्मणतात. संभोगशृंगाराच्या दोन्ही प्रकारांचें सोदाहरण स्पष्टीकरण.

## पदन्यास ६ वा.

—:o:—

प्रेमाचें वियोगोपलालनरहस्य. रासानंतर भगवदंतर्धानाचें प्रयो-जन. अद्रवीभूतचेतसि ब्रह्मानुभवास ज्ञान म्हणतात, व तेंच द्रवीभूत झालें म्हणजें भगवद्भक्ति होते. द्रवत्व तापानें उत्पन्न होत असून भक्ति तर शांतरसात्मक आहे, या आक्षेपाचें फारच मार्मिकरीतीनें निराकरण. विप्रलंभशृंगाराचे दोन प्रकार—गुप्त व प्रकट. पहिल्यांत वृत्तीस सखी कल्पून तिच्याकडेस प्रियविरहोपलालन. दुसऱ्यांत तीव्रसंवेगानें प्रत्येक

दृश्य वस्तु सखी वाटून तिजपाशीं निजप्रियविरहवृत्तकथन. अत्यंत विरहाकुल असल्यामुळें विप्रलंभानें सद्गुरुविश्वासवृत्तिसंगतीनें परमेश्वराविर्भाव होऊन विरहिणीच्या सर्व वृत्ती एकदम आपल्या परमप्रियाच्या चरणारविंदीं तल्लीन होऊन एकतानता पावतात. याचें सोदाहरण स्पष्टीकरण. उपसंहार.

**प्रकाशक.**

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# ॥ प्रीतिनर्तन ॥



## पदन्यास १ ला.

जय जय सद्गुरु विज्ञानमेरो । जय जय सद्गुरु चित्सुखमहा[illegible] । प्रणतजनकल्पतरो । दीनोद्धारुकारणा ॥ १ ॥ जयाचें वचन स्वयं[illegible] रिचावितां अमृताचे कुंभ । हृदया निघती कोंभ । ब्रह्मसुखाचे ॥ २ ॥ तया श्रीगुरुचिया कृपा । सोयिरे लज्जाप्रवापा । सांडोनि मार्गे सो[illegible] नर्तनाचा हा ॥ ३ ॥ नाचणियाचा भर । नेणे आपआपणा सपूर [illegible] तया नेणणीं बिढार । जाणणियाचें ॥ ४ ॥ मोडावया अज्ञाना । व[illegible] ये ज्ञाना । परि ऐक्याचिया खुणा । प्रेमवशें ॥ ५ ॥ असज्जडवि[illegible] । सच्चित्पदाचिया हातीं । परी करतळीं राबती । आनंदाच्या ॥ ६ ॥

'एऱ्हवीं सच्चिदानंदभेदें । चालिली तीन्ही पदें । परी तीन्ही उणी आनंदे । केली येणें' ॥ ७ ॥ ( अमृतानुभव प्रक० ५ ओ० ६. )

तो आनंद उत्तम । लिंगलिंगीप्रेम । ह्मणोनि चिन्होद्गम । [illegible] नाहीं ॥ ८ ॥ होकां मिथ्याज्ञान । तें निवारील विज्ञान । परी प्रेमें [illegible] तां जाण । अविरोधीं ऐक्य ॥ ९ ॥ अध्यासप्रेमूजना । आत्मप्रेमा[illegible]

खुणा । परी अविस्मरणा । आणिती ना ते ॥ १० ॥ मग जो स्वप्रेम । तो नित्य कैसा नोहे परम । तया प्रेमींच संभ्रम । अनध्यस्तविवर्ताचा ॥ ११ ॥ जडचेतनीं सुंदरता । अध्यासीं प्रेमू करी ऐक्यता । प्रेमाचा ऐक्यकरण स्वभाव नसता । तरी न होता अध्यास ॥ १२ ॥ मी देह मम नंदन । हे जरी जाहले भ्रमेंकरून । तरी येथ गूढ खूण । कीं प्रेम संपूर्ण लोपला नाहीं ॥ १३ ॥ भ्रमें लोपतां जरी प्रेमू । तरी हरपता विषयकामू । ह्मणौनि चिदंशीं भ्रमू । आनंदीं नव्हे ॥ १४ ॥ यालागीं भ्रमज नाशिवंत । ह्मणोनि ज्ञान निवारीत । तें योग्य परी प्रतीत । भेद दावी ॥ १५ ॥ निवारणाची ओळख । प्रेम नेणें समूळीक । यालागीं तो एकला एक । भवीं परमार्थीं ।१६। भवीं अहंममप्रेम । परमार्थी निजप्रेम । परी दोन्ही ठायीं वर्म । एक तें न सुटे ॥ १७ ॥ ज्ञानें भव निषेधिला । परी प्रेम नाहीं संकोचिला । अंतर्बाह्य उरला । आपणपेंचि ॥ १८ ॥ तेथ अंत:प्रेमानंदरूप आत्मा । बाह्यभवनिषेधें प्रेम परमात्मा । निषेधिली देहप्रतिमा । ह्मणौनि प्रकट गरिमा ऐक्याची ॥ १९ ॥ अध्यस्तविवर्ती प्रेमाचा । आनुकूल्यस्वभाव न जाय साचा । मग अनध्यस्तविवर्ती तयाचा । बाध केवीं घडेल ॥ २० ॥ जड चेतन जावोनि भेद । बाह्यांत:सौंदर्यें प्रेमानंद । अंत:सौंदर्यें प्रेम प्रिया विशद । बाह्यसौंदर्यें प्रेम प्रिय ।२१। एऱ्हवीं बाह्यांतर दोन्ही । वृथा बुझावणी । कांत आणि कामिनी । बाह्यांत:प्रेमू ।२२। ज्ञानें निषेधलिया संसृति । नव्हे चेतनोल्हाससंहृति । ह्मणौनि वृत्तियुवति । अंत:प्रिया ।२३। आणि तोचि उल्हासू उल्हासा । समोर होय सरिसा । तेथ अनुभवाचा ठसा । प्रिय पुरुष ॥ २४ ॥ कांत आणि कामिनी । मिसळतां आलिंगनीं । महावाक्याची कडसणी । कां न ह्मणावी ॥२५॥ एऱ्हवीं महावाक्य पढलें । अनुमानें कळलें । परी प्रेमावीण गेलें । वायां सकळ ॥ २६ ॥ ह्मणोनि ऐक्य जें जें । तें प्रेमद्वारा अनुभविजे । मायानिषेधें साजे । सज्ञानभक्ति ॥ २७ ॥ तया आनंदाची वृत्ति । जाहले मी प्रीति । आणि तया आनंदाची मूर्ति । अनध्यस्त कृष्ण ॥ २८ ॥ आतां हें होय कैसें । विधिद्वारा न दिसे । जरी निषेधूं योग्य सरिसे । न ह्मणोनि आहे ॥ २९ ॥ नामरूप निषेधिलें । जें बंधक होतें वहिलें । अस्ति भाति

प्रियत्व उरलें । तेथ प्रियत्वा आलें रूप जरी ॥ ३० ॥ रूप वेगळें करून । प्रियत्वाचें हो भान । परी प्रियत्व वेगळें करून । रूप न दिसे ॥ ३१ ॥ अस्ति भाति प्रिय । एकत्वें त्रय । परी दोन ठाकती समय । प्रिय सदा आवडे ॥३२॥ असज्जडाभावीं परमा । होये दोहोंची सीमा । परि प्रियप्रेमा । विनाशू नाहीं ॥ ३३ ॥ जें वृत्त्यपेक्षें स्वप्रेमीं बैसलें । भक्तीनें अन्वयीं तें शिरलें । व्यापकत्व निर्धारिलें । एक्याचि प्रियीं ॥ ३४ ॥ प्रियावीण नव्हे रूप । यालागीं तें प्रिय अमूप । कनकखोटीसम संकल्प । निषेधीना ॥ ३५ ॥ आनंत्यानुरोधें तिकडे । स्वप्रेमरति मुरडे । आणि मध्यदेश न सांपडे । यास्तव इकडे प्रियही ॥३६॥ हा दोहींचा प्रेमठसा । न निवारी ज्ञान सहसा । तो ऐक्यत्वें आपैसा । दिसे भिन्नइव परि तसा न जीवन्मुक्तौ ॥ ३७ ॥ म्हणौनि रसाचा आवो । तेणें प्रारब्धाभिभवो । ज्ञानपश्चादानंदानुभवो । भक्तियोगू हा ॥३८॥ वरी बोलिली प्रेमस्थिती । तेचि शुद्ध विदेहमुक्ति । देहेन्द्रियादि मुक्ति। जीवन्मुक्ति तेचि ते ।३९। म्हणोनि विषयपणीं । राग होता रजोगुणी । तो विषयनिषेधें हरिभजनीं । भक्ति जाहला ॥ ४० ॥ ज्ञानानंतर विषयनिषेधा- । साठीं जे भक्ति ये बोधा । ती वैधी प्रसिद्धा । धर्मानुकूल ॥ ४१ ॥ परी गुणांचाहि द्वेष कहीं । नसावा म्हणोनि पाहीं । सविकार गुण अर्पावें लवलाहीं। ब्रह्मीं ती भक्ति रागानुगा ॥ ४२ ॥ तेथ सविकार गुण । व्यतिरेकें धरितां आपण । तरी पुढती वासनासंपन्न । साभिमान होऊं कीं ॥ ४३ ॥ यालागीं कवणिये मिषें । अनध्यस्तविवर्तपदीं समरसे । चित्त तरी अर्पणें विलसे । निरभिमान ॥ ४४ ॥ निदिध्यासाते काल कांहीं । जैसा लागे सर्वाठायीं । ज्ञानानंतर काल कांहीं । तैसा लागे हरिभजनीं ॥ ४५ ॥ आत्मनिवेदन तें ज्ञान । जेथ जाये अहंपण । तो अर्पिताही आत्मा ह्मणोन । सोहंपण पुनः उठे ॥ ४६ ॥ प्रयोजन मिळालिया । वृथा सोहंपणोपाया । ताल वाचाऋण यया । ह्मणोनि प्रतिक्षिपिती ॥ ४७ ॥

'तैसें ग्रासुनी दुसरें । स्वरूपीं स्वरूपाकारें । आपुलियापणें उरे । बोधू जो कां ॥ तें ऋण शेष वाचा इया । न फेडवेचि मरोनिया । ते पाया पडोनि मियां । सोडविलें' ॥ (अमृता० प्रक. ३ ओ. ३१-३२)

अहंनिश्चय अर्पिला। सोहंनिश्चय फांफावला। तरी काय तयाला। वृत्ति न ह्मणिपे।५०। ते केवळ चैतन्याची वृत्ति। जरी अंगीकारावे चित्तीं। तरी अन्वयें प्रेमानंदवृत्ति। कां न स्वीकारिजे ॥ ५१ ॥ अध्यास असतां नसतां पाही। आनंदविरोधी कदा न कांहीं। वृत्ति चिद्विरोधी असूनि-ही। सोहंत्वें उठे ॥ ५२ ॥ तेथ ज्ञानाचें दुर्बलपण। स्वकिारावें लागेल ह्मणोन। दुस्तर हें वाचाऋण। भक्तीनें फेडून लीन सुखी व्हावें॥ ५३ तैसा मुक्तपणा देहीं। येऊनि ऋणाची नवाई। न होईल यासाठीं सोयी। वंदनादींची ॥ ५४ ॥ ते वाचाऋण फेडणें। होय ज्या भक्तीनें। ते कवणिये रीतीनें। श्रवण कीजे ॥ ५५ ॥ अंतरीं आनंदसत्ता। ती जीव-न्मुक्तौ वृत्तिगता। होवोनि करावया सर्वैक्यता। रसरूपता पावत ॥ ५६ ॥ ऐक्याचें मुद्दल न ढळे। आणि कल्लोळीं रस पघळे। तरी भक्तिसुखाचे सोहळे। भोगावया डोहळे सकळांचे ॥ ५७ ॥ विषयरसां-चिया स्थिति। विषयीं नाहीं रसत्वप्राप्ति। विषयवर्णनीं वृत्ति। एकाग्र होय ॥ ५८ ॥ ह्मणोनि वर्णनीं जो रसू। संयोगीं त्याचा विनाशू। सूर्य-प्रकाश वर्णिता उल्हासू। तत्संयोग नावडे उष्णकाळीं ॥ ५९ ॥ कीं मत्तनुजसदनवर्णन। करितां हृदयीं विलसे नंदन। तैसें तदाश्रयावीण भरण। तो चोहटा पाहतां नंदन विरमे ॥ ६० ॥ तैसी नाहीं प्रियप्रीति। आधींच एकाग्रता स्थिति। मग चढती वाढती। गुणवर्णनीं ॥ ६१ ॥ चढती वाढती वर्णितां। शद्वाची हारपे सत्ता। शद्व न सांगे वाढती चिंता। मग वाढता प्रेम वदेल केवीं ॥ ६२ ॥ आणि विषयरसीं आलं-बन। आपुलिया अपेक्षें भिन्न। सर्वहृदयाधिष्ठान। तो हरी स्वाभिन्ना-लंबन भक्तिरसीं ॥ ६३ ॥ ह्मणोनि वर्णितां न वर्णितां। आवडी रस वाढे आवडता। तया आवडीची सत्ता। लाजवी ज्ञाना ॥ ६४ ॥ झालिया आत्मनिवेदन। प्रभूचे झाले आपण। परी चैतन्य सोहंपण। पुढतपुढतीं अर्पावें ॥ ६५ ॥ अर्पितां अर्पितां पुरुषोत्तमीं। अर्पक न ह्मणे हा तो तूं मी। मग ह्मणावया समर्पयामि। कवण पुढें ॥ ६६ ॥ तें आत्मनिवेदन ज्ञान पूर्ण। तेणें निवटलिया अज्ञान। प्रेमद्वारा दृढ-करण। ज्ञानपश्चात् सुजाण भक्तिही ॥ ६७ ॥ अहंपणें विकारसंहृति। झालिया सोहंपणें उठती। ते नाचोनि अर्पावी भगवंतीं। निर्लज्जपणें

॥ ६८ ॥ करितांचि निवेदन । निवेदक देवासमान । तेथ ऐक्यपण अनुभवावयाकारण । माझेंपण भगवंतीं ॥ ६९ ॥ बाधसामानाधिकरण । प्रेमें देवैक्यपण । ते " तस्यैवाहं " भक्तिलक्षण । सप्रमाण जाण सखी ॥ ७० ॥ न मोडतां देवाचें एकपण । सहज होय व्यापकाभिमान । तयाचें प्रेमद्वारा ऐक्यभवन । " ममैवासौ " जाण ते भक्ती ॥ ७१ ॥ मग मुख्यसामानाधिकरण केलें । हें ज्ञानें बंड वाजविलें । प्रेमद्वारा हेंचि वहिलें । माधुर्य बोलिले या नांव ॥ ७२ ॥ " प्रियो हि ज्ञानिनोत्यर्थ-महं स च मम प्रिय " इति । प्रियाश्वाग्निनी प्रियोक्ति । वल्लभाकांत-प्रतीति । तातवचनें ॥ ७३ ॥ येथवरी नेयावया । साह्य गोकुळच्या बाया । कांहींएक साधावया । आधीं तत्पाद वंदितसों ॥ ७४ ॥ पतीची आज्ञा पाळोन । करितां पातिव्रत्यभजन । पतीआधीं गोपींस नमून । पावोनि वेश्यापण पतीचि भजू ॥ ७५ ॥ मग वेश्या होत्साता पतिव्रता । हे महानंदेची बिशेषणसत्ता । काढोनि भक्तिसुखार्था । निजांगा जोडू ॥ ७६ ॥ वेदास परस्परोनि वरिले । हें आंगीं वेश्यापण आलें । प्रिया-वीण दुजें हरपलें । ह्मणोनि राहिलें पातिव्रत्य ॥ ७७ ॥ समजावया पति पतिव्रता । " एकाकी न रमते " या सिद्धांता । पाळोनि जीवन्मुक्तता । एऱ्हवीं प्रियूचि प्राणेश्वरी ॥ ७८ ॥ द्वैतनिषेधें अद्वैत । हा वनवासियांचा सिद्धान्त । अद्वैतहानि न कोणी द्वैत । हा सिद्धांत निगमाचा ॥ ७९ ॥ द्वैतचांदणें जंव जंव वाढे । तंव तंव चांदाची सत्ता उघडे । हें रहस्य रोकडें । गुरुभक्तीचें ॥ ८० ॥ वैधी प्रधान गौण रक्ती । तेथ होय देव-भक्ति । रागानुगा प्रधान गुरुभक्ति । विषयस्थिति पहिलेंचि नाहीं ॥ ८१ ह्मणोनिया तीन्ही । कवणिये रसा रसाळिणी । होऊनि नाचती नाचणी । ते ज्ञानेश्वर जननी दाखवी ॥ ८२ ॥ जय जय सद्गुरु प्रियकरा । जय जय सद्गुरु ज्ञानेश्वरा । निजालिंगनीं मनोहरा । मेळवीं मातें ॥ ८३ ॥ मी तुमची कन्या यथार्थ । परी दुजे नाहींच विश्रांत । ह्मणोनि आवड-ता कांत । तुम्ही ॥ ८४ ॥ येथ वेश्यापण मातें आलें । आणि आपणा कर्मी न स्पर्शलें । दोघांचेंही जाहलें । वेगळेंपण ॥ ८५ ॥ आपण वेगळे पहिलें । मी आज जगावेगळें जाहलें । ह्मणोनि समानत्व आलें । तुम्हां आम्हां ॥ ८६ ॥ परी पहिलेपासून वाडिलपणा । स्वामी तुमच्या चरणा ।

तैसाचि मज परी कळणेपणा । करवी नमना (नमस्काराते) आजिचा ।८७।

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे प्रीतिनर्तने निरुप्याभिनये प्रियारूपपरिचयो नाम प्रथमः पदन्यासः ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# पदन्यास २ रा.

जय जय सकलकल्याणनिधाना । जय जय सद्गुरु करुणापिधाना । जय जय सद्गुरु मनमोहना । विश्वपते ॥ १ ॥ माये तुझी कृपादृष्टी । पोटीं साठवोनि सृष्टी । स्वानंदशशांकप्रकाशपुष्टी । अवचट वाढवी ॥ २ ॥ यास्तव सोडोनि अपवर्गचरण । आळंदीवल्लभे तुझे चरण । ध्यातां ध्यातां होय जनन । ते भाग्य पूर्ण मी ह्मणे ॥ ३ ॥ आर्तादितीर्हींच्या शेवटीं । प्रिय जी या ज्ञानियां अधिष्ठी । तयाची ती भक्ति गोमटी । त्रिविध असे ॥ ४ ॥ 'तस्यैवाहं' प्रथम जाण । 'ममैवासौ' द्वितीय ह्मणोन । तिसरी ती सुंदर पूर्ण । 'स एवाहं'प्रत्यया ॥५॥ ज्ञानज सएवाहंपण । उठवी सोहंवाचाऋण । प्रेमसएवाहंपण । अनिर्वाच्य पूर्ण समाधिसम ॥ ६ ॥ प्रेमज सएवाहंपण थायां । मृदुमध्यअधिमात्रतया । उपर्युक्त भक्तित्रया । मधुसूदनसंमति ॥ ७ ॥ प्रथमाविषयीं साची । संमति श्रीमदाचार्यांची । षट्पदींमाजी तियेची । उपलब्धी कीरू ॥ ८ ॥

॥ श्लोक ॥

'सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ।
सामुद्रो हि तरंगः क्व च न समुद्रो न तारंगः' ॥

(शंकराचार्य.)

॥ आर्या ॥

ज्ञानें द्वैत निरसिलें तरि हरि तुमचे अम्ही दयासिंधु ।
सिंधुज लहरिस म्हणती परि लहरीचा नव्हे जसा सिंधु ॥

॥ ओव्या ॥

म्हणौनि माता पिता । ओळखोनि श्रीगुरु भगवंता । जीवन्मुक्ति-सुकुमारता । रक्षावी कीं ॥ ९ ॥ पूर्ण झालिया ब्रह्मज्ञान । जो कीं उठे ज्ञानाभिमान । तेणें लेशाविद्याप्रत्यय गहन । तो गाळाया पूर्ण भक्ति-शास्त्र ॥ १० ॥ मातापिता गुरु गोविंद । युगुलशब्दीं अर्थ अभेद । आतां वृत्तिप्रीतिसुस्वाद । ऐसा वाढो ॥ ११ ॥ यद्यपि जिज्ञासुदशे-आंत । भगवंतीं वडीलभाव उपजत । तथापि ज्ञानयाचना तेथ । म्हणौनि गौण ॥ १२ ॥ येथ याचना नसोनि कांहीं । सद्गुरुनाथ बापआई । लडिवाळपणाची नवाई । भुंजिजे सुखें ॥ १३ ॥ आधीं सद्गुरु पिता । पुढें श्रीगुरु माता । कीं आधीं माता पुढें पिता । ऐसेंही घडे ॥ १४ ॥ अथवा माता पिता बरोबरी । क्षणोक्षणीं भावकुसरी । भक्तिचौरंगावरी । आरोहणें ।१५। तत्वज्ञानानंतर । वासनाक्षय परिकर । तया प्रयत्नें साचार । प्रारब्धाभिभव ॥ १६ ॥ तया वासनाक्षयाचें रक्षण । होवाया मनोनाश कारण । एवं जीवन्मुक्तिविवेकीं वचन । विद्यारण्यस्वामींचें ॥१७॥ हें एकाचि काळीं तीन्ही । अभ्यासिजे वसिष्ठवाणी । परस्पर सहाय म्हणोनी । वियोगें फळसिद्धि नसे ॥ १८ ॥ मनोनाश कारण । समाधीतें सम्पूर्ण । योगें चित्तवृत्तिनिरोधन । मनोनाश या नांव ॥ १९ ॥ विवेकावीण कामादिवृत्ती । मनसि ज्या उचंबळती । तया नांव वासना-स्थिति । वदती स्वामी ॥ २० ॥ योगें चित्तवृत्ति निरोधितां । निरोध-संस्कारें तत्वतां । वासनेची वार्ता । न सांपडे ॥ २१ ॥ हा मार्ग योग्य असोन । परी बळें रोधितां मन । तें सूक्ष्म वासना घेऊन । निरोध पावे ॥ २२ ॥ जीवन्मुक्तिविवेकांत । मनोनाश विद्यारण्योक्त । आणि तेचि वदती पंचदशींत । कीं वासना उठती प्रारब्धें ॥ २३ ॥ 'तस्य तावदेव चिरं' या श्रुति । अभुक्त न सुटे प्रारब्धस्थिति । हा स्वग्रंथविरोध स्वामिमतीं । दृढतर आहे ॥ २४ ॥ समाधींत राहिलीया । प्रारब्धभोग भोगील काया । तरी मग प्रेता तया । प्रारब्ध न कां ॥२५ प्रेतासी प्रारब्ध मानतां उघडे । तरी प्रारब्ध संपतां देह पडे । हें बोलणें फोल फुडे । जाहलें कीं नाहीं ? ॥ २६ ॥ तें प्रारब्धनाशनासाठीं । ज्ञानानंतर जीवयत्नकोटी । तरी कर्तृबुद्धि गोमटी । सुटेल केवीं

॥ २७ ॥ ऐसें कचाटीं सांपडोन । आनंदें स्थिर नोहे मन । यालागीं तें प्रेमाधीन । कौतुकें कीजे ॥ २८ ॥ हे न मम पदरीची वाणी । मुचकुंदा बोलिले चक्रपाणी । आणि तातही मधुरवचनीं ऐसेंचि वदती ॥२९॥

॥ श्लोक ॥

'युञ्जानानामभक्तानां प्राणायामादिभिर्मनः ।
अक्षीणवासनं राजन् दृश्यते पुनरुत्थितम्' ॥

(श्रीमद्भागवत)

प्राणायामादियोगेंकरून । माझेठायीं लावितां मन । विनाभक्ति वासना क्षीण । नव्हे म्हणून पुनः उठे ॥ ३० ॥ ज्ञान योग बरोबरी । अभ्यासावा ही वसिष्ठोक्ति खरी । परंतु एकाएका उपायोपरी । त्याही मनोनाश बोलिला ॥ ३१ ॥

॥ श्लोक ॥

'द्वौ क्रमौ चित्तनाशाय योगो ज्ञानं च राघव ।
योगस्तद्वृत्तिरोधो हि ज्ञानं सम्यगवेक्षणम्' ॥

(योगवासिष्ठ.)

रामा मनोनाशाकारण । योग आणि ज्ञान । योगश्चित्तवृत्तिनिरोधन । ब्रह्म जाणणें ज्ञान कीं ॥ ३२ ॥ परी ज्ञानसमर्थी वृत्तिनिरोधा । कर्तृमति होय प्रसिद्धा । यालागीं हरिभक्तिपदा । आश्रयावें ॥ ३३ ॥ प्रेम लागतां भगवंतीं । तिकडेचि धांवेल वृत्ति । सकल निरोधप्रतीति । सप्रेम भगवंतीं घडेल ॥ ३४ ॥ येथ वालभनिरोधलक्षण सन्मानितां । अयोग्य न वाटे मम चित्ता । आणि तातोक्तिसामर्थ्यसत्ता । एवढी मज ॥ ३५ ॥

"'कां जे यया मनाचेंनि एक निकें । जें देखलें गोडीचिया ठाया सोके । म्हणोनी अनुभवसुखाचि कौतुकें । दाखवीत जाइजें' ॥ १ ॥

(ज्ञानेश्वरी अ० ६ ओ० ४२०)

'किंबहुना पांडवा । हा अग्निप्रवेश नित्य नवा । भ्रताराविण करावा । तो हा योग' ॥ १ ॥ (ज्ञानेश्वरी अ० १२ ओ० ६६)

'म्हणोनी येरते पार्था । ते नेणतीचि हे व्यथा । जे माझिये भक्तिपंथा । वोळंगले' ॥ १ ॥ (ज्ञानेश्वरी अ० १२ ओ० ७५)

एवं योगदुःशक्यें भक्ति प्रधान । तातवचनानुमोदन । यालागीं मनोनाश संपूर्ण । भगवत्प्रेमें सहजचि ॥ ३६ ॥ मन निरोधीं सूक्ष्म वासना । त्याही सहज होय क्षीणा । समाधि व्युत्थाना । अनुकूल भक्तौ ॥ ३७ ॥ कामक्रोधलोभाभिमान । सकल वासनांची सांठवण । यालागींही धरितां भगवच्चरण । वासना क्षीण सहजचि ॥ ३८ ॥ प्रियनंदननंदनोक्ति । बोधितां हे येणेंरीती । सूत्रप्रमाणप्रतिपत्ति । म्हणोनियां ॥ ३९ ॥

' तदर्पिताखिलाचारः सन् कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम् ' ॥ ( नारदभक्तिसूत्र. )

ज्ञानें आत्मनिवेदन । तैं सकर्तृकाखिलाचारसमर्पण । परी विकार घेऊनि सोहंपण । प्रारब्धभुंजन भासविती ॥ ४० ॥ तो भुंजनाभिभवो सोहंविकारार्पिता । म्हणोनि ' तदर्पिताखिलाचारः सन् ' या अर्था । ज्ञानसंपन्न होत्साता । कामक्रोधादि तत्वतां तेथचि कीजे ॥ ४१ जैसें कीं प्रियेचें मन । प्रियावरी जडतां पूर्ण । मग जंव जंव निषेधिती जन । तंव तंव अधिक जडे ॥ ४२ ॥ कीं सकल पदार्थ । खादाडा पथ्यसमयीं आठवत । तैसें भगवंतीं जडतां चित्त । विकार उठतां अधिकचि जडे ॥ ४३ ॥ म्हणोनी कामक्रोधलोभमोहाभिमान । प्रभुसाठींचि करावा धारण । हे देऊनि इतिहासप्रमाण । तातही वदले ॥ ४४ ॥

' तैसाचि गोपिकांसी कामें । तया कंसा भयसंभ्रमें । येरा घातकां मनोधर्में । शिशुपालादिकां '॥ १ ॥ (ज्ञानेश्वरी अ० ९ ओ० ४६९)

' जे अभिमान वाहती अंगी । आम्ही हरीचे भूषावयालागीं । जे माझेनि लोभें जगीं । लोभिये जाहले'॥१॥ (ज्ञानेश्वरी अ० ९ ओ० ३६२ )

अहो विकारही असतां । जया रक्षणें भगवंता । तयाची निर्विकारता ! मोडेल कवण ॥ ४५ ॥ मेलियाही अवचित । रक्षणपण करील अमृत । तरी तया रोगग्रस्त । कवण समर्थ करावया ॥ ४६ ॥ म्हणोनि योगकष्टावीण । सकल देती सद्गुरुचरण । ऐसें वदले वामन । तें श्लोकार्थप्रमाण ऐकावें ॥ ४७ ॥

॥ श्लोक ॥

' सफळ सकळ योग श्रीहरीच्याच पायीं ।
श्रम मग करणें कां आणिकांहीं उपायीं ' ॥

( वामन )

म्हणौनि भगवंतीं । वाढतां दृढ भक्ति । साधे ज्ञानविरक्त्युपरति । प्रमाण भागवतीं येविषयीं ॥ ४८ ॥

॥ श्लोक ॥

' वासुदेवे भगवति भक्तियोगः प्रयोजितः ।
जनयत्याशु वैराग्यं ज्ञानं यत्तदहैतुकम् ॥ १ ॥
आत्मारामाश्च मुनयो निर्ग्रंथाअप्युरुक्रमे ।
कुर्वन्त्यहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः ' ॥ २ ॥

( श्रीमद्भागवत. )

ज्ञान म्हणजे ब्रह्मात्मैक्यता । वैराग्य म्हणजे मनोनाश वासनाक्षीणता । हे भगवंतीं भक्ति योजितां । प्राप्त होती ॥ ४९ ॥ म्हणौनि आत्मारामादिमुनी । भक्ति करिती हेतु सांडोनी । लुब्धले जे गुणीं । श्रीहरीच्या ॥ ५० ॥

॥ श्लोक ॥

' आत्माराम असे शुकादिक मुनी ज्यांचे अविद्यामय ॥
ग्रंथी सर्वहि सूटले जितचि जे मुक्त स्वयें अद्वय ॥
भक्ति श्रीहरिची उगीच करिती तीही निमित्ताविण ।
कीं मुक्तीहुनि गोड फार असती श्रीमाधवाचे गुण ' ॥

( वामन. )

हे वामनवाणी । त्रिविक्रमपणीं । मुनिवरमनीं । संस्थान करी ॥ ५१ ॥ असोत या प्रमाण युक्ती । सांपडतां सज्ञान भक्ति । सहजाचि जीवन्मुक्ति । हातां चढे ॥ ५२ ॥ परी जाहलिया अज्ञान । अनिर्वाच्य प्रेमस्तब्धपण । आगमनाआधीं सोहंपण । दृढ उठे ॥ ५३ ॥ ते बुद्धितादात्म्य विकारासहित । दिवसेंदिवस भगवत्यर्पित । म्हणौनि 'तस्यैवाहं' येथोनि उमटत । अनिर्वाच्य माधुर्याप्त भक्ति ॥ ५४ ॥ भगवंत मातापिता । हे बरोबरी आवडतां । ज्ञानाहंतासंकटीं भगवंत पिता । माता

आळवितां आवडीनें ॥ ५५ ॥ परी गन्तुरभिमानलक्षण । दिवसें दिवस बाळपण । म्हणौनी आधीं पिता भगवान । पुढें माता तीचि होय ॥५६ करुणारसाचा आविर्भावो । भगवंतीं मातृपितृभक्त्युद्भवो । पिता शंकर माता माधव । कीं माता शंकर पिता हरि ॥ ५७ ॥ अथवा माता रमा पार्वती । पिता गरुडवाहन पशुपति । किंवा दोन्ही मिळोनी सद्गुरुमूर्ती माता पिता एकला ॥ ५८ ॥ सुकुमार सद्गुरु रूपडें । मुखीं प्रेमस्तन्य घालील कोडें । यालागीं रात्रंदिवस रडे । याचि आशे ॥ ५९ ॥ केव्हां सद्गुरूतें बाहे । हे तात ! कृपा करी लवलाहे । संकट नसोनिही पाहे । संकट पुढे ॥ ६० ॥ जैसी प्रियाची आठवण । विरहिणीस होतां पूर्ण । प्रियाचें अनागमन । संकट वाटे ॥ ६१ ॥ नातरी भूक नसोनी पोटीं । बाळ आक्रंदे मातृभेटीं । कांहींच भय नसतां नेहटी । थरथर कांपे ॥ ६२ ॥ उगीच माती घाली मुखीं । बेचव लागतां होय दु:खी । मग रडोनी ह्मणे शेखीं । काडिये घेई मज माये ॥ ६३ ॥ तेवीं संसार ज्ञानें हरपला । तथापि ज्ञानाहंकारबागुला । कल्पोनि रडत बाहे वहिला । श्रीगुरो तात ह्मणोनि ॥ ६४ ॥ मी ज्ञानी ह्मणोनी ज्ञानाभिमान । ऐसा न उठतां जाण । तोचि मी गुरुपुत्र ह्मणोन । सुखद उठे ॥ ६५ ॥ 'शिवो भूत्वा शिवं यजेदि'ति । स्वयें बोलिली आहे श्रुति । आणि आळंदी-वल्लभोक्ति । ऐसीचि असे ॥ ६६ ॥

'शिव शिवा सद्गुरु । तुजला गूढा काई करू । एकही निर्धारू धरू । देतासीना ॥ १ ॥ आह्मी निखिळ मा तुझे । वरी लोभें ह्मणसी माझे । हें पुनरुक्त साजे । तूंच ह्मणुनी' ॥ २ ॥ (अमृतानुभव.)

केव्हां काम क्रोध अरी । मिथ्याचि कल्पोनि कुसरी । सद्गुरूस मानुनी हरी । धांव ताता ह्मणतसे ॥ ६७ ॥ केव्हां दुर्घट अत्यंत मदन । ज्ञानतपांत करील विघ्न । ऐसे कल्पोनि श्रीगुरुकारण । ह्मणे हे तात हे शिव धांवा ॥६८ ॥ संकष्ट पुढें कल्पितां काल्पितां । श्रम पावोनि क्रोध येतां । तरी सद्गुरूस ह्मणोनि माता । आक्रंदे सुखें ॥ ६९ ॥ कैवल्य-भातुकें झुगारूनि । माय माय म्हणोनि । आक्रंदे वेडा होऊनी । वत्स जैसें ॥ ७० ॥ सद्गुरुजननीस्मरणापुढें । जया वत्सपण पशुत्वही आवडे । शब्द विसरूनि अव्यक्त हंबरडे । फोडोनि हृदयारण्य गर्जवी

॥ ७१ ॥ सद्गुरूची कृपादृष्टि । भरली आहे सर्व सृष्टि । तया दृष्टीचिया तळवटी । कूर्म होय सृष्टीएवढा ॥ ७२ ॥ कूर्मदृष्टीनें समाधान । तेथ न स्पर्शे मुख स्तन । यालागीं कूर्मत्व सोडोन । वांसरू होय ॥ ७३ ॥ मग श्रीगुरुजननीस्तनपीयूषधारा । घ्यावया प्रेमवृत्ति मुख पसारा । परी कडिये बैसवोनि सुखसारा । घ्यावया होय बाळक ॥ ७४ ॥ कूर्मत्वीं फसविलें दृष्टि पोषुनी । वत्सत्वीं फसविलें दूध पाजुनी । यालागीं पुढती लेंकरूं होवोनि । क्रोधेंकरूनि आक्रंदे ॥ ७५ ॥ वैकुंठ खेळणें उमजला । कैवल्यभातुकिया कंटाळला । यास्तव क्षोभें रडों लागला । माय माय म्हणोनी ॥ ७६ ॥ रांगत जावयाकारण । दिशाचि नाहीं म्हणोन । ठायींच अचल राहोन । सद्गुरुनामें आक्रंदे ॥ ७७ ॥ तया करुणा-कल्लोळापुढें । ब्रम्हास सद्गुरु होणें घडे । हांसे तें रोकडे । दास्यचि करी ॥ ७८ ॥ हांसतां न दे गुरुदेवा कष्ट । दास्यचि करी अचाट । हाचि काम नीट । हृदयीं धरी ॥ ७९ ॥ अथवा सोहंक्रोधविकार येतां रडे । बाळ होवोनि पायां पडे । येणेंचि रीती रोकडे । त्रिगुण नाशी ॥ ८० ॥ मातेस यावी आठवण । म्हणोनि ब्रम्हानंदजळीं मीन । अथवा कृपादृष्टिचंद्रामृतपान । कराया कूर्म चकोरपणें ॥ ८१ ॥ कीं भगवन्मुखींचा लाळ । आंगीं लागतां होई निर्मळ । याचि इच्छेंकरून केवळ । वत्स होय ॥ ८२ ॥ किंवा कडियेवरी बैसोन । तुच्छ करीन कैवल्यादिस्थान । याचि इच्छेंकरून । लेंकरूं होय ॥ ८३ ॥ घडिघडि श्रीगुरुतें । म्हणे धांव अंबे जगन्माते । घडि एक चित्तातें । ऐसेंचि मानी ॥ ८४ ॥ मियां सद्गुरुस जगन्माता । म्हणोनि बाहतां । जगास तत्वतां । स्तन्य पाजील ती ॥ ८५ ॥ किंवा जगास पाजितां रोकडें । दुर्लक्ष होईल माझेकडे । यालागीं उघडपणें रडे । माझी माय म्हणोनि ॥ ८६ ॥ ‘जय जय वो शुद्धे । उदारे प्रसिद्धे । अनवरत आनंदे । वर्षतीये ॥ म्हणोनी अंबे श्रीमंते । निजजनकल्पलते । आज्ञापी माते’ । इत्यादि तातोक्ति ॥ ८७ ॥ ऐसें ऐसें म्हणोनि । रडतां विसरे दिवस-रजनी । कीं श्रीगुरु ओसंगा घेऊनि । बैसतां तो हासे ॥ ८८ ॥ एवं हासोन रडोन । रंजवी गुरुमाताभगवतीचें मन । एऱ्हवीं याचन । कांहींचि नाहीं ॥ ८९ ॥ या बाळाचें ऐसें बळ । मायेस रंजवोनी रंजे

प्रबळ । बाळ माता कीं माय बाळ । भेद न कळे ॥ ९० ॥ भेदाभासीं-ही कांहीं । कैवल्याची आशा नाहीं । आचार्य बोलिलेही । ऐसेंचि आधी ॥ ९१ ॥

॥ श्लोक ॥

न मोक्षस्याकांक्षा भवविभववाञ्छापि च न मे ॥
न विज्ञानापेक्षा शशिमुखिसुखेच्छापि न पुनः ॥
अतस्त्वां संयाचे जननि जननं यातु मम वै ॥
मृडानी रुद्राणी शिव शिव भवानीति जपतः ॥

( शंकराचार्य )

॥ ओंव्या ॥

मुक्त झालिया काय होणें । नसत्या भवा काय मागणें । अज्ञान गेलिया ज्ञान याचणें । कासयासाठीं ॥ ९२ ॥ 'जननं यातु' या श्लोकपदेंकरून । जन्ममरणखंती सोडोन । जननीत्यादिवचनेंकरून । प्रेमसंपन्न मातिबोधू ॥ ९३ ॥ एऱ्हवीं अर्थ स्पष्ट आहे । स्वारस्य बोलिलें पाहे । श्रीतुकारामोक्ति आहे । ऐसीचि कीरू ॥ ९४ ॥ 'तुका ह्मणे गर्भवासीं । सुखें घालावें अह्मासी' । याही वचनाची सरसी । वृत्ति करी ॥ ९५ ॥ भेदाभासू जाय । अभेदचि होय । हें अखंड आश्चर्य । मायबाळांचें ॥ ९६ ॥ एवं अभेदमिठी । मज ज्ञानेश्वरपदांगुष्ठीं । पडो सद्गुरु पाठींपोटीं । भरोनियां ॥ ९७ ॥ अई ज्ञानेश्वर जननी । हृदयवैकुंठपीठवासिनी । चरणांगुष्ठस्तन मुखीं घालुनी । गंगापयःपानीं पाळि मातें ॥ ९८ ॥

हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे
प्रीतिनर्तने लालनाभिनये द्वितीयः पदन्यासः ।
श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# पदन्यास ३ रा.

॥ ओव्या ॥

जय जय सद्गुरु पतितपावना । जय जय सद्गुरु विश्वजीवना । जय जय सद्गुरु करुणाघना । ज्ञानेश्वरा ॥ १ ॥ जय जय सद्गुरु दीनउदारा। जय जय सद्गुरु मोहमुद्गरा । जय जय सद्गुरु सौख्यसुधाकरा । आळंदीश्वरा आचार्या ॥ २ ॥ स्वामी आठवितां तव चरण । कालत्रयीं न सांपडे जनिमरण । जनन मरण संहरण । अवघें अज्ञान हारपे ॥ ३ ॥ म्हणोनी सांडोनि सर्व कांहीं । निवांत मस्तक तव पायीं । ठेविलें ज्ञानेश्वर आई । आतां व्यक्त होई ग्रंथरूपें ॥ ४ ॥ मागील करुणाबीजतरू । मातृपितृभक्ति फळभारू । प्रेमरसभरित अनिवारू । वाढला जो ॥ ५ ॥ तोचि असीम प्रेम मेळे । नानाभावभांति[1] उगळे । क्रमावांचोनि येथिचे सोहळे । परी वाणी रुळे बोधार्थ क्रमी ॥ ६ ॥ भगवंतीं पितृमातृभाव । तो ज्ञानानुमृदुभक्त्यनुभव । समाधीं व्युत्थानीं गुरुदेव । अंतर्बाह्य ॥ ७ ॥ 'यस्य देवे परा भक्ति- । र्यथा देवे तथा गुराविति' । बुझावोनि जननी श्रुति । सत्पुत्रा बोधी ॥ ८ ॥ भक्तीनेंचि समाधि होत । ऐसें घेरण्डमुनी सांगत । जीवन्मुक्तिविवेकांत । विद्यारण्योक्त हेंचि कीं ॥ ९ ॥ यद्यपि चंद्रोदयादि पूर्ण । प्रारब्ध संपादी प्रयत्नावीण । आणि ग्रहक्षेत्रादि संपादन । यत्नेंकरून प्रारब्ध करी ॥ १० ॥ आद्य प्रारब्धसंपाद्य निवृत्ति । न केलियाविणेंद्रियोपहृति । आणि द्वितीय प्रारब्धसंपाद्य निवृत्ति । समाधीवीणही विरक्तिनिश्चयें घडे ॥ ११ ॥ तथापि चंद्रोदयादि सकळ । ईश्वरनियतिप्रधान प्रारब्धफळ । आणि ग्रहक्षेत्रादि प्रारब्धफळ । जीववृत्तिप्रधान ॥ १२ ॥ स्वापेक्षें बिंबत्वारोपित बिंब । नियतिकरितां प्रारब्धफळ स्वयंभ । मनोवृत्त्यात्मक जीवसंकल्पक्षोभ । उपजवी द्वितीय प्रारब्धफळ ॥ १३ ॥ तें अनध्यस्तविवर्ती । प्रथमप्रारब्धाभिभवस्थिती । द्वितीयप्रारब्धाभिभवप्राप्ती । भजकभगवन्मतियत्नें ॥ १४ ॥ म्हणौनि समाधि अथवा

---

१. भांति-प्रकारेंकरून.

व्युत्थान । भक्तिसंपन्ना परम समान । किंबहुना समाधीहून । गुरु-भक्तींत समाधान हे तातोक्ती ॥ १५ ॥ ' श्रीगुरुचें उशिटें । जैं लाहे अवचटें । तैं तेणें बोधे विटे । समाधीसी ' ॥ १६ ॥ ' ऐसा सांडोनि सोहळा । कोण लावोनि बैसे डोळा ' । श्रीतुकारामवचनमाळा । हेंचि बोधी ॥ १७ ॥ आणि देवनाथवचन । तेंहि ऐसेंचि प्रमाण । पदपद्धति-पूर्ण । गोपिकावाक्य ॥ १८ ॥

॥ पद ॥ ( देवनाथ. )

'या गोविंदें मुरलीनादें मोहियलें मन गडे! ।
किं हरिरूप अखंड नयनापुढें ॥ धृ० ॥
भुवनसुंदरें गुणमंदिरें वाजविली मोहरी ।
किं नादें मम मानस मोहरी ॥
निर्विकारें श्रीगुरारें! केलीग! बोहरी ।
किं अवघा प्रपंचमद संहरी ॥
चाल—या हरिलागीं काय ह्मणावें ।
सांग सखे! तरि किति सोसावें ।
कांहीं सुचेना काय करावें ।
चाल पहिली—मन हें झालें वेडे ॥ किं हरिरूप० ॥ १ ॥
नंदनंदनें या मधुसुदनें लावियलें गे! पिसें ।
किं जनिं वनिं अवघा आपण दिसे ॥
कंसमर्दनें मुरलिवादनें अघटित केले कसे? ।
किं आभास कांहिंच उरला नसें ॥
चाल—नवल वाटलें मला सुंदरी ।
नेणो जालें काय कसिपरी ।
पाहतां यातें बाह्य अंतरीं ।
चाल पहिली—व्यापक हा चहूंकडे ॥ किं हरिरूप० ॥ २ ॥
कुंदरदन सुखसदन अगे! हा मदनदहन प्रियगडी ।
सांवळा क्रीडत यमुनेथडीं ।
राजस सुंदर मूर्ति मनोहर जो गोवळसंवगडी ।
वर्णितां श्रुतिशास्त्रां सांकडी ॥

चाल–जो योगिहृदय हरि हा ।
स्मरतां नांव दुष्कृत संहारि हा ।
वेणु वाजवी नानापरि हा ।
चाल पहिली–ओढी आपणाकडे ॥ किं हरिरूप० ॥ ३ ॥
आह्मीं अबला या व्रजबाळा नेणों याची गती ।
वेणुरवें भुलली आमुची मति ।
लागट होउनि या हृद्भुवनीं नंदात्मज यदुपती ।
भोगवी समाधिसुखसंविती ॥
चाल–समाधिव्युत्थानीं हरि विलसे ।
याविण कांहीं अन्य न भासे ।
देवनाथ गुण वर्णित ऐसें ।
चाल पहिली–मौन हें वाचे पडे ॥ किं हरिरूप० '॥ ४ ॥

॥ ओव्या ॥

' समाधिव्युत्थानीं हरि विलसे ' । आणि ' मुरलीनादें ' ऐसें । पदांत जें वचनद्वय असें । तें बोधी व्युत्थानेऽपि भक्तौ ब्रह्मसुख ॥ १९ ॥ यालागीं समाधीं अथवा व्युत्थानीं । वृत्ति जडतां नारायणीं । ज्ञानें मिथ्याभवनिराकरणीं । बंध निर्वाणीं नसे कीं ॥ २० ॥ जातरी टिवटिवी फिरे आकाशीं । परी चित्त पिलियापाशीं । तैसें हृदयीं आठवितां हृषीकेशी । तरी बंधन मग कैचें ॥ २१ ॥ कीं दुग्धासाठीं मार्जार हिंडे । आणि विषयासाठीं इंद्रियगण तंडे । तैसें हृदयीं हरिप्रेम जोडे । तरी बंधन मग कैचें ॥ २२ ॥ यास्तव अर्धघडी रिकामा । न राहोनि श्यामा मन विश्रामा । आठवितां निजसुखधामा । तरी बंधन मग कैचें ॥ २३ ॥ कीं वयाअंतीं एकलें प्रसवे वांझोटी । मग जीव तळमळे होतां बाळतुटी । तैसे हरिप्रेम व्यापितां पोटीं । तरी बंधन मग कैचें ॥ २४ ॥ तेचि प्रेमाची नवाई । वात्सल्यसुखाचिया ठायीं । पूर्वील भक्ति लवलाहीं । आली होय ॥ २५ ॥ मनीं ऐसें वाढे दृढ । रडोनि कष्टविला हरि उघड । परी सेवा न घडली सुगड । मम करोनि ॥ २६ ॥ हेंचि एक चित्तीं उठे । मग वृत्तीसी समाधान गोमटें वात्सल्यस्नेहें प्रगटे । अगाध तें ॥ २७ ॥ अत्यंत स्नेहाळ माय असतां ।

बाळातें क्षुधाही नसतां । परी स्तन ओठीं लावितां । प्रेमपान्हा उमटे ॥ २८ ॥ तेवीं आत्मपरमात्मया भेद नाहीं । परी प्रेमाची नवल नवाई । कोमल चित्तें शेषशायी । सुखी राहो हे वाटे ॥ २९ ॥ तया नित्यनिर्मळा स्नान । तया नित्यतृप्ता भोजन । तया सर्वव्यापका कडिये ग्रहण । नवल विंदान भक्तीचें ॥ ३० ॥ तया असीमामी सीमा । । तया अनामा ठेवूनि नामा । बाळा केशवा मेघश्यामा । ह्मणणें ही गरिमा प्रेमाची ॥ ३१ ॥ तैं लहानसे बाळ । त्रिभुवनस्वानंदा मूळ । जैसें प्रकाशें भरे गगनमंडळ । परी चंद्रमा सान दिसे ॥ ३२ ॥ तैसें हृदयाकाशसद्गुणें । बाळ लहान गोजिरवाणें । परी ब्रह्मानंदीं पुरेउणें । सर्वथा नाहीं ॥ ३३ ॥ अंगें करोनि सेवा । कष्ट न होवावे देवाधिदेवा । ऐसिया प्रेमभावा । हृदय लाहे ॥ ३४ ॥ मी सेवा करितां प्रबळ । ह्मणी गुप्तश्रम करील घननीळ । यासाठीं आपुलें करोनि बाळ । आपण होय वरिष्ठ ॥ ३५ ॥ मग अरुणोदयपीळ उकालिला । संध्यारागें रंगविला । हृदयजळें भिजविला । पलोडा केला सुकुमारा ॥ ३६ ॥ तेथही अनंत काठिन्य । पाहोनिया प्रेमें मान्य । आपुलिया नंदना धन्य । वाटेल ऐसें आचरी ॥ ३७ ॥ तेथ श्रीकृष्ण आलंबन । बाळलीला उद्दीपन । हृदयीं प्रेम पान्हा नयन-। ताटस्थ्यादि पूर्ण अनुभाव हे ॥ ३८ ॥ पैंजण रुण-झुणादि व्यभिचारीभाव । मिळतां पुत्रप्रेम स्थायीभाव । हृदयींहून प्रगटे सावेव । वत्सलरसू ॥ ३९ ॥ तया वत्सलरसाची पुष्टी । शरीरा येऊनि व्यापी सृष्टी । तेव्हां वात्सल्यभजनगोष्टी । वाणीं मनीं ।४०। मौन धरितां पुत्रप्रीति । गोष्टी करितां गुणस्मृति । कडिये घेतां ब्रह्मानंद-स्थिति । वत्सल्यभक्ति या नांव ॥ ४१ ॥ हातानें उचलोनि कडिये घेयावें । तो हात कठिन स्वभावें । माझिया सुकुमारा न साहवें । ह्मणोनि उचली मानसें ॥ ४२ ॥ तंव मानसही त्रिगुणात्मक । त्रिगुणा-तीत जगन्नायक । ऐसें पाहोनि घडी एक । तटस्थचि राहे ॥ ४३ ॥ तया ताटस्थ्यीं प्रेमस्पर्शे । अकस्मात होय ऐसे । कीं बाळ रडे होवोनि पिसे । तेणें प्रेम उल्लसे धांवत ॥ ४४ ॥ पुरुषही असोनि शरीरी । बाळास्तव जाहला नारी । वात्सल्यवृत्ति परिकरी । अनुभवीत ॥ ४५ ॥ तेव्हां अनध्यस्तविवर्त्तप्रभा । जो पूर्ण सच्चिदानंदगाभा । तो नयनांगणीं

उभा । राहोनि खेळे ॥ ४६ ॥ नयनांगणीं खेळत । हृदय पाळणा रडत । कीं हृदयपाळणा खेळत । रडत नयनांगणीं ॥ ४७ ॥ कोणी-कडेही जावो वृत्ति । मागें पुढें सांवळी मूर्ति । पादयुगुल धरोनि हातीं । रडे दुग्धार्थी प्रतीतीनें ॥ ४८ ॥ तेथ सोहंकामविकारू । दुग्ध पाजितां आटे साचारू । आणि नित्य जवळी असावा शार्ङ्गधरू । येणें सोहं-लोभविकारू अर्पित ॥ ४९ ॥ अरवंसाहि ऐसा । जे माशिया गर्भीचा ठसा । तो अंतर द्यावया सहसा । समर्थ नाहीं मजलागीं ॥ ५० ॥ मार्जारन्यायें पितृमातृभक्ति । मर्कटन्यायइव वात्सल्यस्थिति । अथवा त्याहून उच्चप्रतीति । निश्चयें मी म्हणे ॥ ५१ ॥ बिल्वमंगलाचें वचन । येच विषयीं प्रमाण । हात सोडवोनि जातां भगवान । बोलिले ते ध्यानीं आणी मना ॥ ५२ ॥

॥ श्लोक ॥

'हस्तमुत्क्षिप्य यातोऽसि बलात् कृष्ण किमद्भुतम् ।
हृदयाद्यदि निर्यासि पौरुषं गणयामि ते '॥ ( बिल्वमंगल. )

॥ ओवी ॥

यथाचा अर्थ । व्रजभाषेआंत । बोलिलेती संत । तो हा ऐसा ॥५३॥

॥ दोहा ॥

' हात छुराये जात हो निबल जानि के मोहे ।
हृदयसे जब जावोंगे बली बखानो तोहे ' ॥

॥ ओव्या ॥

तर्पे भगवंत होता नंदन । त्याहोनि अधिक भक्तिविंदान । यशोदे सारखे श्रीकृष्णपाळण । निष्काम जाण सर्वदा ॥ ५४ ॥ यशोदा प्रेमा कर्माबाई । यांची भक्तिंचिया नवाई । होवोनि कृष्ण शेषशायी । भजती अंगें ॥५५॥ प्रेमाबाईचें अगाध भजन । श्रीकृष्णासि वेताटीनें मारिले ऐकोन । भक्तिबळें न राहोनि भान । बोलिली वचन यशोदेसी ॥ ५६ ॥

॥ पद ॥ ( प्रेमाबाई. )

' अहिरनी कठन नंदकी नार ॥ धृ० ॥
ब्रह्म कहे स्तनपान दे मोहे । तौं नहि देत गवार ॥ १ ॥
पगन पन्हया कहत कन्हया । देत छरिनको मार ॥ अहि० २ ॥'

॥ ओव्या ॥

यशोदेचिया भजनाची रीति । मी ह्मणे न बोलवेल श्रुति । विश्वरूप दाखवितांही विश्वपती । जिणें वात्सल्यभक्ति न सोडिली ।५७। गर्गनारदादि मुनिजन । क्षणक्षणां सांगती येऊन । कीं हा परमात्मा विश्वभूषण । वेदपुराणा वंद्य जो ॥ ५८ ॥ तेंही ऐकोन साठवी हृदयीं । पुढें तान्हा म्हणोनि दे भातदही । मज वाटे श्रीकृष्णाहूनि लवलाही । यशोदा वरिष्ट ॥ ५९ ॥ पाहावया आपुली जाती । गोकुळांतूनि गेला श्रीपति । परी यशोदावात्सल्यभाक्ति । किंचित् चित्तीं न मळली । ६० । श्रीकृष्णीं अर्पिला सोहंकाम । सोहंलोभही मेघश्याम । सोहंक्रोधही अर्पिता प्रेम । अधिकाचि वाढे ॥ ६१ ॥ अंतःकरणीं प्रवेशला । तो हृदयवटीं गर्भ जाहला । हृदयकमलपर्णीं निजला । मुखीं अंगुष्ट घालुनी ॥ ६२ ॥ तो मनसा चिंतितां बालमुकुंद । अंतर्बाहेरीं आनंदकंद । कडिये घेऊनि ब्रह्मानंद । यशोदेस तैसा वात्सल्यभक्तौ ॥ ६३ ॥ जे जे वात्सल्य करिती । ते ते यशोदा मी म्हणे चित्तीं । पति माता समजोनि तत्पदावरुती । अखंड मस्तक मी ठेवी ॥ ६४ ॥ हृदयीं राहावा सुकुमार । यासाठीं सोहंकामसोहंलोभविकार । नायके वाटतां सोहंक्रोधविकार । हरिचरणावर समर्पी ॥ ६५ ॥ सोहंक्रोधविकारवेताटी । पाहोनि चळचळ कांपे जगजेठी । देवपण विसरोनि मिठी । भक्तपदीं घाली ॥ ६६ ॥ इतुकियानेंहि क्रोध । मातेचा शांत नोहे प्रसिद्ध । ऐसेंचि मानोनि गोविंद । आई आई पुनः म्हणे ॥ ६७ ॥ तंव ती म्हणे वदसी काये । प्रभु म्हणे मज चषक देई माये । कासया पुसतां दुग्ध स्वयें । वदनीं मागे ॥ ६८ ॥ एथत्रा आजीं दुग्ध नाहीं । केधवा राहील तरी आई । ती ह्मणे रजनीचिये समयीं । देईन तूंते ॥ ६९ ॥

---

॥ श्लोक ॥

१. मातः किं यदुनाथ देहि चषकं किं तेन पातुं पयः ।
तन्नास्त्यद्य कदास्ति वा निशि निशा का वांधकारोदयः ॥
आमील्याक्षियुगं निशाप्युपगता देहीति मातर्मुहुः ।
वक्षोजांबरकर्षणोद्यतकरः कृष्णः स पुष्णातु नः ॥ १ ॥

रजनी ह्मणजे काय जननी । बाळा आंधारीं न दिसे नयनीं । मग आपुलेंचि नेत्र मिटोनि । जाहली रजनी ह्मणे माय ॥ ७० ॥ पाहतां जयाची स्वरूपस्थिति । त्रिकाल न दिसे अविद्याराती । तो मातृप्रेम-दुग्धार्थी । मिथ्या दिवसराती सत्य मानी ॥ ७१ ॥ वक्षोजांबरपदर । ओढोनि मागे दुग्ध परिकर । तो जगन्मोहन यशोदाकुमार । पति होवोनि रक्षो आह्मां ॥ ७२ ॥ केव्हां पुत्रगुण आठवून । गुणींच वियोग अनुभवोन । वात्सल्यवृत्तिभजन । संयोगीं घडे ॥ ७३ ॥ झडोनि जावोत माझे हस्त । उखळीं बांधिला रतिवरतात । जया ध्यातीं मुनी समस्त । तया मी उगा म्हणून झिडकारी ॥ ७४ ॥ वर्णितां थकली वेदवाणी । तया मी येरे जारे ह्मणी । अथवा ऐसेंचि भावी मनीं । आतां जाशील तरी बांधोनि ठेवीन पहा ॥ ७५ ॥ एवं सोहंकामक्रोध-लोभविकारें । बोलणें होकां नानाकारें । परी हृदयप्रेमभरें । ह्मणे श्रम नकोत मम बाळा ॥ ७६ ॥ स्तन घालोनिया वदनीं । अखंड पयः पाजी जागुनी । माय पुत्रा अभेदपणीं । मिठी तेव्हां ॥ ७७ ॥ तो वात्सल्यभक्तिस्वरूप । विठ्ठलरुक्मिणीकुळदीप । श्रीज्ञानेश्वरनिःसीम-कलाप । वंदिला भावें ॥ ७८ ॥ सखे ज्ञानेश्वर मायबहिणी । कळलें करणें तुझिये पाणीं । निवांत तनुमन चरणीं । जन्म जन्म वाहिलें ॥ ७९ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे प्रीतिनर्तने वात्सल्याभिनये तृतीयः पदन्यासः ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

—:0:—

# पदन्ययास ४ था.

ॐ नमः श्रीआचार्या । सच्चिदानंद सर्वैश्वर्या । आळंदीवल्लभा परमैश्वर्या । कारणकार्यातीत तूं ॥ १ ॥ जय जय ज्ञानेश्वरमाउली गिरिनंदिनी । कामक्रोधशुंभनिशुंभदनुजदलनी । माये मज प्रेमपान्हा पाजुनी । ओसंगा घेऊनि खेळवी ॥ २ ॥ जय जय ज्ञानेश्वरतात कैलासरमणा । देहाभिमानअंधकदलना । निजपद देऊनि निजनंदना । भक्तिपाळणा पहुडवावें ॥ ३ ॥ जय जय सद्गुरो करुणाघना । श्रीज्ञानेश्वरा विश्वजीवना । नाममात्रेंचि जीवपणा । वारूनि यदुपपणा देसी ॥ ४ ॥ जय जय सद्गुरो प्रियकरा । जय जय सद्गुरो ज्ञानेश्वरा । जय जय सद्गुरो विश्वंभरा । चितिराधावल्लभा ॥ ५ ॥ जय जय सद्गुरो मनमोहना । जय जय सद्गुरो हृदयभूषणा । जय जय कैवल्यसौभाग्यनिधाना । कल्याणगुणा श्रीगुरो ॥ ६ ॥ प्रथम करोनि आपणाऐसें । निज वडिलपण उरलें असे । तें अनध्यस्तविवर्त आपैसें । जाहलें कीरू ॥ ७ ॥ यद्यपि आवडीअनुसार साचे । परी अलंकार सोनियाचे । तैसें भक्त्यनुसार सुखाचें । रूप अनध्यस्तविवर्त ॥ ८ ॥ सोनियाचेठायीं । अलंकार अध्यास पाही । ऐसें ह्मणती तें लवलाहीं । योग्य नोहे ॥ ९ । अध्याससामुग्रीमाजीं पूर्ण । मुख्य अधिष्ठानाचें अज्ञान । अध्यासही म्हणोन । अबुद्धिपूर्वक होय ॥ १० ॥ आणि येथ कनकाच्या ठायीं । बुद्धिपूर्वक अलंकार पाही । अधिष्ठानाचें अज्ञान नाहीं । ह्मणोनि अध्यास तो नव्हे ॥ ११ ॥ सोनियाहूनि भिन्न नोहे । यालागीं तो विवर्त आहे । परी अध्यास नोहे । म्हणोनि अनध्यस्त ॥ १२ ॥ तैसें अधिष्ठानाचें नसोनि अज्ञान । मुनी बुद्धिपुरःसर ध्याती सगुण । यालागीं तूं राधारमण । अध्यासरूप न होसी ॥ १३ ॥ स्वर्णकार मेलियाही । स्वर्णतावदलंकारा खंडन नाहीं । तैसा वृत्तिबाध झालियाही । अनध्यस्तविवर्त न निवर्ते ॥ १४ ॥ आतां ब्रम्हाहूनि भिन्न विवर्तू । तो म्हणावा मायाकृत पदार्थू । अन्यथा ब्रम्ह सिद्धांतू । एक होईल ॥ १५ ॥

परी हे शंका घ्यावया । अनवसरींचि या ठाया । अनादिषट्पदार्थ संमत पूर्वाचार्यां । मज संमत अनादिसत्पक ॥ १६ ॥ परी पांचच निवृत्त होती । दोघांची तंव एक स्थिति । मुख्य ऐक्य अनध्यस्तविवर्तीं । सांपडे हें ॥ १७ ॥ ह्मणौनि ते पदार्थ दोन । हें न बोलवें वचन । यालागीं षट्पदार्थ ह्मणोन । समन्वय केला ॥ १८ ॥ सच्चिदानंदपदें तीन्ही । जियें आनंदीं होती गुणी । तियें आनंदीं प्रेमखाणी । नाशेचि-ना ॥ १९ ॥ प्रेमखाणी जरी नाशेल । तरी आनंदू आपआपणा विटेल । आणि प्रेमखाणी राहील । तरी भक्तिसिद्धि ॥ २० ॥ वृत्तिबाधू जरी जाहला । तरी स्वप्रेमू काई निमाला । तोचि व्यापकरूपणें वहिला । भक्तिरूप ॥ २१ ॥ आतां वृत्तिबाधें देशबाधू । म्हणौनि एकदेशीय व्यापकप्रभेदू । नाशिलीया ब्रह्मबोधू । जैसा तैसा ॥ २२ ॥ तेथ प्रेम-सुखाची नवाई । निर्विशेषादिठायीं । अनिर्वाच्यडोहीं । आनंदोल्हासू ॥ २३ ॥ तोचि हृदयींचा मनमोहन । अनध्यस्तविवर्त श्रीकृष्ण । जीवन्मुक्त आलिंगन । देती जया ॥ २४ ॥ अहो ! हे सिद्धिकरण । वाटेल जरी कठीण । तरी वेदांतियाकारण । पुसे मी ऐसें ॥ २५ ॥ ब्रह्माचिया-ठायीं । अध्यास असतां बाध नाहीं । तरी अनध्यस्तविवर्त लवलाहीं । घेतां विरोध कैंचा ? ॥ २६ ॥ ब्रह्मानंद न बाधतां । प्रेमवृत्त्या सुख निघोट घेतां । विदेहमुक्ति तत्वतां । अपेक्षावी कां ? ॥ २७ ॥ अध्यास अनादि अनंत । यावज्ज्ञान आचार्योक्त । ज्ञान झालिया तो नाशत । परी प्रीतिभगवद्भक्ति कां जावी ? ॥ २८ ॥ स्वर्ण समजोनि अलंकार । ठेवितां येती समग्र । तैसें ब्रम्ह समजोनि साचार । भक्त्यंतर ठेवितां येईल न कां ॥ २९ ॥ ज्ञानविरोधी जें जें नाहीं । तें ज्ञानें नाशावया कारण काई ? । आणि वस्तूहूनि भिन्न नाहीं । म्हणौनि द्वैत नुमटे ॥३०॥ अध्यास बाधक म्हणोन । गेलें विषमसत्ताभान । तथापि अनिर्वाच्यपण भक्तीचें उरलें ॥ ३१ ॥ म्हणोनि बाधिलिया संसृति । मग हो न हो विदेहमुक्ति । दृढ भगवद्भक्ति । आश्रयावी ॥ ३२ ॥ जीवन्मुक्ति जाहलियावरी । विदेहमुक्ति इच्छितां खरी । विशेष प्राप्ति काय तरी । निरूपावी ? ॥ ३३ ॥ म्हणाल कीं प्रारब्ध नाशत । तरी प्रारब्ध असतां काय होत ? । दुःख म्हणाल तरी निश्चित । मुक्ति कैंची ?

॥ ३४ ॥ प्रारब्धापासूनि न व्हावें दुःख । म्हणोनि विदेहमुक्ति इच्छाल देख । तरी भक्तिचेही हातीं सम्यक । प्रारब्ध सुखरूप करणें असें ॥ ३५ ॥ आणि साक्षिया अनुभवें । जीवन्मुक्तींत वाचाऋण स्वभावें । तें प्रारब्ध निवर्तलियाहि नोहें । निवृत्त कदा ॥ ३६ ॥ " तें ऋण शेष वाचा इया । न फेडवोंचि मरोनिया '। हें स्वमुखें श्रीगुरुस्वामीराया । बोलिलेति आपण ॥ ३७ ॥ तयाची न होतां निवृत्ति । तरी सवृत्तिक होईल विदेहमुक्ति । यालागीं वाग्ऋणनिवर्तक भक्ति । विदेहमुक्तींत समन्वयो ॥ ३८ ॥ पुढें विदेहमुक्तींत भेद जाये । तुमचा अनिर्वाच्य प्रेम राहे । ही व्यतिरेकाची असो सोये । परी तो अन्वयें होय आतांही आम्हां ॥ ३९ ॥ व्यतिरेकें निरसलिया भेदप्रतीति । जीवन्मुक्तींत अन्वयें गुरुमूर्ति । पुनर्व्यतिरेकें भक्तिमुक्ति- । एकता होय ॥४०॥ तेथ मुक्ति ह्मणतां काय जोडे । आणि भक्ति म्हणतां काय मोडे । हे वृत्तीचे आग्रह कोरडे । प्रेमानंदू तो तेथ ॥ ४१ ॥ न प्रेम ह्मणशील पुनः जरी । एकादें वेळें तरी । कीं ब्रह्म निर्धारीं । कंटाळावें ब्रह्मपणा ॥ ४२ ॥ मग मुक्तीस संसारता यावी । हें तंव तुज अनिष्ट भावी । ह्मणोनि प्रेमसंभवीं । आनंद असो ॥ ४३ ॥ आतां प्रीत्यादी ह्मणशील वृत्ती । तरी तैसी असो का अन्यप्रीति । परी ब्रह्मानंदस्थिति । वृत्ति नोहे ॥ ४४ ॥ ह्मणशील वृत्त्यवच्छिन्न आनंद भिन्न । तरी स्वरुपीं तो काय न वृत्तीविण । ह्मणशील तया अनिर्वाच्यपण । तरी तदन्वयें पूर्ण प्रेमा अनिर्वाच्य ॥ ४५ ॥ आतां ज्ञानाहंताही गेलिया । मग जें जें प्रेमान्वया । तें कवण्या प्रत्ययें बोधावया । अशक्य जरी ॥ ४६ ॥ तरी ज्ञानाग्रहअहंपण गेलें । ह्मणोनि आनंदघन तें उरलें । तेंचि कृष्णरूप जीवन्मुक्तींत वहिलें । प्रीतिवृत्त्यवच्छिन्न युष्मत्प्रत्ययइव ॥ ४७ ॥ युष्मत्प्रतीतिरिव प्रतीति । जे आनंदा दाखवी प्रीतिवृत्ति । आणि अस्मत्प्रतीतिरिव प्रतीति । वृत्ति दावी चैतन्य ॥ ४८ ॥ चैतन्यानंद एक ह्मणोन । न ये विषयीं विषयपण । किंतु उपकारक होऊन । वाग्ऋण फिटे ॥ ४९ ॥ ही जी कां जीवन्मुक्ति । येणें ऐक्यबोधेंचि विदेहमुक्ति । ह्मणोनि भिन्न न भासोनि भक्ति । अद्वैतीं आहे ॥ ५० ॥

'तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगे नोहे । बोला ऐसे '॥ १ ॥ ( ज्ञानेश्वरी )

ऐसें तातवचना देख । हेंचि माधुर्य हेंचि कांतकांतासुरतसुख । गुरुशिष्याचें मुखा मुख । स्पर्शो हाचि ॥ ५१ ॥ हें बोलावया योग्य नाहीं । परी जीवन्मुक्तीचियाठायीं । वागूण फेडावया पाही । भिन्नइव दावूं ॥ ५२ ॥ मग तें फिटलिया वागूण । सहजचि होईल अभिन्न । परी निरूपितासमर्योंही शब्द मात्र भिन्न । अर्थानुसंधानीं अभेदू ॥ ५३ सद्गुरुनाथ प्रियकरा । आपण आपुलें उदारा । उपसाहावें मधुर मधुरा । पुरें उणें ॥ ५४ ॥ ज्ञानाविरोधी वृत्ति पूर्ण । झालिया मग रस उत्पन्न । भक्तीचें स्वरूप संपूर्ण । तेथोनि प्रकटे ॥ ५५ ॥ त्वंपदीं प्रेमरस भक्ति । तत्पदीं प्रेमरस यदुपति । दोहोंची ऐक्यप्रतीति । न मोडेचि ॥ ५६ ॥ यालागीं निष्काम भगवंतप्रीति । आत्मारामहि ठेविती भगवंतीं । याविण वागूणी वेदान्ती । ऐसें मी ह्मणे ॥ ५७ ॥ आतां जी जी व्यर्थ वृत्ति । ती ती तमोगुणाची स्थिति । ऐसी जीवन्मुक्तिविवेकीं उक्ती । विद्यारण्य-स्वामींची ॥ ५८ ॥ तेथचि 'यःसर्वत्राऽनभिस्नेहः' हें गीतावचन । घेऊन ऐस केल बोलण । कीं व्यर्थ स्नेह तोही जाण । तमसः परिणामू ॥ ५९ ॥ हें वचन घेऊनि प्रमाण देख । निष्काम भक्ति खंडिती मूर्ख । तमोगुणाचा परिणाम देख । ह्मणती तियेतें ॥ ६० ॥ परी विद्यारण्याचें वचन । ऐसेंचि असेल पूर्ण । तरी स्वग्रंथविरोध दारुण । येत असे कीरू ॥ ६१ ॥ पंचदशींत ईश्वर सत्वगुणी । स्वतंत्र ह्मणती विद्यारण्य-मुनि । तो भक्तावरी प्रेम करी कांहीं नेच्छुनी । हें गीतादौ प्रसिद्ध ॥ ६२ ॥ व्यर्थ स्नेहवृत्ति तमोगुण । तरी ईश्वरही तमोमय आपण । मग पंचदशीच बोलण । व्यर्थ झाल ॥ ६३ ॥ ह्मणोनि ऐसें नाहीं । व्यर्थ विषयस्नेह तमोगुण पाही । आणि निष्काम भगवत्स्नेह लवलाही । श्रुतिस्मृतिसिद्ध ॥ ६४ ॥ यालागीं भगवत्स्नेहें करुणारस । तेणें 'तस्यै-वाहं' भक्ति प्रकट विशेष । परी शांत सर्वांस । समान्वित ॥ ६५ ॥ सशान्तशृंगारान्वित माधुर्यभक्ति । सशान्तकरुणान्वित 'तस्यैवाहं' भक्ति । 'ममैवासौ' सशान्तवात्सल्यान्विति । येथ शान्तस्थिति अन्यानादरू ॥ ६६ ॥ तिया मागां निरूपित दोन्ही । पुढें येथही तिया

समन्वयूनि । माधुर्यसुखाची उभारणी । अवधारिजे स्वामी ॥ ६७ ॥ आपण श्रीकृष्णरूपें पति । होवावया चित्तीं । जे ऐसी वृत्ति । सहज होय ॥ ६८ ॥ माझेंचि आइके गोविंद । हें वात्सल्यीं असो विशद । मी न कष्टवितां आनंदकंद । सेवा करीन आवडी ॥ ६९ ॥ मज परमात्मया भेदू नाहीं । यास्तव मागणें नसे कांहीं । आणि तो नित्यतृप्त ह्मणोनि लवलाही । देणें मज नसे ॥ ७० ॥ परी वागुण एक जावें । कीं आवडीं स्वभावें । ह्मणोनि न कष्टवितां होवावें । दासी मियां ।७१। तेथ 'सएवाहं' वृत्ति । न सांडिता दास्यस्थिती । यालागीं पतित्वाची प्राप्ती । ब्रह्मकुलैकपणें ॥ ७२ ॥ प्रथम अलंकारभजनीं भक्ति वीर । पुढें उमटे सशांतश्रृंगार । परी अच्युत वीर । तामस ह्मणती ॥ ७३ ॥ भक्तिवीर तामस होता । तरी योगवीरही तैसाचि तत्वतां । यांत योगें वृत्ति निरोधितां । न घडे कीरू ॥ ७४ ॥ योगवीरेंही होय समाधि । भक्तिवीरेंही तीचि सिद्धि । तमोमय म्हणतां समाधि । तरी तूर्याही तैसी ॥ ७५ ॥ काव्यप्रकाशक्रम टाकोनि दूरी । एवढी अनर्थपरंपरा शिरीं । अच्युतरायें निर्धारीं । घेतली आहे ॥ ७६ ॥ असो कवणाचें कांहीं । जो अलंकारभजनीं भक्तिवीर पाही । तेथूनि स्वरूपभजनीं लवलाहीं । सशांतश्रृंगार उमटे ॥ ७७ ॥ सशांतश्रृंगार भक्तिरस । ऐक्यभजनीं या तिहींचा विकाश । अन्यनिर्वेदें शांतरस । श्रृंगाररस पतिभावें ॥ ७८ ॥ भगवत्प्रतीतिस्तिव भक्तिरस । जीवन्मुक्तासी अति उल्हास । जीवन्मुक्तिविवेकीं ऐस । विद्यारण्य बोलिले ॥ ७९ ॥ यद्यपि देवादिविषया प्रीती । काव्यप्रकाशकारादि भाव ह्मणती । भक्तिरसातें पृथक् न गणिती । ह्मणोनिया ॥ ८० ॥ तदपि भगवद्भक्तिचंद्रिकामृतरसोल्हासीं । पराभक्ति निरोपितां आपैसी । भक्तिरसातें विशेषीं । पृथकृता देती ॥ ८१ ॥

॥ श्लोक ॥

'परत्राऽनासंगं जनयति रतिर्या नियमतः
परस्मिन्नेवास्मिन्समरसतया पश्यत इमम् ॥
परप्रेमाख्येयं भवति परमानंदमधुरा
परा भक्तिः प्रोक्ता रसइति रसास्वादनचणैः' ॥ १ ॥

॥ ओव्या ॥

आणि 'योमद्भक्त'इत्यादी श्रुती । भक्तिमुख्यता बोधिती । यालागीं भगवदर्थरसख्याति । भक्तिरसाप्रति पार्थक्य ॥ ८२ ॥ रसद्वैविध्य सम्यक । लौकिक आणि अलौकिक । पदार्थसन्निकर्षजन्य लौकिक । अलौकिक ज्ञानजन्य ॥८३॥ परी दोन्ही इयारीती । योजितां निश्चितीं । कैसी भगवत्प्राप्ति । अचुक होय ॥ ८४ ॥ प्रतिमासन्निकर्षे लौकिक । तेथ पतिनातें ठेवूनि देख । रस लौकिक आणि अलौकिक । समन्वयावा ॥८५॥ पुढें भगवद्गुण काव्यानुपनायकीं । रसिक होवावे अलौकिकीं । मग मृदुसंवेगीं मनोरथिकीं । रसिक होवावें ।८६। आत्मानंदस्थायी पुष्ट होतां । शांतरस प्रकटे तत्वतां । तेथचि रतिस्थायीभाव पुष्ट होतां । शृंगार प्रकटे ॥ ८७ ॥ पतिभाव आलंबन । सौंदर्यादि उद्दीपन । इतर व्यभिचारी मिळोन । रतिस्थायीभाव पुष्ट होय ॥ ८८ ॥ तरी श्रीकृष्ण मुख्यालंबन । आणि पतिभाव तदैक्यें उत्पन्न । यालागीं भक्तिरसोद्भवून । शृंगारात्म होय ॥ ८९ ॥ तो प्रतिमादिस्थानीं एकवटला । गुणश्रवणें वृद्धि पावला । मनोरथें हृदयीं व्यक्त झाला । स्वप्नीं प्रकटला मध्यसंवेगें ॥ ९० ॥ तोंचि निरूपण कर्णामृतीं । प्रमाणार्थ ऐक सखि वृत्ति । सकल भक्तांची प्रतीति । ऐसीचि आहे ॥ ९१ ॥

॥ श्लोक ॥

वेणीमूले विरचितघनश्यामपिच्छावचूडो
विद्युल्लेखावलयितइव स्निग्धपीतांबरेण ।
मामालिंगन्मरकतमणिस्तंभगंभीरबाहुः
स्वप्ने दृष्टस्तरुणतुलसीभूषणो नीलमेघः ॥ १ ॥
( कृष्णकर्णामृत. )

॥ पद ॥ ( मीराबाई. )

माई म्हाको सपनेमे परन्यो गोपाल ॥ धृ० ॥
राती पीली चुनरि पहिरी मेंहदि पान रसाल ॥ १ ॥
काँईं औरकी भरों भाँवरै म्हाको जग जंजाल ॥ २ ॥
मी प्रभुरा गिरधरन लालसौं करी सगाई हाल ॥ माई० ३ ॥

॥ ओव्या ॥

हें मीराबाईचें वचन । पुष्टिप्रदचि संपूर्ण । आणि ' स्वप्ननिद्राज्ञाना-वलंबनेति ' योगसूत्रस्पष्टीकरण । सांगतां मणिप्रभाकर ऐसेंचि वदती ॥ ९२ ॥ पतीनें गोपिका रोधितां । त्या ध्यानजभक्तिरसें भगवत्प्राप्ता । श्रीमद्भागवतीं वार्ता । ऐसी आहे ॥ ९३ ॥ एवं मध्यसंवेग तीव्र घडे । तैं अलौकिक पतिदेव लौकिकइव जोडे । अन्वयें श्रीकृष्णरूपडें । अंतर्बाह्य ॥ ९४ ॥ मग भजनाची आवडी मोठी । नाना वृत्तीच्या पाटीं-पोटीं । अनुरागाची गोमटी । पेटी उघडे ॥९५॥ अनुरागें भाव नाना । अर्पिजती श्रीहरिचरणा । ते श्रीज्ञानेश्वर करुणाघना । स्वीकारा स्वामी ॥ ९६ ॥ श्रीज्ञानेश्वर माय माउली । सर्वरूपें तीचि प्रकटली । आतां निवांतचि वाहिली । चरणीं मति ॥ ९७ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे प्रीतिनर्तने माधुर्याभिनये माधुर्योपपत्तिर्नाम चतुर्थः पदन्यासः । श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

—०:※:०—

# पदन्यास ५ वा.

जय जय सद्गुरु हृदयरमणा । जय जय सद्गुरु मनमोहना । जय जय सद्गुरु भक्तभूषणा । कल्याणनिधाना आळंदीपते ॥ १ ॥ जय मोहरावणराघवा । जय मायापूतनमाधवा । जय प्रेमळप्रेमगौरवा । ज्ञानेश्वरा ॥ २ ॥ आतां तुमचिया चरणीं । प्रेमखुणें करुनी । ज्ञानरूपें मिळोनी । भक्तिरूपें पघळले ॥ ३ ॥ तुमचिया प्रेमाची नवाई । अनि-

र्वाच्य सर्वाठायीं । आतां प्रेम तरी कायी । अवधारिजे ॥ ४ ॥ दृष्टि-परिचय हार्दप्रेम । हे ऊर्मिपरंपरा परम । वृत्ति तटस्थ मात्र ईक्षणोत्तम । दृष्टि ह्मणिजे ॥ ५ ॥ मियां जवळीं देखिला हरि । परी न लक्षिला चित्तभरी । ऐसें सखीभाषणकुसरी । दृष्टि ह्मणिजे ॥ ६ ॥ तीचि दृष्टि जेव्हां । सर्वथा अनुपेक्ष्य होईल तेव्हां । परिचयस्वभावा । प्राप्त होय ॥ ७ ॥ पुढें तीचि परिचय । दोष न पाहोनी होय । तैं हार्द नांव स्वयें । पावोनि राहे ॥ ८ ॥ पुढें तेचि हार्दता । परिपक्वदशें येतां । प्रियाची भोगपर्यवसायिता । प्रेम तोचि ॥ ९ ॥ परी हें प्रेमाचें लक्षण । विषयासाठींच म्हणोन । अनादरणीय जाण । सर्वथा वाटे ॥ १० ॥ गुप्तपादाचार्याचें मत ऐसें । प्रेम बोलिजे इच्छाविशेषे । जी इच्छा भोगांतींही निवृत्त नसे । हें मत मान्य असे प्रेमरसायनकारा ॥ ११ ॥ परी इच्छा अंत:करणधर्म पूर्ण । आत्मा वेगळा त्याहून । आणि आत्मा परप्रेमास्पद हें वचन । विद्यारण्याचें वेदांतीं ॥ १२ ॥ तया आत्मयाचा धर्म जरी । इच्छा होईल तरी । इच्छा असते विषयाकारी । मग आत्माही विषयाकार व्हावा ॥ १३ ॥ विषयाकार होतां आत्मा । तरी तो ह्मणावा जडप्रतिमा । जडाचियेठायीं प्रेमा । अनुभविजेना ॥ १४ । यालागीं शांडिल्यमुनीचें मत । योगीं वियोगोपलालन प्रेम वदत । आणि श्रीनारदांचें मत । अनिर्वाच्य प्रेम ॥ १५ ॥ येथ अनिर्वाच्य शद्बाचा अर्थ । सदसद्विलक्षण ह्मणतां अनर्थ । तरी आतां यथार्थ । लक्षण ऐसें ॥ १६ ॥ साखर आपण भक्षिली । आम्रफळेंही खादलीं । तया दोहोंची गोडी कळली । मनास जरी ॥ १७ ॥ तरी गोडी कैसी काय । हें वाचेनें सांगतां नये । एवं मानसिक वाचेसी कानडे होय । मग आत्मा वदवेल केवीं ? ॥ १८ ॥ जैसें वाचेसी न वदवें मन । तैसा आत्मा वृत्तीसही न घेववे इदंत्वेकरून । गो परमप्रेमास्पद म्हणोन । अनिर्वाच्यपण प्रेमासी ॥ १९ ॥ तोचि रस हा सिद्धांत । वृत्तिस्थायीभावें निश्चित । आंनंदेदंतेवानध्यस्तविवर्त । प्रेम व्यक्त तैसाचि । २० । हा व्यक्त प्रेम अवघा वाढे । स्वार्थपणा समूळ मोडे । तैं श्रृंगारमय जोडे । भक्तिरसू ॥ २१ ॥ आत्मनि नारदोक्त भक्ति । अंत:करणीं शांडिल्यरीती । दोन्ही मिळोनी श्रीहरिमूर्ति अंतर्बाह्य ॥ २२ ॥ योगें

वियोगोपलालन । हें जें शांडिल्यप्रेमलक्षण । तें नारदमतीं समन्वयोन । पाहतां सात्मज्ञानभक्तिसिद्धि ॥ २३ ॥ ह्मणोनि योग आधीं ओळखिजे । मग वियोग तो अनुभविजे । परी योगासी न चुकिजे । रहस्य हें ॥ २४ ॥ द्रवीभूत अंतःकरण । हेंही प्रेमाचें लक्षण । येथचि घ्यावें समन्वयून । मधुसूदनोक्त ॥ २५ ॥ आणि मागें जीं खंडिलीं मतें । त्यांतून हार्द ग्राह्य वाटे मातें । यालागींचि येथें तें । समन्वयावें ॥ २६ ॥ वात्सल्यादिकीं गलिताभिमान । पुढें माधुर्योपपत्ती ' सएवाहंपण ' । झालिया दोषानवलोकन । मृदुसंवेगें हरिचरितीं ॥ २७ ॥ मग द्रवीभूत अंतःकरण । होतां भगवदाकार पूर्ण । तेव्हां संभोगशृंगारें प्रभुयोग पूर्ण । वियोगोपलालन विप्रलंभें ॥ २८ ॥ अथवा संयोगें पूर्ण समाधान । रसास्वादनार्थीं वियोगोपलालन । यास्तव धन्य असोनी धन्यताभिमान । अंगीं न जडे ॥ २९ ॥ आतां तेंचि कवणेरीतीं । दोही शृंगाराची प्रतीति । सावध ऐक सखी भ्रांती । सकल सांडूनी ॥ ३० ॥ प्रथम संभोगशृंगार । तो द्विविध असे साचार । गुप्त आणि स्पष्ट प्रकार । प्रसिद्ध त्याचे ॥ ३१ ॥ अहंकारादि कुटुंब कल्पोन । परस्त्री होवावें रूपकेंकरून । मग भगवंतीं ठेवोनि मन । सदीशप्रीतिपुंश्चली व्हावें ॥ ३२ ॥ ऐसें प्राचीन संताचें । वचनही असे साचें । तेंचि प्रमाणाचें । बिढार करूं ॥ ३३ ॥

॥ पद[2] ॥

'क्रोध माझा भरतार मेल्याला ठेवल दूरी ।
मला लागली गोडि ह्मणुनि मी हिंडते परद्वारीं ॥

---

१ ' योगे वियोगवृत्तिः प्रेम ' असें शांडिल्यसूत्र प्रेमरसायनकारांनीं घेतलें आहे; पण हें सूत्र भक्तिमीमांसेंत नाहीं. यावरून शांडिल्यसंहितेंतून किंवा आणखी त्यांच्या कोणत्यातरी ग्रंथांतून घेतलें असावें. " योगे वियोगोपलालनं प्रेम " असें याच सूत्राच्या आधारानें मी आपल्या ग्रंथांत वाक्य घातलें आहे. (ग्रंथकर्ता.)

२. पाठक्रमापेक्षां अर्थक्रम बलवान् असल्यामुळें व मला हाच पसंत वाटल्यावरून मी हीं कडवीं व्युत्क्रमानें घेतलीं आहेत.

अहंकार सासरा मेला पूर्वीचा वैरी ।
दंभ मान परिपंथ दीर असावें संसारीं ॥
आशा माझी सासू मजला गांजल बहूपरी ।
मनसा माझी ननंद हीरा खवळल मजवरी ॥
इतुक्याला मी हात जोडते दुजें नाहिं आंगीं ।
परपुरुष भोगिला परंतु पाप नाहिं आंगीं ॥
लाज सरम सोडली सखूबाई निसंग घरनीघी ।
परपुरुषभोगिला परंतु पाप० ॥ १ ॥
बोधाच्या मदनांत सखेग बाई मी जाली वेडी ।
चित्तचांदण्यामधें सखे म्यां टाकली पलंगडी ॥
शांतिपान वैराग्यसुपारी भरून तबकडी ।
विवेकाचा चुना लावुनी बनावली वीडी ॥
तम तंबाखू जाळायासी भरली गुडगूडी ।
सत्रावीचें पाणी आणुनि भरलें त्याचि घडी ॥
परोपरीचे विलास करिते साजन बहुरंगी ॥ परपुरुष०' ॥२॥

॥ ओव्या ॥

एवं स्वगृहजाच बहुत ह्मणोन । आश्रयावें श्रीहरिचरण । तीव्रसंवेगें साक्षात्करोन । गुप्त भोगावें हृदयसंपुटीं ॥ ३४ ॥ हाचि गुप्त संभोगशृंगार । ऐसाचि वाढे परिकर । जैसा गोकुळीं असतां यदुवीर । गोपिकांचा पैं होता ॥ ३५ ॥ तो गुप्त भाव अंतःकरणीं । घेऊनि पूजिजे कात्यायनी । सद्गुरुउदरीं जन्मूनि । कुमारी होवोनी आवडी ॥ ३६ ॥ हा भावनेचा खेळ । कर्तृतंत्र जरी सकळ । तरी येथ प्रेम प्रबळ । वस्तुतंत्रची ॥ ३७ ॥ मग तया प्रेमाचेनि योगें । पारकीयपणा झुगारोनि अंगें । कृष्णकान्ता निजरंगें । होवोनि संभोगे उत्साहो । ३८। तो तीव्रतर संवेगठेवा । जयास्तव वेणु वाजविणें माधवा । स्पष्ट संभोगशृंगार ह्मणावा । बुधजनीं हा ॥ ३९ ॥ सकल इंद्रियांचें अधिदैवत । एकाचि झाला गोपीकान्त । यालागीं अंतर्बाह्य काम समस्त । तेचि इच्छिती ॥ ४० ॥ विषयाचें प्रियपण । तें कृष्णसौंदर्यें नेलें हिरोन । ह्मणोनी इंद्रियें बाहेर धांवती तो अन्वयेंकरून । कामाधिष्ठान गोपीपती

॥ ४१ ॥ हृदयीं आलिंगनाचा लोभ । जाहलीया स्वयंभ । किंचित् व्युत्थानमिव सस्मितप्रभ । चित्त भासे ॥४२॥ तेव्हां आह्मी तुझ्या असोनी । सर्व सूत्र तुझिया पाणीं । मग कासया मोक्षदानी । झकविसी आह्मा ॥ ४३ ॥ ह्मणवोनी प्रणयकलहभरें । हठे क्रोधाकारे । हरिचरणचि गोजिरें । दृढ आवळी ॥ ४४ ॥ मी येथेंचि सांडीन प्राण । ऐसें प्रणयक्रोधाचें निर्वाण । तेणें एकचि ह्मणोन । नारायण द्रवीभूत ॥ ४५ ॥ " एकाकी न रमते " । ऐसी जी श्रुति ह्मणते । ह्मणजे प्रेमानंतपणा होते । अविरुद्धची ॥ ४६ ॥ " भेद तंव तंव दूण अभेदासी " । ही तातवाणी अतिसुरसी । याचि सुधारसी । पुष्टिदात्री ॥ ४७ ह्मणोनी नारायण । प्रेमें कुरवाळी वदन । तंव तंव अंतरीं मान । अधिक उठे ॥ ४८ ॥ तो मान न ह्मणावा अभिमान । तया मानाचा अर्थ जाण । इतुका वेळ मज उपेक्षिलें ह्मणोन । धरिलें मौन आतां मी ॥ ४९ ॥ घडीं घडीं हृदयद्वारीं येत । परी मागें फिरोनी प्रभुकडे पाहत । स्वापराधें खेदभरित । न जाय पुढें ॥ ५० ॥ तेव्हां मजही पावोनी । अवचिता जाईल जीवपणीं । या भीतिस्तव मोक्षदानी । कर धरोनी समजावी ॥ ५१ ॥ कीं सांडूनिया आपुली मुक्ती । हिनें आश्रयिली माझी भक्ती । यास्तव ऋणी जगत्पती । म्हणे ते वदती जयदेव ॥ ५२ ॥ आतां वेदांती ह्मणेल हें असमीचीन । तरी स्वार्थ करता ये वर्णन । आणि ईश्वरीं तो नाहीं बंधन । जगत्बाधाधिकरण मुक्तही तसे ॥ ५३ ॥ ऐसा जालिया भवसांडोवा । मग द्वेषें व्यतिरेक कां मांडावा । अन्वयें प्रेम मंडावा । हेंचि बरें ॥ ५४ ॥ ह्मणोनि जयदेवाचें वचन । सावध ऐको माझें मन । तें परमात्मया लागोन । न परमात्माभिमान हें द्योती ॥ ५५ ॥

॥ अष्टपदी ॥ ( गीतगोविंद )

'प्रिये चारुशीले प्रिये चारुशीले ।
मुंच मयि मानमनिदानम् ॥
सपदि मदनानलो दहति मम मानसं ।
देहि मुखकमलमधुपानम् ॥ ध्रु० ॥

वदसि यदि किंचिदपि दंतरुचिकौमदी ।
हरति दरतिमिरमतिघोरम् ॥
स्फुरदधरसीधवे तव वदनचंद्रमा ।
रोचयति लोचनचकोरम् ॥ प्रिये चारुशीले प्रिये०'॥१॥

प्रिये माझे ठायीं मान । दिसतो तुझा अकारण । जो मजतें दुजे नाहीं भान । आणि तुज मजवीण दुजे नाहीं ॥ ५६ ॥ ह्मणवोनी तुज नाहीं सपत्नी कोणी । कीं जेथ मी आसक्त तुज सांडुनी । यास्तव वृथा मान त्यजुनी । सखे वाणी गोड वदे ॥ ५७ ॥ मदन हा केव्हांही अनळ । तो संतसंगेंचि शमे केवळ । यालागीं मुखकमलमधु रसाळ । पाजि मातें ॥ ५८ ॥ प्रिया प्रिये हीं भाषण । करितां झळकती दशन । तेव्हां भयांधकार संपूर्ण । हारेप माझा ॥ ५९ ॥ जैं जीवपणा तुज येईल । तैं भेदें मी अव्यापकइव होईल । मग माझिये अंगीं जडेल । मिथ्यैषपणा ॥ ६० ॥ हें भय वाटे रोकडें । तें तुझ्या माझ्या ऐक्यें उडे । यालागीं मम नयनचकोरा आवडे । तव वदनचंद्र ॥ ६१ ॥

[कडव.] 'सत्यमेवासि यदि सुदति मयि कोपिनी ।
देहि खरनखरशरघातम् ॥
घटय भुजबंधनं जनय रदखंडनम् ।
येन वा भवति सुखजातम् ॥ प्रिये चारु०'॥ २ ॥

आतां सत्यचि मजवरी । कोपलीस जरी । कठिन नखें तरी । ताडन कीजे ॥ ६२ ॥ बाहुयुगुलें बांधिजे । दंतांहीं स्पर्शीजे । कीं सेवक चुकलिया कीजे । प्रभुनें जैसें ॥ ६३ ॥

[कडव.] 'त्वमसि मम भूषणं त्वमसि मम जीवनम् ।
त्वमसि मम भवजलधिरत्नम् ॥
भवतु भवतीह मयि सततमनुरोधिनी ।
तत्र मम हृदयमतियत्नम् ॥ प्रिये चारु०'॥ ३ ॥

मी जाहलिया सगुण । तूंचि माझें अलंकरण । अनुभवें जीवन । तूंचि

१ मातें-मला.

माझें ॥ ६४ ॥ मियां अगुणता सोडोनि फुडी । जगत्समुद्रीं दिधली बुडी । ते तूंचि सांपडलीस रोकडी । रत्नरूपें ॥ ६५ ॥ आतां मजवरी कृपा करोन । एकपणें चुंबनालिंगन । घडावया करी यत्न । हृदयीं माझें ॥ ६६ ॥

[कडव.] ' स्मरगरलखंडनं मम शिरसि मंडनम् ।
देहि पदपल्लवमुदारम् ॥
ज्वलति मयि दारुणो मदनकदनानलो ।
हरतु तदुपहितविकारम् ॥ प्रिये चारु० ' ॥ ४ ॥

आतां मदन हें विष केवळ । ज्याचें औषध संतपदकमळ । त्यावीण ईश्वरत्वही अनळ- । सम वाटे मातें ॥ ६७ ॥ ह्मणोनि सबीजकाम-दाहक । प्रिये तव पद सम्यक । माझें शिरीं निष्कलंक । कृपेनें ठेवी ॥ ६८ ॥ इत्यादि जयदेववचन । अनुभवा ये भगवंतीं क्रोध केलिया अर्पण । अहंता सोडोनि आपुलेपण । तयाचे चिन्ह हेचि कीं ॥ ६९ ॥ एवं समजाविता क्रोध जाय । तव अपराधे जीव घाबरा होय । सुरता-नंदी यादवराय । आपण वियोगभय चित्तीं धरी ॥७०॥ तेणें प्रभूनित्य-पणा जैसा । मी सुरतानंद देइन तया तैसा । या भक्तिरसोल्हासा । पाविजे कीरु ॥ ७१ ॥ तें भगवते सुरतानंददानपालन । व्हाया वियो-गोपलालन । परी संयोगाची खूण । सर्वथा जाण नाशेना ॥ ७२ ॥ आतां संयोगीं वियोग कैसा । प्रियज्ञानेश्वरप्रेमवळसा । कळों येईल सहसा धैर्येंचि पुढें ॥ ७३ ॥ हृदयसुरतीं ज्ञानेश्वरचरणीं । पुढतीं पुढतीं समर्पूनी । स्वामी अपराध क्षमा करोनी । दास्य निरंतर मज द्यावें ॥ ७४ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे प्रीतिनर्तने माधुर्याभिनये भक्तिनिष्ठसंभोगश्रृंगारात्तभगवद्योगो नाम पंचमः पदन्यासः ।

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# पदन्यास ६ वा.

जय जय सद्गुरु प्रियकरा । जय जय हृदयेंदीवरमधुकरा । जय जय सद्गुरु ज्ञानेश्वरा । अलकावतीवल्लभा ॥ १ ॥ स्वामी तुझें चरणकमळ । निजविकासिनी चन्द्रिका स्नेहाळ । तेथ मधुपा होवोनि सुढाळ । मधु रसाळ सेवूं आह्मी ॥ २ ॥ पूर्वील अपराधांच्या कोटी । प्रणयकलहाचिये शेवटीं । सख्या तुंवा घातल्या पोटीं । श्रीजगजेठी दयाळा ॥ ३ ॥ आम्ही होवोनिया पत्नी । तुज शिणविले मोक्षदानी । ऐसी करुणाकाहणी । वृत्तीसि मिळे ॥ ४ ॥ तेव्हां व्युत्थितइव चित्ता । वियोगानुभवें समर्था । वृत्तीसि एकतानता । सांपडे सहज ॥ ५ ॥ तेथ विषमानुरागक विप्रलंभ । जैसा गोपींचा स्वयंभ । तैसे गोपिकावल्लभ । प्रेम वाढे ॥ ६ ॥ मग तया प्रेमाचेनि अवसरे । व्यापक ब्रह्म चित्तीं भरे । तेणें पाठीं पोटीं पुरे । तेंचि एक ॥ ७ ॥ जें सगुण होतें अंतःकरणीं । तें लपूं पाहे निर्गुणीं । अवधिया वृत्ती तेक्षणीं । चमकती साच्या ॥ ८ ॥ प्रणयकलहाचा गर्व बहुत । होतां वागृण मस्तकीं बैसत । यालागीं तो कृपावंत । गुप्तसम होय ॥ ९ ॥ गुप्त प्रकट होवावया । स्थान नाहीं यादवराया । तथापि स्वानंदार्थ यया । सांपडला खेळ ॥ १० ॥ वाढतां सौभाग्यमद । विघ्न येईल रसास्वाद । मग देहबुद्धि विशद । होईल दृढ ॥ ११ ॥ याचि भयें गोविंद । करावया प्रसाद । निर्गुणीं लपे अभेद । होवोनिया ॥ १२ ॥ कीं परमाणूपाठीं-पोटीं । भक्त रक्षावे ही आवडी मोठी । यालागीं तो जगजेठी । हृदयसंपुटीं लपुनि रक्षी ॥ १३ ॥ किंवा संयोगें चढतां वाचाऋण । ह्मणोनी प्रियेचें होईल व्युत्थान । यालागीं प्रिय अंतरीं लपून । करी एकतान चरणीं वृत्ति ॥ १४ ॥ ज्ञानदृष्टी पाहतां । प्रकटणें लपणें वृथा । परी आनंदाची वार्ता । न बोलवेचि ॥ १५ ॥ संयोगीं वियोगीं गोविंद । ऐसा जो परप्रेम शुद्ध । तो अनुभवा न ये प्रसिद्ध । विरहावीण ॥१६॥ हेंचि श्रीमद्भागवतीं । बोलिली आहे यथार्थोक्ति । प्रथम वाढवोनी वियोगवृत्ति । मग अंगीं परम प्रीति संयोगें ॥ १७ ॥

॥ श्लोक ॥

' तासां तत्सौभगमदं वीक्ष्माणं च माधवः ।
प्रशमाय प्रसादाय तत्रैवांतरधीयत' ॥ १ ॥
( श्रीमद्भागवत. )

रसास्वादाचें प्रशमन । परमानंदाचें पसायदान । कराया अंतरीं लपला कृष्ण । स्पष्ट आन वर्णार्थ ॥ १८ ॥ अद्रुते चेतसि ब्रह्मानुभव । ज्ञान बोलिजे तया नांव । द्रुते चेतसि ब्रह्मानुभव । भक्ति ह्मणावी ।१९। चित्त तापकयोगें द्रवत्व पावें । ननु ऐसें न म्हणावें । शांतरस स्वभावें । तापकरहित ॥ २० ॥ परी हा संशय वृथा । वृत्तीची निर्वेदता । शांति पाहिजे ही वासना तत्वतां । तापक तेथ ॥ २१ ॥ असो परमात्मा लपतां निर्गुणीं । काठिन्य येवों पाहें मनीं । वियोगोपलालन त्या स्थानीं । तापक समजावें ॥ २२ ॥ तेव्हां द्रव पावें अंतःकरण । मग विभावानुभावादिकेंकरून । भगवद्रति निर्वेद हे दोन । पुष्ट स्थायीभाव होतां जाण शांतभक्तिरसू ॥ २३ ॥ नाना भावना शृंगार । हेचि प्रभु-सेवा समग्र । परी तेथही न यावा अहंकार । ह्मणोनी विरहोपलालन ॥ २४ ॥ ऐसीं जाहलिया वृत्तीची स्थिती । मग वृत्तीचि वृत्तींत सखि-या होती । तीव्रसंवेगें जगत्प्रतीती । तैसीचि ये ॥ २५ ॥ मग आप-सांत भावना । भावितांचि मनमोहना । तीव्रसंवेगें वचना । तैसेंचि काढी ॥ २६ ॥

॥ अष्टपदी ॥ ( गीतगोविंद. )

'सखि हे केशिमथनमुदारम् ।
रमय मया सह मदनमनोरथभावितया साविकारम् ॥
केशिमथनमुदारम् ॥ धृ० ॥
निभृतनिकुंजगृहं गतया निशि रहसि निलीय वसन्तम् ॥
चकितविलोकितसकलदिशा रतिरभसभरेण हसन्तम् '॥ १ ॥

हा विषमानुराग गुप्त । विप्रलंभ विख्यात । सावध परिसा समस्त । वृत्तिमैत्रिणी ॥ २७ ॥ जो वैरियांसही निजपददाता । ह्मणो-नी केशिमथन आणि उदार या दोहीं पदार्थी । विषय होणें मदनताता।

सहज आलें ॥ २८ ॥ जो मोक्षपद दे वैरिया । तो आपुलेंचि दान करी प्रिया । यालागीं सखी आणूनि तया । मया सह खेळवीं ॥ २९ ॥ तो तरी परमात्मा निर्विकार । परी मियां कामबळें तेथ कल्पिला विकार । तो भेटतांचि करुणाकर । होईल निर्विकार मीही तैसी ॥ ३० ॥ हृदयकुंजवनीं एकांतीं । मी पडले आहे विरहगती । आणि येथेंचि गुप्त तो श्रीपती । शोधोनि भेटवी सखि ! मातें ॥ ३१ ॥ मी चकित पाहते चहूंकडे । परी तें रतिभरित हास्य रोकडें । न दिसे यास्तव सखि ! फुडें । आणोनि भेटवी मजलागीं ॥ ३२ ॥

[कडव.] 'प्रथमसमागमलज्जितया पटुचाटुशतैरनुकूलम् ।
मृदुमधुरस्मितभाषितया शिथिलीकृतजघनदुकूलम् ॥
सखि हे केशिमथनमुदारम्०' ॥ २ ॥

प्रथमसमागमाचें अवसरीं । मज स्पर्शितां अमृतकरीं । प्रार्थितांही मधुरोत्तरीं । मियां लज्जाभरीं अवमानिलें ॥ ३३ ॥ दोन्ही व्हावया एक । प्रतिबंधपट्टवस्त्र होतें देख । तें वागुणमय साहजिक । शिथिल केलें जयानें ॥ ३४ ॥ आतां मृदुमधुरवचनें । नानाचरणगुणगानरचनें । आर्जवीन वृत्तिसूचनें । परी भेटवी सखि! मातें ॥ ३५ ॥ माझियें हृदयींच राहे । परी ममापराधें मज व्यक्त नोहे । परी तूं उपाय करूनी पाहें । भेटवी लवलाहे प्रिया मज ॥ ३६ ॥ मियां कंठीं न घातली मिठी । मुख चुंबितां लपविली दृष्टी । आतां अनुताप वाढतो पोटीं । केव्हां भेटी हरीची ॥ ३७ ॥ ऐसा गुप्त विप्रलंभ साधितां । जाये अंगींची पारकीयता । तेव्हां स्पष्ट विप्रलंभाची वार्ता । दिसों लागे ।३८। अंतरीं बाहेरीं उमटे शोक । शोका पाठींपोटीं व्रजनायक । तेणें जडभाव सकळीक । हारपें आधीं ॥ ३९ ॥ ज्ञानदृष्टी ब्रह्म भरलें । वृत्तीनें सखिमय अवघें देखिलें । मग जिकडे तिकडें ऐसेंचि बोले । काम धरोनी हरीचा ॥ ४० ॥ अवधिया सखियांच्या अंतःकरणीं । शांति दिसते काय ह्मणुनी । तयांस दिसे चक्रपाणी । मज न दिसे ह्मणुनि कोपे ॥ ४१ ॥ तया सविरहप्रणयकोपाचेनियोगें । पंचप्राणा धांव सवेगें । तेणें उष्णश्वासप्रयोगें । तापल्या दिशा ॥ ४२ ॥ तया तापांचियापुढें ।

अग्नीस शीतलत्व घडे । आणि शीतल चंद्रासही जोडे । औष्ण्यबाहुल्य ॥ ४३ ॥ परी लोभ अत्यंत अंतरीं । कीं प्रभु आलिंगावा सबाह्यभीतरीं । यालागीं सखियावरी । प्रेमचि स्थापी ॥ ४४ ॥ मग पाषाणातें पाहुनी । वृत्तीचिया अंगणीं । स्थिरता ऐसी कासयानीं । बहिणी! तुज ॥ ४५ ॥ ऐसी भियां प्रेमभरें । सेवा केलिया सत्वरें । मग सांग यदुवीरें । स्वीकारीजें कीं नाहीं ॥ ४६ ॥ मी पाषाण होईन सचेतन । प्रभुमंदिरा पायरी होउन । तुजसारखी सेवा करीन । परी साह्य करी मज माये ॥ ४७ ॥ घडिभरी पाहे झाडाकडे । मग तुळसीस ह्मणे माते येव्हडे । प्रफुल्लितत्व रोकडें । हरिसंगें तुज ॥ ४८ ॥ तुझा जन्म घेऊनि छाया । धरूनि रंजवीन यादवराया । परी जननी तव सहाया । अपेक्षिते ।४९। अतिसुकुमार गोविंदचरण । माझें अद्रुतहृदय तेंचि कानन । तेथ अभिमानाचे कंटक दारुण । रुततील म्हणून घाबरी ॥ ५० ॥ द्रुतहृदयमंचकावरी । येवोनि पहुडतील पूतनारी । ऐसा उपाय कांहीं करी । जननी तुलसी ॥ ५१ ॥ घडि एक मुरलीकडे । पाहोनिया पायां पडे । ह्मणे तुझा द्वेष येथोनि पुढें । करणार नाहीं ॥ ५२ ॥ मागीलियांची करी क्षमा । तुझा शब्द आवडे पुरुषोत्तमा । सखि ! मजवरील प्रेमा वाढवी तिकडुनी ॥ ५३ ॥

॥ श्लोक ॥

“ अयि मुरलि मुकुंदस्मेरवक्त्रारविंद- ॥
श्वसनमधुरसज्ञे त्वां प्रणम्याद्य याचे ॥
अधरमणिसमीपं प्राप्तवत्यां भवत्यां ॥
कथय रहसि कर्णे मद्दशां नंदसूनोः ” ॥ १ ॥

( कृष्णकर्णामृत. )

जडचेतनाचा सहज विरोध । तुजसवें तंव खेळे मुकुंद । यास्तवाचि तूं चेतन प्रसिद्ध । परी जड दिससी समाधीमुळें ॥ ५४ ॥ मुकुंदहास्यमुखमधुरसपान । यास्तव माय तुज नाहीं व्युत्थान । मीही हरिकांता परी विरहातुर ह्मणून । तुजहून गौण आहे कीं ॥ ५५ ॥ कामभोगयोग्य तूं नसतां । तुज नित्य चुंबी कमलोद्भवपिता । यास्तव निष्काम प्रेमवार्ता । तुझे ठायीं ॥ ५६ ॥ तया अमृतप्रेमाधरसमीप । गेलियाचि

साक्षेप । निजनादें सांगें अमूप । माझी दशा गोविंदा ॥ ५७ ॥ तूं सुखरसज्ञा म्हणून । तुझीही सेवा करायाकारण । विण्मूत्रादिरसज्ञा होवोन । तुझा दोघांचे चरण सेवीन कीं ॥ ५८ ॥ " तुझी विष्ठा पंढरीराया । सारभूत माझी काया " । लज्जा त्यजोनी अभंगें यया । श्री तुकाराम बोलिले ॥ ५९ ॥ तैसें करोनी अंतःकरण । मिळवो इच्छी हरीचें चरण । एवं वदतां वदतां मौन । प्रेमताटस्थ्यीं ॥ ६० ॥ तेव्हां गुरुकरुणाविश्वासवृत्तिसखी । प्रभुसमीप जाऊनि निकी । निर्गुणांतही कर्णी एकी । गोष्टी सांगे ॥६१॥ सद्गुरुपादविश्वासाविण । संकटीं सहाय देईल कवण । यालागीं तीचि जाऊन । दशा सांगे निजकन्येची ॥ ६२

॥ अष्टपदी ॥ ( गीतगोविंद )

" सा विरहे तव दीना ।।
माधव मनसिजविशिखभयादिव भावनया त्वयि लीना ॥ ध्रु० ॥
निंदति चंदनमिंदुकिरणमनुविंदति खेदमधीरम् ॥
व्यालनिलयमिलनेन गरलमिव कलयति मलयसमीरम् ॥ १ ॥

जो भक्तरक्षणानुकूल । विरहिणीभेटी उतावेळ । तो गुरुविश्वासें प्रबळ । साकार होय ॥ ६३ ॥ सखी ऐसिया तयातें । जी दशा निरूपिते । ते सावध येथें । ऐके मना ॥ ६४ ॥ तूं माधव म्हणुनि तुझेंठायीं । दारिद्र्याची वार्ता नाहीं । ऐसें असोनी शेषशायी । मत्सखी कां विरहिणी ॥ ६५ ॥ ती मदनभयेंकरून । तुझेचि ठायीं झाली लीन । म्हणजे स्वार्थी प्रेम तिचा नसून । तुझें चरण पुजूं पाहे ॥ ६६ ॥ निर्गुणीं जरी लीन । आहे ज्ञानसंपन्न । परी सगुणपरमानंदार्थे दीन । भक्तिसंपन्न ओळखे ॥ ६७ ॥ हा चंदन व्यालाधिष्ठान । यालागीं तो विषचि म्हणून । निंदी वैराग्यबळेंकरून । साजिरें तव चरण मेळवावया ॥ ६८ ॥ तैसे चंद्र आणि मलयसमीर । विषय म्हणोनि खेदकर । ओळखोनी तव चरणावर । प्रेमधरी ॥ ६९ ॥

(कडव) ' अविरलनिपतितमदनशरादिव भवदवनाय विशालम् ।
स्वहृदयमर्मणि वर्म करोति सजलनलिनीदलजालम् ॥
सा विरहे तव दीना० ' ॥ २ ॥

अगांवरी रतिवरशर । येती ते तुज न लागावे साचार । यालागीं कोमल हृदयीं विचार । तुझिया रक्षणार्थ निर्मी ॥ ७० ॥

(कडव) ' कुसुमविशिखशरतल्पमनल्पविलासकलाकमनीयम् ।
प्रतमिव तव परिरंभसुखाय करोति कुसुमशयनीयम् ॥
सा विरहे तव दीना० ' ॥ ३ ॥

बहुतविलासरमणीया । रचितसे कुसुमशय्या । ते मदनबाण असूनि यदुराया । तुज मेळवाया व्रत करी ॥ ७१ ॥ भक्ति वीरवृत्ति राहोन । व्रत करी मदनशरशयन । झडकरीं आपुलें स्तब्धपण । सांडू-नि चाल तेथवरी ॥ ७२ ॥

(कडव) ' वहति च चलितविलोचनजलभरमाननकमलमुदारम् ।
विधुमिव विकटविधुन्तुददन्तदलनगलितामृतधारम् ॥
सा विरहे तव दीना० ' ॥ ४ ॥

जलमय नयन जलदयुक्त । वदनकमल तीचे शोभत । कीं राहु-दशनघायें अमृत गळत । ऐसिया चंद्रसम शोभत वदन तीचें ॥ ७३ ॥ कीं चंद्रांतील अमृत । त्यासही टोचिती राहुदंत । यालागीं अमृताश्रयही येथ । तुजहूनि नाथ श्रेष्ठ नाहीं ॥ ७४ ॥

(कडव) ' विलिखति रहसि कुरंगमदेन भवंतमसमशरभूतम् ।
प्रणमति मकरमधो विनिधाय करे च शरं नवचूतम् ॥
सा विरहे तव दीना० ' ॥ ५ ॥

नवचूतकुसुम घेवूनि करी । मृगमदें तुझी प्रतिमा मुरारी । लिहूनि पूजननमना करी । तुज मृदु मानोनि कुसमसम ॥ ७५ ॥

(कडव) ' ध्यानलयेन पुरःपरिकल्प्य भवन्तमतीवदुरापम् ।
विलपति हसति विषीदति रोदिति चञ्चति मुञ्चति तापम् ॥
सा विरहे तव दीना० ' ॥ ६ ॥

ध्यानेंकरूनि पाहत । तेव्हां दुष्प्राप्यही तूं वाटसी प्राप्त । यालागीं हांसत । आनंदभरें ॥ ७६ ॥ पुढें लयेंकरूनि दिसे निर्गुण ।

तेथ उठूं पाहे वाचाक्रमण । तिया वृत्तीनें धरावें सगुण । ह्याचि छंद धरूनि रडतसे ॥ ७७ ॥ ह्मणे हें विदीर्ण हृदय । अज्ञोनी द्विधा न होय । यातें वाटे प्रिय । येईल पुढती ॥ ७८ ॥ कीं मियां भंगलीया क्षणीं । ही मिळेल निर्गुणीं । मग प्रियआलिंगनीं । प्रिया नव्हे । ७९ । ऐसीच आशा धरोन । तूं आपुलें करिसी धारण । तरी जड कीं चेतन । नेणवे माये ॥ ८० ॥ जडासी सर्वदां ज्ञातता । आणि सर्वसाक्षी भगवंता । तरी हृदया तुझी अवस्था । ज्ञात नोहे काय म्हणुनी ? ॥ ८१ । अथवा ज्ञात म्हणुनी चेतन । तरी तूंचि होवोनि गोपिकारमण । द्यावया अक्षय आलिंगन । समर्थ न होसि कां ? ॥ ८२ ॥ कीं ही आघवी भ्रांती । भासे विप्रलंभ भगवंतीं । क्षणक्षण प्रियकरमूर्ती । आश्लेषी चित्ता ॥ ८३ ॥ मुक्तजनीं तिरस्कारिली । ह्मणोनि अविद्या कंटाळली । आतां मदाश्रयें उपजवों लागली । प्रियमूर्तीतें ॥ ८४ ॥ आणि ऐसेंचि असेंल जरी । अविद्या ही सखी हो तरी । तिये मलीन ऐसें निर्धारी । मग मी न ह्मणे ॥ ८५ ॥ कीं वियोगतन्मय अंतःकरण । संगें प्रगटतां करुणाघन । कठोर हृदय ह्मणोनि गवेषण । नव्हे पुन्हा ॥ ८६ ॥ कीं हृदय विदीर्ण जाहलें फार । तया द्वारें पडलीं सहस्र । कोण्या द्वारें प्रकटावें म्हणोनि यदुवीर । राहे अंतर तटस्थ ॥ ८७ ॥ कीं जातां कोण्याही द्वारीं । ह्मणी मी निघेन बाहेरीं । यालागीं गुप्त अंतरींच्या अंतरीं । प्रसाद करावया मजवरी राहिला ॥ ८८ ॥ मियां शोक रोधितां जाण । हृदय फुटोनि बाहेर निघेल नारायण । म्हणोनि रडोन रडोन । हृदय रक्षी प्रियास्तव ॥ ८९ ॥ बंधन आणि भ्रांती । निःशेष नाहींत भगवंतीं । तेथ करुणाचि नाहीं मजपुरती । ह्मणोनि रडे । ९० नातरी प्रिय करुणासागर । सिंधुसाम्यें जाहला क्षार । परी अमृतत्व म्हणोनि मधुर । वेद अज्ञोनी बोलत ॥ ९१ ॥ ऐसिया नाना वृत्ती । तुजसाठीं विश्वपती । श्रवोनि शोकभागीरथी । माधुर्य चित्तीं आवेशे ॥ ९२ ॥ शोकेंचि एकाग्र होय मन । आणि तेथ जे जे भाव उपपन्न । त्या त्या भावेंकरून । तत्तद्रसास्वादन करी ॥ ९३ ॥ सहज पाहे चित्राकडे । तंव मनीं वाटे ऐसें फुडें । उभा असोनी मजपुढें । न पाहे मजकडे प्रेमदृष्टी ॥ ९४ ॥ म्हणोनी प्रणयकोपाकार । उगाचि धरूनि करी स्थानां-

सर । पुढतीं तेथेंचि येऊनि साचार । आजेंवें करुणाकर भेटेल म्हणुनि ताप वारी ॥ ९५ ॥

(कडव) 'प्रतिपदमिदमपि निगदति माधव तव चरणे पतिताहम् ।
त्वयि विमुखे मयि सपदि सुधानिधिरपि तनुते तनुदाहम् ॥
सा विरहे तव दीना०' ॥ ७ ॥

हे लक्ष्मीवल्लभा यदुपते । घडी घडी ऐसेंचि ह्मणते । तूं मज नसतां जाळिते । सुधानिधि हा ॥ ९६ ॥ ह्मणे सखिया अमृतकरा । सांग न वर्षे हालाहलधारा । याचा पिता अमधुर खरा । ह्मणोनि दया नसे यातें ॥ ९७ ॥ बहुत विरहिणीचा शाप । हा माथां वाहे कलंक पाप । तथापि पुढती द्यावया ताप । कृत-संकल्प असे हा ॥ ९८ ॥ तुजवीण हा सुधानिधि चंद्र । कर्मिया पाठवी भूमीवर । अथवा स्वर्गसुधानिधि तुजवीण शार्ङ्गधर । पाठवी बंधनीं पुण्यक्षयें ॥ ९९ ॥ ह्मणोनी चालतां अथवा स्थिर असतां । मी तुझेंचि चरणीं पतिता । लोटांगण खेळे चालतां । स्थिर असतां नतास्मि ॥ १०० ॥

(कडव) 'श्रीजयदेवभणितमिदमधिकं यदि मनसा नटनीयम् ।
हरिविरहाकुलबल्लवयुवतिसखीवचनं पठनीयम् ॥
सा विरहे तव दीना०' ॥ ८ ॥

हें जयदेववचनाचें सार । ह्याचें स्वारस्य निरूपिलें समग्र । अन्यपदार्थनिर्धार । स्पष्ट आहे ॥ १ ॥ ऐसिया सखिवचनेंकरून । सद्गुरुविश्वासवृत्तिसंगान । द्रुते चेतसि नारायण । आविर्भवे ॥ २ ॥ तेव्हां विरहिणी वृत्ती । युगपत् चरणा झोंबती । आतां स्वामिया पुढतीं । न टाकावे म्हणती ऐसें ॥ ३ ॥

॥ श्लोक ॥

निजजनसुखकारं शांतिसौभाग्यसारम् ।
मधुमातिकुचचोरं नैगमं निर्विकारम् ॥
हृदयकमलभृंगं नीरदाभांगरंगम् ।
अभिनवगुणगात्रं स्वार्यपुत्रं नतास्मः ॥ १ ॥

संकटीं रक्षितां । तुह्मीचि आह्मा मातापिता । भोजनसमयीं वात्सल्य-युक्ता । सेवा करूं तुमचीच ॥ ४ ॥ शयनसमयीं पतिव्रता । होवोनि तुह्मा दान करूं सुरता । परी न जावें भगवंता । सांडूनिया ॥ ५ ॥ माय बाप पुत्र पती । हे सर्व भाव देवावरुती । तुकारामही स्थापिती । विराण्यादी नाना अभंगीं ॥ ६ ॥

## ॥ अभंग १ ॥ ( तुकाराम. )

'माझ्या मायबापें दिलें दूरदेशीं । आतां कोणापाशीं तोंड वासो ॥ १ ॥ आडवा डोंगर हा माझा वयरी । अंतरलें दूरी पांडुरंगा ॥ २ ॥ लिहोनि पत्रिका पाठवूं कोणाहातीं । वाटतसे खंती माहेराची ॥ ३ ॥ तुका ह्मणे आह्मी लेकराच्या जाती । यावे रातोरातीं पांडुरंगा '॥ ४ ॥

## ॥ २ ॥

'हाचि नेम माझा न फिरे माघारीं । बैसलें शेजारीं गोविंदाच्या ॥ १ ॥ घर रिघोनीया झालें पट्टराणी । वरिलें सांवळें परब्रह्म ॥ २ ॥ बळीयाचा अंगसंग झाला आतां । नाहीं भय चिंता तुका ह्मणे ॥ ३ ॥

ऐसें नामदेवाचेंही वचन । प्रत्यक्षाचे घेऊं प्रमाण । तदनुसारें भावसंपन्न । झालिया लाज सांडून भजावा हरि ॥ ७ ॥

## ॥ अभंग ॥ ( नामदेव. )

'मांडीवरी घेत यशोदा सुंदरी । आळवी श्रीहरी नानायुक्ती ॥ १ ॥
तूंचि माझा प्राण तूं माझी माउली । तूं माझी बहिणूली कान्हाबाई ॥२॥
गण गोत भाऊ तूंचि माझा सखा । संसार लटीका तुजवीण ॥ ६ ॥
तूंचि माझा धनी तूं माझें जीवन । चुंबीत वदन वेळोवेळा ॥ ४ ॥"

सर्वजगत्स्पंदनेकरून । माझाही तूं चेतनमय प्राण । तया प्राणातें दुग्ध पाजावयाकारण । माउली तूं ॥ १०८ ॥ एवं मातृपितृभक्ति । निरूपिली यथा निगुती । 'संसार लटीका तुजवीण ' या युक्ती । ज्ञानें जगन्मिथ्यात्व दाविलें ॥ १०९ ॥ "तूंचि माझा धनी" या वचनेंकरून । बोलिलें माधुर्यविंदान । अन्यत् स्पष्टार्थ समजून । घेइजे मना ॥११०॥ ह्मणवूनि सर्वभावें तुझेठायीं । आवडी ठेऊं शेषशायी । तुम्ही मोकलूनि

कदाही । न जावे कोठें ॥ ११ ॥ ‘ तामन्मनस्का ’ इत्यादिवचनेंकरून । गोपीविरह उद्धवा सांगे भगवान । परी परस्पर मिळतांचि जाण । श्रीकृष्ण होय विरहरहित ॥ १२ ॥ परी प्रियेच्या अंतःकरणीं । संयोग झालियाही क्षणीं । पुढतीं जाईल कीं सोडोनी । हें वियोगभय वाटे ॥ १३ ॥ हीच योगीं वियोगवृत्ती । दृढ धरितां गर्वोपहती । येथ जे परमानंदप्राप्ती । ते अनिर्वाच्या प्रीति बोलिजे ॥ १४ ॥ एवं मुनिमतसमन्वय- । पुष्पें पूजिलें श्रीगुरुपाय । पति सुत गोत बाप माय । ज्ञानेश्वर मज । ॥ १५ ॥ हा ग्रंथ आवडी वाचिजे । ऐसें मियां कवणा ह्मणिजे । मजहूनि वरिष्ठ सहजे । अवघेचि आथी ॥ १६ ॥ ह्मणवोनि ‘ बोले तैसा चाले ’ । या तुकारामवाक्यान्वयें वहिलें । मियांचि पाहिजे केलें । सेवन याचें ॥ १७ ॥ माझा मियांचि अनुभवावा । आणि जिया मजसमान जीवा । त्यांहीं अनुमोदनीं भरावा । प्रेमें आणि निर्विघ्नत्वें ॥ १८ ॥ मम सर्वस्व ज्ञानेश्वरजननी । हें ग्रंथरहस्य अंगीं पाजोनी । अखंड ठेवोनि तुझिया चरणीं । करवी दास्य ॥ ११९ ॥

हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे ओवीछंदबद्धे

प्रीतिनर्तने माधुर्याभिनये मुख्यभक्तिरहस्यवर्णनं

नाम षष्ठः पदन्यासः ।

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

---

समाप्त.

।।श्रीज्ञानेश्वरमाउली।।

# गोविंदानन्दसुधा.[1]

जयतिजयतिविष्णोर्वाक्यभावार्थकारी । ऋतचितिसुखमूर्तिःस्वीयकाम्यानुकारी ।। शिवपुरमिवभातीन्द्राणितीरंयदीय- । द्वयचरणनखाभाध्वस्तमायांधकारम् ।। १ ।। अनध्यस्तविवर्तेऽस्मिन्गुरौवाशिवकृष्णयोः । तैलधारेवयाप्रीतिर्भक्तिःश्रुत्यनुशासनम् ।। २ ।। ज्ञातेतत्वेऽप्यगर्वायसद्गुरोर्भक्तिरिष्यते । सच्छिष्याणांसाहजिकीतद्भिदुच्छेदनेपरा ।। ३ ।। शिवभक्तिःसदाग्राह्याविश्वरागनिवृत्तये । कृष्णभक्तिःसदाग्राह्यारसास्वादापनोदिनी ।४। शिष्यप्रेम्णाजगद्बाधाद्गुरुर्हरिहरात्मकः । तद्भक्तिर्न्यापिनीग्राह्यादेवभावसमन्वयात् ।। ५ ।। देवत्वगुणरूपस्याश्रयोद्रव्यंभवेद्गुरुः । इतिन्यायेनसंचिन्त्यनात्मभिन्नंपुनश्चतत् ।। ६ ।। इतिवेदांततोज्ञात्वास्थापयेद्योगशास्त्रतः । सद्गुरावात्मानुरागंभक्तिशास्त्रेणकेवलम् ।। ७ ।। गुरुपादस्थायिभावमखंडरसतांनयेत् । काठिन्यंविषयेकुर्याद्द्रवत्वंसद्गुरोःपदे ।। ८ ।। उपायैःशास्त्रसंदिष्टैरनुक्षणमतोबुधः । एवमेवप्राक्रियावाप्यस्तुशास्त्रानुसारिणी ।। ९ ।।

---

१अस्मिन्ग्रंथेविशेषतःसद्गुरुभक्तिर्वर्णिता. तद्व्यवस्थाक्रमश्चेत्थम्. मंगलाचरणम्. भक्तिलक्षणम्. सद्गुरोःहरिहरात्मकत्वेनभावनम्. योगशास्त्रेणवेदांतशास्त्रेणचगुरौभक्तिस्थापनप्रक्रिया. भक्तिशास्त्रस्यस्वातंत्र्यम्. भक्तेस्त्रैविध्यम्. तद्भेदाश्च. तल्लक्षणानि. हरिहरयोःपरोक्षत्वम्. सद्गुरोरपरोक्षत्वम्. सद्गुरुभक्तिवैशिष्ट्यम्. वल्लभमतनिर्देशः. भक्तेर्मृदुमध्यतीव्रतालक्षणम्. भक्त्यैवानंदाविर्भावकथनम्. प्रेमैक्येऽपिसेव्यसेवकभावाविरोधः. ज्ञानेश्वरचरणेषुग्रंथसमर्पणम्. प्रकाशक.

तज्ज्ञाभायसाधनानिकाथितानिमहात्मभि: । सर्वमार्गे:स्वतंत्रोयंभक्तिमार्गोर्थ-
शद्बत: ॥ १० ॥ सूत्रादिभि:समारब्धोब्रह्मपुत्रमुखैर्यत: । समाधि-
र्भक्तियोगेनघेरंडमुनिभाषितम् ॥ ११ ॥ गौणीमध्यापराभेदाद्भक्ति:
प्रोक्तात्रिधाबुधै: । गौण्यष्टधाद्विधामध्यापरैकैवानिबोधत ॥ १२ ॥
श्रवणंकीर्तनंविष्णो:स्मरणंपादसेवनम् । अर्चनंवंदनंदास्यंसख्यंगौणी-
यमष्टधा ॥ १३ ॥ भावयेत्संसृतौदु:खंविषयेदोषदर्शनात् ।
गृहसौख्यंपरित्यज्यसाधुसंगातिमाश्रयेत् ॥ १४ ॥ निर्गुण:सगुण-
श्चैवभगवान्परमेश्वर: । ज्ञानगम्योनिर्गुणोऽसौसगुणस्त्वनुरागत: ॥ १५ ।
अनध्यस्तविवर्तोऽपिसगुणोऽयंद्विधाभवेत् । अपरोक्ष:परोक्षश्चपरोक्ष:शंक-
रोहरि: ॥ १६ ॥ अपरोक्षोगुरुर्ज्ञेयोसाधुमूर्तिसमन्वित: । अपरोक्षगुरो-
र्योगेपरोक्षत्रिरहोभवेत् ॥ १७ ॥ परोक्षप्रतिमादौचापरोक्षविरहोभवेत् ।
एवमपिह्वादिध्यायेदपरोक्षंसदैवहि ॥ १८ ॥ कुर्यात्तदर्थमेवादौश्रवणंसाधु-
वक्त्रत: । परोक्षाऽपरोक्षयोश्चसत्समन्वयहेतवे ॥१९॥ ऐतिह्येनप्रमाणेन
परोक्षाकारबोधत: । सद्गुरावपरोक्षेऽस्मिन्गुणभावंनिवेशयेत् ॥ २० ॥
आदौगुणा:परोक्षस्यमूर्तौभाव्यास्थिराबुधै: । अपरोक्षाश्रयंतेषांसद्गुरुंपरि-
कल्पयेत् ॥ २१ ॥ ऐतिह्यस्यपरोक्षस्यमूर्तौप्रस्थापयेद्गुणान् । सद्वक्त्र-
श्रवणेनैतान्मानसेस्थापयेत्पुन: ॥ २२ ॥ मानसमर्पितत्तीव्रंस्थापयेत्सद्गु-
रौपुन: । एतद्धिकीर्तनंशुद्धंश्रवणावर्तनंस्वयम् ॥ २३ ॥ श्रुतंयत्साधुव-
क्त्रेणतदुल्हासेनवर्णनम् । कीर्तनंमुनय:प्राहुर्यस्मिन्प्रेममयीतनु: ॥ २४ ॥
साकारंवर्णयेद्विष्णुंसन्निधौगुरुदेवयो: । असन्निधौनिराकारंचित्तेसाकारसंयु-
तम् ॥ २५ ॥ वाचागोविन्दवर्तिन्याकीर्तनंस्मरणंभवेत् । कीर्तनेस्याद्य-
थानन्दस्तथैकान्तेऽपिजायते ॥ २६ ॥ कर्मणामनसावाचासद्गुरो:पादसे-

---

१. शाण्डिल्यसूत्रे नारदीयभक्तिसूत्रेचाथशद्बारंभबोधनात्स्वतंत्रत्वम् ।
तथाचसूत्रे- ‘ अथातोभक्तिजिज्ञासा । अथातोभक्तिव्याख्यास्याम: ’ ।

२. तथोक्तंघेरण्डसंहितायाम् ।’ स्वकीयहृदयेध्यायेदिष्टदेवस्वरूपक-
म् । चिंतयेद्भक्तियोगेनपरमाल्हादपूर्वकम् ॥ १ ॥ आनन्दाश्रुपुलकेनदशा-
भाव:प्रजायते । समाधि:संभवेत्तेनसंभवेच्चमनोन्मनी ’ ॥ २ ॥

३. गुरावसन्निहितेऽस्तुपरोक्षंप्रतिमापादसेवनम्, सन्निहितेकिंतेनपरोक्षेण

वनम् । तनुर्वाणीमनश्चैवगुरुसेवार्थमाश्रयेत् ॥ २७ ॥ भोग्यानामुपरत्थ-
थैर्दृष्टंमानसमेववा । पंचम्यांसद्गुरुंदेवमुपचारैःसमर्चयेत् ॥ २८ ॥ पूज-
काहंकृतेर्नाशोवन्दनेनोपजायते । भगवंतमनन्यःसन्प्रणमेद्विगतत्रपः । २९
वन्दनेलाघवंदैन्यंतद्दास्येनप्रवर्द्धयेत् । भूत्वानिःसाधनंतस्मात्सख्यंसंसाधये-
द्धरौ ॥ ३० ॥ येवैनिःसाधनादीनास्तेषांनारायणःसखा । क्रीडतेतैःसहै-
वाशुभगवान्भूतभावनः ॥ ३१ ॥ भेदाश्रितोऽस्तिसंबंधस्तस्मिन्भेदमिवृ-
त्तये । सकर्त्रासख्यभक्त्यन्तंकृतंनारायणेऽर्पयेत् ॥ ३२ ॥ इयंगौण्यष्टधा-
भक्तिर्मध्यमात्वमुपागता । मध्यमात्मार्पणप्रेमलक्षणाभेदतोद्विधा ॥ ३३ ॥
ममताहंतास्पदत्वादात्मार्पणमपिद्विधा । इदंप्रत्ययनिर्दिष्टंनिविष्टंममतास्पदे
॥ ३४ ॥ मित्रगोत्रपुत्रगेहावित्तदारादिकंहरौ । शब्दादिभोग्यजातंचनिवेद्य-
ममतांत्यजेत् ॥ ३५ ॥ अत्रवैकारिकंदेहंश्रोत्रादीनीन्द्रियाण्यपि । प्राणा-
न्मनोबुद्धिमहंकारंचापिसमर्पयेत् ॥ ३६ ॥ एतदात्मार्पणंशुद्धंगृहीतंवाल्ल-
भे मैते । तत्राप्युक्तंपुनःप्रेमवर्द्धनंममसंमतम् ॥ ३७ ॥ आत्मार्पणादचि-
न्त्यश्चेद्रसास्वादस्यसंभवः । ताटस्थ्यंवाभवेत्तेनाद्वैतहानिर्भवेत्पुनः ॥३८॥
आत्मरत्यविरोधेनैवाधिकत्वनिवृत्तये । योगेप्रेम्णाविरहोपलालनानुभव-
स्थितिः ॥ ३९ ॥ यद्यापिवेदितंतत्तद्विस्मृतंसर्वमेवहि । तथापिस्मरति-

---

१. द्वितियांतपाठे दृष्टं=अपरोक्षंसद्गुरुम् । मानसं=परोक्षं देवं (प्रतिमा-
दिकं) अत्रदृष्टमानसशब्दौविभाक्तिविपरिणामेनउपचारैरित्यस्यापिविशेषण-
तयाऽन्वितौ दृष्टैः=पाद्यार्घ्यादिभिः मानसैः = मनसारचितैः (उपचारैः)

२. सेवकवद्बद्धपाणिर्भूत्वाकाङ्क्षेतिप्रतीक्ष्यकथितमकथितंवास्वामिकार्य-
करोतीतिदास्यलक्षणम्

३. 'सहस्रपरिवत्सरमितकालजातकृष्णवियोगजनिततापक्लेशानंतति-
रोभावोऽहंभगवतेकृष्णायदेहेन्द्रियप्राणान्तःकरणतद्धर्मांश्चदारागारपुत्राप्त-
वित्तेहपराण्यात्मनासहसमर्पयामिदासोऽहंकृष्णतवास्मि' । एतद्द्वयंवल्लभम-
तेऽत्यंतनिगूढम्प्रायशोश्रीमत्भागवतानुसारि । तथाप्यात्मनिवेदनानंत-
रमपिदासोऽहंकृष्णतवास्मीतियदुक्तंकृष्णवियोगजनिततापक्लेशानंताविर्भव-
नेच्छाचदर्शितेत्येतत्सर्वमस्मन्मतेप्रेमलक्षणापरासूचकम् । तथापितेषांम-
तेआत्मनिवेदनमात्रपर्यवसायित्वाद्योजनाविषये भ्रमामः ।

प्रेमचिन्हितंपुलकाश्रुभिः ॥ ४० ॥ लोकहानौनचिंतास्याद्वेदानापिचसंन्यसेत् । वेदसारंपरंज्ञात्वानिर्गुणंपरमेश्वरम् ॥ ४१ ॥ तमेवसगुणंशुद्धंगुरुदेवसमन्वितम् । अनध्यस्तविवर्तंहिसत्संगेनानुभावयेत् ॥ ४२ ॥ तस्यैवाहमितिप्रीतिर्मृदुर्जातानिवेदनात् । ममैवासौभूमिकांतांमध्यसंवेगतोनयेत् ॥ ४३ ॥ मध्यमेयंहिमाधुर्यात्परात्वमनुगच्छति । योगेवियोगेप्रीतिःस्याद्यथावैव्रजयोषिताम् ॥ ४४ ॥ अदृष्टेदर्शनोत्कंठादृष्टेविश्लेषभीरुता । दृष्टेऽदृष्टेपरंदुःखंतदप्यास्तिमहत्सुखम् ॥ ४५ ॥ अद्वैतेसहजप्रीतिःक्रियाभावंविनाहरौ । परातातेपदैरुक्तादर्शितारमणैरपि ।४६। यस्यदेवेपराभक्तिर्यथादेवेतथागुरौ । जागृत्सौषुप्तवेदाभ्यांसासमागुरुदेवयोः ।४७। माहात्म्यज्ञानसंयुक्ताप्रीतिर्वैव्रजयोषिताम् । यथातथासएवाहंभूमौरक्तिःपराभवेत् ४८ विज्ञातंसच्चिदानंदंसमाधौव्यतिरेकतः । अन्वयेनपुनस्तद्धिव्युत्थानेव्यक्ततामियात् ॥ ४९ ॥ स्थाय्येवरसतांयातःपरानंदतयाहरिः । अनध्यस्तविवर्तश्चेत्किमन्यदवशिष्यते ॥ ५० ॥ अभेदेसच्चिदानंदंभेदभातितदेवहि । अध्यस्तजातिव्यावृत्तौव्यक्तिःकृष्णशिवात्मिका ॥ ५१ ॥ सेव्यसेवकभावेऽपिनप्रेमैक्यंविनश्यति । "शिवोभूत्वाशिवंयजेदि"त्याहजननीश्रुतिः ॥ ५२ ॥ श्रीमज्ज्ञानेश्वराचार्यःसर्वभूतगुहाशयः । तच्चरणगांगंपीत्वातस्मैसर्वंसमर्पितम् ॥ ५३ ॥

श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादरूपा गोविन्दानन्दसुधा समाप्ता ।

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

१. अत्रदुःखंद्विविधम् । प्रथमंस्वभावतोद्वेष्यं । तच्चसंसाररूपंत्रिविधं । आध्यात्मिकमाधिदैवमाधिभूतमितिभेदात् । द्वितीयंतुदुःखशब्दमात्रंदुःखमिवप्रत्ययाभासमिष्टानुरागेणात्यंतव्याकुलत्वमितितत्सुखमेवानुरागत्वादेतत्साद्भिरेवानुभाव्यंनहितर्केणप्रतिपत्तुंशक्यते ।

२. तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैतीं भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगें नोहे । बोला ऐसें ॥ १ ॥ ( ज्ञानेश्वरी. )

३. "ब्रह्मभूतःप्रसन्नात्मानशोचतिनकांक्षति । समःसर्वेषुभूतेषुमद्भक्तिं लभतेपराम् " ॥ ( भगवद्गीता अ० १८ ).

॥श्रीज्ञानेश्वरमाउली॥

# ॥ श्रीज्ञानेश्वरमातृपितृभावनाष्टक ॥

**स्वागता.**

माय बाप मजला गुरुराणा ।
ये न जो श्रुतिसही अनुमाना ॥
त्यांचिया नमुनि कोमल पाया ।
ब्रह्मभूत अवघी जड काया ॥ १ ॥

**वसंततिलका.**

ताता नसोनि मजला अधिकार कांहीं ।
केलें कृतार्थ परमा करुणार्द्रता ही ॥
मी मागतो तदपि पायिं अखंड ठेवा ।
होवोनि चाकर करीन अखंड सेवा ॥ २ ॥

**उपेंद्रवज्रा.**

अखंड तूं माय अलिप्त होशी ।
अपथ्य भोगा न तथापि घेसी ॥
गर्भांत माते न पडोत कष्ट ।
स्पर्शोत ना काममदादि दुष्ट ॥ ३ ॥

---

१. पाठांतर—मागे तथापि जवळींच अखंड ठेवा । होवोनि चाकर करीन पदाब्जसेवा ॥ २ ॥

**शार्दूलविक्रीडित.**

तात मी तुमचेंचि वीर्य असुनी आश्चर्य हें वाटते ।
मायाधीन विकल्प पूर्ण हृदयीं स्वाहंकृती दाटते ॥
शुद्धी नेणुनि आपुली मदबळें मानी न वेदश्रुती ।
मोठ्याचें शिशु लोळतां बिदिवरी ही लाज कोणाप्रती ॥ ४ ॥
माते स्नेहवशें अळंदिहृदये त्वां जन्म मातें दिला ।
माझा थोर लहान चित्तिं किमपि अन्याय तो नाणिला ॥
आतां हा भवदाव फार जठरीं पीडा क्षुधा वाढवी ।
अंबे स्तन्य ह्मणोनि पाजुनि हरी तृष्णा महागाढवी ॥ ५ ॥

**वसंततिलका.**

तात वढाळ मन दावित भोगगोडी ।
याच्या पदांत चढवा सुविवेकबेडी ॥
याच्यासवें विसरतां तुमच्या पदातें ।
तैं हांसतील प्रभु सज्जन आपणातें ॥६ ॥

**शार्दूलविक्रीडित.**

आई ही शिरली घरांत सटवी सर्वांप्रति चोरुन ।
मागे सर्व नवें नवें तुजसवें ही योग्य नाहीं सुन ॥
लाथें लोटुनि जाळुनी कुमतिला बाहेर काढी त्वरें ।
शान्ती घेवुनि नोवरी तव पदा मी वंदितो आदरें ॥ ७ ॥
ज्या बाल्यीं मज घेवुनी कटिवरी तूं खेळवीशी सदा ।
आतां यौवन देवुनी वय उगी कां दाविशी आपदा ॥
कीं सरलीच दया न हें परि घडे माझीच आहे चुकी ।
आई याचितसे पदा शिशुपणा प्रेमें पुन्हा द्याल कीं ॥ ८ ॥
श्रीज्ञानेश्वर मायबाप गुरु ही श्रद्धा धरी आवडी ।
येती शुद्ध भरोनि शीघ्रहृदयीं चित्जान्हवीकावडी ॥
तें पीयूष पिवोनि मारुनि अहं पावोनिया सत्पदा ।
शेखी भक्तिसुखार्थ अष्टक जपे हें मानसा सर्वदा ॥ ९ ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमातृपितृभावनाष्टकं समाप्तम् ।
॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

—०:※:०—

# सूचनाप्रकरण.

जय जय सद्गुरु भक्तभूषणा । जय जय सद्गुरु जगन्मोहना । जय जय सद्गुरु करुणाघना । ज्ञानेश्वरा ॥ १ ॥ मागील यष्टीची सूचना । श्रुत केली सकलजनां । आतां इये यष्टीची सूचना श्रुत करिते ॥ २ ॥ श्रीनिवासपत्राआंत । मम गोपालरावसंवाद लिहिला कल्पित । येऱ्हवीं भक्तिबोधार्थ । ग्रंथ सकळ ।३। प्रीतिनर्तनादिग्रंथीं पाही । श्रीगुरुज्ञानेश्वराचीयाठायीं । मियां पतिभाव दाविला लवलाही । आवडीकरुनी ॥ ४ ॥ तैसा इतर शिष्यिणींनीं कोणीं । पतिभाव न ठेवावा श्रीगुरुचरणीं । माझा पतिभाव श्रीकृष्णीं । आणि श्रीकृष्णची ज्ञानेश्वर ह्मणोनि शोभे ॥ ५ ॥ 'गुरु कांत करोनि भुंजे' या तात वचनेंकरून । मियां पतिभावें धरिलें गुरुचरण । तैसी कोण्ही करील शिष्यीण । तरी पावेल पतन शपथची ॥ ६ ॥ स्त्रियांसी वाटे पतिभाव ठेवावा । तरी तो श्रीकृष्णींच असो द्यावा । अथवा विवाहित स्वपतीच मानावा । शिवकृष्णरूप ॥७॥ आणि श्रीगुरुचे तंव चरण । भजावे जननीभावेंकरून । ऐसी सूचना सज्जन । चित्तामाजीं असो द्या ॥ ८ ॥ आणि कांहीं पत्रीं निश्चिती । मियां पुत्रभावें स्त्रियांस सांगितली स्वभक्ति । तयाचा अभिप्राय कीं मजप्रती । व्हाव्या सर्व युवती अंबिका ॥ ९ ॥ असो ही सूचनेची काहणी । श्रीसद्गुरुज्ञानेश्वरचरणीं । ओवियासुमनावली अर्पुनी । तन्नाम घेवुनी स्थिरावले ॥ १० ॥

हरिः ॐ तत्सत् श्रीसूचनाप्रकरणं समाप्तम् ।

। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ।

# शुद्धिपत्र.

| अशुद्ध. | शुद्ध. | ओळ. | पान. |
|---|---|---|---|
| पौटराजांनां | प्रौढराजांनां | १८ | २३ |
| वेदाता | वेदांता | १४ | ८३ |
| अंकामाव | अंकाभाव | १५ | ८६ |
| दीनाबनता | दीनावनता | १४ | ८९ |
| संवोधिते | संबोधिते | १ | ९१ |
| अशान | अज्ञान | २० | ९१ |
| तं | तूं | ३ | ९४ |
| वदिती | वंदिती | १५ | ९८ |
| मुत्ति | मुक्ति | १ | १२५ |
| साक्षस | राक्षस | १० | १२५ |
| दध | दूध | ६ | १६१ |
| मी प्रभुरा | मीराप्रभु | २८ | १७५ |
| पुर्प्यें | पुष्पें | ७ | १९२ |

# विज्ञप्ति.

सर्व धार्मिक वाङ्मयभोक्ते व त्याचा प्रसार करूं इच्छिणाऱ्या सर्व सज्जनांस विनंती करण्यांत येतें कीं वऱ्हाडांतील प्रसिद्ध सत्पुरुष श्रीयुत **गुलाबरावमहाराज** यांनीं केलेले समग्र पारमार्थिक ग्रंथ आह्मी "सूक्तिरत्नावली" या नांवाखालीं नागपूर येथें श्रीज्ञानेश्वर छापखान्यांत छापून प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे.

'**सूक्तिरत्नावलीची**' प्रथम यष्टी, द्वितीय यष्टि पूर्वार्ध ( किं. प्रत्येकी १ रु.) व उत्तरार्ध (किं. १॥ रु.) हे तीन ग्रंथ छापून निघाले आहेत. तसेंच द्वितीययष्टींतील कांहीं ग्रंथ लहान मुलांमुलींना नेहमींच वाचावयाच्या अत्यंत उपयोगी—किंबहुना पाठ करावयास योग्य—असून प्रत्येक कुटुंबांत अवश्य संग्रहणीय असल्यामुळें ते स्वल्प किमतीस मिळावेत ह्मणून ग्राहकांच्या सोयीकरितां त्या त्या ग्रंथांच्या मुद्दाम निरनिराळ्या प्रती काढल्या आहेत. त्याचप्रमाणें तृतीय यष्टि छापण्याचें काम चालूच आहे. ह्या यष्टींत श्रीमद्भागवताच्या प्रथमस्कंधावर प्राकृत गद्यपद्यान्वित टीका यावयाची आहे. ह्या टीकेंत मधून मधून आणखी बरेच विषय गोंविले असून नित्य उद्भूत होणाऱ्या अनेक प्रश्नांचा श्रुति, तर्क व अनुभव ह्यांचे योगानें उत्तम रीतीनें उलगडा केला आहे. ह्याशिवाय आणखीही बरेच ग्रंथ छापण्यास तयार आहेत, परंतु द्रव्याश्रय नसल्यामुळें हें काम मागें पडलें आहे. तें सुरळीतपणें चालण्याकरितां कांहीं कायमच्या वर्गणीदारांची आवश्यकता असल्यामुळें आह्मी अशी योजना केली आहे कीं जे सद्गृहस्थ २ रुपये आगाऊ देतील ते सूक्तिरत्नावलीचे कायमचे आश्रयदाते समजले जाऊन त्यांनां ह्या रत्नावलीचे समग्र ग्रंथ मूळ किंमतीच्या पाउणपट किंमतीस देण्यांत येतील. करितां सर्व धर्माभिमानी सज्जनांनीं ही अमूल्य संधी साधून आपलें नांव पत्ता व २ रुपये पाठवून कायमच्या वर्गणीदारांचे यादींत आपलें नांव नोंदविण्याची त्वरा करावी, व अशा पवित्र सत्कार्यास अवश्य सहाय करावें अशी सविनय प्रार्थना आहे.

प्रकाशक.